# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३

सत्र–५ : पेपर–७
सत्र–६ : पेपर–१२

# प्राचीन भारताचा इतिहास

**(History of Ancient India)**

(शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१८
बी. ए. भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ४००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-645-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ इतिहास समन्वय समिती ■

अध्यक्ष - **प्राचार्य ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. व्ही. आर. पाटील**
  आर्टस् कॉलेज, कोवाड,
  ता. चंदगड, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. नंदा पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



## अभ्यास घटकांचे लेखक

| **लेखन सहभाग** | **सत्र–५ घटक क्रमांक** | **सत्र–६ घटक क्रमांक** |
|---|---|---|
| **डॉ. निरंजन कुलकर्णी**<br>मा. श्री. आण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले | १ | ४ |
| **डॉ. शर्मिला अशोक साबळे**<br>राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी | २ | – |
| **डॉ. मंजुश्री शिवाजीराव घोरपडे**<br>विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर | ३ | – |
| **डॉ. राजश्री दिलीप निकम**<br>कृष्णा महाविद्यालय, रेठरे, बुद्रुक, ता. कराड, जि. सातारा | ४ | – |
| **डॉ. विनायक जाधव**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | – | १ |
| **डॉ. माधुरी राजाराम खोत**<br>जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी | – | २ |
| **डॉ. भास्करराव कदम**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | – | ३ |

**■ संपादक ■**

**डॉ. विनायक जाधव**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

**डॉ. निरंजन कुलकर्णी**
मा. श्री. आण्णासाहेब डांगे महाविद्यालय,
हातकणंगले

## प्रस्तावना

२००७ पासून, शिवाजी विद्यापीठाने, बहिशाल विद्यार्थ्यांसाठी 'दूर शिक्षण केंद्राचा' उपक्रम राबविलेला आहे. या उपक्रमांतर्गतच, विद्यार्थ्यांसाठी 'स्वयं-अध्ययन साहित्य' निर्माण केले जाते. हे स्वयं अध्ययन साहित्य हे बी.ए.-३ च्या विद्यार्थ्यांसाठी 'प्राचीन भारताचा इतिहास' या पेपरसाठी निर्माण केलेले आहे.

सर्वप्रथम, पहिल्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना, भारतीय प्रागैतिहासिक काळ तसेच इतिहासपूर्व काळाचा परिचय करून देण्यात येत आहे. यामध्ये, अश्मयुगीन मानवी जीवनाचे विविध पैलू तसेच हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांनी अभ्यासावयाची आहे. पुढे दुसऱ्या घटकामध्ये, विद्यार्थ्यांना वैदिक संस्कृतीचा परिचय करून देण्यात येत आहे. यामध्ये, प्रथम वैदिक संस्कृती म्हणजे काय ते स्पष्ट केले जाईल. पुढे, वैदिक संस्कृतीच्या सर्व स्तरावर कसे-कसे बदल होत गेले याचा ही परिचय करून दिलेला आहे. या घटकामध्ये, दक्षिण भारतातील 'महाशिलायुगाचा' ही परिचय करून दिलेला आहे. तर तिसरे घटक आपल्याला इसपू सहाव्या शतकातील भारताच्या दुसऱ्या नागरीकरणाचा परिचय करून देईल. त्याचबरोबर, जैन आणि बौद्ध धर्मासारख्या क्रांतीकारी विचारांचाही अभ्यास या घटकामध्ये करता येईल. 'मौर्यकालीन भारत' हा चवथ्या घटकाचा अभ्यासविषय आहे. या घटकामध्ये प्रथम या काळाच्या साधनांचा परिचय करून देण्यात आलेला आहे. तसेच, या काळात मौर्यांचे साम्राज्य निर्माण कसे झाले हे स्पष्ट केलेले आहे. आणि त्यामध्येही सम्राट अशोकाने आपल्या 'धम्माची' जी देणगी दिलेली आहे त्याचाही अभ्यास करता येईल. पुढे सहाव्या सेमिस्टरची सुरुवात आपण 'सातवाहन आणि कुशाणकालीन भारत' या घटकाने करणार आहोत. यामध्ये, या काळाचा इतिहास लिहिण्यास कोणकोणती साधने आपण वापरतो यांचा परिचय करून देण्यात येईल. त्याचबरोबर, या काळामध्ये आर्थिक संपन्नता कशी निर्माण झाली, कलेचा विकास कसा झाला हे ही अभ्यासता येईल. पुढील घटकामध्ये 'गुप्त आणि वाकाटक काळामध्ये' भारतामध्ये कसे सुवर्णयुग निर्माण झाले याचा अभ्यास करता येईल. यामध्ये, या काळामध्ये भारताची साहित्य-विज्ञान आणि कला या क्षेत्रात भारताची प्रगती कशी झाली हे स्पष्ट होईल. पुढील घटकामध्ये 'गुप्तोत्तर भारत' म्हणजेच मुख्यत्वे उत्तरेकडील वर्धन तर दक्षिणेकडील चालुक्य व पल्लव घराण्यांचा परिचय करून देण्यात आलेला आहे. तर शेवटच्या घटकामध्ये इतिहासाचा अभ्यास करताना आपल्याला कोणकोणत्या ठळक शास्त्रांची मदत होते यांचा परिचय करून देण्यात आलेला आहे. यामध्ये पुरातत्त्वशास्त्र, मूर्तीशास्त्र, नाणकशास्त्र तसेच पुराभिलेखविद्या यांचा समावेश होतो.

प्रत्येक घटकामध्ये, विविध टप्प्यावर प्रश्न दिलेले आहेत. नव्या संज्ञा-संकल्पनांचा परिचय करून देण्यात आलेला आहे. तसेच, अधिक वाचनासाठी काही संदर्भ हे घटकांच्या शेवटी देण्यात आलेले आहेत.

दूर शिक्षण केंद्रासाठी, हे स्वयंअध्ययन साहित्य निर्माण करण्यास, मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी आम्हाला संधी दिली, त्याबद्दल त्यांचा आभार मानत आहोत.

**■ संपादक ■**

**डॉ. विनायक जाधव**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

**डॉ. निरंजन कुलकर्णी**
मा. श्री. आण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–७** | |
| | **प्राचीन भारताचा इतिहास** | |
| १. | प्रागैतिहास आणि इतिहासपूर्व संस्कृती | १ |
| २. | वैदिक संस्कृत | २१ |
| ३. | इ.स. पूर्व सहाव्या शतकातील भारत | ४५ |
| ४. | मौर्य काळ | ६७ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१२** | |
| | **प्राचीन भारताचा इतिहास** | |
| १. | सातवाहन आणि कुशाण | ९१ |
| २. | गुप्त आणि वाकाटक | ११८ |
| ३. | गुप्तोत्तर काळ | १४९ |
| ४. | प्राचीन भारताच्या अभ्यासाची सहाय्यकारी शास्त्रे | १६९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक - १

# प्रागैतिहास आणि इतिहासपूर्व संस्कृती

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ विभाग १ - अश्मयुग (पुराश्मयुग ते मध्याश्मयुग)

(अ) हत्यार व तयार करण्याचे तंत्र, (ब) मध्याश्मयुगीन गुहा चित्रे

१.२.२ विभाग २ - नवाश्मयुग

(अ) हत्यारे, (ब) वसाहती, (क) दक्षिणेकडील राखेचे ढिगारे

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

१.२.३ विभाग ३ - हडप्पा संस्कृती

(अ) विस्तार, (ब) नगररचना, (क) व्यापार, (ड) धर्म, (इ) मुद्रा.

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

### १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- अश्मयुगीन मानवाची हत्यारांतील प्रगती तसेच त्याची चित्रकला यांची माहिती होईल.
- नवाश्मयुगामध्ये अश्मयुगीन मानवांमध्ये कोणते क्रांतिकारक बदल झाले हे लक्षात येईल.
- हडप्पा संस्कृतीतील भारताचे पहिले नागरीकरण कळून येईल.

## १.१ प्रस्तावना

प्रागैतिहासिक (Prehistoric) काळ म्हणजे मानवाच्या इतिहासातील सुरुवातीचा कालखंड. या काळातील मानव हा मुख्यत्वे दगडी हत्यारांच्या साहाय्याने, प्रकृतीशी झुंझत होता तसेच तिच्याशी जुळवून घेत, तिला आपल्या उपयोगी आणीत होता. म्हणून या काळास 'अश्मयुग' (Stone Age) असेही म्हटले जाते. या युगामध्ये पुराश्मयुग आणि मध्याश्मयुग असे त्याच्या विकासाचे दोन टप्पे दिसतात. अर्थात, या दोही टप्प्यावर तो शिकारी आणि अन्न-संकलक असतो. तो भटका असतो. पुढे नवाश्मयुग, या विकासाच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये मात्र त्याच्या जीवनामध्ये क्रांती होते. तो शेती, पशुपालन करू लागतो. तो स्थिर होतो. यानंतर, विकासाच्या पुढच्या टप्प्यावर तो मोठी झेप घेतो. त्याला तांबे या धातूचा शोध लागतो. तो भारतातील पहिल्यावाहिल्या नगरांची निर्मिती करतो. या काळात उपजिवीकेची साधने, नगररचना-राहणीमान, सामाजिक-आर्थिक परिस्थिती इ. विविध अंगात उत्तम दर्जाचा विकास घडून येतो. या काळालाच हडप्पा संस्कृतीचा काळ असे म्हटले जाते.

भारतीय प्रागैतिहासिक तसेच इतिहासपूर्वकालीन हडप्पा संस्कृतीचा अभ्यास करताना, लिखित साधने मिळत नसल्याने तसेच जी मिळतील ती अद्याप वाचता न आल्याने, आपल्याला पुरातत्त्वीय साधनांचाच आधार घ्यावा लागतो.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ विभाग १ : अश्मयुग (पुराश्मयुग ते मध्याश्मयुग)

**(अ) हत्यारे व तयार करण्याचे तंत्र,**

**(ब) मध्याश्मयुगीन गुहा चित्रे**

**प्रागैतिहासिक संस्कृतीचा कालक्रम :** पर्यावरणातील बदल, मानवाचे प्रयोग, त्याच्या हत्यारातील-बनविण्याच्या तंत्रातील-लागणाऱ्या कच्च्या मालातील बदल इ. निकषांवर भारतीय प्रागैतिहासाचे अथवा अश्मयुगाचे साधारणत: तीन मुख्य कालखंड पडतात. जसे, पुराश्मयुग (Paleolithic) (इ.स.पू. २.५ लाख ते १०,०००); मध्याश्मयुग (Mesolithic) (इ.स.पू. १०,००० ते ८,०००) आणि नवाश्मयुग (Neolithic) (इ.स.पू. ८,००० ते ४,०००). त्याचबरोबर, वरील निकषांवरून, पुराश्मयुगाचेही तीन कालखंड पडतात, जसे, पूर्व (इ.स.पू. २.५ लाख ते १ लाख), मध्य (इ.स.पू. १ लाख ते ४००००) आणि उत्तर (इ.स.पू. ४०००० ते १००००).

या काळातील मानव हा पूर्णपणे भटका असून, मुख्यत्वे शिकार व अन्न-संकलन-मासेमारी हेच त्याचे उपजिविकेचे साधन होते. सुरुवातीच्या काळात हा गेंडा, हत्ती असे मोठे प्राणी आणि पुढे मध्याश्मयुगामध्ये जंगली वराह, चिंकारा, नीलगाय, हरणांसारख्या वेगवान आणि छोट्या प्राण्यांची तो शिकार करू लागलेला दिसतो. त्याच्या आहारात कासव, मासे यांचाही समावेश दिसून येतो. तर मध, फळे, मूळं, बिया, पानं इ. चा तो खाण्यासाठी संग्रह करीत असे. त्याची ही अवस्था अश्मयुगाच्या सर्व उपटप्प्यातून विकसित होताना दिसते. हा मानव भटका असल्यामुळे, शक्यतो हा उघड्यावरच रहात असे. तसेच गुहा/कपारींच्या आश्रयानेही रहात असे.

### (अ) हत्यारे व तयार करण्याचे तंत्र

प्रागैतिहासिक मानवाने हत्यारांसाठी मुख्यत्वे दगडांचा वापर केला. **पुराश्मयगीन** मानवाच्या विकासाबरोबरच, त्याच्या हत्यारांमध्येही विकास होत गेलेला दिसून येतो. जसे, पूर्वपुराश्मयुगात स्थानिक ठिकाणी मिळणाऱ्या दगडांच्या छिलक्यांचा (Flaes) तसेच गोट्यांचा (Pebbles) वापर करून, अनुक्रमे हातकुऱ्हाडी (Hand-axe) व तोडहत्यारे (Chopping Tools) त्याने तयार केली. तर, मध्यपुराश्मयुगात फक्त छिलक्यांचा आणि पुढे उत्तरपुराश्मयुगात दगडी पात्यांचा (Blaes) वापर त्याने केला. यासाठी त्याने मुख्यत्वे क्रिप्टो क्रिस्टलाईन सिलिसियस (Crypto-crystaline Silicious) दगडाचा वापर केला.

तर **मध्याश्मयुगीन** मानवाने मात्र छोट्या-छोट्या हत्यारांची संयुक्त हत्यारे वापरण्यास सुरुवात केली. हा आता पूर्वीपेक्षा अधिक विकसित झालेला होता. त्याने पूर्वजांच्या पाते संस्कृतीतून सूक्ष्मास्त्रांचा शोध लावला. ही सूक्ष्मास्त्रे साधारणतः टोकदार आणि विविध भौमितिक आकारांची असून, संयुक्त हत्यारे म्हणूनच यांचा उपयोग होत असे. पूर्वीप्रमाणेच त्याने यासाठी क्रिप्टो क्रिस्टलाईन दगड व संयत स्वरुपाने दाब तंत्राचा (pressure technique) वापर करुन हत्यारे निर्माण केली. अर्थातच अशा प्रकारच्या हत्यारांचा त्याला फार फायदा झाला. जसे, ही हत्यारे मुख्यत्वे संयुक्त स्वरुपाची असल्याने, कोणताही विशिष्ट आकार गृहीत धरुन हत्यारे करणे आता फारसे गरजेचे राहिलेले नाही. फक्त ही सूक्ष्मास्त्रं ज्या लाकडात/दगडात जोडायची आहे ते हव्या त्या आकारांची असले की झाले. तसेच, या काळातील हत्यारे ही पूर्वीपेक्षा वजनाने हलकी असल्याने सोबत बाळगणे हे आता अधिक सोयीचे झाले. शिवाय ही हत्यारे तुटली अथवा हरवली तरी जागच्या जागी तयार करणेही सोपे होते. विशेषतः अशा सूक्ष्मास्त्रांचा वापर करुन त्याने आपले धनुर्धारी कौशल्य विकसित केले.

### (ब)मध्याश्मयुगीन गुहा चित्रे (Rock-art)

मध्याश्मयुगीन मानवाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे गुहाचित्रे होय. साधारणतः १८६७-६८ मध्ये भारतीय पुरातत्व खात्याच्या कार्लाइल यांनी सोहागीघाट (जि. मीर्झापूर) याठिकाणी मध्याश्मयुगीन गुहाचित्रांचा शोध लावला. त्यापासून आजपर्यंत एकूण १५० गुहांचा शोध लागलेला असून त्याची १९ गटांत विभागणी होते. यातील बहुतेक गुहा (३/४) या मध्य प्रदेशातील विंध्य-सातपुडा पर्वतरांगामध्येच वसलेल्या आहेत. यामध्ये, भीमबेटकाची (भोपाळपासून ४५ किमीवर) गुहाचित्रं ही प्रातिनिधिक व प्रसिद्ध अशी आहेत. याठिकाणी जवळपास दहा किमीच्या वर्तुळात आणि सात डोंगररांगात एकूण ६०० गुहा आहेत. चांगले पर्जन्यमान, पाण्याचा बारमाही पुरवठा, हत्यारांसाठी उपयुक्त अशा दगडांचे प्रचंड साठे, विविध लहानमोठे प्राणी वसत असलेली घनदाट जंगले यामुळे या गुहांमध्ये मानवाने अगदी पूर्वपुराश्मयुगापासून याठिकाणी आश्रय घेतलेला दिसून येतो.

ही चित्रे गुहांच्या छतावर व भिंतीवर काढलेली आहेत. यासाठी या मानवाने रंगासाठी नैसर्गिक (स्थानिक खनिजांचा) रंगांचा वापर केलेला दिसून येतो. या रंगांमध्ये लाल, पांढरा, हिरवा, पिवळा यांचा विविध छटांमध्ये समावेश होतो. त्याने रंग टिकावा म्हणून हे रंग चरबी आणि डिंकामध्ये कालवून वापरलेले दिसतात. तर, प्राण्यांच्या शेपटांपासून ब्रश तयार केलेले आहेत. अर्थात, ही मुख्यत्वे रेखाचित्रे असून यामध्ये नंतर रंग भरला जाई. अभ्यासकांनी या चित्रांवरून चित्रकलेच्या एकूण १२ शैली ओळखलेल्या आहेत.

चित्रविषयांमध्ये मुख्यत्वे प्राणी व शिकारीचे प्रसंग प्रधान दिसतात. प्राण्यांचा विचार करता यामध्ये वाघ, गेंडा, हरिण, रानडुक्कर, माकड, ससे, कोल्हा इ. विविध प्राण्यांचा, त्यांच्या हालचालीसह समावेश करता येईल. त्याने, विविध भौमितिक आकारांनी यांचे शरीर सुशोभित केलेले दिसते. तर शिकारीच्या दृश्यात सामूहिक तसेच एकेकट्याने केलेल्या शिकारींची तसेच प्राण्यांना सापळ्याद्वारे पकडण्याची चित्रं आहेत. यामध्ये सूक्ष्मासस्त्र जोडलेली भाले, धनुष्य-बाण इ. हत्यारेही दिसून येतात. तसेच, मधासारखी वन्यउत्पादानं गोळा करणारी आणि मासेमारी करणारी माणसेही या चित्रांत आहेत. त्याचबरोबर, बाळाचा जन्म, त्याचे पालन-पोषण, दफनविधी अशी जीवनचक्रं दाखविणारीही चित्रं आहेत. काही अभ्यासकांना असे वाटते की ही चित्रे मानवाने निव्वळ गुहा सजवण्यासाठी काढलेली नव्हती. तर ही चित्रे काढण्यामागे त्याचा धार्मिक दृष्टिकोन असावा. कारण ही चित्रे अशा गुहांत काढलेली असत की, यांचा वापर मानव नियमितपणे रहाण्यासाठी करत नसे. शिवाय, बरीचशी चित्रेही अगोदरच्या चित्रांवर जणू काही गिरवल्यासारखी काढलेली आहेत. जसे, एखादा प्राणी, वारंवार गिरवल्यावर तो मोठ्या प्रमाणावर आपल्याला मिळेल ही त्याची श्रध्दा असावी. एकंदरीत यावरुन असे दिसते की हा मानव, पूर्वीपेक्षा सामाजिकदृष्ट्या अधिक व्यवस्थित आणि संगठित झालेला आहे. तसेच, त्याने विविध प्रकारच्या उपजिविकेची माध्यमं हाताळलेली आहेत. अशा गोष्टींमुळेच तो कोणत्याही पर्यावरणावर नियंत्रण ठेवण्यात यश मिळवू शकला असावा.

### १.२.२ विभाग २ : नवाश्मयुग

### (अ) हत्यारे, (ब) वसाहती, (क) दक्षिणेकडील राखेचे ढिगारे

नवाश्मयुग म्हणोच निओलिथिक (Neolithic) हा शब्दप्रयोग सर्वप्रथम सर जॉन लुबॉक यांनी आपल्या (१८६५) ग्रंथात केला. 'घासून गुळगुळीत केलेली दगडाची हत्यारे' ही, तो या नव्या युगाचे विशेष लक्षण मानतो. नवाश्मयुग हा मानवाच्या इतिहासातील क्रांतिकारक टप्पा होय. या काळात तो शेती करू लागला आणि घरं बांधून स्थिर होऊ लागला. या काळातील शेतीचा शोध प्रथम नाईल नदीच्या खोऱ्यात लागला. तर पशुपालनाचा शोध पश्चिम आशियामध्ये लागलेला होता. तसेच या भागातील लोक, अशा नव्या शोधांमुळे स्थिरही झालेले दिसून येतात. हे नवनवे शोध वायव्य भागातूनच भारतात आलेले दिसतात.

भारतामध्येही शेती आणि पशुपालनाचे पहिलेवहिले पुरावे नवाश्मयुगापासून मिळण्यास सुरुवात होते. ही नवाश्मयुगीन स्थळे भारतातील काही ठराविक भागात वसलेली दिसून येतात, तशीच ती आपली काही प्रादेशिक वैशिष्ट्येही घेऊन येतात. यांचे वितरण अफगाणिस्थान-बलुचिस्तान (मेहेरगढ), काश्मीर (बुर्झाहोम, गुफकराल), आग्नेय उत्तर प्रदेश (बेलन नदीचे खोरे : चौपानी मंडो, कोल्डीहवा, महागरा), उत्तर बिहार (सेनुआर, चिरांद), दक्षिण भारत (बुधिहाळ, नागार्जुनकोंडा, संगणकल्लू) असे दिसून येते. यातील मेहेरगढमध्ये तो पशुपालक तर होताच शिवाय तो आता गहू (तीन जातींचा) आणि जव (दोन जातींचा) पिकवू लागला तसेच खजूरही उगवू लागला. तसेच तो राहण्यासाठी कच्च्या विटांची आयताकार घरे बांधू लागला. हा मानव सामुहिक स्वरूपात धान्य साठवण्यासाठी विविध कक्ष असलेल्या इमारतीही बांधू लागला. पुढील हडप्पा काळातील धान्ययकोठारांची ही जणू काही नांदीच होती.

**नवाश्मयुगीन क्रांती**

'शिकार आणि अन्नसंकलक' मानवामध्ये फार मोठा बदल होऊन तो 'शेती-पशुपालन' करणारा आणि एका ठिकाणी स्थिर राहणारा मानव झाला. या बदलाला विद्वानांनी 'नवाश्मयुगीन क्रांती' असे म्हटलेले आहे. अशा या नवाश्मयुगाची ठळक लक्षणे खालीलप्रमाणे मांडता येतील.

**शेतीचा शोध :** या काळात विविध जंगली बियांचे नियंत्रितपणे पिकवणे अथवा त्यांची लागवड करणे सुरू झाले. जसे जंगली तांदळाचे नियंत्रित स्वरुपात तांदळाची शेती सुरू झाली. हा मानव आता गहू, जव, तांदूळ, वाटाणा, मूग, मसूर, कुळीथ, रागी पुढे कापूस, द्राक्षे इ. महत्त्वाची पिके घेताना दिसतो. थोडक्यात, या काळात शेतीचा शोध लागला. हा शेतीचा शोध पुढे खाजगी मालमत्तेच्या संकल्पनेला जन्म देणारा ठरला.

**पशुपालन** : तसेच, आहार आणि इतर कष्टाच्या कामासाठी योग्य अशा प्राण्यांची निवड करून, त्यांचे नियंत्रितपणे पालन सुरू झाले. यात शेळ्या-मेंढ्यांबरोबर, गुरांचाही समावेश होतो.

**स्थिर स्वरुपाची वसाहत :** वरील दोन्ही बाबींसाठी अथवा दोन्ही बाबींमुळे त्याला एका ठिकाणी स्थिर रहावे लागले. त्याने कुटुंब निर्माण केले. ही त्याची खाजगी मालमत्ता बनली. आता आपल्या कुटुंबासाठी तो घरे बांधू लागला. यावेळी प्रथम तो जमिनीखाली राहत असे पुढे तो जमिनीवर आयताकार मातीची, कुडाची, कच्च्या विटांची घरे बांधून राहू लागला.

**खेड्यांचा उदय :** या घरांतून आणि कुटुंबव्यवस्थेतून, सामाजिक संबंध अधिक घट्ट विणले गेले. यातूनच पहिल्यावहिल्या खेड्यांचा उदय झाला. तसेच धान्यकोठारे, तटबंदी, शेणाचे ढिगारे पेटवण्यासारख्या नियमित अशा रिवाजासारख्या सामुहिक वास्तू आणि कृतीही उदयास आल्या. अर्थात यावेळी काही प्रमाणात सामाजिक स्तरीकरणाबरोबरच, अन्य संस्कृती संबंधांचे संकेतही मिळू लागतात.

वरील काही सांस्कृतिक प्रक्रियांबरोबरच मृद्भांडी, घासून गुळगुळीत केलेली हत्यारे, हाडांची हत्यारे आणि अवजारे, मौल्यवान खड्यांचे मणी इ. या युगाची ठळक लक्षणे होती.

**(अ) हत्यारे**

या काळातील मानव, पूर्वजांच्या हत्यारासोबत, आता घासून गुळगुळीत केलेल्या दगडांचा वापर करू लागला. यामध्ये, कुऱ्हाडी, कुदळ, रापी (Adze), छिन्नी (Burin), रिंग स्टोन , खलबत्ता, वरवंटा यांचा समावेश होतो. या दगडांच्या हत्यारांबरोबरच तो लाकडांची व हाडांची हत्यारे वापरू लागलेला दिसतो. त्याचे हे हत्यारांचे भांडार एकंदरीतच त्याच्या शेती आणि स्थिर राहणीकडे निर्देश करते.

**(ब) वसाहती**

नवाश्मयुगीन मानवाच्या वसाहती वैविध्यपूर्ण दिसून येतात. काश्मीरसारख्या प्रदेशात तो जमिनीमध्ये खड्डे करून राहतो, उर्वरित ईशान्य आणि उत्तर भारतामध्ये तो कच्च्या विटांच्या झोपड्यांमध्ये राहतो, तर दक्षिणेकडे-कर्नाटकामध्ये त्याची घरेच मिळत नाहीत. उलट, तेथे 'राखेचे मोठमोठे ढिगारे' दिसून येतात.

काश्मीरमध्ये बुर्झाहोम येथील लोक थंडीपासून संरक्षण करण्यासाठी गर्तावासात (pit dwellings) म्हणजे जमिनीत खड्डे/घरे करून रहात असत. तर जमिनीवर या खड्ड्याच्या भोवती शंखाकृती गवताची झोपडी असावी. पुढे मात्र तो आयताकृती कुडांच्या झोपड्यात व मातीच्या विटांच्या घरांत राहू लागला. या मानवाने बैल, घोडा, शेळी समुहातील प्राणी माणसाळवले होते. यातील रेडा व गाढवाचा (घोडा समूह) वापर तो ओझी वाहण्यासाठी करीत असे. तसेच तो धान्यांचीही, किमान पोटापुरती प्राथमिक स्वरुपातील पैदास करू लागला. यामध्ये, गहू, बार्ली, जवस यांचा समावेश होतो. हे धान्य साठविण्यासाठी तसेच इतर कामांसाठी हा आता मृद्धांडी बनवू लागला. तर *गुफकराल* या ठिकाणी दगडी मात्र अधिक लांब व सुधारित अशा कुऱ्हाडी, हाडांची सुधारित अवजारे (बाणाग्र) तसेच हार्वेस्टरचा समावेश होतो. असे दिसते की हा मानव आपल्या पूर्वजांप्रमाणेच विविध संस्कृत्यांशी संबंध ठेवून होता. हा त्यांच्याशी शंख, हार यामध्ये विनिमय करताना दिसतो. बुर्झाहोम येथील गर्तावास, तर गुफकराल येथील हार्वेस्टर आणि कुत्र्याची दफने त्याचा चिनी नवाश्मयुगीन लोकांशी संपर्क दाखवितात. आणि येथे सापडलेली मृद्धांडी त्याचा पूर्व-हडप्पा काळाशी संपर्क दाखवतात. तसेच, त्याच्या दफनामध्ये प्रेतासोबत मिळालेल्या विविध वस्तूवरून असे दिसते की याच्या मरणोत्तर जीवनाबद्दलही काही श्रद्धा होत्या. थोडक्यात, काश्मीर खोऱ्यात घर, त्याच्याजवळ गोठा व सभोवती पसरलेले शेत आणि कुरण अशा पद्धतीचे एक खेडेच या काळात निर्माण झाले. याबरोबरच आता,शेती-पशुपालन करणारा आणि काही श्रद्धा बाळगणाऱ्या आणि समुहात राहणारा अशा कुटुंबवत्सल सामाजिक मानवाचाही उदय होऊ लागला. या उदयाला वायव्य भारत, मध्य आशिया, चीन यांच्याशी असणाऱ्या संपर्कांचीही जोड होती.

तर **आग्नेय उत्तर प्रदेशातील** *चौपानी* मंडो येथे मध्याश्मयुगाच्या शेवटी-शेवटी मानव निम भटका असला तरी तो काही काळासाठी स्थिर रहात असून, शेती करीत होता. याठिकाणी झोपड्या, चुली, सूक्ष्मास्त्रं, जाती, रिंग स्टोन आणि हातावर बनवलेली मृद्धांडी तसेच जंगली तांदूळ, जंगली गुराबरोबरच पाळीव शेळ्या-मेंढ्यांची हाडे मिळालेली आहेत. असे कळते की, शेती आणि पशुपालना अगोदरच या मानवाने मृद्धांड्यांचा शोध लावलेला होता. हे लक्षात ठेवले पाहिजे की येथील मृद्धांडी ही जगातील सर्वात पहिली मृद्धांडी आहेत (इ.स.पू. ९-८०००). म्हणजेच, मृद्धांडी व काही प्रमाणात दगडी जातीही त्याच्या अन्नसंग्राहक व्यवस्थेशी जोडलेली आहेत. असे दिसते की हा मानव अन्नसंग्रहणाबरोबरच, पशुपालन आणि थोडीफार शेती करून स्थिर झालेला होता असे दिसते. तर महागरा ही फक्त नवाश्मयुगीन वसाहत असून याठिकाणी एक मोठा गोठा मिळालेला आहे. या दोन्ही ठिकाणी मानव तांदूळ पिकवित होता, शेळ्या-मेंढ्या आणि गुरे पाळत होता व स्थिर झालेला होता असे दिसते. या बेलन नदीच्या खोऱ्यातील नवाश्मयुगीन संस्कृतीचा विचार करता असे दिसते की हे लोक विशेषकरून तांदळाची लागवड करीत आणि पशुपालन करीत होते. तसेच, अन्न संग्रहणाचाही एक पर्याय उपलब्ध होता. हे दगडांची अवजारे वापरीत मात्र ही पूर्वीपेक्षा अधिक सुधारित व पॉलिश केलेली असत. तसेच, मृद्धांड्यांच्या कारागिरीत एक प्रमाणबद्धता येऊ लागलेली होती. अशा या वसाहतींत कुटुंबव्यवस्था आणि समाजव्यवस्था उदयास आलेली होती.

उत्तर बिहार याठिकाणी पर्यावरणीय अनुकूलता असूनही, येथे तुलनेने फार पुढे (इ.स.पू. २०००-१६००) नवाश्मयुगीन वसाहती निर्माण झाल्या. येथे सेनुआर, चिरांद याठिकाणी नवाश्मयुगीन अवशेष मिळालेले आहेत. हा

मानव गहू, तांदूळ, जव, वटाणे आणि मसूर शिवाय हरभरा आणि मूग यांची लागवड करीत असे. शिवाय या ठिकाणी मृद्भांडी, घासून गुळगुळीत केलेली हत्यारे, हाडांची हत्यारे, मौल्यवान खड्यांचे मणी, टेराकोटाचे पुतळे इ. मिळालेले आहेत. दोन्हीही ठिकाणी हाडांची उल्लेखनीय अशी हत्यारे मिळालेली आहेत. म्हणजेच येथील मानव शेतीबरोबरच, पशुपालन तर करीत होताच तसेच आता तो आपली सौंदर्य अभिरुची ही जपू लागलेला दिसून येतो.

आसाम आणि नजिकचा हिमालय पर्वत हा प्रचंड पर्जन्यमानाचा प्रदेश असून आसाम आणि गारो, नागा या पर्वतरांगामध्ये नवाश्मयुगीन अवशेष मिळालेले आहेत (जवळपास इ.स.पू. २०००). येथील देवजाली हाडिंग याठिकाणी स्कंधयुक्त कुऱ्हाडी (schouldered celt), घासून गुळगुळीत केलेल्या कुऱ्हाडी (burnished-polished axe), दोऱ्याची नक्षी असणारी मृद्भांडी मिळालेली आहेत.

### (क) दक्षिणेकडील राखेचे ढिगारे

दक्षिण भारतामध्ये विशेष पर्यावरणीय अनुकूलता नसतानाही (पावसाचे प्रमाण २५ सेमीपेक्षा कमी) उल्लेखनीय अशा नवाश्मयुगीन वसाहती दिसून येतात. या वसाहती डोंगराळ भागात तसेच कोरड्या दख्खनच्या पठारावर मिळालेल्या आहेत. येथील नागार्जुनकोंडा, संगणकल्लू या महत्त्वाच्या वसाहती होत. यातील नागार्जुनकोंडा (इ.स.पू. २६००-१०००) येथील मानवी वसाहतीच्या सर्वात अगोदच्या स्तरांमध्ये (इ.स.पू. २५००) शेतीचे अल्पज्ञान होते आणि पशुपालन तर जवळजवळ माहीतच नव्हते. मात्र पुढील काळात मानव आता लाल रंगाची मृद्भांडी बनवू लागला. तो गुरे, शेळ्या-मेंढ्या, गाढव, वराह, घोडे आदी पशू पाळू लागला. तसेच, तो, सांबर, बारशिंग्या, चिंकारा अशा हरीण समुहातील प्राण्यांची शिकार करताना दिसतो. तसेच, हा मणीही बनवू लागला. तर विकासाच्या पुढील टप्प्यात तो धूसर अशी मृद्भांडी आणि गुळगुळीत हत्यारंही मोठ्या प्रमाणावर तयार करू लागलेला दिसतो. तसेच तो आता गर्तावासात राहू लागलेला आहे. म्हणजेच तो आता पूर्वीचे अन्नसंग्रहण बाजूला ठेवून, शेतीसह पशुपालनही करू लागलेला दिसून येते. अर्थात, शिकार आणि मासेमारी हे पर्याय सोबत होतेच. याठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की या ठिकाणी शेतीचा शोध हा पशुपालनाच्या अगोदर लागलेला आहे.

पशुपालनाचा विचार करता, दक्षिण भारतीय नवाश्मयुगाचे आणखीन एक वैशिष्ट्य आपल्यासमोर येते. ते म्हणजे 'राखेचे ढिगारे' (Ashmounds). या प्रदेशात कित्येक ठिकाणी मानवी वसाहतीपासून दूर राखेचे मोठमोठे ढिगारे दिसून येतात, जसे, बुधिहाळ, कोडेकल आणि कुपगल इ. ठिकाणी. असे दिसते की हा पशुपालक मोठ्या प्रमाणावर आणि एका विशिष्ट ठिकाणी शेण साठवून ठेवत असे. कालांतराने हा, हे शेणाचे ढिगारे पेटवून देत असावा. काही अभ्यासकांच्या मते या 'शेणाचे ढिगारे जाळणे' या कृतीला काही धार्मिक आशय असू शकतो व म्हणून, आजच्या होळीच्या सणाची पूर्वपरंपरा ही असावी. काहीही असो, यातून आपल्याला या समाज जीवनातील पशुपालनाचे महत्त्व कळते. असे दिसते की हा पशुपालक वर्षातील काही ठरावीक महिने आपली जनावरं घेऊन वसतीपासून दूर चरण्यासाठी घेऊन जात असावा. आजही सातारा भागातील पशुपालक पावसाळ्याव्यतिरिक्त उरलेले महिने आपली जनावरे घेऊन कोकणात जाताना दिसतात.

दक्षिण भारताचे नवाश्मयुगीन जीवन पाहता असे दिसते की हा मानव पायऱ्यांची शेती करून, गहू, कुळीथ, मूग आणि रागी पिकवित होता. तसेच, वजन वाहण्यासाठी तसेच नांगर चालवण्यासाठी पशूंचे पालन करीत होता. याशिवाय शिकार आणि मासेमारी हे त्याच्या अन्नवैविध्यासाठी महत्त्वाचे घटक होते. एकंदरीत असे दिसते की या मानवाच्या उपजिविकेमध्ये शेती, पशुपालन हे मुख्य घटक असून हा आता स्थिर झालेला होता.

**स्वयंअध्ययन प्रश-१**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............. या काळात मानव गुहांमध्ये चित्रे काढू लागला.

(अ) पुराश्मयुग (ब) मध्याश्मयुग (क) नवाश्मयुग (ड) ताम्रपाषाणयुग

२. ............ ही मध्याश्मयुगीन मानवाची हत्यारे होत.

(अ) हातकुऱ्हाडी (ब) सूक्ष्मास्त्रे (क) पात्यांची हत्यारे (ड) गुळगुळीत हत्यारे

३. 'राखेचे ढिगारे'हे...........या काळाचे ठळक लक्षण आहे.

(अ) पुराश्मयुग (ब) मध्याश्मयुग (क) नवाश्मयुग (ड) ताम्रपाषाणयुग

४. ............ हे एक प्रसिद्ध नवाश्मयुगीन ठिकाण होय.

(अ) बूर्झाहोम (ब) नेवासे (क) बागोर (ड) धोलावीरा

५. मध्य प्रदेशातील...........याठिकाणी गुहाचित्रे सापडलेली आहेत.

(अ) बूर्झाहोम (ब) भीमबेटका (क) बागोर (ड) धोलावीरा

**(ब) एका वाक्यात त्तरे द्या.**

१. प्रागैतिहासिक काळ म्हणजे काय ?

२. पुराश्मयुगीन मानव कोणकोणती हत्यारे तयार करीत असे ?

३. मध्याश्मयुगीन प्रसिद्ध गुहाचित्रे कोठे मिळालेली आहेत ?

४. शेती आणि पशुपालनाचा शोध कोणत्या काळात लागला ?

५. बूर्झाहोम येथील नवाश्मयुगीन मानव कोठे रहात असे ?

## १.२.३ विभाग ३ : हडप्पा संस्कृती

(अ) विस्तार, (ब) नगररचना, (क) व्यापार, (ड) धर्म, (इ) मुद्रा

- **हडप्पा संस्कृतीचा शोध व तिला हडप्पा का म्हणतात ?**

अश्मयुगानंतर भारताने ताम्रपाषाणयुगात प्रवेश केला. यास 'इतिहासपूर्व काळ' असेही म्हणतात. साधारण १८५३ व १८५६ या काळात कनिंगहॅमने हडप्पा या ठिकाणी प्राथमिक उत्खनन केल्याने तसेच लाहोर-मुलतान रेल्वेमार्गासाठी वीटा आणताना येथे एका नव्या सभ्यतेचा अंदाज आलेला होता. मात्र त्यांना या संस्कृतीचा कालनिर्णय करता आलेला नव्हता. पुढे जॉन मार्शलने एम. एस. वत्स बरोबर पुरातत्व विभागामार्फत विस्तृत प्रमाणावर उत्खनन करून या सभ्यतेचा व्यवस्थित शोध लावला (१९२१). तसेच, पुढे दयाराम साहनी यांनी हडप्पा येथे व राखालदास बॅनर्जी यांनी मोहेनजोदडो येथे उत्खनन करून हडप्पा संस्कृतीस आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून दिले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर मॉर्टिमर व्हिलर, ग्रेगरी पॉसेल, बी. बी. लाल, ए. घोष, राव, बीश्त इ. संशोधकासह इतर संशोधकांनी किमान २०० ते १५०० स्थळांचा शोध लावला. यातील कालीबंगा (राजस्थान), राखीगढी (हरियाणा), लोथल (गुजरात) तसेच धोलावीरा (गुजरात) या नगरांचा शोध आणि तेथील उत्खननं महत्त्वाची ठरली.

भारताचे पहिले नागरीकरण घडवून आणणारी ही सभ्यता मुख्यत्वे सिंधू नदीच्या खोऱ्यात विकसित झालेली असल्याने हिला 'सिंधू संस्कृती' असे म्हणले जात होते. तसेच स्थळांच्या वितरणावरून आणि काही मतांच्या अभिनेवशामुळे हिला 'सिंधू-सरस्वती' आणि 'सरस्वती संस्कृती' असेही म्हटले जाते. मात्र पुरातत्त्वशासस्त्रज्ञांच्या मते, या संस्कृतीच्या पहिल्यावहिल्या खुणा हडप्पा याठिकाणी मिळालेल्या असल्याने, यास 'हडप्पा संस्कृती' असेच म्हटले जाते. हे नाव बरेच व्यापक आणि वर्तमानकालीन विविध वादापासून निरपेक्ष असल्याने, हेच नाव सध्या सर्वत्र स्विकारलेले आहे.

### हडप्पा संस्कृतीचा कालक्रम

अशा या हडप्पा संस्कृतीचा उदय ही काही एका रात्रीत घडून आलेली घटना नव्हती. साध्या खेड्यापासून ते विकसित प्रचंड शहरापर्यंत आणि पुन्हा ऱ्हासापर्यंत, जवळजवळ अडीच-तीन हजार वर्षे प्रवास केलेली ही एक सांस्कृतिक प्रक्रिया होती. ही प्रक्रिया खालील टप्प्यातून उलगडताना दिसते. (नवाश्मयुग : इ.स.पू.८००० ते ४०००), पूर्व हडप्पा काळ (इ.स.पू. ४००० ते २६००), विकसित हडप्पा काळ (इ.स.पू. २६०० ते १८००), उत्तर-हडप्पा काळ (इ.स.पू. १८०० पासून पुढे). 'हडप्पा संस्कृती' म्हणून जी वैशिष्ट्ये आपण पाहणार आहोत ती 'विकसित हडप्पा काळामध्ये' मोडतात.

### (अ) विस्तार

आतापर्यंत हडप्पा संस्कृतीची जवळजवळ २००० स्थळं सापडलेली आहेत. मात्र यातील मोजक्या ठिकाणांचेच उत्खनन झालेले आहे. मुख्यत्वे सिंधू व सरस्वती नद्यांच्या खोऱ्यात ही संस्कृती विकसित झालेली असून, सर्वसाधारणत: तिचा विस्तार उत्तरेस सरायखोला (ईशान्य पाकिस्तान) पासून ते दक्षिणेस दायमाबाद (महाराष्ट्र) पर्यंत तर पश्चिमेस मुंडिगाक, शोर्तुघाई (अफगाणिस्तान) पासून अथवा सुत्काजेनदोरपासून (मकरान किनारा, नैर्ऋत्य पाकिस्तान) पूर्वेस

आलमगीरपूर (पश्चिम उत्तर प्रदेश) पर्यंत जवळजवळ १५-२० लाख चौ. किमी इतके क्षेत्र या सभ्यतेने व्यापलेले आहे. तर विशेषकरून भारताचा विचार करता, काश्मीर (मांडा), पंजाब (रुपर), हरीयाणा (बनावली, राखीगढी), उत्तर प्रदेश (आलमगीरपूर), राजस्थान (कालीबंगा), गुजरात (लोथल, धोलावीरा, भगतराव), महाराष्ट्र (दायमाबाद) इ. प्रदेशात, म्हणजे एकंदर १२,९९,६०० चौ.कि.मी. (दक्षिणोत्तर लांबी ११०० किमी तर पश्चिमोत्तर लांबी १५५० कि.मी.) हिचा विस्तार आढळून येतो. सर्वसाधारणत: ही संस्कृती पूर्व अफगाणिस्तान, पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम/वायव्य भारत या विस्तृत क्षेत्रात पसरलेली असून, डोंगराळ भाग, मैदानी भाग, नद्यांची खोरी, वाळवंट, समुद्रकिनारा इ. सर्व प्राकृतिक वैशिष्ट्यांत वसलेली आहे.

**(ब) नगररचना**

हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण नगरे आपल्याला मिळतात. ही नगरे एकतर नदींच्या काठावर आहेत किंवा, खनिजसंपत्तीच्या जवळ वसवलेली आहेत. या नगरांची अतिशय शिस्तबद्ध आणि व्यवस्थित अशी नगररचना असे. त्याचप्रमाणे त्या नगरांमध्ये लक्षणीय असे सार्वजनिक स्थापत्य सुद्धा आपल्याला आढळते.

या नगरांचे बालेकिल्ल्याचा भाग (Citadel) व लोकवस्तीचा भाग (Lower Town) असे दोन भाग असत. कालिबंगा या ठिकाणी मात्र काही घरे नगरांबाहेरही आढळून आलेली आहेत. ही नगरे व्यवस्थित तटबंदीने संरक्षितही केलेली असत. काही ठिकाणी सर्व वसाहतीला एक सामायिक स्वरूपाची तटबंदी आहे. तर काही ठिकाणी, या सामायिक तटबंदीसह, प्रत्येक विभागाला स्वतंत्र तटबंदी आहे. तर काही ठिकाणी फक्त बालेकिल्ल्याला तटबंदी आहे. ही तटबंदी मातीच्या विटांनी बनवलेली असे. तसेच अधिक मजबुतीसाठी, तटबंदीस, बाहेरून भाजक्या विटांच्या दुय्यम तटाने आधार दिलेला आहे. या तटबंदीवर कोपऱ्यावर तसेच विविध ठिकाणी बुरुजही (भाजीव विटांचे) बांधलेले आहेत. या बालेकिल्ल्यात प्रवेश करण्यासाठी प्रवेशद्वारं असत.

**घरे :** ही घरे साधारणत: लोकवस्तीच्या भागात दिसून येतात. ही घरे भाजीव विटांची बांधलेली असत. या घरांची 'एक चौकोनी अंगण आणि त्याच्या चारही बाजूला खोल्या' अशी रचना दिसून येते. या घरांची जमिन मातीच्या/मातीच्या विटांनी तयार केलेली असे. तर काही ठिकाणी फरश्याही बसवलेल्या होत्या. तसेच गुरांना चारा खाण्यासाठी व पाणी पिण्यासाठी अंगणात मातीच्या विटांचे एक मोठे भांडे व जमिनीत एक मडके पुरलेले असे. सर्वसाधारणत: ही घरं एकमजली आहेत. काही दुमजली घरसुद्धा दिसून येतात. काही घरांमध्ये तर जवळजवळ १२ खोल्या दिसून येतात. याही पेक्षा मोठी घरे आढळलेली असून, यामध्ये स्वयंपाकघर तसेच शौचालयांची सोयही करण्यात आलेली होती. काही धनाढ्यांच्या घरांमध्ये स्वतंत्र जलतरण तलावाचीही सोय होती असे दिसते. पाणीपुरवठ्यासाठी घरांमध्ये विहिरीची सोय केलेली दिसते. येथे सांडपाणी वाहून जाण्यासाठी उत्तम व्यवस्था असून, गटारे विटांनी बांधलेली आहेत. या घरांचे दरवाजे अरुंद गल्ल्यांमध्ये उघडत असत. काही मोठ्या घरांच्या अंगणात उघडणारा दरवाजा हा बैलगाडी जाण्याइतका मोठा केलेला दिसून येतो. या भागातील रस्ते उत्तर-दक्षिण जाणारे असून, एकमेकांना व्यवस्थित काटकोनात छेदत असत. मोहेनजोदडो येथील मोठा रस्ता हा कमीतकमी १० फूट रुंद आहे. या घरांबरोबरच, लोकवस्तीच्या भागात, घरांबरोबरच, कारागीरांच्या कार्यशाळा आणि दुकानेही होती, जसे,

कुंभारांच्या भट्ट्या, रंगाऱ्यांचे कुंड, धातूमध्ये काम करणाऱ्यांच्या, शंख-शिंपल्यांचे अलंकार करणाऱ्यांचे तसेच मणीकारांची.

नगररचनेचा विचार करता **धोलावीराचा** विशेष करून आपल्याला विचार करणे आवश्यक आहे. धोलावीरा (ता. बछाऊ, जि कच्छ) हे गुजरातमधील कच्छच्या वाळवंटातील 'खादिर' नावाच्या बेटावर बसलेले आहे. येथील नगररचना मात्र अतिशय विकसित अशा स्वरुपाची दिसून येते. याठिकाणी, बालेकिल्ला आणि लोकवस्तीचा भाग आहेच. शिवाय, वाढीव लोकसंख्येमुळे येथे लोकवस्तीचा आणखीन एक भाग निर्माण केलेला आहे. तसेच बालेकिल्ल्याजवळ एक स्वतंत्र तटबंदीची 'निवासी-कार्यालयीन संकुल' (Residencial cum Office Complex) उभारण्यात आलेले होते. येथे मुख्यत्वे व्यापारी प्रशासनाचे कार्यालय असावे. त्याचबरोबर या ठिकाणी एक 'खुले सभागृह' (Ceremonial Ground) निर्माण करण्यात आलेले होते. या नगराला एक सामायिक तटबंदी होतीच, शिवाय, प्रत्येक विभागाला, त्याची-त्याची स्वतंत्र तटबंदी होती. हे नगर आयताकृती आहे. या नगराच्या तटबंदीचा पाया जवळजवळ ११ मीटरचा होता. अधिक मजबुतीसाठी तटाला ५ मीटर रुंद मातीच्या विटांचा आधारही दिलेला होता. या तटाला चुन्याचा गिलावा देण्यात आला. मातीच्या विटा टिकून रहाव्यात तसेच कच्छचा उन्हाळा सुसह्य व्हावा यासाठी येथील घरांनाही चुन्याचा गिलावा देण्यात आलेला होता. या नगराच्या प्रवेशद्वारासमोर नगराच्या नावाचे लाकडी फलकही बसवण्यात आलेले होते. या फलकावर खाचा पाडून त्यामध्ये स्टेटाईटची १० अक्षरे (३३ सेमी उंच ह्न २७ सेमी रुंद) बसवण्यात आलेली होती.

**सार्वजनिक स्थापत्य :** यामध्ये, सार्वजनिक उपयोगाच्या विविध इमारतींचा समावेश होतो. खालीलप्रमाणे:

**महास्नानगृह :** मोहेनजोदडोच्या बालेकिल्ल्यातील महास्नानगृह हे ६०x३६ मी. असून, मध्यभागी पोहण्यासाठी १२x७ मी. चा तलाव (३ मी. खोली) होता. हे भाजीव विटांनी बांधलेले आहे. याच्या तळाशी २ ते ३ मी. रुंद अशी जमिन असून, पाणी झिरपू नये यासाठी आतील बाजूने चुन्याचा गिलावा केलेला होता. या तलावात उतरण्यासाठी पायऱ्या असून, कपडे बदलण्यासाठी तसेच पूजाविधी करण्यासाठी भोवताली खोल्याही आहेत. यात सतत पाणीपुरवठा व्हावा यासाठी जवळच एक तळे आहे तर सांडपाण्यासाठी व्यवस्था आहे.

**धान्याचे कोठार :** हडप्पा येथे नदीच्या दक्षिणेस व धान्यांच्या उंचवट्याजवळ धान्यकोठार आहे. हे कोठार एकूण ५५x३ मीटरच्या क्षेत्रात तयार केलेले आहे. यामध्ये कोठारांच्या एकूण दोन रांगा असून, प्रत्येक रांगात सहा कोठारे (प्रत्येकी १५x६ मी.) आहेत. या कोठारांचा पाया भाजीव विटांचा असून, हवा जाण्यासाठी छिद्रं तयार केलेली आहेत. या धान्यकोठारालगतच उत्तरेस रावी नदी वाहते. तर, कामगारांच्या चाळीलगतच, धान्य कुटण्यासाठी उंचवटे तयार केलेले आहेत. एकूण पाच पूर्व-पश्चिम रांगात हे उंचवटे असून, प्रत्येक रांगात सहा उंचवटे आहेत. हे उंचवटे (३.५ मी व्यासाचे) भाजीव विटांच्या वेटोळ्यांनी वेढलेले असून, त्यामुळे मध्यभागी खोलगट भाग तयार झालेले आहेत.

तसेच, मोहेनजोदडो येथे पश्चिमेस धान्याचे कोठार (५५x३७ मी) एका जोत्यावर भाजीव विटांनी बांधलेले आहे. यावर बहुधा लाकडाचे बांधकाम असावे. यामध्ये, तीन रांगात, प्रत्येकी नऊ अशा प्रकारे २७ कोठ्या आहेत.

प्रत्येक कोठ्यांच्या मधून १ मी. रुंद अशी हवा खेळती राहण्यासाठी मोकळी जागा आहे. या कोठाराच्या उत्तरेस धान्य उतरवण्यासाठी एक उंचवटाही तयार केलेला आहे.

तसेच, लोथल येथे बालेकिल्ल्याच्या भागात, धक्क्याजवळच एक मालाचे कोठार आहे. याठिकाणी एका विटांच्या उंचवट्यावर (४ फूट उंच) चार रांगात, प्रत्येकी तीन अशा १२ आयताकृती मातींच्या विटांच्या कोठ्या आहेत (क्षेत्र : १७x१४ मी.) तर हवा खेळती राहण्यासाठी प्रत्येक कोठ्यांच्यामध्ये मोकळी जागाही ठेवलेली आहे.

**राजमहाल :** मोहेनजोदडो येथे, महास्नानगृहाजवळ राजमहालाची एक लांब (२३ x ७८ फूट) इमारत आहे. या इमारतीला तीन व्हरांडे असून, समोरच ३३ चौरस फुटाचे अंगण पसरलेले आहे. तर मुंडिगाक येथे एक खांबांची रांग असलेला मोठा महालही सापडलेला आहे. हे अवशेष राजमहालासारख्या इमारतीकडे निर्देश करतात.

**सभागृह :** मोहेनजोदडो येथील सभागृह आठ मीटर लांबी रुंदीचे असून, हे चार रांगात, प्रत्येकी पाच अशा २० खांबांनी बांधलेले आहे. हे सभागृह एकूण ७५० चौ.मी. इतक्या जागेत बांधलेले आहे. असेच एक धोलावीरा येथे, बालेकिल्ल्याला जोडूनच ‘खुले सभागृह’ आढळते.

**कामगारांच्या चाळी :** हडप्पा येथे बालेकिल्याच्या वायव्येस कामगारांच्या चाळी असून त्याभोवती छोटी तटबंदी आहे. या चाळी पूर्व-पश्चिम अशा दोन रांगात वसलेल्या आहेत. यामध्ये प्रत्येक घरास (१७x७ मी.) एक खोली व अंगणाची सोय केलेली आहे.

**पाण्याची सोय :** धोलावीरा येथे पाण्याची सदैव चिंता आजही आहे. येथील स्टेज ३ अ च्या हडप्पावासियांनी याठिकाणी एक अभिनव कल्पना वास्तवात आणली. धोलावीराच्या दक्षिण व उत्तर बाजूंनी पावसातच वाहणारे नाले होते. यांनी या नाल्यांना बांध (Dam) घालून यातील पाणी शहरात वळविले. त्यांनी शहरातील तटबंदीला जोडून आतल्या बाजूस, चारी बाजूनी, थोड्या-थोड्या अंतराने तलाव (Water Reservoir) बांधलेले होते. त्यांनी नाल्याचे वळविलेले पाणी या तलावांच्या मालिकेत साठवून ठेवले व अशा रीतीने धोलावीरा समोरील पाण्याचा प्रश्न सोडविला. याशिवाय इतर ठिकाणी विहिरीची सोय दिसून येते.

**बंदर :** लोथल येथील बंदराची सोय विशेष लक्षणीय आहे. लोथल (गुजरात) हे भोगाव नदीच्या काठी वसलेले असून याठिकाणी हडप्पा संस्कृतीचे महत्त्वाचे बंदर होते. ही भोगाव नदी साबरमती नदीची एक उपनदी असून, कँबेच्या आखाताद्वारे अरबी समुद्राला जाऊन मिळते. या शहराच्या पश्चिमेस, नदीच्या बाजूने, एक बंदर (२१६ मी.उ-द x ३६ मी. पू-प) आहे. हे भाजीव विटांच्या भिंतीने (४.३ मी. उंच x १.२ मी रुंद) बंदिस्त केलेले आहे. हे बंदर नदीला एका कालव्याने (७ मी. रुंद) जोडलेले आहे. असे दिसते की व्यापारी जहाजे ही अरबी समुद्र-कँबेचे आखात-साबरमती अशा मार्गाने प्रवास करीत येत असत. पुढे ही जहाजे साबरमतीतून भोगाव नदीतून प्रवास करून, भरतीच्या वेळी, या कालव्यातून लोथलच्या बंदरामध्ये येऊन थांबत असत. पुढे, बंदराला जोडूनच एक धक्काही आहे. या धक्क्यावर हा माल उतरवला जात असे/जाहाजांत चढवला जात असे. पुढे ओहोटीच्या वेळी ही जहाजे पुहा कालवा-भोगाव नदी-साबरमती-कँबेचे आखात-अरबी समुद्र अशी जात असत.

या कालव्यातून पाण्याचा पुरवठा होत असून, बंदरामध्ये पाणी सदैव रहावे अशी व्यवस्था केलेली आहे. तसेच, अतिरिक्त पाणी वाहून जाण्यासाठी बंदराच्या दक्षिणेस एक वाटही केलली आहे.

**हडप्पा संस्कृतीतील नगररचनेची वैशिष्ट्ये**

● याठिकाणी शहराचे दोन भाग पडलेले होते, महत्त्वाच्या व्यक्तींसाठी बालेकिल्ला (Citadel) व इतर लोकांसाठी लोकवस्तीचा भाग (Lower Town). हे शक्यतो एकमेकांपासून वेगळे व स्वतंत्र तटबंदी असलेले असे होते. काही ठिकाणी एक वेगळी वस्ती तटबंदीच्या बाहेरही असे. (फक्त धोलावीरामध्ये लोकवस्तीचा भाग-२ आहे.)

● येथील नगररचना नियोजनबद्ध असून याठिकाणी भाजक्या विटांनी बांधलेल्या इमारतींचे सार्वजनिक व खाजगी असे दोन भाग पडतात. यामधील सार्वजनिक स्थापत्यात महास्नानगृह, धान्यकोठारे, सभागृह, बंदर इ.चा समावेश होतो. या सार्वजनिक स्थापत्यावर पुरोहित वर्गाचे वर्चस्व होते. तर, खाजगी स्थापत्यात ४ ते ३० खोल्यापर्यंत असणाऱ्या एक/दुमजली घरांचा समावेश होतो. ही घरे चौरस असून, मध्यभागी चौक व सभोवती खोल्या अशी रचना असे. काही घरांचे दरवाजे हे बैलगाडी ये-जा करू शकेल एवढे मोठेही असत. ही घरे रस्त्याच्या कडेला जरी असली तरी त्यांची तोंडे हे गल्ल्यात उघडणारी असत.

● याठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी साधारणत: प्रत्येक घरात विहिरीची सोय होती. तर सांडपाणी वाहून नेण्यासाठी मातींच्या विटांची बांधीव अशी गटारे होती. (धोलावीरामध्ये तलावांची मालिका आहे).

● येथील रस्ते उ-द व पू-प. जाणारे असून रुंद असत. यांना गल्लीतील रस्ते मिळत असत.

● येथे वापरलेल्या विटांचे ४:२:१ (लांबी : रुंदी : जाडी) असे प्रमाणबद्ध आकार आहेत.

● या लोकांना एकंदर शिस्तप्रियता, नियमबद्धता व स्वच्छतेची आवड दिसते. प्रमाणबद्ध वीटा, सरळ-रुंद रस्ते, उभ्या-आडव्यास छेदणाऱ्या रस्त्यांनी शहराची बुद्धिबळाच्या पटासारखी केलेली मांडणी, विहिरी, स्नानगृह, सांडपाणी व्यवस्थित वाहून नेण्यासाठी बांधीव भुयारी गटारे व सामूहिक मोठे गटार इ. वरून हडप्पा संस्कृतीची नागरी जाणीव किती प्रखर होती हे दिसून येते.

● एकंदर रचनेवरून हडप्पा संस्कृतीचे नगररचनेची नियोजनबद्धता दिसून येतेच शिवाय सामाजिक भेदाकडेही निर्देश करते. यामध्ये पुरोहित वर्गाचे धर्मिक, आर्थिक (धान्यपुरवठयावर) तसेच सामाजिक वर्चस्व दिसून येते.

● ही शहरे पूर अथवा भूकंप अशा नैसर्गिक आपत्तीमुळे ऱ्हास पावली असावीत.

**(क) व्यापार**

हडप्पा नगरातील धनाढ्य तसेच प्रभावशाली लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मुख्यत्वे दूरदेशी व्यापाराला प्रोत्साहन मिळालेले दिसते. येथील लिपीची समानता, व्यापारातील वस्तूंची विविधता व आंतरराष्ट्रीयता यावरून हे निश्चित की हडप्पा संस्कृती ही व्यापारप्रधान होती. येथील महत्त्वाची शहरे हडप्पा संस्कृतीच्या इतर शहरांबरोबरच, भारतातील दुसऱ्या शहरांशी/संस्कृतींशी तसेच आशियातील संस्कृतींशी एका व्यवस्थित व्यापारी जाळ्याने/नेटवर्कने जोडली गेली होती. लोथल हे हडप्पा संस्कृतीचे अरबी समुद्राकडे उघडणारे एक महत्त्वाचे बंदर होते.

**(अ) अंतर्गत व्यापार (केंद्रे, वस्तू, मार्ग) :** हडप्पा संस्कृतीचा प्रचंड विस्तार आणि तोही विविध स्वरुपाच्या भौगोलिक प्रदेशात झालेला होता. असे का असावे ? याचे एक कारण कच्च्या मालाची गरज हेही असू शकेल,

जसे सोने (उ. कर्नाटकातून), तांबे (खेत्री : राजस्थान), मौल्यवान दगडांमध्ये (मणी तयार करण्यासाठी) ॲमेथिस्ट (महाराष्ट्र), गोमेद/अगेट, चॅल्सिडोनी, अकिक (सौराष्ट्र) इ. अर्थात, हे संसाधान मिळवण्यासाठी विविध स्वरुपाच्या प्रदेशात काही केंद्रे निर्माण झाली. तसेच, याठिकाणी पूर्वीपासूनच काम करत असणारी केंद्रे दळणवळणाच्या साधनांनी जोडली गेलेली दिसून येतात. प्रचंड विस्ताराच्या प्रदेशात, एक समान स्वरुपाच्या अवशेषांची प्राप्ती होणे हे वरील बाबीला पुष्टी देते.

**(ब) आंतरराष्ट्रीय व्यापार (केंद्रे, वस्तू, मार्ग) :** हडप्पाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार करता मुख्यत्वे मेसोपोटेमिया आणि इराणशी होणारा व्यापार लक्षात घ्यावा लागतो. मेसोपोटेमियामधील *सूसा, ऊर, निप्पूर, किश, तेल अस्मार* अशा ठिकाणी हडप्पा संस्कृतीची शिक्के, वजन-मापे, मातीच्या तसेच टेराकोटाच्या मूर्ती, अकिकाचे मणी, नक्षीदार हाडे सापडलेले आहेत. यातील काही शिक्क्यांवर एकशिंगी प्राणी तसेच हडप्पा लिपी मिळालेली आहे.  तसेच, पर्शिया/इराण येथील फेलका, बहारीन इ. ठिकाणीही अशा प्रकारचे हडप्पा शिक्के मिळालेले आहेत.

तर हडप्पा स्थळांमध्ये मात्र मेसोपोटेमियाच्या वस्तू कमी प्रमाणावर मिळालेल्या आहेत. कदाचित असे असावे की मेसोपोटेमिया, कपडे, लोकर, वासाचे तेल, कातडी वस्तू इ. सारख्या नाशवंत मालामध्ये व्यापार करीत असल्याने या वस्तूंचे अवशेष टिकलेले नाहीत. मात्र हडप्पा स्थळांतील चांदीच्या वस्तू आणि काही लंबाकार शिक्के आणि तांब्याचा धातूपिंड निश्चितच मेसोपोटेमियाकडे बोट दाखवितात.

आपल्याला असे दिसते की अक्कडचा सम्राट सारगॉनच्या (इ.स.पू. २३५०) राजधानीत दिलमून, मगान आणि मेलुहाच्या जहाजांनी पाडाव टाकलेला होता. यातील मेलुहा म्हणजे हडप्पा बंदरे होत. तसेच मेसोपोटेमियातील प्राचीन दस्तऐवज सांगतात की उर येथील व्यापारी मेलूहातून तांबे, गोमेद, हस्तीदंत, शिंपले, वैदूर्य, मोती आयात करीत होते. असे दिसते की, पूर्व हडप्पा काळापासून या दोन प्राचीन संस्कृतींमध्ये व्यापारी देवाणघेवाण चाललेली होती. हडप्पा संस्कृतीतील काही व्यापारी समुदाय त्याठिकाणी रहात असून, संवादासाठी एक दुभाषा ही नेमलेला दिसून येतो. यावरूनच दोहोंच्यातील धनिष्ठ व्यापारी संबंध आपल्या लक्षात येऊ शकतो.

**(क) आयात व निर्यात :** यातील आयात मालांचा विचार करता चांदी (अफगाणिस्तान, इराण), मौल्यवान दगडांमध्ये (मणी तयार करण्यासाठी) वैदुर्य (बदक्शान, ईशान्य अफगाणिस्थान), नीलमणी (Turquise) (मध्य आशिया, इराण), जेड (मध्य आशिया) याचा विचार होतो. तर निर्यातीमध्ये मेसोपोटेमियाशी होणाऱ्या व्यापारात तांबे, सोने, अकिक, हस्तीदंत, मोती, कापूस, मसाल्याचे पदार्थ, वेगवेगळ्या प्रकारचे लाकूड इ. नाशवंत बाबींचा समावेश होतो.

**(ड) वजन-मापे :** येथील वजनमापांमध्येही एक प्रकारची प्रमाणबद्धता दिसून येते. या वजनांची एक मालिका असून, प्रथम दुपटीत म्हणजे १, २, ४, ८, ६४ अशी व नंतर १६ च्या पटीतील दशमान पद्धतीची म्हणजे ३२०, ६४०, १६००, ३२००, ६४०० अशी होती. येथे लांबी '३७.६ सेमी.चा एक फूट' अशी मोजपट्टीने मोजली जात होती. ही वजनं गारगोटी, जास्पर, स्टेटाईट तसेच चुनखडीपासून बनवलेली असत. तर यासाठी तांब्याचा तराजू वापरला जात असे. वजनमापांतील अशा प्रमाणबद्धतेतून हडप्पा प्रशासनाचा विस्तृत प्रदेशांवरील नियंत्रणाचा यशस्वी प्रयत्न दिसून येतो.

**(फ) वाहतुकीची साधने** : हा व्यापार विविध अशा साधनांद्वारे केला जात असे. या वाहतूक साधनांत, अंतर्गत व्यापारासाठी बैलगाड्या, बैलांचे तांडे, ऊंट यांचा वापर केला जात असे. हडप्पा येथे कांस्याची एक गाडी मिळालेली आहे, तसेच इतर ठिकाणाहून गाडीची खेळणीही मिळालेली आहेत. तसेच, दूरवरील व्यापारासाठी पशुपालक जमातीच मुख्यत्वे बैलांचे तांडे घेऊन माल वाहतुकीची कामं करीत असत. तर सागरी व्यापाराचा विचार करता, मोहेनजोदडो आणि हडप्पाच्या शिक्क्यांवर जहाज, नावांच्या आकृत्या दिसतात तर लोथलमध्ये एका जहाजाची मातीची प्रतिकृतीही मिळालेली आहे. अर्थातच, सागरी व्यापार याद्वारे केला जात असून, पश्चिम किनारपट्टीवर लोथल, बालाकोट सारखी बंदरे तर मकरान किनाऱ्यावर सुत्काजेन-डोर (पाकिस्तान आणि इराणच्या रस्त्यावर), *सुत्काकोह* अशा चौक्या दिसतात. यावरूनच हडप्पा संस्कृतीचा आंतरराष्ट्रीय व्यापार सुव्यवस्थित आणि विकसित होता हे दिसून येते.

**(ड) धर्म** : मोहेनजोदडो येथील पुराव्यावरून असे दिसते की, या ठिकाणी धर्मगुरूंची एक प्रकारे सत्ता असावी. महास्नानगृहाजवळील प्रार्थनेची जागा या धर्मगुरुंचा स्नान व पूजाविधी दर्शवितात. त्याचप्रमाणे या स्नानगृहाजवळच असणाऱ्या धान्याच्या कोठारावरून दिसून येते की या धर्मगुरुंचीच सत्ता या धान्याच्या कोठारावर म्हणजेच अर्थकारणावर असावी. असेच चित्र कालीबंगामध्येसुद्धा दिसून येते.

**(अ) पूजा/धार्मिक विधी स्थाने :** हडप्पा संस्कृतीमध्ये निश्चित अशी मंदिरांसारखी रचना दिसून येत नाही. तरी पूजास्थान अथवा काही धार्मिक विधीच्या जागा आपणास दाखवता येतात. जसे, मोहेनजोदडो येथील लोकवस्तीच्या भागामध्ये एक, मध्यवर्ती मंच असलेली मोठी इमारत मिळालेली आहे. हिला एक मोठे प्रवेशद्वार असून, मंचाकडे जाण्यासाठी दुहेरी पायऱ्याही आहेत. हे एक पूजास्थान असावे. येथील महास्नानगृहाजवळ पूजापाठासाठी खोल्या दिसून येतात. तसेच लोथल मध्येही बालेकिल्ल्यात एका उंचवट्यावर (४ मी. उंच) १२ स्नानगृहांच्या रांगा आहेत. कालीबंगामध्येही अग्नीवेदीजवळ विहीर व आंघोळीसाठी उंचवटे केलेले होते. हे पुरावे धार्मिक विधीतील स्नानाचे महत्त्व दाखवितात.

याठिकाणी कालीबंगा येथील पुरावे विशेष महत्त्वाचे आहेत. येथील बालेकिल्ल्याचे उत्तर व दक्षिण असे पुन्हा दोन समान आकाराचे (१२० मी.) भाग केलेले आहेत. यामधील दक्षिण भागात धार्मिक स्थळे आहेत. याठिकाणी मातीच्या विटांनी बांधलेले उंच जोते दिसून येतात. प्रत्येक जोत्यामध्ये मोकळी जागा ठेवलेली आहे. यातील एका जोत्यावर सात अग्नीवेदी बांधलेल्या आहेत. जवळच एक विहीर व आंघोळीसाठी उंचवटे केलेले आहेत. अर्थातच, स्नान व त्यानंतर पूजापाठ करण्याची ही जागा असावी. अशीच रचना दुसऱ्याही जोत्यावर आहे. या दक्षिण भागास दोन दरवाजे (उत्तर व दक्षिणेस) असून, पायऱ्यांची सोय केलेली आहे. म्हणजेच, या दरवाज्यातून दक्षिण भागात जायचे असेल तर पायउतार होऊनच जावे लागते. म्हणजेच या दक्षिण भागास एकप्रकारचे धार्मिक पावित्र्य व महत्त्व होते असे दिसते. तर, उत्तर भागात रस्त्याच्या दोन्ही बाजूस घरांची रांग दिसून येते. यापलिकडे कोणतीही राजकीय स्वरुपाची इमारत दिसून येत नाही. म्हणजेच, कालींबगा मध्येही एक प्रकारे पुरोहितांची सत्ता असावी. हे पुरोहित बालेकिल्ल्याच्या उत्तर भागात रहात असून, धार्मिक कार्य करण्यासाठी ते दक्षिण भागात येत असावेत. याठिकाणी इतरांना प्रवेश जरी असला तरी याठिकाणी त्यांना पायउतार होऊन नम्रपणेच जावे लागत असावे.

**(ब) दैवते :** हडप्पा संस्कृतीत सापडलेले विविध शिक्के तसेच मातीच्या आणि टेराकोटांच्या मूर्ती येथील देव-देवतांबद्दल लक्षणीय माहिती पुरवतात. याठिकाणी पुरुष, स्त्रिया, पशु-वनस्पती, संयुक्त/काल्पनिक अशा देवदेवतांचे पूजा होत असे. जसे, पशुपती. यामध्ये एक योगासनात बसलेली व्यक्ती दाखवलेली असून, ती, बकरी, हत्ती, सिंह आणि हरिणांनी घेरलेली आहे. हिच्या डोक्यावर शिंगांचा मुकुट असून, मार्शलच्या मते ही पशुपती (पुढील शिव) ची मूर्ती असावी. याचबरोबर, टेराकोटाच्या मातृदेवतांच्या मूर्तीही मिळालेल्या आहेत. यांच्या डोक्यावर पंख्याचे शिरोभूषण आहे. काही मातृदेवतांच्या मूर्ती बाळांबरोबरही दिसतात.

अशा पुरुष आणि मातृदेवतांबरोबरच, काही वृक्षदेवताही दिसून येतात. विशेषत: पिंपळाचे महत्त्व अगदी पूर्वहडप्पा काळापासून (ते आजपर्यंतही!) दिसून येते. काही शिक्क्यांवर सभोवती पार असलेला पिंपळ दाखविलेला आहे. तसेच, एका ठिकाणी एका देवतेच्या डोक्यावरील शिंगामधून एक झाड उगवताना दिसते. दुसऱ्या एका शिक्क्यावर एक लांबसडक केस असलेली देवता पिंपळाच्या फांद्यामधून वर येताना दिसते. तिच्यासमोर एक साष्टांग नमस्कार घालत आहे व सोबत सात आकृत्या आहेत. याचबरोबर प्राण्यांचेही पूजन केले जात होते. विशेषत: वशिंडयुक्त बैलही विशेष प्रिय दिसतो. काही संयुक्त/पौराणिक/काल्पनिक प्राणीही पूजले जात असावेत, जसे, नर-सिंह, एकशिंगी/युनिकॉर्न इ. तसेच, मेसोपोटेमिया पौराणिक कथांतील दोन सिंहांशी लढणारा शूर गिलगामेश सारखा देव ही पूजला जात असावा. वरील दैवतांसह, अग्नीदेवता (वेदी) सूर्यदेवतेचेही (स्वस्तिक/चक्र अशी चिन्हे) पूजत असण्याची शक्यता वर्तविली जाते.

**(क) अंत्यसंस्कार पद्धती :** अंत्यसंस्कार पद्धतीला धार्मिक जीवनात एक महत्त्वाचे स्थान असते. यातून, त्या संस्कृतीच्या मरणोत्तर जीवनावरील विश्वास आणि कल्पना दिसून येतात. हडप्पा संस्कृतीमध्ये अंत्यसंस्काराच्या विविध पद्धती दिसून आलेल्या आहेत, जसे, पूर्ण दफन, अंशत: दफन, दहनोत्तर दफन इ. येथे प्रेताला उत्तर-दक्षिण दिशेत ठेवले जात असत. तसेच, मृतदेहाचे दफन करताना त्याबरोबर शिंपल्यांच्या बांगड्या, हार, कर्णभूषण, तांब्यांचे आरसे, काजलशलाका, मातीचे लाडू, चमचे, मणी, हस्तीदंती वस्तू सोबत ठेवली जात. काही दफनं व्यवस्थित विटांनीही बनवलेली दिसून येतात. तसेच, लोथलमध्ये प्रेतांची जोडीही दिसून येते. यावरून मरणोत्तर जीवनाबद्दल त्यांच्या काही कल्पना असाव्यात असेही दिसते. यांची स्मशानभूमी शहरांपासून स्वतंत्र असे.

हडप्पा संस्कृतीतील एकंदर धार्मिक परिस्थितीचा विचार करता, विविध क्षेत्रांमध्ये विविध प्रकारचे विधी प्रचलित होते असे आढळते. जसे, कालीबंगा-लोथलमध्ये अग्नीवेदी दिसतात, मात्र इतरत्र कुठे नाही. तर, या दोघांबरोबर, मोहेनजोदडो येथे स्नानाचे पूजाविधीसाठी महत्त्व दिसते, हडप्पा मध्ये नाही. अंत्यसंस्कारामध्ये ही एक प्रेत, जोडी प्रेत, सामुहिक दफन इ. वैविध्य दिसून येते. अर्थातच, हडप्पा संस्कृतीचा प्रचंड विस्तार आणि तत्कालिन मर्यादित दळणवळण/संपर्क व्यवस्थेमुळे हे स्वाभाविकच होते. त्याचबरोबर यातून हडप्पा संस्कृतीच्या समाजजीवनाचे वैविध्यपूर्ण स्वरुप आणि तरीही सांस्कृतिक ऐक्य आपल्याला बरेच काही शिकवू पाहते!

**(इ) मुद्रा**

हडप्पा संस्कृतीमध्ये व्यापारी मालाची हमी देण्यासाठी शिक्क्यांचा वापर केला जात होता. येथे शिक्क्यांबरोबरच

(seal) शिक्क्यांच्या मुद्राही (sealings) मिळालेल्या आहेत. हडप्पा संस्कृतीतून जवळजवळ २००० पेक्षा अधिक शिक्के मिळालेले आहेत. हे साधारणत: चौकोनी असून, स्टेटाईटपासून बनवलेले असत. हे शिक्के १ ते ५ सेमी पर्यंत आकाराचे असून, साधारणत: त्यांच्या एका बाजूवर चित्र तर दुसऱ्या बाजूस अक्षरे दिसतात. यातील काही शिक्क्यांवर केवळ लिपी तर काहींवर माणूस, प्राणी, अर्ध-मानव, वनस्पती इ. आकृत्या दिसून येतात. तसेच, यांवर भौमितिक आकृत्याही दिसून येतात.

प्राण्यांच्या आकृतींचा विचार करता यामध्ये भारतीय हत्ती, रेडा, गेंडा, वाघ आणि मुख्यत्वे वशिंडयुक्त बैल दिसून येतात. त्याचप्रमाणे काही संयुक्त पशुही दिसून येतात. एका आकृतीत तर एक माणूस दाखविलेला असून, चेहरा हत्तीचा, डोक्यावर बैलाचे शिंग असून, पुढील शरीर मेंढ्याचे असून मागील वाघाचे आहे. तर काही शिक्क्यांवर पशुपती आणि मातृदेवता ही दिसून येतात. कदाचित असे शिक्के धार्मिक उपयोगासाठी वापरले जात असावेत. या मुद्रा/शिक्के त्याकाळची कलेतील प्रगती सांगतातच शिवाय त्याकाळातील लोकांचे लेखनकलेचे ज्ञान, कलेतील प्रमाणबद्धता, सभोवतालचा निसर्ग (प्राणी-पक्षी-झाडे), त्यांच्या धार्मिक कल्पना/श्रद्धा, प्रगत व्यापारही दाखवितात.

**स्वयंअध्ययन प्रश-२**

**(अ) योग्य पर्याय िवडा.**

१. ............हे महाराष्ट्रातील हडप्पा संस्कृतीचे स्थळ होय.

(अ) दायमाबाद (ब) नेवासा (क) पैठण (ड) कऱ्हाड

२. हडप्पा संस्कृतीतील महास्नानगृह............. या ठिकाणी सापडलेले आहे.

(अ) मोहेनजोदडो (ब) लोथल (क) कालीबंगा (ड) धोलावीरा

३. .............या ठिकाणी हडप्पा संस्कृतीतील बंदर सापडलेले आहे.

(अ) मोहेनजोदडो (ब) लोथल (क) कालीबंगा (ड) धोलावीरा

४. हडप्पा संस्कृतीमध्ये सोन्याची आवक............येथून होत असे.

(अ) महाराष्ट्र (ब) राजस्थान (क) कर्नाटक (ड) केरळ

५. महाराष्ट्रातून ...............ची आवक हडप्पा संस्कृतीमध्ये होत असे.

(अ) ॲमेथिस्ट (ब) तांबे (क) अगेट (ड) चॅल्सिडोनी

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. हडप्पा संस्कृतील 'हडप्पा संस्कृती' असे का म्हणतात ?

२. धोलावीराच्या नगररचनेमध्ये कोणकोणते भाग येतात ?

३. हडप्पा संस्कृतीमध्ये उद्योगासाठी लागणारा कच्चा माल कोठून येत असे ?

४. हडप्पा संस्कृतीतील कोणत्या स्थळी अग्नीवेदी आढळलेल्या आहेत ?

५. हडप्पा संस्कृतीतील शिक्के कशाचे बनवत असत ?

## २.३ सारांश

भारताच्या आद्य मानवाचा इतिहास अश्मयुगापासून सुरू होतो. तो आपल्या भोवतालच्या गोष्टींमधून, दगडाची हत्यारासाठी निवड करतो. या हत्यारांचा वापर करून तो शिकार करत असतो, अन्नसंकलन करत असतो. त्याच्या विकासाचे विविध टप्पे आपल्याला अश्मयुगाच्या विविध टप्प्यांमध्ये दिसून येतात. भटका शिकारी आणि अन् न संकलकापासून, नवाश्मयुगामध्ये त्याला शेतीचा आणि पशुपालनाचा शोध लागतो. तो गावं वसवतो. तो स्थिर होतो. यातूनच, कालांतराने, भारतामधील पहिलीवाहिली शहरे निर्माण होतात. याला हडप्पा संस्कृती म्हणतात. या काळात संस्कृतीच्या प्रत्येक अंगामध्ये प्रचंड विकास घडून येतो. भारताची पहिली नागरी सभ्यता अस्तित्वात येते.

## १.४ पारिभाषिक संज्ञा

**पुरातत्वशास्त्र** (Archaeology) **:** मानवाने हेतूपूर्वक/निर्हेतूकपणे आपल्या मागे सोडलेल्या भौतिक अवशेषांचा अभ्यास करून त्याच्या इतिहासाची पुनर्बांधणी आणि विश्लेषण करणारे शास्त्र होय.

**प्रागैतिहास** (Prehistory) **:** हा आद्य मानवाच्या इतिहासाचा कालखंड. डॅनियल विल्सन याने १८५१ मध्ये या शब्दाचा प्रयोग प्रथमत: केला. या काळाचा इतिहास लिहिताना लिखित साधनांचा अभाव जाणवतो. त्यामुळे आपल्याला पुरातत्वीय अवशेषांवरच अवलंबून रहावे लागते. दुसऱ्या शब्दात ‘लेखनकला अवगत होण्या-आधीच्या काळातील मानवाचा इतिहास म्हणजे प्रागैतिहास ’ असेही म्हटले जाते. या कालखंडात भारतातील अश्मयुग येते.

**इतिहासपूर्वकाळ** (Proto-history) **:** हा प्रागैतिहास आणि लिखित-इतिहास कालखंडाच्या मधील कालखंड. हा एक लवचिक असा कालखंड आहे. या काळामध्ये ‘हडप्पा संस्कृतीचा’, ‘वैदिक संस्कृतीचा’ (घटक २) तसेच दक्षिणेकडील ‘महाशिलायुगीन’ (घटक २) काळाचा विचार होतो. हडप्पा संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला लिखित साधने मिळतात मात्र ती वाचता येत नाही. त्यामुळे पुन्हा आपल्याला, या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी पुरातत्त्वीय साधनांवर अवलंबून रहावे लागते. तर ‘वैदिक संस्कृती’ची लिखित साधने मिळतात, ती त्याच काळातील आहेत. मात्र ती, त्याच काळातील, प्रत्यक्ष रुपाने म्हणजे आलेख किंवा भूर्जपत्र, ताडपत्र, कागद इ. स्वरुपात मिळत नाहीत. त्यामुळे या संस्कृतीला इतिहासपूर्व काळामध्येच गणले जाते. तर महाशिलायुगीन कालखंडाच्या अभ्यासासाठी फक्त पुरातत्वीय साधनेच आपल्याला मिळतात. पण त्याचवेळी, धातूतंत्रज्ञान विकसित असलेली ही संस्कृती होती. म्हणून त्यांना ‘प्रागैइतिहासा’मध्येही मोजता येत नाही. म्हणून तिची गणनाही इतिहासपूर्व काळामध्येच होते. अर्थात, ‘इतिहासपूर्व काळ’ हा कालखंड लवचिक आहे. ज्यावेळी हडप्पा संस्कृतीची लिपी वाचली जाईल, वैदिक संस्कृतीची त्याच काळातील प्रत्यक्ष स्वरुपाची लिखित साधने मिळतील आणि महाशिलायुगाची लिखित साधने मिळतील त्यावेळी ‘इतिहासपूर्व काळ’ ही संकल्पनाच संपुष्टात येईल आणि भारताच्या

इतिहासाचे प्रागैतिहास (लिखाणचे ज्ञान असण्यापूर्वीचा मानव) आणि लिखित-इतिहास (लिखाणचे ज्ञान असलेला मानव) हे दोनच कालखंड उरतील.

**शिक्का** (seal) **आणि मुद्रा** (sealing) : शिक्का हा आकृती असलेला एक लाखेचा अथवा सेलखडीचा तुकडा असून, प्रमाणीकरणासाठी याचा वापर केला जातो. तर, हा शिक्का एका गोष्टीवर मारल्यानंतर, जो छाप उठतो त्यास मुद्रा असे म्हणतात.

**नागरीकरण :** नागरीकरण हा मानवी विकासाच्या प्रक्रियेतील एक टप्पा असून, हिची, नियोजनबद्ध आणि तटबंदीयुक्त शहरे, सार्वजनिक इमारती, लोकसंख्येत वाढ, सामाजिक स्तरीकरण, शेतीतील अतिरिक्त उत्पादन, व्यवसायाचे विशेषीकरण, मोठ्या व्याप्तीचा व्यापार, प्रमाणबद्ध वस्तू आणि मानकं, वजनमापं, नाणी आणि एकंदर प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणारी व्यवस्था इ. ठळक लक्षण मांडता येतात.

## १.५ स्वयंअध्ययन प्रशाची उत्तरे

**स्वयंअध्ययन प्रश-१**

**(अ) योग्य पर्याय ििवडा.**

१. मध्याश्मयुग २. सूक्ष्मास्त्रे ३. नवाश्मयुग

४. बूर्झाहोम ५. भीमबेटका

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. प्रागैतिहासिक काळ म्हणजे मानवाच्या इतिहासातील सुरुवातीचा कालखंड. या काळातील मानव हा मुख्यत्वे दगडी हत्यारांच्या साहाय्याने, प्रकृतीशी झुंझत होता तसेच तिच्याशी जुळवून घेत, तिला आपल्या उपयोगी आणीत होता. या काळास 'अश्मयुग'असेही म्हटले जाते.

२. हातकुऱ्हाडी, तोडहत्यारे, दगडी पात्यांची हत्यारे इ.

३. भीमबेटका

४. नवाश्मयुग

५. गर्तावासामध्ये

**स्वयंअध्ययन प्रश-२**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. दायमाबाद २. मोहेनजोदडो ३. लोथल

४. कर्नाटक ५. ॲमेथिस्ट

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. या संस्कृतीच्या पहिल्यावाहिल्या खुणा हडप्पा याठिकाणी मिळालेल्या असल्याने, यास 'हडप्पा संस्कृती' असे म्हटले जाते.

२. लोकवस्तीचा भाग-१, लोकवस्तीचा भाग-२, निवासी-कार्यालयीन संकुल, सभागृह

३. सोने (उ. कर्नाटकातून), तांबे (खेत्री - राजस्थान), मौल्यवान दगडांमध्ये (मणी तयार करण्यासाठी) ॲमेथिस्ट (महाराष्ट्र), गोमेद/अगेट, चॅल्सिडोनी, अकिक (सौराष्ट्र) इ.

४. कालीबंगा

५. स्टेटाईट

## १.६ स्वाध्याय

**टीपा द्या.**

१. अश्मयुगीन हत्यारे
२. मध्याश्मयुगीन गुहाचित्रे
३. नवाश्मयुगीन वसाहती
४. धोलावीरा
५. हडप्पाकालीन धर्म

**दीर्घोत्तरी प्रश**

१. नवाश्मयुगाची माहिती द्या.

२. हडप्पा संस्कृतीतील नगररचनेची माहिती द्या.

३. हडप्पा संस्कृतीच्या व्यापाराची माहिती द्या.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


- Allchin, R. and Bridget, Rise of Civilization in India and Pakistan, CUP, Delhi. 1983.
- ढवळीकर, म. के., आर्यांच्या शोधात, राजहंस प्रकाशन, पुणे,२००८
- Ghosh, A., Encyclopaedia of Indian Archaeology, Vol. I & II, Munshiram & Manoharlal, New Delhi, 1989.
- थोरात, ए. जी. आणि निरंजन कुलकर्णी (संपा.), प्राचीन भारताचा इतिहास, बी.ए.-३/पेपर क्र.४, घटक २ ते ३, दूर शिक्षण केंद्र, स्वयं-अध्ययन साहित्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००९.
- कुलकर्णी, निरंजन (संपा.), प्राचीन भारतीय समाज, धर्म आणि संस्कृती, एम.ए.-१/पेपर क्र. HS-१०१, दूर शिक्षण केंद्र, स्वयं-अध्ययन साहित्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१३.

## घटक - २

# वैदिक संस्कृती


२.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

२.२.१ विभाग १ : वैदिक वाङ्मय

२.२.२ विभाग २ : पूर्व वेदकालीन संस्कृती

२.२.३ विभाग ३ : उत्तर वैदिक काळ

२.२.४ विभाग ४ : 'महाशिला' संस्कृती.

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक संज्ञा, संकल्पना व अर्थ

२.५ स्वयं अध्ययनाची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


### १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- वैदिक संस्कृतीची माहिती देता येईल.
- आर्यांच्या मूळ वसतिस्थानाविषयी विविध सिद्धांत स्पष्ट करता येतील.
- आर्यांच्या वैदिक साहित्याची ओळख करून देता येईल.
- पूर्व वेदकालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थिती स्पष्ट करता येईल.
- उत्तर वैदिक कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवन विशद करता येईल.
- 'महाशिला' संस्कृतीतील दफन पद्धती व अलिकडील उत्खनन मांडता येईल.

## १.१ प्रास्ताविक

सिंधू संस्कृतीनंतर प्राचीन भारताच्या इतिहासात ज्या महान संस्कृतीचा उदय झाला तिला 'वैदिक संस्कृती' या नावाने ओळखले जाते. तिची गणना जगातील प्राचीन व महानतम संस्कृतीत केली जाते. वैदिक संस्कृतीचे प्रचारक व प्रसारक आर्य होते. म्हणून तिला 'आर्य संस्कृती' असेही म्हटले जाते. हीच आर्य संस्कृती पुढे व्यापक भारतीय संस्कृतीचे स्वरूप धारण करते. आर्य भारतात बाहेरून आले व ते सप्तसिंधूच्या प्रदेशात राहिले. त्यामुळे या संस्कृतीचा उदय सप्तसिंधू प्रदेशात झाला. या संस्कृतीने मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविले. वैदिक संस्कृतीची माहिती मिळविण्यासाठी वैदिक वाङ्मय व वैदिक संस्कृतीचा अभ्यास करण्यापूर्वी आर्यांचे मूळ वसतिस्थान याविषयी माहिती घेणे आवश्यक आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ विभाग १ : वैदिक वाङ्मय

**(अ) आर्यांचे वसतिस्थान** : 'आर्य' हा शब्दप्रयोग प्रथम ऋग्वेदात केला आहे. आर्य या शब्दाचे सज्जन, मान्य, सदाचरित असे अनेक अर्थ आहेत. 'जो कर्तव्याचे पालन करतो, निषिद्ध, निंद्य, आचरण करीत नाही व सामान्यांचे शिष्टाचार पाळतो, त्याला 'आर्य' असे म्हणतात. आर्य म्हणजे सुसंस्कृत जीवनाचा संकेत होय. आर्य हा शब्द वंशवाचक किंवा वर्णवाचक नाही. तो संस्कृतिवाचक व गुणवाचक आहे. मात्र आर्य कोण ? त्यांचे मूळ वसतिस्थान कोणते ? ते भारतात कसे आले ? याविषयी संशोधकांनी विविध मते मांडलेली आहेत.

**१. मध्य आशियातील** : जर्मन अभ्यासक मॅक्समूलर व वेगेल यांनी भारतातील संस्कृत भाषेचा सखोल अभ्यास केला व वैदिक वाङ्मयात आर्यांचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला. मध्य आशियातील भाषा व आर्यांची भाषा बरीच मिळती-जुळती आहे. म्हणून मध्य आशिया हेच आर्यांचे मूळ वसतिस्थान होते, असा त्यांनी सिद्धांत मांडला.

**२. दक्षिण आशियातील** : आर्यांचे मूळ वसतिस्थान दक्षिण आशिया असल्याचा सिद्धांत प्रा. मार्स आणि प्रा. चाईल्ड यांनी मांडला.

**३. डॅन्यूबचे खोरे** : डॉ. गाईल्स यांनी Cambridge History of India मध्ये आर्यांचे मूळ वसतिस्थान डॅन्यूबचे खोरे मानले आहे. कारण त्या काळात राहण्यास योग्य अशा हंगेरी, बोहोमिया, ऑस्ट्रिया व डॅन्युब नदी (डॅन्युब खोरे)चा प्रदेश होता. वेदातील भाषा, वनस्पती, फळे, फुले ही हंगेरी या थंड प्रदेशात आढळतात म्हणून डॉ. गाईल्स व प्रा. मॅक्डोनाल्ड यांनी ते हंगेरीतील असावेत असा सिद्धांत मांडला.

**४. उत्तर ध्रुव** : ''दि ऑर्क्टिक होम इन दी वेदाज'' या ग्रंथात लो. टिळकांनी उत्तर ध्रुवाच्या आसपास आर्यांचे मूळ वसतिस्थान असावे असा सिद्धांत मांडला. पूर्वी उत्तर ध्रुव हा बर्फाच्छादित प्रदेश नव्हता. मात्र कालांतराने तेथे बर्फाळ प्रदेश निर्माण झाल्याने आर्यांनी हे मूळ वसतिस्थान सोडले व त्यातील एक टोळी दक्षिणेकडून भारतात आली असावी.

**५. सप्तसिंधू प्रदेश** : डॉ. गंगानाथ झा, संपूर्णानंद, अविनाश चंद्र दास, डी. एस. त्रिवेदी इत्यादींनी सिंधू, झेलम, चिनाब, रावी, बियास, सतलज, सरस्वती हा सप्तसिंधूंचा प्रदेश आर्यांचे मूळ वसतिस्थान होय, म्हणजे आर्य हे भारतातीलच आहेत, असा सिद्धांत मांडला. अविनाशचंद्र दास यांनी 'ऋग्वेदिक इंडिया' या ग्रंथात याविषयीचे सविस्तर वर्णन केले आहे. त्यांच्या मते, वैदिक वाङ्मयात आर्यांच्या मूळ वसतिस्थानाचा कोठेही उल्लेख नाही. वेदात उल्लेख केलेली सोमवल्ली फक्त भारतात पंजाब सारख्या प्रदेशात सापडते. तसेच वैदिक वाङ्मयात तेथील निसर्ग व सप्तसिंधूंचे प्रामुख्याने वर्णन आहे. त्यावरून त्यांनी वरील सिद्धांत मांडला.

**६. तिबेट** : स्वामी दयानंद सरस्वती, पार्जीटर आणि एडवर्ड मेयर या विचारवंतांनी आर्यांचे मूळ वसतिस्थान तिबेट असावे, तेथून ते भारतात स्थलांतरीत झाले असावेत असा सिद्धांत मांडला. 'सत्यार्थ प्रकाश' या ग्रंथात स्वामी दयानंद सरस्वती यांनी ही ऐतिहासिक परंपरा मांडली आहे.

**७. बोघाजकोई शिलालेख (नवीन पुरावा)** : जर्मन संशोधकांना आशिया मायनर मधील बोघाजकोई या ठिकाणी इ.स.पू. १३४० चा एक शिलालेख मिळाला. त्यामध्ये मिटानी व हिटाई या दोन टोळ्यांतील कराराचे वर्णन आहे. या शिलालेखात मिटानी लोकांचे देव इंद्र, मित्र, वरुण इत्यादी देवतांचे उल्लेख आहे. या देवता ऋग्वेद काळातील आर्यांचा देवदेवतांशी जुळणाऱ्या आहेत. तसेच बॅबिलोनिया येथे इ.स.पू. १७४६ ते १२५० या पाच शतकाच्या काळात राज्य करणाऱ्या कासावूट राजाची नावे आर्य सदृश्य दिसतात. यावरून उत्तर आशिया मायनर पासून बॅबिलोनिया ते मेडियापर्यंतच्या प्रदेशात आर्य संस्कृतीचा प्रभाव होता, असे दिसते.

आर्यांच्या वसतिस्थानाबद्दल संशोधकांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. तरी अलीकडील सर्वेक्षणे, नवे पुरावे यांचा विचार करता लो. टिळकांचा उत्तर ध्रुवानजीक आर्क्टिक प्रदेशातील आर्यांच्या मूळ वास्तव्यासंबंधीचा सिद्धांत सर्वमान्य होण्यासारखा आहे. हवामान तज्ज्ञांचेही मत असे आहे की उत्तर ध्रुवावरील हवामान आजच्या इतके थंड नसून मानवी वास्तव्यास आवश्यक तितके ऊबदार असावे. तरीही सर्व सिद्धांताचा विचार करता आर्य मध्य आशियातील भागात राहात असावेत असे मानण्यास हरकत नाही.

आर्य टोळ्याटोळ्यांनी भारतात आले. संशोधकांनी त्यांच्या येण्याचा काळ पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

| | | |
|---|---|---|
| मॅक्समुल्लर | - | इ.स.पू. १२०० |
| डॉ. विंटरनिटस् | - | इ.स.पू. २००० |
| लो. टिळक | - | इ.स.पू. ४००० |
| डॉ. दास | - | इ.स.पू. ५००० |

वरील प्रमाणे आर्य येण्याचा काळ सांगितला असला तरी बोघाजकाई शिलालेखावरून आर्यांच्या आगमनाचा काळ इ.स. पूर्व १५०० च्या दरम्यान असावा. त्यांनी भारतात वास्तव्य केल्यामुळे एक नवी संस्कृती, वैदिक संस्कृती किंवा आर्य संस्कृती उदयाला आली.

### २.२.१ वैदिक वाङ्मय (Vedic Culture)

वैदिक वाङ्मय हे प्राचीन आहे. ते विपूल प्रमाणात असून आर्यांचे अतिप्राचीन वाङ्मय मानले जाते. आर्यांनी भारतीय संस्कृतीस वेद वाङ्मयाच्या रूपात महत्त्वाचे योगदान दिले आहे. वेदांची निर्मिती कोणी केली व ते कोणत्या काळात लिहिले याबाबत निश्चित पुरावा नाही. त्यामुळे वेद हे 'अपौरुषेय' आणि शाश्वत मानले जातात. सर्व वैदिक वाङ्मय कोणी एका व्यक्तीने लिहिले नसून प्राचीन ऋषींनी त्यांची निर्मिती केली. ऋषींना ते सुचले. ते त्यांनी मांडले व ते मुखोद्गत करून पिढ्यानपिढ्या संक्रमित होत राहिले. वेगवेगळ्या लोकांनी रचलेल्या सूक्तांना संकलीत करून त्याचे संहितीकरण करण्यात आले. म्हणून वेदांना संहिता असे म्हणतात.

या वैदिक वाङ्मयाची प्रमुख वैशिष्ट्ये

१. पाठांतराच्या पद्धतीने निर्माण झालेले हे प्रचंड वाङ्मय कानामात्रेचाही फरक न होता हजारो वर्षे टिकलेले आहे.

२. आर्यांचे व हिंदूंचे धर्मग्रंथ म्हणून वैदिक वाङ्मयाला पवित्र व मानाचे स्थान आहे.

३. प्राचीन काळातील धार्मिक, शास्त्रीय व ललित साहित्याच्या अभ्यासाचे हेच एकमेव साधन आहे.

४. आर्यांचा इतिहास, संस्कृती व सर्वांगीण जीवनाच्या विस्तृत अभ्यासाचे हेच एकमेव साधन आहे.

५. तौलनिक भाषाशास्त्राचा अभ्यास व भारतीय आर्य व त्यांचे युरोपीय बांधव यांच्या समान पूर्वजांची माहिती मिळविणे या वाङ्मयावरूनच शक्य झाले आहे.

वेद म्हणजे काय ?

अर्थ : 'विद्' धातूपासून वेद शब्द बनला.

'विद्' म्हणजे जाणणे. वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा होतो. म्हणूनच वेद म्हणजे आर्यांचे धर्मज्ञान संग्रहीत केलेला ग्रंथ होय. आर्य समाजाला ज्या गोष्टींचे ज्ञान होते व ज्या ज्या गोष्टींचे ज्ञान त्यांनी प्राप्त करून घेतले त्याचे वर्णन वैदिक वाङ्मयात आढळते.

**वैदिक वाङ्मयाचे स्वरूप** : वैदिक वाङ्मय हे विस्तृत आहे. त्यात अनेक ग्रंथांचा समावेश आहे. आर्यांनी भारतात आल्यावर ज्या लढाया केल्या, निरीक्षण केले, देवता विकसित केल्या. सृष्टीतील चमत्कार पाहिले, अनुभवले व त्यांना जे तात्त्विक विचार सूचले त्याचे वर्णन वैदिक वाङ्मयात आहे. या काळातील आर्यांचे सर्वच साहित्य एकत्र आल्याने भाषा व विषयांच्या दृष्टीने विविधता आहे. बदलत्या काळाचे, धार्मिक आचार-विचार व संस्कृती तसेच समाज जीवनाचे दर्शन या वाङ्मयातून घडते.

**वैदिक वाङ्मयाचे प्रकार :**

वैदिक वाङ्मयाचे संहिता, ब्राह्मण्ये, आरण्यके व उपनिषदे असे प्रकार आहेत. ते पुढीलप्रमाणे -

**(१) संहिता**

संहिता म्हणजे एकत्रित केलेली ग्रंथरचना होय. वैदिक कवींना/ऋषींना हे विचार किंवा सूक्ते जेव्हा स्फुरली तेव्हा त्यांनी या सूक्तांची रचना करून ठेवली. कालांतराने अशी अनेक सूक्ते तयार झाली. या सर्व सूक्तांचे एकत्रीकरण करून त्यांची मांडणी किंवा रचना करणे आवश्यक बनले. आणि अशा एकत्रीकरणातूनच जे ग्रंथ तयार झाले त्यालाच 'संहिता' म्हणतात. 'संहिता मध्ये पुढील चार ग्रंथांचा (वेदांचा) समावेश होतो तो पुढीलप्रमाणे -

**१. ऋग्वेद :** आर्यांच्या प्रारंभीच्या जीवनाविषयी माहिती देणारा एकमेव पुरावा म्हणजे ऋग्वेद होय. हा आर्यांचा सर्वांत प्राचीन ग्रंथ होय. ऋग्वेदात एकूण १० मंडले असून त्यात १०२८ सूक्ते आहेत. त्यात ईश्वराची विविध रूपात स्तुती, यज्ञ, अध्यात्म, शत्रूचा नाश अशा कारणांसाठी प्रार्थना केलेली दिसते. ऋग्वेदाच्या शाकल, बाल्कल, ऐतरेय व कौषितकी अशा कमीत कमी चार शाखा असाव्यात असे मानले जाते. त्यापैकी आज फक्त शाकल शाखेचीच ऋग्वेद संहिता उपलब्ध आहे. ऋग्वेदातून समर्पण, विनम्रपणा, परमेश्वराशी जवळीक, वात्सल्य व भक्तीचा झरा प्रवाहीत होतो. ऋग्वेदात १०५५२ मंत्र आहेत.

**२. यजुर्वेद :** हा शब्द यजु+वेद या दोन शब्दांनी तयार झाला आहे. 'यजु'चा अर्थ यज्ञ असा आहे. यजुर्वेदाचे कृष्ण यजुर्वेद व शुक्ल यजुर्वेद असे दोन भाग आहेत. कृष्ण यजुर्वेदात यज्ञ विधीचे विवेचन आहे तर शुक्ल यजुर्वेदात मंत्र, श्लोक व यज्ञ प्रसंगी उच्चारल्या जाणाऱ्या वाक्यांच्या मंत्राचा उल्लेख केला आहे. यजुर्वेदाचा काही भाग गद्यात तर काही भाग काव्यात रचला गेला. यज्ञप्रसंगी उच्चारल्या जाणाऱ्या मंत्रांचा समावेश यजुर्वेदात आहेत. यजुर्वेद हा कर्मकांड प्रधान ग्रंथ आहे. यजुर्वेदात आर्यांचे सामाजिक, धार्मिक जीवन, वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था व भौगोलिक विस्तार यांची माहिती आहे.

**३. सामवेद :** सामवेद हा शब्द साम+वेद असा तयार झाला आहे. या 'साम'चा अर्थ संगीत आहे. यात एकंदर १८१० ऋचा आहेत. या वेदाची १६ उपनिषदे आहेत. यज्ञ प्रसंगी सामवेदाचे तालासूरात स्वतंत्र गायन होत असे. सामवेदाचे आर्चिक व उत्तरार्चिक असे दोन भाग पडतात. भारतीय संगिताच्या इतिहासाच्या दृष्टीने या वेदाचे महत्त्व अधिक आहे. हा वेद संगीतशास्त्राचे मूळ समजले जाते.

**४. अथर्ववेद :** चार वेदांपैकी अथर्ववेद हा सर्वात शेवटचा असून त्याची रचना सर्वांत शेवटी झाली. या वेदाची रचना अथर्वा ऋषींनी केल्याचे मानले जाते. या वेदात ४० अध्याय असून त्यामध्ये धर्म, सामाजिक रचना, रोग निवारण, तंत्र-विद्या इत्यादी विषयांचे वर्णन केले आहे. हा वेद भारतीय औषधी शास्त्रांचा प्राचीन ग्रंथ आहे. अथर्ववेद संहितेत ७३० सूक्ते असून त्याचे २० कांड (विभाग) आहेत. आयुर्वेद, शरीरचिकित्सा याबरोबरच जारण-मारण, विद्या, आनंद शांती, इष्टपूर्ती व शत्रूपीडा यांवरील विजयांचा यात समावेश आहे.

**(२) ब्राह्मणे :**

ऋषींनी वेदावर केलेले भाष्य म्हणजे 'ब्राह्मणे' होय. काळानुसार वेदातील अवघड भाषेचे स्पष्टीकरण करणे आवश्यक बनले. त्यातूनच ब्राह्मण ग्रंथांची निर्मिती झाली. यज्ञविधी, वैदिक मंत्र यांचे स्पष्टीकरण यामध्ये आहे.

प्रारंभी ब्राह्मणग्रंथ वेदग्रंथाला जोडूनच होते. नंतर त्यांची स्वतंत्र रचना केली गेली. ऋग्वेदाचे ऐतरेय व कौषितकी, यजुर्वेदाचे तैतरीय, शुक्ल यजुर्वेदाचे शतपथ, सामवेदाचे जैमिनीय व पंचविश आणि अथर्ववेदाचे यज्ञविधी, विशिष्ट मंत्रांचा यज्ञविधी मध्ये वापर कसा, कोणत्या पद्धतीने व केव्हा करावे याचे स्पष्टीकरण ब्राह्मण ग्रंथात आहे.

**३. आरण्यके**

अरण्यात एकांतात ज्यांचा अभ्यास करावयाचा त्यांना आरण्यके म्हणतात. ब्राह्मण ग्रंथात कर्मकांडाचे स्तोम वाढले होते. या यज्ञकर्मकांडाला कंटाळलेल्या लोकांनी यज्ञावरील विधी सोप्या भाषेत ग्रंथ लिहिले. यज्ञ विधीतील गूढवाद व प्रतिकवादाची मीमांसा आरण्यके ग्रंथात केली आहे. कर्मकांडाऐवजी चिंतन हे आरण्यक ग्रंथांनी महत्त्वाचे मानले. या काळात समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था तसेच तत्त्वज्ञान यांचे ज्ञान मिळविण्यासाठी आरण्यके ग्रंथाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो.

**४. उपनिषदे**

गुरुजवळ बसवून शिष्यास दिलेले ज्ञान असा अर्थ उपनिषदांचा होतो. उपनिषदांची संख्या १०८ आहे. त्यातील ऐतरेय, कौषितकी, तैतरीय, मैत्रायणी, बृहदारण्यक, केन, छांदोग्य, प्रश्न, मांडुक्य ही उपनिषदे महत्त्वाची आहेत. उपनिषदांचा प्रमुख विषय तत्त्वज्ञान आहे. विश्वाची उत्पत्ती, स्थिती. लय, आत्ममोक्ष, पुनर्जन्म, अंतिम सत्य, ब्रह्मस्वरूप अशा अनेक गूढ प्रश्नांच्या स्पष्टीकरणार्थ उपनिषदांची निर्मिती झाली. आर्यांच्या बौद्धिक प्रगतीचे प्रतिक म्हणजे 'उपनिषद' ग्रंथ असे मानता येते.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१**

**(अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१. लोकमान्य टिळकांच्या मते आर्य ............ येथील होते.

(अ) मध्य आशिया (ब) भारत (क) युरोप (ड) उत्तर ध्रुवीय

२. आर्य भारतात येण्याचा काळ इ.स.पू. १२०० असावा असे मत ................ यांनी मांडले.

(अ) डॉ. विंटर निट्झ (ब) लो. टिळक (क) मॅक्समूलर (ड) डॉ. दास.

३. आर्यांच्या प्रारंभीच्या जीवनाविषयी माहिती देणारा एकमेव पुरावा म्हणजे ........... होय.

(अ) सामवेद (ब) यजुर्वेद (क) अथर्ववेद (ड) ऋग्वेद

४. ऋषींनी वेदावर केलेले भाष्य म्हणजे ........... होय.

(अ) संहिता (ब) ब्राह्मण्ये (क) आरण्यके (ड) उपनिषदे

५. उपनिषदांची संख्या ......... आहे.

(अ) १०८ (२) २०८ (क) १०४ (ड) २०४

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आर्यांनी भारतात कोणत्या प्रदेशात आपली राज्ये निर्माण केली ?

२. 'आर्य मूळ तिबेट मधील असावेत' असे कोणत्या विचारवंतांनी म्हटले आहे ?

३. वैदिक वाङ्मयाचे प्रकार कोणते आहेत ?

४. ऋग्वेदात किती मंडले व किती सूक्ते आहेत ?

५. बोघाजकोई शिलालेखात कोणत्या दोन प्राचीन टोळ्यांचे वर्णन आहे ?

## २.२.२ विभाग २ - पूर्ववेदकालीन संस्कृती किंवा ऋग्वेदकाळ (Early Vedic Culture)

वेदकाळाचे ऋग्वेदकाळ किंवा पूर्ववेदकाळ व उत्तरवेद काळ किंवा ब्राह्मणकाळ या दोन विभागात विभाजन केले आहे. यापैकी पूर्ववैदिक काळाची माहिती मिळविण्यासाठी कोणतेही पुरातत्त्वीय साधन उपलब्ध नाही. केवळ ऋग्वेदातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष माहितीच्या आधारेच या काळातील सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. आर्य भारतात टोळ्या-टोळ्यांनी आले. आर्यांच्या भरत, अनु, द्रस्यू, पक्य, भलान, अलिन, तुर्वशु, यदु, पुरु इत्यादी प्रमुख टोळ्या होत. त्यातील भरत ही टोळी विशेष पराक्रमी होती. प्रारंभीच्या काळात आर्यांच्या अनार्यांबरोबर व नंतरच्या काळात परस्परांत संघर्ष झाल्याची माहिती मिळते. आर्यांच्या टोळ्यांमध्ये परस्परात झालेले पहिले महत्त्वपूर्ण युद्ध म्हणजे ''दाशराज्ञ'' युद्ध होय.

**दाशराज्ञ युद्ध :** या युद्धाला वसिष्ठ व विश्वामित्र या पुरोहितामधील शत्रूत्व कारणीभूत ठरले. भरत टोळीचा राजा सुदास होता. त्याने विश्वामित्र या पुरोहिताला काढून त्याजागी वसिष्ठांची नेमणूक केली. त्यामुळे रागावलेल्या विश्वामित्राने सुदास राजाविरुद्ध शत्रू संघ तयार केला. इतर जमातीही भरत टोळीला आळा घालण्यासाठी उत्सुक होत्या. विश्वामित्राने दहा टोळ्यांचा राज्यसंघ घेऊन भरताच्या राज्यावर आक्रमण केले. परुष्की नदीच्या तीरावर झालेल्या युद्धात सुदास राजाने दहा राज्यांशी युद्ध करून विजय मिळविला. या युद्धास 'दाशराज्ञयुद्ध' म्हणतात. पुढे या भरतांनी अनेक टोळी राज्यांचा पराभव करून आपला साम्राज्यविस्तार वाढविला व भारतीय इतिहासात पहिले भरतांचे साम्राज्य निर्माण केले व ते दीर्घकाळ टिकले. यावरूनच आपल्या देशात भारतवर्ष नांव मिळाले.

**राजकीय जीवन** (Polity)

ऋग्वेद काळात राजतंत्रात्मक शासनप्रणाली प्रचलित होती. आर्यांच्या स्थिर जीवनातून कुटुंबसंस्थेचा जन्म झाला. आणि या कुटुंब संस्थेतूनच राजसत्तेची संकल्पना विकसित होत गेली असावी. 'दाशराज्ञ युद्धा'पूर्वी आर्यांची छोटी-छोटी राज्ये टोळीच्या स्वरूपात अस्तित्वात होती. आपल्या टोळीचे संरक्षण करणाऱ्या सामर्थ्यवान व्यक्तीलाच 'राजा' मानले जाण्यास सुरुवात झाली. गुरे मिळविण्यासाठी युद्ध करणे व आपली गुरे पळवणाऱ्या टोळ्यांचा पराभव करणे हे राजाचे प्रमुख कर्तव्य मानले गेले. यातूनच पुढे भरत टोळीचा राजा सुदासने आपल्या पराक्रमाने साम्राज्यविस्तार केला. साम्राज्याच्या प्रशासन सोयीसाठी त्याने अनेक विभाग निर्माण केले. त्यामध्ये जन (राष्ट्र) अनेक 'विशां'चे

मिळून बने. अनेक ग्राम मिळून 'विश' बने. ग्राम हा सर्वांत लहान भाग होता. ग्रामांच्या प्रमुखास 'ग्रामणी' म्हणत. विशाच्या प्रमुखास 'विशपती' म्हणत तर जन च्या प्रमुखास 'राजा' म्हणत.

**१. राजा :** राजा हा लष्करी दृष्टीने सामर्थ्यवान असणे आवश्यक मानले होते. पराक्रमी, युद्ध कुशल राजाचीच निवड केली जात असे. तथापि निवड अयोग्य असल्यास समिती राजाला पदच्यूत करू शकत असे. राजावर जनतेचे नियंत्रण असे. परकिय आक्रमणापासून प्रजेचे रक्षण, युद्धाचे नेतृत्व, प्रजेच्या हिताची कामे राजाला करावी लागत असत. राजा हा श्रेष्ठ मानलेला असला तरी त्याला कोणतेही विशेष अधिकार दिल्याची माहिती मिळत नाही.

**२. मंत्रिमंडळ :** राज्यकारभारात राजाला मदत करण्यासाठी मंत्रिमंडळ असे. यात सर्वोच्च मंत्री म्हणून पुरोहित असे. सेनानी, हेर, दूत व ग्रामणी हे प्रमुख अधिकारी यांचा समावेश होता. या सर्व अधिकाऱ्यांची निवड राजा करीत असे. पुरोहित हा राजाचा प्रमुख सल्लागार होता. पुरोहितानंतर महत्त्वाचे अधिकार सेनानीचे होते. सर्व सैनिकांचा तो प्रमुख असे. लष्करी मोहिमा, संरक्षण, प्रशासन व नियंत्रण ही जबाबदारी सेनानीची असे. हेर हा राजनिष्ठ असे. राज्यातील अंतर्गत गोष्टींची माहिती राजाला पुरवत असे तर ग्रामणी हा गावचा राजकारभार पहात असे. जनतेची गाऱ्हाणी राजापर्यंत पोहोचविणे व राजाची आज्ञा जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम दूत करत असे.

**३. सभा व समिती :** राजाला राज्यकारभारात मदत करणे व प्रसंगी राजाच्या अधिकारांवर काही प्रमाणात नियंत्रण ठेवण्याचे काम सभा व समिती करीत होती. त्यांची कर्तव्ये व रचना याबाबत भिन्न-भिन्न मते आहेत.

ऋग्वेदात 'सभा' नावाची राजकीय संस्था होती याचा उल्लेख आढळतो. राजाला कोणत्याही बाबतीत सल्ला देण्याचे काम सभा करीत होती. सभेमध्ये प्रतिष्ठित मंडळी, विद्वान, ज्ञानी, वयोवृद्ध स्त्री-पुरुषांचा समावेश असे.

'समिती' ही प्रजेची प्रतिनिधीत्व करणारी महत्त्वाची संस्था होती. समितीच्या बैठकीला राजा स्वतः हजर राही. लष्करी, कार्यकारी मंडळावर व राजावर नियंत्रण समिती ठेवत असे.

**४. न्यायव्यवस्था :** राजा स्वतः न्यायव्यवस्थेचा सर्वोच्च अधिकारी होता. त्याला पुरोहित, अन्य अधिकारी, सभा समिती न्यायदानात मदत करीत असत. चोरी, खून, हत्या, व्यभिचार, फसवणूक या अपराधांसाठी दंडाची शिक्षा दिली जात असे. गुन्ह्याच्या स्वरूपावरून कधी-कधी अपराध्यांना अग्नीपरीक्षा व जल परीक्षा, हद्दपार व मृत्यूदंड अशा शिक्षा दिल्या जात असत.

**५. युद्धनिती :** आर्य हे मुळातच युद्धप्रिय होते. त्यांची प्रजा हीच त्यांचे सैन्य होते. सैन्यात पायदळ व रथदल असे व राजा स्वतः रथात बसून सैन्याचे नेतृत्व करत असे. धनुष्य, बाण, तलवार, भाला, गोफण, गदा इत्यादी आर्यांची शस्त्रास्त्रे होती.

आर्यांची राजकीय व्यवस्था भक्कम पायावर उभारलेली आदर्शवादी होती.

**२. सामाजिक जीवन** (Social Life)

आर्यांना सप्तसिंधूच्या प्रदेशात स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर आर्य संस्कृतीचा विकास होत गेला. त्याच वेळी काही रुढी व परंपरांना महत्त्व मिळण्यास सुरुवात झाली. त्यांच्या सामाजिक जीवनात प्रगती होत गेली. ऋग्वेद काळातील

सामाजिक जीवनाचा अभ्यास करताना कुटुंबव्यवस्था, स्त्री-जीवन, वर्णव्यवस्था, आहार, वेशभूषा, केशभूषा, अलंकार व मनोरंजन या घटकांचा विचार करावा लागतो.

**१. कुटुंब व्यवस्था :** आर्य जीवनात कुटुंब हा राजकीय व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा घटक होता. या काळात समाज एकत्र कुटंब पद्धतीत विभागलेला होता. दोन-तीन पिढ्यांचे संयुक्त कुटुंब असे. वयाने सर्वांत ज्येष्ठ व्यक्ती कुटुंबप्रमुख असे. त्याला 'गृहपती' म्हणत. कुटुंबावर त्याची अनिर्बंध सत्ता होती. कालांतराने कुटुंबपद्धतीत थोडासा बदल होऊन संयुक्त पितृप्रधान कुटुंब पद्धती अस्तित्वात आली.

**२. स्त्री-जीवन :** वैदिक काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान होते. स्त्रियांना पुरुषांबरोबर शिक्षण दिले जात होते. त्या पुरुषांबरोबर वाद-विवाद व चर्चा यामध्ये सहभागी होत. अपाला, घोना, विश्ववरा, लोपामुद्रा, सिकता, निवावरी, उर्वशी या विद्वान स्त्रियांनी वेदातील काही ऋचांची रचना केली. त्यांच्यावर कोणतेच बंधन नसल्यामुळे त्या धार्मिक कार्यातही सहभागी होत. स्त्रीला पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. विवाह करून पतीगृही जाणे तिचे प्रमुख कर्तव्य मानले जाई. विधवा स्त्रियांना विवाह करता येत असे. सर्वसाधारणपणे एकपत्नीत्वाची पद्धत समाजात रूढ होती. परंतु श्रीमंत लोक किंवा राजे एकापेक्षा अनेक विवाह करीत. अशा प्रकारे वैदिक काळात स्त्रियांचे स्थान मानाचे व उच्च दर्जाचे होते.

**४. वर्णव्यवस्था :** ऋग्वेद काळात जातिसंस्थेचे अस्तित्व नसावे. आर्य लोक जे व्यवसाय करू लागले त्यावरून त्यांच्यात वर्णभेद ठरले. ऋग्वेदकाळाच्या प्रारंभी चातुर्वर्ण्य पद्धती नव्हती. पुढे ऋग्वेदकाळाच्या शेवटी चातुर्वर्ण्यपद्धती समाजात रूढ झाली. वर्णव्यवस्था ही गुणावर, कर्मावर व व्यवसायावर अवलंबून होती. त्यामुळे जन्मावरून ठरली जाणारी वंशपरंपरागत जात मानली जात नव्हती.

**५. आहार :** आर्य हे पशुपालक होते. त्यामुळे त्यांच्या आहारात दुग्धजन्य पदार्थांचाच प्रामुख्याने समावेश होता. उदा. दूध, दही, लोणी, तूप इ. बैल, बकरी, मेंढी यांचे मांसही खात असत. तसेच आर्य शेतीही करत असल्यामुळे भाजीपाला, कडधान्ये, तांदूळ, गहू, जव, सातू इ. पदार्थांचा दैनंदिन आहारात समावेश असे. सुरापान व मद्यपान केले जाई. सोमरस सोमवल्लीपासून तर सुरा धान्यापासून काढीत. ऋग्वेदात सोमरसाला देवासमान मानले आहे. त्यामुळे प्रसन्नता, सामर्थ्य व उत्साह प्रदान करून चित्तशुद्धी व बुद्धीशुद्धी होते असा आर्यांचा समज होता.

**६. वेषभूषा :** आर्य सुती व लोकरी कपडे वापरत. ते दोन-तीन वस्त्रे अंगावर नेसत. स्त्रीया व पुरुष यांच्या वेषभूषेत फारसा फरक नव्हता. कमरेभोवती जे वस्त्र गुंडाळत त्याला 'नीवा' म्हणत तर अंगात घातलेले 'वासन' व डोक्यावरून परिधान केलेले 'अधिवासन्' ही प्रमुख वस्त्रे होती. आर्य अनेक रंगाचे कपडे वापरत. कपड्यावर सोनेरी भरतकाम असे. लोक सर्वसाधारणपण पांढरी वस्त्रे वापरत.

**७. केशभूषा :** पुरुष केस कापत व दाढी ठेवत. ऋग्वेदात केशकर्तनाचा उल्लेख आहे. पुरुष केसाचा बुचडा बांधीत तर स्त्रिया विविध प्रकारची केशभूषा करीत. केशभूषेचे विविध प्रकार आर्यांना माहीत होते.

**८. अलंकार** : आर्य हे अलंकाराचे प्रेमी होते. कर्णफुले, कंठमाला, अंगठ्या, पैंजण, बाजूबंद, नथणी, कमरपट्टे, मेखला, जोडवे इ. अलंकार वापरीत. अलंकारासाठी सोने, चांदी, पाचू, हिरे, माणिक, मोती, रत्ने, शंख-शिंपले व हस्तिदंताचा वापर केला जात असे.

**९. मनोरंजन** : द्यूत, नृत्य, रथस्पर्धा, घोड्यांच्या शर्यती इ. मनोरंजनाची साधने होती. ऋग्वेदात द्युतावर एक स्वतंत्र सूक्त आहे. द्यूत हा सर्वनाशाचा खेळ आहे. 'फासे खेळू नकोस, शेतीच कर' असा उपदेश एक पश्चात्ताप झालेल्या जुगारीने ऋग्वेदात केला आहे. आर्यांना विशेषतः शिकारीचा नाद होता. सिंह, हरिण, डुक्कर, हत्ती, रेडे इ. प्राण्यांची शिकार केली जाई. याशिवाय विशेष प्रसंगी आर्य लोक गायन, वादन व नृत्यात भाग घेत.

**१०. वैद्यकशास्त्र** : दूषित पाण्यापासून होणारे रोग, रोगनाशक वनस्पती, रोगनिवारण्यासाठी प्रार्थना व मंत्रविद्या, विषारी प्राण्यांच्या विषबाधेपासून मुक्तता इ. गोष्टींचे ज्ञान पूर्ववैदिक काळात आर्यांना होते.

**धार्मिक जीवन** (Religious Life)

ऋग्वेद या ग्रंथावरून पूर्व वैदिक काळातील धार्मिक जीवनाची माहिती मिळते. आर्यांचे धार्मिक जीवन साधे-भोळे होते. निसर्गातील बदल, निसर्गाची उपयुक्तता, घडामोडी याबद्दल आर्यांच्या मनात आदर निर्माण झाला. रात्र-दिवस, प्रकाश, अंधार, पाऊस इ. मागची कारणे आर्यांना माहीत नव्हती. या सर्व बदलामागे कोणतीतरी दैवी शक्ती आहे, असा त्यांचा समज होता. म्हणून आर्यांनी निसर्गातील वेगवेगळ्या शक्तींना ईश्वरी रूप दिले. देवदेवतांचे विविध प्रकारही पाडले होते. आर्यांच्या धर्म कल्पनेतील निसर्ग देवता तीन प्रकारच्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे -

१. स्वर्गातील देवता - आकाश, वरुण, सूर्य, मित्र, विष्णू, इजा, सविता, आप, पुणय

२. अंतरिक्ष देवता - इंद्र, वायू, वरुण, पर्जन्य

३. पृथ्वीवरील देवता - पृथ्वी, सोम, अग्नी, सरस्वती

ऋग्वेदकालीन देवता व त्याबाबत आर्यांच्या संकल्पना -

**१. वरुण** : वरुणाचे वर्णन करणारी १२ सुक्ते ऋग्वेदात आहेत. विश्वातील गोंधळ नष्ट करून समाजात नीतितत्त्वांचे व्यवस्थित पालन होते किंवा नाही हे पाहण्याचे काम वरुण करतो. विविध संकटे व व्याधींच्या द्वारे वरुण माणसास शिक्षा करतो. तो उंच आकाशात राहतो. ऋग्वेदातच वरुणाचे देवता म्हणूनही वर्णन केलेले दिसते.

**२. इंद्र** : ऋग्वेदात इंद्राची प्रार्थना करणारी २५० सूक्ते आहेत. आर्यांची सर्वश्रेष्ठ व पराक्रमी देवता म्हणून इंद्राचा उल्लेख केला जातो. इंद्र आपल्या मायेच्या साह्याने अनेक रूपे धारण करतो. तो अत्यंत बलाढ्य असून मानवांना व देवांनाही त्याच्या सामर्थ्याचा अंत लागत नाही असे आर्य मानत. आर्यांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात इंद्राचा संबंध फार जवळचा आहे.

**३. अग्नी** : ऋग्वेदातील २०० सूक्तांमधून अग्नीची प्रार्थना केलेली आहे. दोन लाकडाच्या घर्षणातून अग्नीची निर्मिती होत असल्याने अग्नीला दोन माता आहेत असे समजलेले होते. अग्नी अंधाराचा नाश करते. राक्षसांना भिती घालतो, प्रकाश आणतो असे ऋग्वेदात वर्णन केलेले आढळते. 'अग्नी' हा मानवाचा मित्र आहे, हितकर्ता आहे

याही पेक्षा तो देव व माणूस यांच्यातील दूत आहे. इतर देवदेवतांची कृपा मिळवून देण्याचे काम अग्नी करतो. अग्नीची पूजा करतात ते शतायुषी, संपत्तीमान व किर्तीमान होतात. या वैशिष्ट्यामुळे ऋग्वेदकालीन देवतांमध्ये अग्नीला महत्त्वाचे स्थान आहे. अग्नीच मानवाला मुक्ती देते.

**४. सूर्य** : ऋग्वेदात सूर्याच्या रथाचे व सात घोड्यांचे वर्णन आढळते. सूर्य हा वरुण, मित्र व अग्नी यांचा डोळा आहे असाही उल्लेख आहे. सूर्याच्या प्रार्थनेमुळेच मानवाला दीर्घायुष्य व निरोगी जीवन मिळते. सूर्य हा जीवनमात्राचा आधार आहे. म्हणून सूर्याला संपूर्ण सृष्टीचा रक्षणकर्ता मानले.

**५. उषा** : उषा ही स्त्री देवता आहे. उषा म्हणजे अरुणोदयापूर्वीची वेळ. तिचे सुरेख वर्णन ऋग्वेदात केले आहे. तिची प्रार्थना करणारी २० सूक्ते ऋग्वेदात आहेत. सूर्य हा तिचा प्रियकर आहे व रात्र ही तिची बहीण आहे. ती निसर्गसौंदर्याचे प्रतिक असून ती सूर्याच्या आगमनाची चाहूल मानवाला देते.

**६. पृथ्वी** : ऋग्वेदाच्या १२ व्या कांडातील पहिले सूक्त पृथ्वीविषयक आहे. पृथ्वी ही मातृदेवता असून सर्व प्राणिमात्राचा आधार आहे. ती अन्नदाता सृष्टीची देवता आहे. ऋग्वेदात पृथ्वी ही इंद्र, वरुण, चंद्र, सूर्य इ. देवतांची माता म्हणून वर्णन केले आहे.

**७. रुद्र** : रुद्र ही आरोग्याची देवता असून ती सृष्टीतील रोगजंतूंचा नाश करते. रुद्रालाच पुढे शिवदेवता मानू लागले. ऋग्वेदात रुद्राची प्रार्थना करणारी तीन सूक्ते आहेत. अत्यंत रागीट व उग्र देवता असे देवतेचे स्वरूप असून ती आर्यांनी अनार्यांकडून घेतली असावी, असे मानले जाते.

**८. विष्णू** : वैदिक काळातील धार्मिक जीवनात सूर्याच्या इतकेच विष्णूदेवतेला महत्त्व दिलेले दिसते. ऋग्वेदात विष्णूचे वर्णन करताना तीन पावलांमध्ये विश्व व्यापून टाकणारा परमेश्वर म्हणून वर्णन केलेले दिसते. तो संसाराचा कर्ता व रक्षणकर्ता आहे. त्याची प्रार्थना केल्यास दुःखे दूर होतात अशी धारणा आर्यांची होती.

**९. यम** : यम ही धर्म निती-नियमांचे पालन करणारी देवता असून मृत व्यक्तीला कर्मानुसार शिक्षा देण्याचे काम करते. ही मृत्यूची देवता आहे.

**१०. सोम** : ऋग्वेदाच्या नवव्या मंडलात 'सोम' या देवतेची स्तती आहे. सोम ही वनस्पती आहे व तिचा रस म्हणजे सोमरस. ती पिल्याने असामान्य सामर्थ्य प्राप्त होते असा आर्यांचा समज होता. सोमरस हे इंद्राचे आवडते पेय आहे. यज्ञप्रसंगी सोमरस प्राशन मोठ्या प्रमाणात होई.

**११. मरुत** : रुद्र मरुताचा पिता होय. इंद्राला साहाय्य करणे, युद्धात सतत त्याच्या समवेत राहणे ही त्याची प्रमुख कार्ये आहेत. मरुत म्हणजे वादळी वारे.

**१२. वायू व पर्जन्य** : वायू म्हणजे हवा व पर्जन्य म्हणजे पाऊस. या निसर्गतत्त्वाचा मानवाला दैनंदिन जीवनात फार उपयोग होत असल्याने आर्यांनी देवता म्हणून त्यांचे पूजन केलेले दिसते.

वरील देव-देवतांखेरीज विश्वकर्मा, प्रजापिता, आप्त सरस्वती, बृहस्पती, सविता, आदिती, इत्यादी देवतांची वर्णने ऋग्वेदात आली आहेत.

**वेदकालीन यज्ञसंस्था**

ऋग्वेदकालीन देवता या मानवाप्रमाणेच असून त्यांचा मानवाप्रमाणेच भावभावना आहेत. त्यांची स्तुती केल्याने ते संतुष्ट होतात असा आर्यांचा समज होता. देवतांना प्रिय असणारी वस्तू मानवाने यज्ञात अर्पण केली तर देवता आपणास अनुकूल होतात. त्या वस्तू पोहोचविण्याचे अग्नी हे एक साधन आहे. कारण अग्नीच्या ज्वाला व धूर हा देवापर्यंत पोहोचतो. हे लक्षात आल्यावर अग्नीच्या माध्यमातून देवदेवतांना आहुती देण्यास सुरुवात केली. यातूनच धार्मिक आचारात यज्ञ पद्धतीचा प्रारंभ झाला. यज्ञातील हवीमध्ये दूध, तूप, धान्य, सोम या वस्तूंचा समावेश असे. यज्ञपद्धती साधी होती. या काळात मंदीर किंवा इतर पूजा प्रकार अस्तित्वात नव्हता. तर ईश्वराच्या प्रसन्नतेसाठी यज्ञविधी करण्याचा प्रकार प्रचलित होता. त्यातूनच यज्ञविधीचे एक शास्त्र हळूहळू विकसित झाले. आणि पुरोहित वर्गास धार्मिक व सामाजिक जीवनात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

**वैदिक तत्त्वज्ञान** : आर्य लोक पूर्वजांची पूजा करीत. आत्मा व पुनर्जन्मावर आर्यांचा विश्वास होता. त्यांचे तत्त्वज्ञान, नीतिमान, जीवन आदर्शवादी होते. दान, सत्कर्म, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा, सदाचरण, संस्कारमय जीवनाचा संदेश देणारे होते. आत्मा अमर आहे. तो पुन्हा नवीन देह धारण करतो. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात पुनर्जन्म व मरणोत्तर जीवनाचे वर्णन आहे. ऋग्वेदकालीन आर्यांच्या तत्त्वज्ञानात निराशावादाला कोठेही स्थान नाही. जीवनाविषयी किंवा कर्माविषयी तिरस्कार व्यक्त केलेला नाही. एकंदरीत जीवन सुंदर व रमणीय असून ते जगण्यासाटी दीर्घायूष्य मिळावे, अशीच त्यांची इच्छा होती.

**ऋग्वेदकालीन देवदेवतांची वैशिष्ट्ये**

१. या देवदेवता निसर्गशक्तीपासून निर्माण झाल्या होत्या.

२. या देवता मानवसदृश्य होत्या व मानवाप्रमाणे त्यांना अवयव व भावना आहेत अशी धारणा होती.

३. संपूर्ण विश्वातील निर्मितीला व घडामोडीला जबाबदार एकच ईश्वर असून त्याची रूपे वेगवेगळी आहेत.

४. सर्वच देवता आकाशमार्गे संचार करतात, अशी धारणा होती.

५. यज्ञविधीत दिली जाणारी आहुती ती देव-देवतांचे अन्न व सोमरस हे आवडते पेय आहे असे मानले होते.

६. सर्व देवदेवता वैश्विक नियमांचे किंवा ऋतृतत्त्वांचे पालन करतात व तत्त्वांचे पालन न करणाऱ्या समाजातील व्यक्तीला शिक्षा देतात असा समज होता.

७. देवदेवतांच्या प्रार्थनेमुळे ते प्रसन्न होतात व आपल्या इच्छा सफल होतात.

८. सूर्य, सविता व पूजन या तीन देवता एकाच तत्त्वांच्या द्योतक आहेत. ते तत्त्व म्हणजे प्रकाशतत्त्व होय.

९. रोगविरहित शरीर, संपत्ती, संतती, समृद्धी, पशुधन, युद्धातील विजय, सुखाची प्राप्ती यासाठी देवदेवतांची प्रार्थना केली पाहिजे.

१०. देवाला वळविण्याचे सामर्थ्य मंत्रात आहे. यज्ञ हा ईश्वराची कृपा व प्रसाद मिळविण्याचा एक मार्ग आहे असा आर्यांचा समज होता.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

**(अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१. 'दाशराज्ञ' युद्ध ............. नदीच्या तीरावर झाले.

(अ) सिंधू (ब) सरस्वती (क) परुष्णी (ड) गंगा

२. वेदकाळात ग्रामाच्या प्रमुखास .......... म्हणत.

(अ) ग्रामणी (ब) कुल (क) विश (ड) जन

३. वेदकाळात .......... हा राजाचा प्रमुख सल्लागार होता.

(अ) सेनानी (ब) हेर (क) पुरोहित (ड) ग्रामणी

४. उषा ही ........... देवता आहे.

(अ) पुरुष (ब) स्त्री (क) रुद्र (ड) विष्णू

५. आरोग्याची देवता .............. आहे.

(अ) पृथ्वी (ब) सूर्य (क) रुद्र (ड) विष्णू

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. वेदकालीन मंत्रिमंडळात कोणत्या प्रमुख अधिकाऱ्यांचा समावेश होता ?

२. वैदिक काळातील कोणत्या स्त्रियांनी ऋचांची रचना केली ?

३. ऋग्वेदकालीन देवतांची नांवे सांगा ?

४. आर्यांच्या धर्म कल्पनेतील देवतांचे प्रकार सांगा.

## २.२.३ विभाग ३ - उत्तर वैदिक काळ

ज्या काळात सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद यांची रचना झाली तो काळ उत्तर वैदिक कालखंड होय. किंवा ऋग्वेदानंतर जो काळ भारतात उदयाला आला त्या काळाला उत्तर वैदिक काळ म्हणतात. या काळात धर्मविधी वाढत गेले. कर्मकांडाला महत्त्व प्राप्त झाले. ब्राह्मण ग्रंथामध्ये या कर्मकांडाचा उल्लेख आहे. या काळात 'ब्राह्मण' ग्रंथांना महत्त्व प्राप्त झाले. म्हणूनच या कालखंडाला 'ब्राह्मणकाळ' असेही म्हणतात. या काळात आर्यांनी भारताच्या पूर्व भागात आपली व्याप्ती वाढवली. सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद आणि ब्राह्मणे, उपनिषदे, रामायण व महाभारत यांची रचना उत्तर वेद काळात झाली. आर्यांच्या लहान-लहान राज्यांचे मोठ्या राज्यात विलिनीकरण झाले व बलाढ्य अशी प्रादेशिक राज्ये उदयाला आली. आर्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आला. हा कालखंड इ.स.पू. १२०० ते इ.स.पू. ६०० असा मानता येईल.

### उत्तर वैदिक कालखंडातील आर्यांचा विस्तार

राजकीय विस्तारापूर्वी आर्य सप्तसिंधूच्या प्रदेशात स्थिर झाले होते. त्यानंतर वाढत्या लोकसंख्येमुळे त्यांना नवीन प्रदेशाची गरज भासू लागली. त्यातूनच आर्यांनी विस्तारवादी धोरण स्वीकारले. या काळात ते मध्य देशाकडे वळले. मध्य प्रदेश हा सरस्वती व गंगा नदीच्या दरम्यानचा भाग होय. येथील कुरुक्षेत्र, कोसल, काशी, विदेह, अंग या प्रदेशावर आर्यांनी आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले. या प्रदेशाला मध्यदेश, ब्रह्मावर्त, आर्यावर्त अशी नावे होती. शहरांच्या निर्मितीला व शहरी जीवनाच्या विकासाला चालना मिळाली. कुरु, पांचाल, उशीनर ही नवीन राज्ये उदयास आली. या कालखंडात जुन्या जमाती लयाला गेल्या व जमातींचा उदय झाला. पुरु आणि भरत जमातीचे एकत्रीकरण होऊन कुरु ही जमात पुढे आली. सरस्वती व गंगा नद्यांच्या प्रदेशात कुरुचे राज्य होते. कुरुश्रवण, परीक्षित, जनमेंजय, शतनिक हे या घराण्यातील प्रमुख राजे होत. कुरु व पांचाल या उत्तर वैदिक कालखंडातील प्रमुख जमाती होत. पांचालांचे राज्य हे कुरुंच्या पूर्वेस होते.

कुरु व पांचाल हे लोक शुद्ध आर्य वंशाचे असावेत. ब्राह्मण ग्रंथात जेथे राज्याभिषेक उत्सवाचे वर्णन आहे तेथे राजाचा परिचय 'हे कुरुंनो, हे पांचालांनो, हे कुरु-पांचालांनो' असे लोकांना संबोधून केला आहे. दिल्ली दुआबाच्या मध्य व उत्तर भागामध्ये कुरु पांचालाचे प्रभुत्व निर्माण झाले. कुरु व पांचाल यांच्यात वैर असल्याचा उल्लेख महाभारतात आहे.

### राजकीय जीवन

**१. राजसत्तेचा उदय** : उत्तर वैदिक काळात बलाढ्य राजे उदयाला आले. त्यामुळे पराक्रमी बलवान, युद्धप्रिय व धाडसी राज्यकर्त्यांचा उदय झाला. राजसत्तेचा उदय कसा झाला यासंबंधी ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे की देव-दानवांच्या युद्धात देवांचा पराभव होऊ लागला. तेव्हा देवांनी एक राजा निवडला व त्याच्या साहाय्याने दानवांवर विजय मिळविला. म्हणजेच लष्करी गरजेतून राजपद निर्माण झाले. तसे मानवांनाही राजा हवा म्हणून आर्यांनी राजा निवडला. राजे हे प्रामुख्याने क्षत्रीय वर्गातील असत. या काळात वंशपरंपरागत राजसत्ता अस्तित्वात आल्याचे दिसते.

**२. राजाचे अधिकार व कर्तव्ये** : राज्यरक्षण, राज्यसंवर्धन व न्यायदान ही राजाची प्रमुख कर्तव्ये होती. तो सर्वसत्ताधीश असले तरी त्यांच्यावर धर्म-नीतीचा पगडा होता. त्यामुळे ते जुलमी व अनियंत्रित होऊ शकत नव्हते. या कालखंडातील राजांना अधिराज, राजाधिराज, सम्राट, एकराट, विराट, राजन अशा निरनिराळ्या पदव्या दिलेल्या दिसतात. यावरून या कालखंडातील राजे हे शक्तिशाली असावेत असा निष्कर्ष निघतो.

**२. राजकीय अधिकारी वर्ग** : उत्तर वेद काळात राज्यविस्तारामुळे राजाला प्रशासनाची गरज निर्माण झाली. राजाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी मंत्रिमंडळ व अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली. हे मंत्रिमंडळ राजाला जबाबदार असे. सर्व मंत्र्यांच्या व अधिकाऱ्यांच्या नेमणुका स्वतः राजा करीत असे. मंत्रिमंडळाला या काळात 'रत्निन' म्हणत. यामध्ये खालील लोकांचा समावेश होत असे.

- **राजपुत्र** : या पदावर राजपुत्र, राज परिवार, सरदार यापैकी क्षत्रीय व्यक्ती असे.
- **महिषी** : पट्टराणीला हे पद देत. तिने नाजूक बाबींवर व संकटकालीन सल्ला द्यावा.

- **पुरोहित** : हा धर्मप्रमुख असून याचाही मंत्रिमंडळात समावेश असे. राजा, प्रजा व राष्ट्राच्या कल्याणासाठी प्रार्थना करणे, धार्मिक विधी करणे व राजाला सल्ला देणे. संकटकाळी युद्धमोहिमेवर जाणे ही कामे पुरोहित करीत असत.
- **सेनानी** : हा लष्कराचा प्रमुख असून तो राजाला संरक्षण कार्यात मदत करत असे.
- **संग्रहीत** : हा अर्थ व्यवहार सांभाळणारा कोषाध्यक्ष होय.
- **भागदूत** : कर वसुली करणारा अधिकारी होता.

**३. सभा** : सभा ही ग्रामसंस्था असे. यामध्ये वयस्कर व प्रतिष्ठित व्यक्तींचा सहभाग असे. महत्त्वाच्या राजकीय प्रश्नावर राजाला सल्ला देणे तसेच न्याय पंचायत म्हणून निर्णय देणे ही कामे सभेकडे सोपविलेली होती.

**४. समिती** : यामध्ये सामान्य स्तरातील प्रतिनिधी असत व ही सभेपेक्षा मोठी असे. या समितीत झालेले निर्णय व धोरण यांची राजाला गंभीरपणे दखल घ्यावी लागे. अन्यायी व दुराचारी शासक बदलण्याचे सामर्थ्य असणारी ही एक मुख्य संस्था होती. सभा व समिती प्रशासकीय कार्यात राजाला सल्ला देत असे.

**५. न्यायव्यवस्था** : राजा हा न्यायव्यवस्थेचा प्रमुख असे. या कामात त्याला पुरोहित मदत करीत असे. दिवाणी, अंतर्गत वारसा हक्क, कर्ज, जमिन मालकी अशा गुन्ह्यांचा न्याय राजा करीत असे. तसेच राजा धर्म, रितीरिवाज आणि विद्वानांची मते घेऊन न्यायदानाचे काम करीत असे. गुन्ह्याच्या स्वरूपावरून शिक्षा ठरविल्या जात. नुकसान भरपाई, अग्निदिव्य, अवयव तोडणे, वाळीत टाकणे, हद्दपार करणे व मृत्यूदंड या कठोर शिक्षा होत्या. मात्र स्वतंत्रपणे न्यायव्यवस्था विकसित झालेली दिसत नाही.

**सामाजिक जीवन**

आर्यांच्या राजकीय व सांस्कृतिक प्रगती बरोबरच समाजव्यवस्थेतही बदल घडून आले. उत्तर वैदिक काळात निर्माण झालेल्या वाङ्मयातून आर्यांच्या सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल झालेला आढळून येतो. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे -

**१. कुटुंबसंस्था** : या काळात पितृप्रधान कुटुंब पद्धती असल्याने पिता हा कुटुंबाचा प्रमुख असे. कुटुंब ही संस्काराची प्रथम पाठशाळा होती. कुटुंबांना कूल म्हणून संबोधले जाऊ लागले. पुढे कुलाचार, कुलनाम यांना महत्त्व आले.

**२. विवाह संस्था** : वैदिक काळाप्रमाणेच विवाह हा पवित्र संस्कार होता. मात्र विवाहसंस्थेत परिवर्तन झाल्याचे दिसते. या काळात स्त्रियांना वर निवडीचे स्वातंत्र्य गमवावे लागले. पिता अनुरूप वराला कन्यादान करू लागला. विवाह संस्थेला स्थैर्य प्राप्त झाले होते. या काळात मुलगा कुलदीपक ही कल्पना अस्तित्वात आली. समाजात अनेक प्रकारचे विवाह रूढ झाले होते. स्मृतीमध्ये विवाहाचे आठ प्रकार दिले आहेत.

**१. ब्राह्मविवाह** : विधीपूर्वक ठरवून झालेले कन्यादान.

२. **दैवविवाह** : पुरोहितांद्वारे सालंकृत कन्यादान.

३. **आर्ष विवाह** : वराकडून वधूपित्यास गाय-बैल अर्पण करून वधूशी विवाह.

४. **प्रजापत्यविवाह** : हुंडा न घेता झालेला विवाह

५. **आसुरविवाह** : वधूच्या पित्यास धन देऊन वधू विकत घेणे व विवाह लावणे..

६. **गांधर्व विवाह** : वधू-वरांच्या संमतीचा विवाह.

७. **राक्षस विवाह** : वधूस जबरदस्तीने पळवून नेवून केलेला विवाह.

८. **पैशाच्य विवाह** : एखाद्या स्त्रीवर बळजबरी करून तिला बेशुद्ध करून तिच्याशी विवाह करणे.

वरील पहिल्या चार प्रकारांना समाजमान्यता होती. तर नंतरचे चार प्रकार अस्तित्वात असले तरी त्यांना समाजमान्यता नव्हती. अनुलोम विवाहास मान्यता होती, परंतु प्रतिलोम विवाहास मान्यता नव्हती. याही काळात बालविवाह व सतीची पद्धती नव्हती. विधवा पुनर्विवाहास मान्यता होती.

३. **स्त्रीजीवन** : उत्तर वैदिक काळात स्त्रियांचा दर्जा घसरला. समाजात स्त्रियांना मानाचे स्थान नव्हते. तरीपण ती काही धार्मिक व सामाजिक समारंभात भाग घेऊ शकत असे. स्त्री स्वातंत्र्यावर मर्यादा आल्या. अपत्य संगोपन व गृहकृत्ये हीच स्त्रियांची प्रमुख कर्तव्ये मानली गेली. तिचा मालमत्तेचा अधिकार काढून घेतला. विवाहवयाची मर्यादा कमी करण्यात आली. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत गेला. विधवांना पुनर्विवाह करण्यास बंदी आली. तिला पती मेल्यांनतर सती जाण्यासाठी प्रवृत्त केले जाऊ लागले. तिला पूर्ण अबला बनवून तिच्या संरक्षणाची जबाबदारी पिता, पती व पुत्र यांच्यावर सोपविण्यात आली. या काळात स्त्रियांच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले गेले नाही.

ऐतरेय ब्राह्मणात मुलगी ही पित्याला, पतीला व तिच्या मुलांना दुःखदायक होते असे म्हटले आहे. अथर्ववेदातही मुलीच्या जन्माविषयी असेच उद्‌गार काढले आहेत. शतपथ ब्राह्मणात स्त्रीने पतीचे भोजन झाल्यावर जेवावे असे म्हटले आहे. या सर्व नोंदी उत्तर वैदिक काळात स्त्रियांचा दर्जा खालावत गेल्याचे स्पष्ट करतात.

४. **वर्णव्यवस्था :** ऋग्वेदकाळात वर्णव्यवस्था लवचीक होती. मात्र उत्तर वेद काळात ती कडक बनली. या वर्णपद्धतीतूनच जातिसंस्थेचा उदय झाला. जन्मावरून जात ठरू लागली. अशा प्रकारे उत्तरवेद काळात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णामध्ये समाज विभागला गेला.

१. **ब्राह्मण** : या वर्णाला श्रेष्ठ स्थान प्राप्त झाले. ब्रह्माविषयी जाणकार, विद्या व धर्माचा उपासक तो ब्राह्मण याची प्रमुख कामे वेदग्रंथाचा, वेदांगे यांचा अभ्यास, ज्योतिषी, वैद्यकशास्त्राचे ज्ञान व मुख्य पौराहित्य करणे.

२. **क्षत्रीय** : पराक्रम, लढावू वृत्ती जोपासणारे व राज्याचे रक्षण करणारे हे क्षत्रीय होत. युद्धशास्त्र व दंडनितीशास्त्र यात ते निपुण होते.

३. **वैश्य** : कृषी व व्यापार-उदीम करणारा हा वर्ग. आर्थिक जीवनाचे नेतृत्व या वर्णाकडे होते. शेती, वेगवेगळे व्यवसाय व गोपालन ही वैश्य वर्णाची प्रमुख कर्तव्ये होत.

**४. शूद्र** : सर्वांची सेवा करणे हे त्यांचे मुख्य कर्तव्य. वेदाचे अध्ययन करणे, यज्ञ किंवा उपनयनाचे अधिकार त्यांना नव्हते. वरील तिन्ही वर्णांची सेवा करणे हे त्यांचे प्रमुख कर्तव्य होते.

**५. आश्रम व्यवस्था** : उत्तर वैदिक काळात उदय व विकास पावलेली एक सामाजिक संस्था म्हणजे आश्रमव्यवस्था होय. आश्रम म्हणजे श्रम करण्याची जागा. त्या काळात मोक्षप्राप्ती हे जीवनाचे अंतिम ध्येय मानले होते. मानवाचे आयुष्य १०० वर्षांचे मानून मानवाच्या संपूर्ण जीवनाला चार आश्रम व्यवस्थेत विभागलेले होते. पितर आणि समाज या चार ऋणातून मुक्त होण्यासाठी आश्रमव्यवस्था निर्माण करण्यात आली. आश्रमाच्या प्रत्येक अवस्थेत कोणते कर्म करावयाचे हे ठरवून दिले. ते आश्रम पुढीलप्रमाणे

- **ब्रह्मचर्याश्रम** : जीवनाच्या या प्रथम अवस्थेचा प्रारंभ आठ वर्षाचा झाल्यानंतर उपनयन विधी केला जाई व त्याला ब्रह्मचारी राहून शिक्षण संपादन करावे लागे. १२ वर्षे गुरूगृही राहून अपार कष्ट व अत्यंत कडक शिस्तीत राहून त्याला वेदाभ्यास करावा लागे. येथे सर्व वर्णातील मुले एकत्र राहत. गुरू श्रीमंत-गरीब, ज्येष्ठ-कनिष्ठ असा भेद करीत नसत. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर 'समावर्तन' हा विधी केला जात असे. शिष्य गुरूला 'गुरुदक्षिणा' देत. शूद्रांना या आश्रमात प्रवेश नव्हता. हा या आश्रमाचा सर्वात मोठा दोष होता.

- **गृहस्थाश्रम** : ऐन तारुण्याची ही अवस्था. वय वर्षे २० ते ५० हा या आश्रमाचा कालखंड होय. ब्रह्मचर्याश्रमाची अवस्था पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी गुरूच्या परवानगीने घरी येत. विवाह करून त्याला कौटुंबिक जबाबदारी पार पाडावी लागे. व्यक्ती व समाज या दोघांच्या दृष्टीने हा आश्रम महत्त्वाचा होता. वंशसातत्य कायम राखणे, सदाचाराने अर्थार्जन करणे व स्वतःचा आणि समाजाचा योगक्षेम चालविणे हे या आश्रमाचे महत्त्वाचे कर्तव्य होते. या आश्रमामुळे धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांची प्राप्ती होते अशी या काळात लोकांची श्रद्धा होती.

- **वानप्रस्थाश्रम** : संसार-मोह यांचा त्याग करून कौटुंबिक जबाबदारी आपल्या मुलांवर सोपवून स्वतः परमेश्वर चिंतनात वेळ घालविणे, याला वानप्रस्थाश्रम असे म्हणत. या आश्रमाचा कालखंड ५० ते ७५ असा गृहीत धरला होता. हा आश्रम म्हणजे संन्यासाश्रमाची पूर्वतयारी होय. या काळात (अवस्थेत) मानवाने स्वतःच्या गरजा कमी करून शरीराला ऐहिक सुखापासून दूर ठेवून परमेश्वर चिंतनात वेळ घालवावा.

- **संन्यासाश्रम** : वयाच्या ७५ वर्षापासून मृत्यूपर्यंत हा आश्रम होता. सर्व मायेचे पाश तोडून वैराग्यवृत्ती पत्करून या आश्रमात पदार्पण करावे लागे. इंद्रियावर ताबा, ब्रह्मचर्य, अहिंसा, सत्य, ईश्वरचिंतन इ. नियमांचे कठोर पालन करावे लागे. पुढे हा आश्रम ब्राह्मण वर्गापुरताच मयादित राहिला.

आश्रमव्यवस्थेचे पालन / नियम न पाळल्यास शिक्षा देणारी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे पुढील काळात आश्रमव्यवस्थेचे महत्त्व कमी झाले. ती फार टिकली नाही.

**६. शिक्षण** : अथर्ववेदात उपनयन विधी झाला की शिक्षणाचा आरंभ होत असे. गुरूगृही राहून शिक्षण घेण्याची परंपरा होती. शिक्षणसंस्था हे त्या काळातील समाजाचे महत्त्वाचे अंग होते. गुरूकुलात राहून इंधन गोळा करणे, पाणी भरणे, समिधा आणणे व गुरूची सेवा करणे ही कामे विद्यार्थ्याला करावी लागत. ब्राह्मणांना वेद, विद्या,

धर्म, यज्ञ, क्षत्रियांना युद्ध विद्या व वैश्यांना व्यवहार विद्या व इतिहास, गणित, नक्षत्र विद्या, आयुर्वेद, विज्ञान हे विषय शिकविले जात.

पूर्व वैदिक काळाप्रमाणेच पोशाख, आहार, अलंकार व करमणुकीची साधने होती. यात फारसा बदल झाला नाही.

**धार्मिक जीवन**

उत्तर वेद काळात देवतांमध्ये बदल झाले. धार्मिक जीवनात बरेच बदल घडून आले. इंद्र व वरुण यांचे महत्त्व कमी होऊन रुद्र व विष्णू यांचे महत्त्व वाढले. अनार्यांचा चातुर्वर्ण्यात समावेश होऊन आर्य व अनार्य संघर्ष कमी झाला. ऋग्वेद काळात निसर्गाधिष्ठित देवता मागे पडल्या व यज्ञाशी संबंधीत देवतांचे महत्त्व वाढले.

**१. यज्ञसंस्था** : उत्तर वेद काळात यज्ञसंस्थेचे महत्त्व वाढले. यज्ञ हा धर्मसंस्थेचा केंद्रबिंदू होता. यज्ञकर्ता हा यज्ञामुळे देवाला प्रसन्न करू शकतो असा विश्वास होता. वेगवेगळ्या इच्छा पूर्तीसाठी नवीन यज्ञांचे प्रकार अस्तित्वात आले. यज्ञप्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची बनत गेली. जीवनातील प्रत्येक घटनेसाठी यज्ञ करण्यात येऊ लागले. त्यामुळे पुरोहित वर्गाचे महत्त्व वाढले. त्यामुळे पुरोहित हा देवता व यजमान यामधील महत्त्वाचा दुवा ठरला. यज्ञाचे नित्य, नैमित्तिक व काम्य असे प्रकार रूढ झाले. मनुष्याचे जन्मतः असलेले देव, मातापिता, ऋषी, समाज व पशूपक्षी यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी अग्नी होमाच्याद्वारे नित्य 'पंचयज्ञ' करावेत असे बंधन प्रचलित झाले. तर अमावस्या, पौर्णिमा, उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या ऋतूंच्या प्रारंभी शेतातून पीक घरी आणल्यानंतर यज्ञ करावे असे बंधन असून त्यांनाच 'नैमित्तिक' यज्ञ म्हणत. विशिष्ट हेतू मनात ठेवून किंवा इच्छा फलप्राप्तीच्या अपेक्षेने करण्यात येणाऱ्या यज्ञांना 'काम्ययज्ञ' म्हणत. हे यज्ञ एक दिवस, दहा दिवस, अनेक दिवस चालत. यांचे विधी व नियम वेगवेगळे होते. राजसूय, अश्वमेध यासारख्या यज्ञांना या काळात महत्त्व मिळाले.

ऋग्वेद काळात परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी सुरू झालेल्या यज्ञाचे स्वरूप उत्तर वेद काळात मोठ्या प्रमाणावर विकसित झाले. यज्ञाला साचेबंदपणा आला. कर्मकांड वाढले व खर्चिक स्वरूप प्राप्त झाले. यामुळे सर्वसामान्य समाज या यज्ञधर्मापासून बाजूला गेला. यज्ञविधीतील पुरोहिताचे वर्चस्व, यज्ञाचे तांत्रिक महत्त्व, हिंसेचा अतिरेक व कर्मकांडाचे प्राबल्य, पूजाविधीची गुंतागुंत यामुळे सामान्य माणसाला स्वतः पूजा करणे अवघड झाले. यज्ञधर्मातील भावना, प्रार्थना यांचे पुनश्च पुनरुज्जीवन करणे आवश्यक वाटू लागले. त्यातूनच उपनिषदातील यज्ञविरोधी विचारांना महत्त्व मिळाले.

**सोळा संस्कार** : या काळात कर्मकांडाबरोबर संस्काराला महत्त्व प्राप्त झाले. व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत १६ संस्कार सांगितलेले आहेत. (१) जातकर्म, (२) नामकरण, (३) निष्क्रमन, (४) अन्नप्राशन, (५) चुडाकरण, (६) कर्णवेध, (७) उपनयन, (८) वेदारंभ (९) केशांत, (१०) समावर्तन, (११) विवाह, (१२) अग्निपरिगृह, (१३) गर्भाधान, (१४) पुंसवन, (१५) सीमन्तोनयन, (१५) अन्नपरिग्रहण, (१६) अंत्यसंस्कार.

थोडक्यात, धर्म अतिशय गुंतागुंतीचा बनून रूढींचे रूपांतर परंपरामध्ये व परंपरांचे रूपांतर बंधनामध्ये झाले. त्यामुळे जादूटोणा, मंत्रतंत्र अशा निरर्थक गोष्टींना धर्मात स्थान मिळाले. याचा परिणाम जास्तीत जास्त कर्मकांडात

सामान्य मनुष्य गुंतून राहिला व तो खऱ्या धर्मापासून दूर गेला. म्हणूनच तो पुढील काळात सदाचार व अहिंसा यावर आधारित असलेल्या जैन व बौद्ध धर्माकडे तो आकर्षित झाला. असे असले तरी यज्ञसंस्थेमुळे वैदिक परंपरा कायम टिकली. संगीत, नृत्य, शिल्प, प्राणीशास्त्र, ज्योतिष्य इत्यादी विषय विकसित झाले. विद्वानांच्या एकत्र येण्यातून व चर्चेतून व्याकरण, छंद या विषयांचा विकास झाला. विविध सामाजिक, धार्मिक विचार व आचारांना गती मिळाली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३**

**(अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१. ......... सरस्वती व गंगा नद्यांच्या प्रदेशात राज्य होते.

(अ) कुरु (ब) पुरु (क) भारत (ड) पांचाळ

२. उत्तर वेद काळात .......... हा कर वसुली करणारा अधिकारी होता.

(अ) सेनानी (ब) संग्रहीत (क) भागदूत (ड) महिषी

३. ........... गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम हे मुख्य आश्रय आहेत.

(अ) ब्रह्मचर्याश्रम (ब) मोक्ष (क) अर्थ (ड) धर्म

४. उत्तर वेद काळात स्मृतीमध्ये विवाहाचे ....... प्रकार दिलेले आहेत.

(अ) ८ (ब) १० (क) ६ (ड) १२

५. उत्तर वेद काळात ......... व .......... देवतांचे महत्त्व वाढले.

(अ) इंद्र, वरुण (ब) रुद्र, विष्णू (क) अग्नी, सूर्य (ड) सोम, मरुत

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. रामायण व महाभारताची रचना कोणत्या काळात झाली ?

२. उत्तर वैदिक कालखंडातील प्रमुख जमाती (टोळ्या) कोणत्या ?

३. सभा व समिती मध्ये कोणाचा समावेश असे ?

४. उतर वेद काळातील कोणत्या स्त्रीचा धर्मविषयक चर्चेमध्ये सहभागी होत ?

५. 'काम्ययज्ञ' म्हणजे काय ?

### २.२.४ **'महाशिला' संस्कृती** (Megalithic Cultures)

'Megalith' या शब्दाचा अर्थ मोठा दगड असा आहे. प्राचीन संस्कृतीमध्ये या शब्दाला एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला. प्राचीन काळामध्ये मृतदेहाचे दफन केले जाई. त्या व्यक्तीची स्मृती म्हणून दफन केलेल्या ठिकाणावर एक मोठा दगड 'महाशिला' किंवा दगडांचा ढीग विशिष्ट पद्धतीने ठेवला जात असे व त्याला समाधी असे संबोधले

जात असे; म्हणून 'Megalith' या इंग्रजी शब्दासाठी 'महाशिला समाधी' असा प्रतिशब्द या ठिकाणी वापरण्यात आला आहे.

मृतदेह पुरलेल्या ठिकाणावर एखादी 'महाशिला' उभारण्याचा कालखंड इ.स.पू. १००० च्या प्रारंभी सुरू झाला असे मानले जाते. लोहयुगापासून मृतदेह पुरण्याची प्रथा सुरू झाली असावी असे दिसते. मृतदेह दहन करण्याची वा जाळून टाकण्याची प्रथा ऊशिरा सुरू झाली.

'महाशिला' पद्धतीने मृतदेह पुरण्याचा प्रकार प्रथम मध्य आशिया, इराणच्या प्रदेशातून स्थानांतरित झालेल्या लोकांनी आणला असावा असे विद्वानांचे मत आहे. याबाबत अनेक मत-मतांतरे आहेत. एक मात्र खरे की दक्षिण व उत्तर भारतातील लोकांचा जसजसा एकमेकांशी संबंध येत गेला तसतसे एकमेकांनी 'महाशिला' पद्धतीचा अवलंब केला असावा. ही पद्धत इ.स.पू. २००० ते १००० च्या प्रारंभापासून सुरू झाली असावी. मृतदेह पुरल्यानंतर त्या व्यक्तीच्या स्मृतीप्रित्यर्थ त्या देहाशेजारी त्या व्यक्तीने जिवंतपणी वापरलेल्या वस्तू, खाद्यपदार्थ, दैनंदिन वापरातील त्याच्या आवडीच्या वस्तू ठेवून गाडल्या जात असत. मृतदेह पुरून टाकून त्यावर 'महाशिला' व स्मृतिवस्तू ठेवण्याची प्रथा दिसून येते. या दफनांतील घोड्यांची हाडे, घोडेस्वारीसाठी वापरावयाचा लगाम यासारख्या मिळालेल्या वस्तूंवरून मध्य आशियाकडे निर्देश करतात. मृतदेह पुरण्याची ही दफन पद्धती महाराष्ट्रात नागपूर परिसर, कर्नाटकात मस्की, आंध्र प्रदेशात नागार्जुन कोंडा, तामिळनाडूत आदिचल्लनूर आणि केरळ या राज्यात आढळते.

### महाशिला दफन पद्धती

महाशिला दफन पद्धती विविध प्रकारची होती. मृतदेहाला जमिनीत पुरून टाकणे हा प्रकार सर्वमान्य असला तरी पुढील विविध प्रकार केले जात होते.

१. मृताच्या अस्थी एका मोठ्या रांजणात ठेवून तो रांजण खड्ड्यात पुरून ती जागा ओळखता यावी म्हणून त्याभोवती वर्तुळाकार पद्धतीने दगड मांडून ठेवले जात होते किंवा महाशिला ठेवून मोठी दगडी टोपी ठेवली जात असे.

२. मृतदेहाशेजारी खड्ड्यात मृत व्यक्तीला जिवंतपणी आवडणाऱ्या अशा जीवनावश्यक वस्तू ठेवल्या जात असत.

३. काही मृतदेह दगडी शवपेट्यात ठेवून त्या खड्ड्यात पुरलेल्या देखील आढळल्या आहेत.

४. काही मृतदेह टाकीसारख्या पेटीत ठेवून त्यावर ग्रॅनाईटची मोठी सपाट शिळा ठेवलेली असे.

५. मृतदेह पुरलेल्या जागेवर एखादी प्रचंड शिळा उभी केल्याचे आढळले आहेत.

एकूणच लोहयुगातील 'महाशिला' संस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण अशीच आहे.

### महाशिला संस्कृतीचे अलिकडील उत्खनन

पुरातत्त्व खात्याने फेब्रुवारी २००४ मध्ये 'महाशिला' संस्कृतीचा शोध घेण्यासाठी तामिळनाडू राज्यात आदिचेनलूर येथे उत्खनन केले. येथे सुमारे ११४ एकर जागेत 'महाशिला' संस्कृतीचे अनेक अवशेष सापडले. त्यामध्ये मोठ्या

रांजणात मृतदेह ठेवून पुरलेल्या अनेक जागा मिळाल्या. एका रांजणात मृतदेहाचा सांगाडा आणि बाहेरील पृष्ठभागावर तामिळ-ब्राह्मी लिपीत केलेले लेखन, नक्षी, दोन शिंगी प्राण्यांचे चित्र, तांदळाच्या रोपाचे चित्र आढळले आहे. या संस्कृतीच्या उत्खननात ६ खड्ड्यात महाशिला संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत. मृतदेह पुरलेले १५७ रांजण मिळाले. यापैकी ५७ चांगल्या स्थितीत होते व त्यापैकी १५ मध्ये मानवी देहाचे सांगाडे सुस्थितीत होते. ज्या रांजणात सांगाडे होते त्यावर दुसरे रांजण होते. मोठ्या खड्ड्यात तिहेरी पद्धतीने (उतरंडीसारखे) रांजण आढळून आले. या रांजणाऱ्या शेजारी तांबडी, काळी, तांब्याच्या बांगड्या, कानातील रिंगा, भाल्याची लोखंडी पाती, वाडगे, गोलाकार ऊभट चिंचोळी भांडी आढळली आहेत.

श्री सत्यमूर्ती यांनी तामिळनाडूतील आदिचेनलूर येथे सापडलेल्या अवशेषावरून ही संस्कृती इ.स.पू. १००० ते इ.स.पू. ३०० च्या काळातील असावी असे अनुमान काढले आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-४**

**(अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. 'Megalith' या शब्दाचा अर्थ ............. आहे.

(१) लोखंड (ब) शिसे (क) मोठे दगड (ड) धातू

२. तामीळनाडू येथे ............. गावी महाशिला संस्कृतीचे उत्खनन करण्यात आले.

(अ) आदिचेनलूर (ब) इनाम (क) मुळशी (ड) सुपे

३. पुरातत्त्व खात्याने फेब्रुवारी २००४ मध्ये 'महाशिला' संस्कृतीचे उत्खनन ....... राज्यात केले.

(अ) महाराष्ट्र (ब) तामिळनाडू (क) कर्नाटक (ड) गुजरात

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मृतदेह पुरण्याची प्रथा कोणत्या युगापासून सुरू झाली ?

२. मृतदेह पुरण्याची 'महाशिला' दफन स्थळे कोठे सापडली आहेत.

३. पुरातत्त्व प्रमुख श्री सत्यमूर्ती यांनी 'महाशिला' संस्कृतीचा कालखंड किती सांगितला आहे ?

## २.३ सारांश

आर्यांचे प्रारंभिक जीवन सप्तसिंधूच्या काठी विकसित झाले. नंतरच्या काळात त्यांच्या सर्वांगीण जीवनाची प्रगती झाली. आर्यांनी वेदवाङ्मयाची निर्मिती केली. ऋग्वेद काळात समाजाच्या बदलत्या जीवनाबरोबरच त्यांच्या आचार व विचारांमध्ये बदल होत होता. धार्मिक जीवनात देवदेवता, धार्मिक आचार किंवा विचार यांच्या बाबतीत साचेबंदपणा नव्हता. उत्तर वेद काळात आर्यांच्या संस्कृतीचा प्रसार झाला. त्यांच्या धार्मिक जीवनाला यज्ञविधीच्या साचेबंद स्वरूपामुळे बंधनात्मक कर्मकांडाचे स्वरूप आले. सामाजिक जीवनात चातुर्वण्य पद्धतीतून जातिसंस्था

उदयास आली. तिची बंधने तीव्र बनत गेली. 'महाशिला' संस्कृती म्हणजे मृतदेहाचे दफन करून त्यावर एक 'महाशिला' (मोठा दगड) ठेवत. ही पद्धत इ.स.पू. २००० ते १००० च्या प्रारंभापासून सुरू झाली असावी. ती वैशिष्ट्यपूर्ण होती.

## २.४ पारिभाषिक संज्ञा (संकल्पना व अर्थ)

- **आर्य** - या संस्कृत शब्दाचा अर्थ उच्चकुलीन, उदार, कर्तव्यनिष्ठ व सदाचारी असा होतो. भारतात येणाऱ्या इंडो युरोपियन आक्रमकांनी स्वतःला आर्य म्हणवून घेतले.
- **वेद** : 'विद' म्हणजे जाणणे. 'विद' या धातूपासून वेद शब्द बनला. वेद म्हणजे ज्ञान.
- **ऋचा** : ऋग्वेदातील प्रत्येक कडव्यास 'ऋचा' म्हणतात.
- **संहिता** - वैदिक मंत्राचा समुच्चय म्हणजे 'संहिता'.
- **ब्राह्मणे** - वेदांचे स्पष्टीकरण करणारे ग्रंथ.
- **उपनिषदे** - उपनिषद या शब्दाचा अर्थ गुरूजवळ बसून मिळविलेले ज्ञान.
- **आरण्यके** - अरण्यात जाऊन रचलेले ग्रंथ.
- **रांजण** - मातीपासून बनवलेले उभे, खोलगट भांडे.

## २.५ स्वयं अध्ययनाची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(अ) उत्तर ध्रूवीय (२) मॅक्समूलर (क) ऋग्वेद (ड) ब्राह्मणे (५) १०८

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) सप्तसिंधूच्या (२) स्वामी दयानंद सरस्वती (३) संहिता, ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे

(४) १० मंडले व १०२० सूक्ते (५) मिटानी व हिटई

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(अ) परुष्णी (२) ग्रामीण (क) पुरोहित (ड) स्त्री (५) रुद्र

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. पुरोहित, सेनानी, हेर, दूत व ग्रामणी

२. अपाला, घोषा, विश्ववरा, लोपामुद्रा, सिकता, निवावरी, उर्वशी

३. वरुण, इंद्र, अग्नी, सूर्य, पृथ्वी, रुद्र, विष्णू, यम, ओम, मरुत, वायू व पर्जन्य.

४. स्वर्गातील देवता, आंतरिक्ष देवता व पृथ्वीवरील देवता.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(अ) कुरु (२) भागदूत (क) ब्रह्मचर्याश्रम (ड) ८ (५) रुद्र, विष्णू.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. उत्तर वेद काळात

२. कुरु व पांचाळ

३. सभेमध्ये वयस्कर व प्रतिष्ठित लोकांचा समावेश असे तर समितीमध्ये सामान्य स्तरातील प्रतिनिधी असत.

४. मैत्रेयी व गार्गी

५. विशिष्ट हेतू मनात ठेवून फलप्रातीच्या अपेक्षेने करण्यात येणाऱ्या यज्ञांना 'काम्ययज्ञ' म्हणत.

**स्वयं अध्ययन प्रश्न- ४**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(अ) मोठा दगड (२) आदिचेनल्लूर (क) तामिळनाडू

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. लोहयुगापासून

२. महाराष्ट्रात नागपूर, कर्नाटकात मस्की, आंध्रप्रदेशात नागार्जुन कोंडा, तामिळनाडूत आदिचेनलूर व केरळ येथे.

३. इ.स. पूर्व १००० ते इ.स. पूर्व ३००

## २.६ सरावासाठी स्वाध्यायासाठी

**(अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. वेदकाळातील राजकीय व सामाजिक जीवनाची माहिती लिहा.

२. वैदिक वाङ्मयाची माहिती द्या.

३. उत्तर वेद काळातील सामाजिक व राजकीय जीवनाची माहिती सांगा.

४. महाशिला संस्कृतीची माहिती द्या.

**(ब) टिपा लिहा.**

१. आर्यांच्या मूळ वसतिस्थानाबाबत वेगवेगळे सिद्धांत.

२. वेदकालीन स्त्रियांची व्यवस्था.

३. आश्रमव्यवस्था

४. 'महाशिला' संस्कृतीतील दफन पद्धती

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. कोलारकर रा. गो. - प्राचीन भारताचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९१.

२. कदम य. ना. - प्राचीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

३. प्रा. भिडे गजानन, प्राचीन भारत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६.

४. देव प्रभाकर, प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, नागपूर, २००२.

५. जोशी लक्ष्मणशास्त्री, वैदिक संस्कृतीचा इतिहास, प्राज्ञपाठशाळा, मंडळ, वाई, १९७२.

६. देव शांताराम भालचंद्र, पुरातत्त्वविद्या, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७६ ते २००२.

## घटक - ३

# इ.स.पूर्व सहाव्या शतकातील भारत


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ नागरीकरण व सोळा महाजनपदे

३.२.२ (अ) जैनधर्म : वर्धमान महावीरांचे जीवन व कार्य

(ब) बौद्ध धर्म : गौतम बुद्धांचे जीवन व कार्य

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक संज्ञा, संकल्पना व अर्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

३.८ क्षेत्रीय कार्य


### ३.० उद्दिष्टे

या प्रकरणात आपल्याला,

- महाजनपदाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करता येईल.
- नागरीकरण व सोळा महाजन पदांचा आढावा घेता येईल.
- जैनधर्म व बौद्ध धर्माच्या उदयाची कारणे विशद करता येतील.
- वर्धमान महावीर यांचे पूर्वचरित्र व त्यांचे कार्य विशद करता येईल.
- जैन धर्माचे स्वरूप व तत्त्वज्ञान स्पष्ट करता येईल.
- जैन धर्माचा प्रसार व योगदान विशद करता येईल.

- गौतम बुद्धाचा पूर्व वृत्तांत व बौद्ध धर्म यासंबंधीची माहिती स्पष्ट करता येईल.
- बौद्ध संघ, बौद्ध धर्म ग्रंथ, बौद्ध धर्म परिषदा यासंबंधीची माहिती विशद करता येईल.
- बौद्ध धर्माच्या योगदानाचा आढावा घेता येईल.

## ३.१ प्रस्तावना

इ.स.पूर्व ६ वे शतक प्राचीन भारताच्या इतिहासात युगप्रवर्तक ठरले. धार्मिक पुनरुज्जीवनाची सुधारणावादी चळवळ ह्या कालखंडात सुरू होऊन जैन व बौद्ध धर्माचा उदय झाला. याच काळात लोहयुग महत्त्वपूर्ण ठरले. लोखंडाच्या वापरामुळे कृषीव्यवस्था स्थिर व भक्कम बनली. त्याच्याच जोडीला अनेक व्यवसायांचा विकास झाला. तसेच व्यवहारात नाण्यांचा वापर सुरू झाला. व्यापार, उद्योगधंद्यांची भरभराट झाली. त्यामुळे अनेक नगरांचा उदय होऊन अनेक नगरे व्यापार केंद्रे म्हणून प्रसिद्धीस आली. त्याअनुषंगाने प्राचीन भारताचे नागरिकीकरण घडून आले.

## ३.२ विषय विवेचन

प्राचीन भारतात या कालखंडात अनेक महत्त्वपूर्ण बदल घडून आले. अनेक समृद्ध नगरांचा उदय झाला. हे भारतातील दुसरे नागरीकरण होते. पहिले नागरीकरण हडप्पा संस्कृतीच्या कालखंडात घडून आलेले होते. हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासानंतर पुन्हा भारतात जमात केंद्रीत व भटकी अवस्था प्राप्त झाली. त्यानंतर उत्तर वैदिक काळात कृषीव्यवस्था भक्कम झाली. त्यामुळे लोकांच्या जीवनाला स्थिरता प्राप्त होऊन अनेक वस्त्या अस्तित्वात आल्यानंतर दुसऱ्या नागरीकरणाची पूर्व तयारी झाली. अशा नगरांमधून प्राचीन वस्तूविनिमय आणि गाय हे संपत्तीचे प्रमुख साधन न मानता या नगरांमध्ये कारागिर व व्यापाऱ्यांनी प्रथमच नाण्यांचा वापर आरंभ केला. त्यातूनच तत्कालीन वाङ्मयात पूर, पतन, निगम, नगर, महानगर, दुर्ग इत्यादी नागरीकरण दर्शविणारे शब्द आढळतात.

### ३.२.१ नागरीकरण व सोळा महाजनपदे

#### नियोजनबद्ध नगरांची रचना

कृषीप्रधान संस्कृती, स्थिर लोकवस्ती, लोखंडाचा विस्तृत वापर यातून इ.स. ६ व्या शतकापासून उत्तर भारतात प्रादेशिक राज्याचा उदय झाला. संपन्न शेती, कारागिरी, विविध व्यवसाय, नाण्यांचा शोध व वापर, लेखन-कलेचा विकास यातूनच व्यापाराचा विकास झाला. नवीन नगरे, व्यापारी केंद्र म्हणून उदयास आली. उत्तर प्रदेश-बिहार परिसरातील कौशांबी, श्रावस्ती, राजगृह, उज्जयनी, वैशाली, काशी, तक्षशिला, चम्पा, साकेत, पाटलीपुत्र, बनारस ही त्या कालखंडातील भरभराटीस आलेली तत्कालीन प्रसिद्ध नगरे होती.ही नगरे सर्वसामान्यपणे ३० ते ५० चौ. मै. क्षेत्रफळ असलेली असून ही भक्कम तटबंदीयुक्त होती. ही नगरे मुख्यतः उत्तर भारतातील गंगा नदी किनारी किंवा दोन हमरस्ते एकत्र असणाऱ्या ठिकाणीच विकसित होत असत. ग्रामीण भाग विस्तृत मार्गांनी जोडलेला असून नगरातील रस्ते हे लांब-रुंद असत. उत्कृष्ट नगररचनेची वैशिष्ट्ये या ठिकाणी प्राप्त झालेली होती. मृद्पात्र भांडी, मातीच्या मूर्ती, हाडे, हस्तीदंत, दगड, काच इत्यादीपासूनच्या वस्तू, तांबे, लोखंड धातूच्या वस्तू तयार करण्याचे कारखाने त्या कालखंडात होते. नगरातून अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापारही भरभराटीस आलेला होता. पूर्वेकडील ताम्रलिपी

आणि पश्चिमेकडील भृगुकच्छ या नगरातून ब्रह्मदेश, सिलोनशी मोठ्या प्रमाणावरती व्यापार चालू होता. ही सर्व नगरांची प्रक्रिया प्राचीन कालखंडाची समृद्धी स्पष्ट करते. ह्या सर्व नगरांचा उदय हा मुख्यतः उत्तर हिंदुस्थानामध्ये घडून आल्याचे दिसते. वरील अनुषंगाने ग्रामीणीकरणातूनच नागरीकरणाची प्रक्रिया घडून आल्याचे दिसते.

**सोळा महाजनपदे**

इस.स.६ व्या शतकामध्ये सोळा मोठी राज्ये अस्तित्वात होती. या राज्यांनाच महाजनपदे असे म्हणतात. आरंभी प्राचीन भारतातील लहान-लहान राज्यांना जनपद असे म्हणत. आरंभी ही जनपदे जे क्षत्रिय राजे राज्य करीत होते त्यांच्या नांवाशी निगडीत होती. पुढे बौद्ध कालखंडात क्षत्रियांचा विस्तार झाला. शेती आणि अन्य व्यवसायही भरभराटीस आले. त्यातून जनपदे बलिष्ठ झाली. हळूहळू त्यातील काही शक्तिशाली बनून जवळच्याच जनपदांना जिंकू लागली. त्यामुळेच त्यांना महाजनपदाचे रूप प्राप्त झाले. या १६ महाजन पदांची माहिती बौद्ध व जैन ग्रंथातून मिळते. तसेच हिरोडोट्स, एरियन, स्ट्रॅबो, प्लीनी, कार्टियस व थ्युसीडिडज या परकीय लेखकांनी १६ महाजन पदाबद्दल विश्वसनीय माहिती लिहून ठेवलेली आहे. प्रा. ऱ्हिस डेव्हिस यांनी 'बुद्धकालीन भारत' या ग्रंथात प्रामुख्याने १६ महाजनपदे त्यावेळी होती असे म्हटले आहे. ही महाजनपदे राजकीयदृष्ट्या स्वतंत्र व सार्वभौम होती. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे

**१. कुरु** : आजचा दिल्ली परिसरातील प्रदेश व मिरत जिल्ह्याच्या परिसरात कुरुंचे राज्य होते. कुरुंची राजधानी इंद्रप्रस्थ होती. कुरु राज्यात आरंभी असलेली राजसत्ताक पद्धती बदलून नंतरच्या कालखंडात तेथे प्रजासत्ताक राजवट आली. वैदिक काळात कुरुंचे राज्य वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होते. महाभारतातील कौरव कुरुवंशीय होते. इ.स.पू. ६ व्या शतकापासून मात्र कुरुंचे महत्त्व घटत गेले.

**२. पांचाल** : पांचाल हे वैदिक काळात प्रसिद्ध पावलेले राज्य होते. आजचा रोहील खंडाचा प्रदेश म्हणजे पांचाल राज्य होते. पाच राज्यसंघाचा मिळून पांचाल राज्याची निर्मिती झाली होती. भगिरथी नदीमुळे पांचालचे उत्तर पांचाल व दक्षिण पांचाल असे दोन भाग पडले होते. उत्तर पांचालची राजधानी अहिछत्र व दक्षिण पांचालची राजधानी काविल्यनगर होती. महाभारताची नायिका द्रौपदी ही पांचाल राजकन्या होती. प्राचीन भारतातील सांस्कृतिक आणि व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध पावलेले कनोज हे पांचालच्या राज्यात होते. इ.स.पूर्व ५ च्या शतकापासूनच पांचालचे अस्तित्व नष्ट झाले.

**३. शूरसेन** : यमुना नदीच्या खोऱ्यात शूरसेन हे राज्य होते. या राज्याची राजधानी मथुरा होती. हे विद्येचे महत्त्वाचे केंद्र होते. शूरसेनचा राजा अवलंतीपुत्र हा गौतम बुद्धाच्या समकालीन होता. त्याच्यामुळे मथुरा आणि आसपासच्या प्रदेशात बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणावर घडून आला होता. कृष्णभक्तीचे एक मोठे केंद्र असल्याचा उल्लेख प्राचीन साहित्यात आढळतो.

**४. मत्स्य** : हे राज्य आजच्या जयपूर परिसरात होते. विराटनगर ही त्याची राजधानी होती. येथे महाभारत काळात विराटाचे राज्य होते. पांडवांनी वनवासातील अज्ञात वर्षे विराटाच्या नगरीतच गुप्तरूपाने घालविली होती. नंतरच्या काळात हे मगधात विलीन झाले असावे असे मत अनेक इतिहासकारांनी व्यक्त केले आहे.

**५. चेदी :** आजच्या बुंदेल खंडातील परिसरात चेरी राज्य होते. महाभारतानुसार चेदीची राजधानी 'शक्तिमती' होती. चेदी या राज्याचे दोन भाग असावेत. दुसरा भाग नेपाळच्या डोंगरदऱ्यामध्ये असावा असे इतिहासकारांचे मत होते. चेदी या राज्यालाही मगध या महाजनपदाने जिंकून घेतले होते.

**६. कोसल :** हे राज्य शक्तिशाली होते. श्रावस्ती ही कोसलांची राजधानी होती. गौतम बुद्धाच्या वेळेस येथील राजा प्रसेनजीत हा होता. त्याची बहीण कोसलदेवी मगध सम्राट बिंबिसार ह्याला दिलेली होती. त्यावेळी प्रसेनजिताने काशी राज्याचा काही प्रदेश बिंबिसाराला दिला. पुढे कोसल व मगध राज्यात शत्रूत्व निर्माण झाले व हे राज्य लयास गेले.

**७. काशी :** बौद्ध जातक कथामधील वर्णनावरून समजते की काशीची राजधानी वाराणसी हे शहर भारतातील प्रसिद्ध सहा शहरांपैकी एक होते. जैन तीर्थंकर पार्श्वनाथाचे वडील अश्वसेन काशीचे राजा होते. अनेक बौद्ध व जैन साहित्यातून काशीचे राज्य भरभराटीस व समृद्ध असल्याचे वर्णन आहे. काशी-कोसल-मगध संघर्षात हे राज्य लयास गेले.

**८. मगध :** मगध हे राज्य आधुनिक बिहारमधील पाटणा व गया परिसरात उदयास आले होते. मगधाची राजधानी गिरीव्रज (राजगृह) होती. मगध गंगा आणि शोण नद्यांच्या सुपीक भूभागात वसले होते. मगधाचा इतर महाजनपदाशी सतत संघर्ष झाला व मगधालाच विजय प्राप्त होत राहीले. त्यामुळे मगध हे शक्तिशाली राज्य बनले. गौतम बुद्धाच्या पूर्वी बृहद्रथ व जरासंघ या राजांनी राज्य केले होते. बिंबिसार, अजातशत्रू, महापद्मनंद तसेच चंद्रगुप्त मौर्य आणि अशोकाने मगधावर राज्य केले. साम्राज्याच्या उदयापर्यंत मगध हे भारतीय राजकारणाचे केंद्र होते.

**९. वृज्जी :** वज्जी हे जनपद गंगा नदीच्या उत्तरेस आणि हिमालयाच्या दक्षिणेला होते. हे आठ जमातींचे संघराज्य होते. वृज्जी, विदेह, लिच्छवी, वज्जी या जमाती प्रमुख होत्या. वैशाली त्यांची राजधानी होती. ही नगरी तिन्ही बाजूंनी भक्कम तटबंदी आणि टेहळणी बुरुज असलेली सुसज्ज होती. वर्धमान महावीराची आई वैशालीची राजकुमारी होती. लिच्छवीच्या गणराज्यातील ७,७०७ अशा प्रतिनिधींची एक सभा राज्यकारभार करत होती. प्रतिनिधीमध्ये राजे, उपराजे, सेनापती, भंडारीक इ. समावेश होत. प्रत्यक्ष दैनंदिन कारभार पाहण्यासाठी आठ महत्त्वाच्या मंत्र्यांचा समावेश होता.

**१०. मल्ल :** १६ महाजनपदांपैकी मल्ल हे एक प्रजासत्ताक पद्धतीचे राज्य होते. या राज्याचे मुख्य दोन भाग होते. कुशीनगर व पावा या दोन त्यांच्या राजधान्या होत्या. बुद्धकाळात या स्थळांना अत्यंत महत्त्व होते. मल्ल लोक शूर लढवय्ये होते. बौद्ध धर्माविषयी त्यांना आस्था होती. सध्याच्या उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यात हे राज्य होते.

**११. वत्स :** प्रयाग व अलाहाबादचा प्रदेश म्हणजे वत्स राज्य होय. वत्साची राजधानी कोशांबी होती. वत्सराज उदयन हा बौद्ध काळातील प्रसिद्ध राजा होता. धर्मशास्त्र, वेदांत, तत्त्वज्ञानातही प्रवीण होता. उदयन राजाने राज्याच्या संरक्षणाची उत्तम व्यवस्था ठेवली होती. त्याने राज्याच्या सरहद्दीवर मजबूत व भव्य किल्ले उभारले होते. त्याशिवाय प्रचंड हत्तीचे दल उभारले होते. सुरुवातीला तो वैदिक धर्माचा कट्टर अनुयायी होता. गौतम बुद्धाच्या संपर्कात आल्यामुळे त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता.

**१२. अंग** : हे राज्य गंगेच्या उत्तर खोऱ्यात हाते. चम्पा ही अंग राज्याची राजधानी होती. १६ महाजन पदांपैकी हे एक सामर्थ्यशाली राज्य होते. हे नगर महागोविंदाने वसविले असून बौद्ध कालखंडातील महत्त्वपूर्ण नगरात चंपाचा समावेश होता. हे शहर व्यापार व संपत्तीसाठी प्रसिद्ध होते. इ.स.पूर्व ६ व्या शतकात अंग राज्य मगधात विलीन झाले.

**१३. अवंती** : इ.स.पूर्व ६ व्या शतकात अवंती महाजनपद हे शक्तिमान राज्य होते. विंध्य पर्वतामुळे अवंतीच्या राज्याचे दोन भागात विभाजन झाले होते. उत्तरेची राजधानी उज्जैन होती तर दक्षिणेची राजधानी महिष्मती होती. अवंती म्हणजेच माळवा प्रदेश होय. इ.स.पू. ६ व्या शतकात पराक्रमी राजा प्रद्योत सत्तेवर आला. त्याचा पराक्रम पाहून मगधाच्या अजातशत्रूने राजगृह या राजधानी भोवती भक्कम तटबंदी केली होती. प्रद्योत बौद्ध उपासक असल्याने अवंती हे बौद्ध धर्माचे मुख्य केंद्र बनले. त्याच्या मृत्यूनंतर हे राज्य मगध साम्राज्यात विलीन झाले.

**१४. अश्मक** : हे राज्य दक्षिणत भारतात गोदावरी नदीच्या परिसरात होते. वायू पुराणातील वर्णनानुसार येथील राजे हे इक्ष्वाकू वंशाचे होते. अश्मक राज्याची राजधानी पैठण होती. अश्मकचा शासनकर्ता अरुणने मगधावर विजय मिळवून काही प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडला होता. अश्मक आणि अवंती या दोन राज्यात संघर्ष होत असे. अवंतीच्या राजाने अश्मकाचा पराभव करून हे राज्य आपल्या राज्यास जोडले होते.

**१५. गांधार** : भारताच्या वायव्य प्रदेशात हे राज्य असून त्याची राजधानी तक्षशिला होती. तक्षशिला हे नगर व्यापाराचे प्रमुख केंद्र, विद्या आणि कलांचे माहेरघर होते. गांधारचे राजे धार्मिकदृष्ट्या उदारमतवादी होते. महाभारतातील धृतराष्ट्राची पत्नी ही गांधारची राजकुमारी होती. ख्यातनाम पाणिनी हा गांधारचाच रहिवासी होता. गांधार हे महाजनपद वैभवसंपन्न होते.

**१७. कंबोज** : भारताच्या पश्चिम सीमेवरील सौराष्ट्र भूमीच्या (गुजराथ) परिसरात कंबोज हे राज्य होते. द्वारका ही त्याची राजधानी असून भगवान श्रीकृष्ण महाभारत काळात द्वारकेचा सत्ताधीश होता. द्वारका नगरी व्यापारी व सांस्कृतिकदृष्ट्या श्रेष्ठ होती. नंतरच्या काळात हे परदेशी व्यापाराचे मुख्य केंद्र बनले होते. १६ महाजनपदापैकी कंबोज एक महत्त्वाचे महाजनपद होते.

वरील १६ महाजनपदापैकी अश्मक, गांधार, कंबोज वगळता बहुतेक राज्ये गंगेच्या मध्य व उत्तर खोऱ्यात दिसून येतात. या महाजनपदांच्या मध्ये सतत संघर्ष होत असे. त्यातून अनेक महाजनपदे नष्ट झाली. या संघर्षातून पांचाल, शूरसेन, कुरु, काशी अशा महाजनपदांचे महत्त्व कमी होत गेले. मगध साम्राज्य स्वरुपात उदयास आले. भौगोलिक अनुकूलता, आर्थिक समृद्धता, शूर सेनानी, पराक्रम राजांची परंपरा या कारणांमुळे मगध महाजनपदाचे साम्राज्यात रूपांतर होऊन इतर महाजनपदांच्यावर वर्चस्व निर्माण झाले.

## ३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१

### (अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.

१. इ.स.पू. ६ व्या शतकात भारतात ........... इतकी महाजनपदे होती.

(अ) १३ (ब) १४ (क) १५ (ड) १६

२. महाभारताची नायिका ......... ही पांचाल राजकन्या होती.

(अ) द्रौपदी (ब) कुंती (क) माद्री (ड) रुक्मिणी

३. ............... ही शूरसेनची राजधानी होती.

(अ) अहिछत्र (ब) मथुरा (क) विराटनगर (ड) अवंती

४. ............... हा कोसल महाजनपदाचा राजा होता.

(अ) प्रसेनजीत (ब) बिंबिसार (क) अजातशत्रू (ड) उदयन

५. ............... हा अवंतीचा पराक्रमी राजा होता.

(अ) अजातशत्रू (ब) अरुण (क) प्रद्योत (ड) बृहद्रथ

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ताम्रलिपी आणि भृगुकच्छ नगरातून कोणत्या परदेशी राज्यांशी व्यापार चालत असे ?

२. प्रा. ऱ्हिस डेव्हिस यांनी कोणता ग्रंथ लिहिला ?

३. कुरु महाजनपदाची राजधानी कोणती होती ?

४. कोसल देशाचा राजा प्रसेनजीतच्या बहिणीचे नाव काय होते ?

५. वत्स या महाजनपदाचा पराकमी राजा कोण होता ?

## ३.२.२ (अ) जैन धर्म : वर्धमान महावीरांचे जीवन व कार्य
## (ब) बौद्ध धर्म : गौतम बुद्धांचे जीवन व कार्य

इ.स.पूर्व सहावे शतक हे भारताच्या इतिहासात धार्मिक वैचारिक क्रांतीचे युग म्हणून ओळखले जाते. उत्तर वैदिक काळामध्ये धर्माचे साधे स्वरूप बदलून किचकट व गुंतागुंतीचे बनले. त्यामुळे लोकांच्यामध्ये धार्मिक असंतोष निर्माण झाला. धर्मातील मूळ शिक्षण बाजूला जाऊन धर्मबाह्य आचरणावर भर दिला जावू लागला. लोकांच्या धार्मिक आवश्यकता पूर्ण करण्याची शक्ती वैदिक धर्मात राहिली नसल्यामुळे लोकांचा वैदिक धर्मावरील विश्वास उडाला. अशा परिस्थितीत लोकांना साधा, सोपा, सरळ व निश्चित मार्ग सांगणाऱ्या नवीन धर्माची आवश्यकता वाटू लागली. या पार्श्वभूमीवर भारतात अनेक नवीन पंथ उदयास आले. या नवीन संप्रदायांची संख्या ६२ होती. या अनेक संप्रदायापैकी जैन व बौद्ध धर्म प्रमुख होते. हे दोन्ही धर्म वैदिक धर्माहून भिन्न होते. भगवान महावीर व गौतम बुद्ध यांनी भारतीय समाजाला नवीन धर्माची व विचारांची दिशा दाखवली. यांच्या धर्मांना 'अवैदिक धर्म' असे म्हणतात.

### अवैदिक धर्माच्या उदयाची कारणे (पार्श्वभूमी)

इ.स.पू. सहाव्या शतकात भारतात जैन, बौद्ध या नवीन धर्माचा उदय होऊन जीवनाचे नवे तत्त्वज्ञान मांडले गेले. त्याचप्रमाणे इतर अनेक पंथांचा सुद्धा उदय झाला. साधारणतः जुन्या वैदिक धर्मातील दोषांमुळे नवीन धर्म स्थापन

करण्यात आले. लोकांना साधे सरळ जीवन जगण्यासाठी धर्माची आवश्यकता असते. त्यातून प्रतिक्रिया म्हणून या धर्माचा उदय झाला. त्याची अनेक कारणे आहेत.

**१. वैदिक धर्मातील अर्थशून्यता** : वैदिक धर्माच्या मूळ तत्त्वज्ञानाचा गाभा बाजूला पडून धर्म म्हणजे निरनिराळे यज्ञ आणि समारंभ असे त्याला स्वरूप प्राप्त झाले. यज्ञ विधी इतके खर्चीक होते की सर्वसामान्यांना झेपत नव्हते. सामान्य माणूस यज्ञाच्या खर्चाच्या ओझ्याखाली दबून गेला व नवीन धर्माकडे आकर्षित झाला.

**२. यज्ञाचे महत्त्व** : निरनिराळ्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी पशुबळी व क्वचित प्रसंगी नरबळी देण्यात येऊ लागले. यामुळे सर्वसामान्य माणूस हादरून गेला. त्याला यज्ञातील कर्मकांड बंद होणे आवश्यक वाटू लागले व त्यातूनच अहिंसावादी धर्म पुढे आला.

**३. मंत्रावरील अतूट विश्वास** : यज्ञातील कर्मकांडाबरोबरच मंत्र-तंत्रास याच काळात महत्त्व प्राप्त झाले. मंत्रामुळे रोगनिवारण, शत्रूचा नाश आणि युद्धात विजय मिळतो अशी लोकांची श्रद्धा झाली. त्यामुळे अशा अज्ञानी समजुतीने लोकांची फसवणूक होऊ लागली. या मार्गाचे अनेक पंथ, उपपंथ भोंदू साधू मांत्रिक होते. त्यांनी सामान्य माणसांची फसवणूक करण्यास सुरुवात केली. त्यामुळे धर्मजागृतीची गरज समाजात निर्माण झाली.

**४. पुरोहित वर्गाची मक्तेदारी** : प्रत्येक धार्मिक विधीसाठी पुरोहितांची आवश्यकता असे. त्यामुळे समाजात त्यांचे सर्वोच्च स्थान होते. जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्वच विधी केवळ पुरोहितांमार्फतच होत असत. राजकारण, प्रशासन, पुरोहित, गुरु, मार्गदर्शक म्हणून त्यांना विशेष मान व दर्जा प्राप्त झालेला होता. पुढील काळात त्यांच्यात अहंकार वाढला. लोकांची आडवणूक व शोषण त्यांच्याकडून होऊ लागले. त्यामुळे समाजात त्यांच्या मक्तेदारीस विरोध झाला. त्यामुळे नवीन धर्मप्रवाह उदयास आले.

**५. कडक जातीबंधने** : या काळात वर्णाश्रम व्यवस्था अधिक बळकट झाली. त्यामुळे जातिभेद अधिक तीव्र झाले. एका जातीतून दुसऱ्या जातीत प्रवेश करणे कठीण झाले. शूद्रांची परिस्थिती दयनीय झाली. त्यामुळे नवीन धर्माची गरज निर्माण झाली.

**६. मतभेद** : वैदिक धर्मात वेदांना सर्वोच्च मानले आहे. वेदात सांगितलेला धर्म सर्वसामान्यांना कळत नव्हता. कर्म-ज्ञान-तप इत्यादी संस्कृत भाषेतील सिद्धांताबद्दल तत्कालीन विद्वानांनाही ठाम माहिती सांगता येत नव्हती. अशा परिस्थितीत वैचारिक गोंधळ नाहीसा करून सुस्पष्ट विचार व नेतृत्वाची आवश्यकता वाटली व यातूनच नवीन धर्माची आवश्यकता वाटू लागली.

**७. वेदवाद** : वेदांना अपौरुषेय मानले आहे. कारण ते ब्रह्मदेवाच्या मुखातून निघालेले आहेत अशी लोकांची श्रद्धा होती. अंतीम सत्य म्हणजे वेद अशी लोकांची धारणा होती. परंतु धर्माचे मूळ तत्त्वज्ञान बाजूला जाऊन रूढी-परंपरा यांचे महत्त्व वाढल्याने त्यास विरोध झाला.

**८. आत्मीक अशांती** : या काळातील समाज हा मनातून अशांत होता. यज्ञाने मोक्ष मिळतो किंवा नाही याबद्दल त्यांच्या मनात संशय निर्माण झाला आणि त्यातून त्यांनी आत्मशांतीचा मार्ग धरण्याचा प्रयत्न सुरू केला.

**९. भाषेची अडचण :** वैदिक साहित्य संस्कृत भाषेतून लिहिण्यात आले होते. सामान्य माणसांना ही संस्कृत भाषा कळत नव्हती. धर्माचे तत्त्वज्ञान साधे, सोपे व लोकभाषेत असावे असे लोकांना वाटत होते.

**१०. अनेकेश्वरवाद :** वैदिक काळात सुरुवातीला ३३ देवता होत्या. त्यात सातत्याने भर पडत गेली. देवदेवतांची पूजा केल्याने मोक्ष मिळतो ही कल्पना समाजात रूढ झाली. कालांतराने या विचारात बदल झाला. अनेकेश्वरवादावर टीका होऊ लागली. मनुष्य हा स्वतःचा भाग्यविधाता आहे. त्याला आपल्या उत्कर्षासाठी देवदेवतांवर विश्वास ठेवण्याची गरज नाही हे तत्त्व पुढे आले.

**११. सामाजिक विषमता :** समाजातील वेगवेगळ्या जाती व वर्गासाठी वेगवेगळे नियम होते. ब्राह्मणांना विशेष अधिकार, सवलती होत्या. क्षत्रीय व वैश्यांसाठी वेगवेगळे नियम होते. शूद्रांना कोणतेही अधिकार नव्हते. आंतरजातीय विवाहाला बंदी होती. जातिबंधने कठोर होती. अशा सामाजिक विषमतेमुळे सामान्य लोकांत विद्रोहाची भावना निर्माण झाली.

**१२. आर्थिक कारण :** तत्कालीन काळात प्रत्येक वर्णाचा स्वतंत्र व्यवसाय ठरलेला होता. त्यामुळे पूर्वीचा व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय करता येत नव्हता. व्यवसाय बदलण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला दंड केला जात होता. म्हणून बदलत्या परिस्थितीप्रमाणे अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था बदलण्याची गरज निर्माण झाली.

**१३. नेतृत्वाचा अभाव :** मोक्षाचा नवीन मार्ग कोणीतरी सांगावा आणि त्याप्रमाणे मोक्ष मिळवावा अशी लोकांची अपेक्षा होती. ही काळाची गरज ओळखून लोकांना सोप्या भाषेत धर्म समजावून सांगण्याचे नेतृत्व कोणीतरी स्वीकारले पाहिजे होते. पण कोणीच पुढे न आल्याने नवधर्माची निर्मिती या काळात झाली.

वरील सर्व कारणांमुळे वैचारिक जागृती होण्यास सुरुवात झाली. महावीर व बुद्धाने नवीन ज्ञानाची प्राप्ती करून जीवन जगण्याचा नवा मार्ग उपलब्ध करून दिला. त्यांच्या धर्माचे ज्ञान क्षत्रिय, वैश्य, शूद्र व स्त्रियांना सामावून घेणारे समानतेचे व आचरणास सोपे होते म्हणून ते अवैदिक धर्माच्या स्थापनेस उपयुक्त ठरले.

## ३.२.२ (अ) जैन धर्म

जैनधर्म वैदिक धर्माएवढा प्राचीन धर्म आहे. जैन या शब्दाची उत्पत्ती 'जिन' या शब्दापासून झाली आहे. जिन म्हणजे जिंकणारा त्यावरून ज्याने आपल्या इंद्रियावर आणि विषय वासनेवर विजय मिळविला आहे त्यांना जैन म्हणत. जैन धर्मात इंद्रिय नियंत्रणावर अधिक भर देण्यात आला आहे. तसेच संसार त्यागावर या धर्मात अधिक भर दिला गेला. यावरून जैन धर्म हा निवृत्ती मार्गी आहे.

### ● जैनधर्माचे तीर्थंकर

जैनधर्माचे संस्थापक आणि प्रवर्तक यांना तीर्थंकर म्हटले जाते. देवापेक्षाही श्रेष्ठ दर्जा तीर्थंकराचा असे. जैन धर्म आणि साहित्यानुसार २४ जैन तीर्थंकर झाले आहेत. (१) ऋषभ, (२) अजित (३) संभव (४) अभिनंदन (५) सुमती (६) पद्मप्रम (७) सुपार्श्व (८) चंद्रप्रभू (९) सुविधी (१०) शीतल (११) श्रेयांस (१२) वासूपूज्य (१३) विमलनाथ (१४) अनंत (१५) धर्म (१६) शांती (१७) कुंथूनाथ (१८) अरह (१९) मल्ली (२०) मुनिसुव्रत

(२१) नेमिनाथ (२२) नेमिनाथ (अरिष्टनेमी) (२३) पार्श्वनाथ आणि वर्धमान महावीर हे २४ वे जैन तीर्थंकर होत.

**पार्श्वनाथ :** जैन धर्माचे तेविसावे तीर्थंकर पार्श्वनाथ मानले जातात. त्यांचा जन्म वर्धमान महावीरांच्या पूर्वी २५० वर्षे बनारसचा राजा अश्वसेनच्या कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव वामा व पत्नीचे नाव प्रभावती. वयाच्या तिसाव्यावर्षी त्यांनी गृहत्याग केला. कठोर तपश्चर्या करून त्यांना कैवल्यज्ञान प्राप्त झाले. त्यांनी आपल्या विचारांचा प्रसार केला. अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह हे त्यांचे चार उपदेश होते. सम्मेद शिखरजी या जैनांच्या सर्वश्रेष्ठ तीर्थसेनी त्यांना मोक्षाची प्राप्ती झाली.

**वर्धमान महावीर :** जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर आणि धार्मिक क्षेत्रातील एक क्रांतिकारक प्रभावी प्रचारक म्हणून महावीरांचा उल्लेख केला जातो. महावीरांचे नाव वर्धमान होते. त्यांचा जन्म इ.स.पू. ५३९ मध्ये वैशालीजवळच्या कुंदग्राम नगरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ व आईचे नाव त्रिशला होते. महावीरांच्या वयाच्या ३० व्या वर्षी आई-वडिलांचा मृत्यू झाला. याचाही त्यांच्या मनावर परिणाम झाला. आपला वडील बंधू नंदीवर्धन यांची संमती घेऊन त्यांनी संन्यास धर्म स्वीकारला.

**ज्ञानप्राप्ती :** गृहत्याग केल्यानंतर महावीरांनी १२ वर्षे कठोर तपस्या केली. ऋजुपालिका नदीच्या तटावर शाल वृक्षाखाली त्यांना आत्मज्ञान प्राप्ती झाली. त्यांनी आपल्या विकार व वासनांवर विजय मिळविला. सर्व इंद्रियावर विजय मिळविणारा म्हणून त्यांना 'जीन' असे म्हणू लागले. या नावावरूनच त्यांच्या अनुयायांना जैन हे नाव मिळाले. त्यांनी ज्या मार्गाचा प्रसार केला तो जैन धर्म म्हणून प्रसिद्ध पावला.

**धर्मविचारांचा प्रसार**

ज्ञान प्राप्तीनंतर महावीराने तीस वर्षे प्रवास करून आपल्या धर्मविचारांचा प्रचार केला. लिच्छवीचा राजा चेटक याची कन्या पद्मावती ही महावीरांची पहिली शिष्या होती. विदेह, अंग मगध, कोसल, श्रीवस्ती इत्यादी ठिकाणी त्यांनी धर्मप्रसार केला. मगधचा राजा अजातशत्रू, व बिंबिसार हे महावीरांचे शिष्य बनले. महावीराला एकूण १४ हजार शिष्य मिळाले. वयाच्या ७२ व्या वर्षी इ.स.पू. ५२७ मध्ये पाटणा जिल्ह्यातील राजगृहाजवळील 'पावा' या गांवी त्यांचे महानिर्वाण झाले.

**जैन धर्माची शिकवण (तत्त्वज्ञान)**

वर्धमान महावीरांनी भारतीय समाजाला रुढी-परंपरा, अंधश्रद्धा, वर्णभेदाच्या साखळीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. आपल्या उपदेशामध्ये धर्मासंबंधी आचरण करण्याचे नितीनियम सांगितले. त्यास जैन धर्माची शिकवणूक असे म्हणतात.

जैन धर्माची शिकवण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**(१) जैन धर्माची त्रिरत्ने :** त्रिरत्नांचे आचरण केल्यास मोक्षप्राप्ती होऊ शकते. कर्माच्या बंधनाचा नाश आणि कैवल्य ज्ञानप्राप्तीसाठी महावीरांनी त्रिरत्नांचे अनुकरण करण्याचा उपदेश केला.

१. **सम्यक दर्शन** : सत्यावर विश्वास ठेवणे तसेच जैन सिद्धांतावर श्रद्धा ठेवणे.

२. **सम्यक ज्ञान** : महावीरांनी सांगितलेल्या ज्ञानावर श्रद्धा, विश्वास ठेवणे.

३. **सम्यक चरित्र** : नैतिक आचारांची शुद्धा राखणे.

महावीरांच्या शिकवणीप्रमाणे योग्य आचरण ठेवण्यासाठी पाच नियम सांगितले आहेत. त्याला पंचमहाव्रते असे म्हणतात.

**(२) पंच महाव्रते**

१. **सत्य** : नेहमी सत्य बोलावे. सत्यामुळे मोक्षप्राप्ती होऊ शकते.

२. **अहिंसा** : कोणत्याही जीवाची हिंसा करू नये.

३. **अस्तेय** : चोरी करू नये.

४. **ब्रह्मचर्य** : सर्व प्रकारच्या मानसिक, शारीरिक व पारलौकिक कामवासनेचा त्याग करणे.

५. **अपरिग्रह** : आवश्यक तेवढ्याच संपत्तीचा साठा करणे.

**(३) आत्मा** : महावीर परमेश्वरांचे अस्तित्व मान्य करीत नाहीत. मनुष्याच्या आत्म्यात जी काही श्रेष्ठता, नैतिकता आणि सामर्थ्य आहे तेच परमेश्वर स्वरूप होय. प्रत्येकाचा आत्मा परमेश्वर आहे. म्हणून आत्म्याचे खरे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा असे त्यांचे मत होते.

**(४) वेद अमान्य** : वेदातील तत्त्वज्ञानाने मोक्ष मिळतो हे महावीरांना मान्य नव्हते. यज्ञसंस्थेला व यज्ञातील हिंसेला त्यांनी विरोध केला. दैववाद व वेदवाद टाळण्यासाठी त्यांनी नव्या धर्माचे ज्ञान सांगितले.

**(५) तप व चिंतन** : ज्ञानप्राप्तीसाठी महावीराने संन्यास वृत्ती, तपश्चर्या, चिंतन, मनन, ध्यानधारणा, समाधी मार्गाने इंद्रियांवर विजय मिळवावा. त्यासाठी देहदंड करावा असा मार्ग सांगितला.

**(६) स्त्री स्वातंत्र्य** : पार्श्वनाथ व महावीरांनी स्त्रियांना जैन धर्मात प्रवेश खुला केला. त्यामुळे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबर अध्यात्मिक विकासाची संधी प्राप्त झाली. तसेच अनेक स्त्रियांनी जैन धर्माची दीक्षा घेतली. श्रमणी आणि श्रविका नावाच्या दोन स्त्री वर्गाची जैन संघात स्थापना करण्यात आली.

**(७) जातिव्यवस्थेस विरोध** : महावीर हे जातिव्यवस्थेविरुद्ध होते. मनुष्य आपल्या कर्मावरून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र बनू शकतो असे त्यांचे मत होते. त्यामुळे जैन धर्मात सर्व जातीतील लोकांना प्रवेश होता. जैन धर्म समतेवर आधारीत होता.

**जैनधर्माचा प्रसार :**

जैन धर्माचे साधे सोपे तत्त्वज्ञान असल्यामुळे अनेक लोक या धर्माकडे आकर्षीत झाले. महावीरांच्या काळात जैन धर्म कोसल, विदेह, मगध आणि अंग या राज्यात पसरला. त्यातून शेकडो अनुयायी त्यांना मिळाले. त्यांच्या हयातीतच अनेक राजांनी जैन धर्माला आश्रय दिला होता. चंद्रगुप्त मौर्य, बिंबिसार आणि अजातशत्रू यांनी जैन

धर्माचा स्वीकार केला होता. तसेच मथुरा, शूरसेन, वत्स, अवंती, माळवा, सौराष्ट्र, सिंध प्रांत, आंध्र, तेलंगणा व तामीळ प्रदेशातही जैन धर्माचा प्रसार घडून आला. कुशाण काळ आणि यानंतरही मथुरा व उज्जैन ही जैन धर्माची प्रसिद्ध केंद्रे होती. पाचव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत भारतातील कदंब, गंग, चालुक्य आणि राष्ट्रकूट राजे, रजपूत राजे यांनी जैन धर्मास राजकीय आश्रय दिला.

**● दिगंबर व श्वेतांबर पंथ**

**१. दिगंबर** : हा सनातन पंथ असून महावीराला थोर आत्मा पुरुष मानतात. लोक विवस्त्र राहतात. स्त्रियांना मोक्ष मुक्ती नाही असे मानतात. मूर्तीपूजा अमान्य, चिंतन, मनन, तप, ध्यान, धारणा मानतात.

**२. श्वेतांबर** : काळानुसार बदलणारा सुधारणावादी, पक्ष असून हा पंथ पार्श्वनाथास श्रद्धास्थानी मानतो. हे पांढरी वस्त्रे परिधान करतात. स्त्रियांना मोक्षाचा अधिकार मान्य केलेला आहे. महावीराला ईश्वर मानतात व मूर्तीपूजेस मान्यता. स्वर्ग, मोक्षप्राप्ती जीवनाचे उद्दिष्ट मानतात.

**● जैन धर्मग्रंथ**

जैन धर्मात जे प्रमुख ग्रंथ आहेत त्यांना 'आगम' असे म्हटले जाते. आगम म्हणजे उपदेश. महावीरांनी वेळोवेळी आपल्या प्रवचनातून जैन विचारांचा उपदेश केला. त्यातून जैन ग्रंथ व तत्त्वज्ञानाची निर्मिती झाली. बरेच विद्वान, आचार्य, जैन धर्माला लाभले. त्यांनी अनेक ग्रंथांची रचना केली. मूळच्या धर्मग्रंथाचे बारा अंग म्हणजे भाग होते. या ग्रंथाची भाषा अर्धमागधी असून दिगंबर पंथाचे काही ग्रंथ संस्कृत भाषेतही आहेत. सिद्धसेन दिवाकर यांचे न्यायावतार व संमती तर्क हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. आचार्य हेमचंद्र यांनी तर्कशास्त्र, व्याकरण, शब्दकोश, काव्यशास्त्रे, योगशास्त्र व इतिहासावर ग्रंथ रचले. गिरनार, दिलवाडा, पालीठाणा, जबलपूर, पावापुरी, कुंदग्राम व श्रवळणबेळगोळ ही ठिकाणे जैनधर्माची पवित्र क्षेत्रे मानली जातात.

**● भारतीय संस्कृतीस जैन धर्माची देणगी**

**१. साहित्यिक देणगी** : भारतीय संस्कृतीस जैन धर्माची मोठी साहित्यिक देणगी मिळाली आहे. धर्मग्रंथ सोडूनही बरेच जैन वाङ्मय प्राकृत व संस्कृत भाषेत आहे. भद्रबाहू, सिद्धसेन, हरिभद्र, सिद्ध, हेमचंद्र इत्यादी प्रसिद्ध लेखक होते. काव्य, कादंबरी, नाट्य, ललित वाङ्मयात जैन लेखकांनी मोठी भर घातली. तर्क, व्याकरण, गणित, ज्योतिर्विद्या, फलज्योतिष, शब्दकोष इत्यादी विषयात जैन लेखकांनी मोलाची ग्रंथरचना केली. याशिवाय कन्नड, तामिळ, तेलगू, गुजराथी, हिदी, मराठी, राजस्थानी भाषेमध्ये जैन साहित्याची मोठी वाङ्मय निर्मिती झाली.

**२. अहिंसेचा सिद्धांत** : अहिंसेच्या सिद्धांताच्या प्रभावामुळे वैदिक धर्मात यज्ञात देण्यात येणारी पशुबळीची प्रथा बंद झाली. या सिद्धांताने अल्लाउद्दीन खिलजी, मुहम्मद तुघलक, अकबर हे भारतीय शासक प्रभावित झाले. महात्मा गांधीजींच्या राष्ट्रीय आंदोलनाचे प्रमुख हत्यार अहिंसा होते. पंडित नेहरूंच्या पंचशील धोरणाचा आधार अहिंसा हाच होता. अशा प्रकारे धार्मिक क्षेत्रात जैन धर्माची सर्वांत मोठी देणगी अहिंसेचा सिद्धांत होता.

**३. सामाजिक समतेचा पुरस्कार :** महावीरांनी जातिव्यवस्थेला तीव्र विरोध करून सर्व जातीतील लोकांसाठी जैन धर्माची द्वारे खुली केली व सामाजिक समतेचा पुरस्कार केला.

**४. उच्च नैतिक जीवनावर भर :** महावीरांनी दैनंदिन जीवनात श्रेष्ठ, नैतिक आचरण व सत्कार्यावर भर दिला. वासनेचा त्याग, संयम व सदाचारावर जोर दिल्याने जैनधर्म सरळ, साधा व नैतिकता या सिद्धांताने परिपूर्ण बनला.

**५. सत्कार्य करण्याची प्रेरणा :** जैन धर्माच्या तत्त्वज्ञानानुसार चांगले कर्म केले की चांगले फळ मिळते व मोक्षप्राप्ती मिळते आणि जन्म-मरणाच्या बंधनातून मुक्तता होते. वाईट कर्म केले तर मोक्षप्राप्ती मिळत नाही. मोक्षप्राप्ती हेच मनुष्याच्या जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. हे अंतिम उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मनुष्याला जीवनात सत्कार्य करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे जैन धर्मामुळे मनुष्यात सत्कार्य करण्याची प्रेरणा निर्माण झाली.

**६. वैदिक धर्मास विरोध :** जैन धर्माने वैदिक धर्मातील यज्ञ, कर्मकांड व ब्राह्मणांच्या प्रभुत्वाला विरोध केला. त्यामुळे सामाजिक व धार्मिक दृष्टिकोनातून ब्राह्मणांचे महत्त्व शून्य ठरविले.

**७. महावीरांची साधी व सोपी शिकवणूक :** महावीरांनी साधे, सोपे तत्त्वज्ञान मांडले जे सहजपणे माणसाला समजणारे होते. त्यासाठी साधी, सोपी आचार संहितेची शिकवण दिली. त्यामुळे अहिंसा, नैतिकता व सदाचार हा धार्मिक व सामाजिक जीवनाचा खरा मार्ग दाखविला.

**८. राजकीय क्षेत्रातील योगदान :** जैन धर्माच्या अहिंसा या तत्त्वामुळे जनतेने युद्धाचा त्याग करून शांततापूर्ण जीवन जगण्यास प्रारंभ केला. मगध राजा, अजातशत्रू व नंद राजाने जैन धर्माचा स्वीकार केल्याने ते युद्धापासून परावृत्त झाले.

**९. चित्रकलेच्या क्षेत्रातील योगदान :** जैन धर्माने चित्रकलेच्या विकासातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. जैन आचार्यांच्या हस्तलिखीत पुस्तकात अनेक सुंदर चित्रे उपलब्ध आहेत. त्यांच्या रंगामध्ये विविधता होती. जैन चित्रकलेवर राजपूत चित्रकला शैलीचा विशेष प्रभाव होता.

**१०. कला व स्थापत्य क्षेत्रातील देणगी :** जैन धर्माने आपल्या धर्म प्रसारासाठी कलेचा आश्रय घेतला. स्थापत्य कला, मूर्तिकला आणि चित्रकलेच्या माध्यमातून भरीव कामगिरी केली. ओरिसरातील हाथीगुंफा, वेरूळची लेणी, उदयगिरी येथील लेणी, उस्मानाबाद, अंबेजोगाई येथील लेणी, खजुराहो येथील जैन मंदीरे, माऊंट अबू पहाडातील दिलवाडा मंदिरे, राणकपूर, गिरनार, पालिताना, पावापुरी, राजगृह येथील मंदीरे, मध्य भारतातील बडवानी व श्रवणबेळगोळ येथील बाहुबलीची प्रचंड मूर्ती या स्थापत्य कृतींनी भारतीय सांस्कृतिक जीवनात वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविलेला आहे.

भारतातील प्राचीन धर्मापैकी जैन हा एक धर्म असून या धर्माचे नियम कडक असल्याने त्याचा प्रचार जलद होऊ शकला नाही. त्यांना थोडेच अनुयायी मिळाले पण ते धर्माशी एकनिष्ठ राहणारे होते. म्हणून आजही भारतात सर्वत्र जैन धर्माचे अस्तित्व असलेले दिसून येते.

### ३.२.२ (ब) बौद्ध धर्म

इ.स.पू. सहाव्या शतकात जैन धर्माप्रमाणेच बौद्ध धर्माचाही उदय झाला. बौद्ध धर्माच्या उदयामुळे वैदिक धर्मावर मोठा आघात झाला. बौद्ध धर्माने वैदिक धर्मातील दोषांच्यावर कडाडून हल्ला केला. वैदिक धर्मातील दोष दूर करण्यासाठीच्या प्रयत्नातूनच बौद्ध धर्म वाढीस लागला. बौद्ध धर्माच्या उदयामुळे तत्कालीन वैदिक धर्मातील यज्ञविधी, अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, पुरोहितांचे वर्चस्व या मूलभूत गोष्टीत परिवर्तन घडून येऊन वैदिक धर्माचे हिंदू धर्मात रूपांतर झाले. जगातील एक मोठा धर्म म्हणून नावारुपास आलेल्या बौद्ध धर्माची शिकवण तत्त्वज्ञान म्हणजेच धर्मसंस्थापक, प्रसारक गौतम बुद्धांच्या जीवनकार्याचाच आढावा होय.

- **गौतम बुद्धांचे जीवन चरित्र**

बौद्ध धर्मसंस्थापक व समाज परिवर्तन घडविणारा युगपुरुष म्हणून गौतम बुद्धांना ओळखतात. गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पू. ५६७ मध्ये रोहिणी नदीच्या काठी असलेल्या कपिलवस्तु नगराजवळ लुंबिनी येथे झाला. त्यांचे पिता शुद्धोधन शाक्य गणराज्याच्या राजा होता. सिद्धार्थाच्या जन्मानंतर एका आठवड्यातच त्यांची आई मायावती मृत्यू पावली. त्यामुळे त्यांचे पालनपोषण मावशी गौतमीने केले. त्यामुळेच पुढील काळामध्ये तो गौतम म्हणून ओळखला जाऊ लागला. गौतमासंबंधी अनेक कथा प्रचलित आहेत. गौतम भविष्यात चक्रवर्ती सम्राट बनेल अथवा संन्यासी बनेल असे भविष्य वर्तविल्यामुळे त्यांचे पालनपोषण काळजीपूर्वक करण्यात आले. त्यांचे बालपण अत्यंत ऐश्वर्यात गेले. विश्वामित्र व संघमित्र या शिक्षकांनी त्यास शिक्षण दिले. लहानपणापासूनच बुद्धाचा स्वभाव विचारी आणि दयाळू होता. तो एकांतप्रिय होता. वडिलांनी त्यास सुखात ठेवण्याची हर प्रकारे प्रयत्न केला पण गौतमावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही.

- **गौतमाचा गृहत्याग**

शाक्यकन्या यशोधरा नावाच्या सुंदर मुलीशी त्यांचा वयाच्या १६ व्या वर्षी विवाह झाला होता. कालांतराने सिद्धार्थला राहूल नावाचा मुलगाही झाला. परंतु संसारसुखात सिद्धार्थचे मन रमत नव्हते. तो सदैव चिंतनात मग्न असे. राजधानीतून फिरत असताना त्याला वृद्ध माणूस, आजारी माणूस आणि मृत माणूस ह्यांचे दर्शन झाले. ते पाहून त्याला खूपच दुःख झाले. सर्व जगच दुःखमय असून त्यावर उपाय शोधण्याचा सिद्धार्थने निश्चय केला. त्यातून वयाच्या २९व्या वर्षी सर्व सुखे असतानाही संसार सुखाचा त्याग करून त्यांनी संन्यास घेण्याचे ठरविले. अशा प्रकारे इ.स.पू. ५३२ मध्ये सिद्धार्थ संन्याशी झाले.

**आत्मज्ञान प्राप्ती**

सिद्धार्थ यांनी जीवनाचे अंतीम सत्य शोधण्यास सुरुवात केली. त्यावेळी वैशाली नगरीतील 'अलकाराम' ह्या विद्वान आचार्यास गुरू केले. त्यांच्याकडून ध्यानमार्गाचे तंत्र आत्मसात केले. परंतु येथेही त्यांचे समाधान झाले नाही. त्यानंतर त्यांनी राजगृह येथील 'उदकरामपुत्र' ह्या सिद्ध पुरुषाचे शिष्यत्व पत्करले. तेथेही त्यांनी खडतर तपश्चर्या केली. त्याचाही उपयोग झाला नाही. त्यांनी सहा वर्षे योग साधनेत घालविली. त्यांची शरीर अस्थिपंजर झाले. तरीही त्यास दिव्यज्ञान प्राप्त झाले नाही. अखेरीस वैशाख पौर्णिमेच्या दिवशी गया येथील एका पिंपळाच्या झाडाखाली

ध्यानस्थ अवस्थेत बसले असताना त्यांना दिव्यज्ञानाची प्राप्ती झाली. त्यामुळे गौतम ज्ञानी बनला. म्हणजेच बुद्ध बनला. लोक बुद्ध म्हणून त्यांना ओळखू लागले. तसेच गयेला 'बुद्धगया' व पिंपळाच्या वृक्षाला 'बोधिवृक्ष' या नांवाने ओळखले जाऊ लागले.

**गौतम बुद्धांचे सारनाथ येथील पहिले प्रवचन व प्रसार :** दिव्यज्ञान प्राप्तीनंतर गौतम बुद्धांनी धर्मप्रचाराच्या दृष्टीने पहिले प्रवचन सारनाथ येथे दिले. सारनाथच्या मृगवनात तपश्चर्या करीत असलेल्या कौंडिण्य, वास्प, भद्रिक, अश्वजित व महानाम ह्या पांच ब्राह्मणांना आपल्या नवीन धर्माची दिक्षा दिली. त्यासच 'धर्मचक्र प्रवर्तन' म्हणतात. पुढील आयुष्यात ४५ वर्षे गौतम बुद्धांनी आपल्या धर्माचा प्रसार राजे, व्यापारी, सामान्य जनता यांच्यात केला. कोसल, काशी, मगध, वत्स, चेदी, विदेह, अंग, लिच्छवी या राज्यांना धर्माचे आचरण, शिकवण यासंबंधी प्रवचने दिली. कोसलचा राजा प्रसेनजीत व राणी मल्लिका, वत्सराजा उदयन, गणिका आम्रपाली, मावशी गौतमी, मगधाचे शासक बिंबिसार व अजातशत्रू यांनीही बौद्ध धर्म स्वीकारला. धर्माच्या प्रसारासाठी त्यांनी संघ स्थापन केले.

अशा प्रकारे धर्मस्थापना व प्रचारामुळे लक्षावधी लोक त्यांचे शिष्य झाले. दीर्घकाळ धर्मप्रसार केल्यानंतर वयाच्या ८० व्या वर्षी इ.स.पू. ४८७ मध्ये वैशाख शुद्ध पौर्णिमेसच कुशीनगर येथे बुद्धाचे महापरिनिर्वाण झाले. मृत्यूनंतर आठ राज्यात त्यांचे शरीर अवशेष, रक्षा, अस्थी नेण्यात आल्या. प्रत्येकाने त्या अवशेषावर स्तूप उभे करून बुद्धाची शिकवण चिरंतन ठेवली.

- **गौतम बुद्धांची शिकवण (बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान)**

गौतम बुद्धांची शिकवण अत्यंत साधी सोपी होती. जीवनातील दुःखाच्या कारणांचा शोध घेऊन त्याचा नाश करण्याचा प्रयत्न करतानाच त्यांनी दुःख मुक्तीचा व्यावहारिक मार्ग सांगितला. या करिता वेदाचे प्रामाण्य नाकारतानाच यज्ञातील पशुहत्येचा निषेध केला. यज्ञातील अर्थहीन विधीवर टीका केली. जातिव्यवस्था, पुरोहितांचे वर्चस्व यास आव्हान देतानाच देवाचेही अस्तित्व नाकारले.

- **चार आर्यसत्ये**

मानवाची दुःखातून सुटका होण्यासाठी गौतमांनी चार आर्यसत्यांचा स्वीकार केला.

१. **दुःख** : संसार दुःखमय आहे.

२. **दुःखसमुदाय** : तृष्णा, लोभ, भोग ही दुःखाची कारणे आहेत.

३. **दुःखनिरोध** : तृष्णेचा त्याग केल्याशिवाय दुःखातून मुक्त होता येत नाही.

४. **दुःखनिरोध मार्ग** : ह्या दुःखाचा त्याग करण्यासाठी त्यांनी अष्टांग मार्ग सांगितला.

**अष्टांग मार्ग**

बौद्ध धर्माच्या शिकवणुकीचे सार म्हणजेच अष्टांग मार्ग होय. सारनाथच्या प्रथम धर्मचक्र परिवर्तनामध्ये अष्टांग मार्गाचीच माहिती सांगितली होती. इच्छेचा नाश करण्यासाठी गौतम बुद्धांनी पुढील आठ मार्ग सांगितले.

१. **सम्यक दृष्टी** : चांगल्या मार्गावर गाढ श्रद्धा ठेवणे.

२. **सम्यक विचार** : चांगले विचार करावेत आणि त्यांचे प्रत्यक्ष आचरण करावे.

३. **सम्यक भाषण** : सत्य बोलावे, कमी बोलावे, मृदू बोलावे, कठोर बोलून दुसऱ्यांचे मन दुखवू नये.

४. **सम्यक कृती** : दानधर्म करावा, प्राणी मात्रावर दया करावी.

५. **सम्यक उपजीविका** : निती मार्गाने मिळविलेल्या संपत्तीवर उदरनिर्वाह करावा.

६. **सम्यक प्रयत्न** : विवेक, सदाचार व नीतीचा मार्ग अवलंबावा.

७. **सम्यक संकल्प** : इच्छेचा त्याग करून कर्मापासून मुक्ती मिळवावी.

८. **सम्यक समाधी** : मनाची एकाग्रता वाढविणे.

या व्यतिरिक्त बौद्ध धर्माची त्रिरत्ने बुद्धांनी सांगितली आहेत.

१. **प्रज्ञा** : म्हणजे धर्माचे पूर्ण ज्ञान.

२. **शील**: म्हणजे चारित्र्य

३. **समाधी** – समाधीशिवाय मनाची एकाग्रता साधल्याशिवाय निर्वाणपद प्राप्त होत नाही.

● **पंचशील तत्त्वे** : गौतम बुद्धांनी गृहस्थी जीवनातील प्रत्येक माणसांनी म्हणजेच बौद्ध उपासक व उपासिका यांना नैतिक नियम घालून दिले.

१. **सत्य** : माणसाने नेहमी सत्य बोलावे.

२. **अहिंसा** : कोणत्याही प्राणिमात्राची हत्या करू नये.

३. **अस्तेय** : जे आपल्या मालकीचे नाही त्याची अभिलाषा करू नये.

४. **अपरिग्रह** : संपत्तीचा साठा आवश्यकतेपेक्षा अधिक करू नये.

५. **ब्रह्मचर्य** : परस्त्री पवित्र मानणे. ब्रह्मचर्याचे पालन करणे.

● **बौद्ध धर्मसंघाची स्थापना**

गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी भिक्षु आणि भिक्षुणींचे संघ स्थापन केले. त्यांना 'बौद्धसंघ' असे नाव दिले. भिक्षु आणि भिक्षुणींना संन्यस्त राहून धर्मप्रसार करण्याचे कार्य करावे लागत होते. सर्वसंग परित्याग करून संसाराचा मोह सोडून संन्यास घेऊन, बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन ते बाहेर पडत. बौद्ध संघात प्रवेश घेण्याचा विधी अत्यंत साधा होता. त्यांना बुद्धावर, बौद्ध धर्मावर व बौद्ध संघावर निष्ठा ठेवून एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागत असे. या संघात १८ वर्षांवरील स्त्री-पुरुषांना प्रवेश मिळत असे. संघात प्रवेश केलेल्या स्त्री-पुरुषांचे मुंडन केले जात असे. पिवळ्या रंगाची वस्त्रे धारण करावी लागत.

● **संघाचे नियम**

संघात दाखल झाल्यानंतर बौद्ध भिक्षुला दहा नियमांचे पालन करावे लागे. (१) प्राणीहत्या करणार नाही, (२) चोरी न करणे, (३) ब्रह्मचर्य पाळणे, (४) असत्य भाषणाचा त्याग, (५) मद्यपानाचा त्याग, (६) अवेळी भोजन करू नये, (७) नृत्य, गायन, वादन यांचा त्याग, (८) सौंदर्य प्रसाधनांचा त्याग, (९) मऊ बिछान्याचा त्याग, (१०) सोने-चांदी इ. मौल्यवान धातू किंवा वस्तूंचे दान घेऊ नये.

संघाची घटना लोकशाही विचारसरणीवर आधारीत होती. कोणतीही कृती सर्वांच्या विचाराने केली जात असे. भिक्षुंचे संघ आजही म्यानमार, श्रीलंका, थायलंड, बांगलादेश येथे मूळ स्वरूपात आहेत.

● **बौद्ध धर्मग्रंथ**

गौतम बुद्धांच्या मृत्यूनंतर बौद्ध धर्मग्रंथाची निर्मिती झाली. बुद्धाने सांगितलेले विचार, उपदेश आणि प्रवचने बौद्ध पंडितांनी केलेले भाष्य या दोन माध्यमातून बौद्ध वाङ्मयाची निर्मिती झाली. अनेक विद्वान साहित्यिक व तत्त्वज्ञ बौद्ध धर्माला लाभल्यामुळे ग्रंथ निर्मितीत भर पडली. बौद्ध धर्मग्रंथ हे पाली, अर्धमागधी, संस्कृत, परकीय भाषेतही लिहिले आहेत. सुत्तपिटक, विनयपिटक, अभिधम्म पिटक हे तीन पिटक ग्रंथ आहेत. धम्मपद, थेरगाथा, थेरीगाथा हे काव्यग्रंथ आहेत. याशिवाय सिंहली भाषेत दीपवंश, महावंश, तिबेटी भाषेत दिव्यावदान हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. मिलिंद प्रश्न, नैतिप्रकरण, ललिता विहार, 'मंजूश्रीमुळकल्प' इ. ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

● **बौद्ध धर्मातील पंथ**

गौतम बुद्धांच्या निर्वाणानंतर त्यांच्या शिष्यात मतभेद सुरू झाले. त्यातूनच बौद्ध धर्मात महायान व हिनयान असे दोन पंथ अस्तित्वात आले.

**१. हिनयान पंथ** : बुद्धांच्या मूळ शिकवणीवर चालणारा सनातनी, कर्मठ व संन्यस्त मार्गाचा पुरस्कार करणारा आत्मक्लेश यास महत्त्व देणारा, मूर्तीपूजा अमान्य असलेला असा हा हिनयान पंथ होय. या पंथाचा प्रसार सिलोन, ब्रह्मदेश या देशात झाला.

**२. महायान** : सुधारणावादी, भक्तीमार्गाचा पुरस्कार करणारा, बुद्धांना देवता समजून पूजा करणारा, पूजाअर्चा, प्रार्थना, मोक्ष विधीमंत्राचा स्वीकार करणारा हा पंथ होय. चीन, तिबेट, मध्य व पूर्व आशिया भागात या पंथाचा प्रसार झाला.

● **बौद्ध धर्मपरिषदा**

बौद्ध धर्माच्या इतिहासात धर्मपरिषदांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण गौतम बुद्धांच्या मृत्यूनंतर बौद्ध भिक्षुकांमध्ये मतभेद निर्माण झाले. हे मतभेद दूर करण्यासाठी बौद्ध धर्मपरिषदा आयोजित केल्या होत्या.

**१. राजगृह परिषद :** बुद्धांच्या मृत्यूनंतर त्याच वर्षी इ.स.पू. ४८७ मध्ये पहिली बौद्ध महासभा भरली होती. मगध सम्राट अजातशत्रूने ही परिषद आयोजित करताना साहाय्य केले होते. महाकश्यप हा परिषदेचा अध्यक्ष होता. आनंद व उपाली यांनी या परिषदेत मार्गदर्शन केले होते. येथे सुत्त व विनय पिटकांची रचना सुरू झाली. ५०० भिक्षुक परिषदेत उपस्थित होते.

**२. वैशाली परिषद :** इ.स.पू. ३८७ मध्ये वैशाली येथे राजा काकवर्णी कालशोक याने आयोजित केली होती. बौद्ध भिक्षूंच्या दैनंदिन आचाराविषयी मतभेद होऊन बौद्ध धर्मात महायान व हीनयान पंथ निर्माण झाले.

**३. पाटलीपुत्र परिषद :** बौद्ध धर्मातील निर्माण झालेले मतभेद दूर करण्यासाठी अशोकाने इ.स.पू. २५१ मध्ये पाटलीपुत्र येथे या तिसऱ्या परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेचे अध्यक्षपद मोगलीपुत्त तिस्स होते. दोन्ही पंथात ऐक्य प्रस्थापित करणे हा परिषदेचा उद्देश होता. येथे अभिधम्मपिटकाची रचना करण्यात आली.

**४. कुंडलवन परिषद :** इ.स. पहिल्या शतकात कुशाण सम्राट कनिष्काने या चौथ्या धर्मपरिषदेचे आयोजन काश्मीरमध्ये कुंडवन येथे 'वसुमित्र' यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केले होते. या परिषदेत त्रिपिटीकावर तीन महाभाष्ये रचली गेली. ५०० भिक्षू परिषदेस हजर होते. या परिषदेनंतर बौद्ध धर्म हीनयान व महायान या दोन संप्रदायात विभक्त झाला.

**● भारतीय संस्कृतीस बौद्ध धर्माची देणगी**

बौद्ध धर्माने भारतीय संस्कृतीच्या संपन्नतेमध्ये महत्त्वाची भर टाकली. भारताच्या सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, साहित्यिक आणि राजनैतिक क्षेत्रात बौद्ध धर्माचा फार मोठा प्रभाव पडलेला होता. त्याचा पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल.

**१. सोपा आणि लोकप्रिय धर्म :** कर्मकांडे, यज्ञसंस्था, पुरोहितशाही, यज्ञातील हिंसाचाराला विरोध करणारा हा धर्म साधा सोपा होता. सोपी भाषा, सोपा सदाचार, सोपी शिकवण इत्यादीमुळे हा धर्म भारतात अतिशय लोकप्रिय झाला.

**२. उच्च नैतिक शिकवण :** बौद्ध धर्माने सदाचार, पवित्र जीवन, नैतिकता, जनसेवा, स्वार्थत्याग, कर्मशुद्धी इत्यादी उच्च व श्रेष्ठ आदर्शावर अधिक भर दिला. त्यामुळे समाजातील चारित्र्यसंवर्धनाला मोठ्या प्रमाणात मदत झाली.

**३. अहिंसेचे महत्त्व :** यज्ञातील हिंसाचाराची अमानुषता पटवून सांगितली. त्यामुळे पुढे हिंदू धर्मात नैतिकता, सदाचारांचे व अहिंसेचे महत्त्व वाढत गेले.

**४. जातिभेदाला विरोध व समतेचा स्वीकार :** बुद्धांनी जन्म तत्त्वावर केलेली वर्णव्यवस्था नाकारली. सर्व मानव समाज समान व स्वतंत्र असून सर्वांना आध्यात्मिक प्रगती करण्याचा व निर्वाणप्राप्तीचा अधिकार आहे असा संदेश दिला. सामाजिक व्यवस्थेला लोकशाहीच्या सिद्धांतावर आश्रित करण्याचा प्रयत्न बौद्ध धर्माने केला.

**५. वैदिक धर्म सुधारण्यास चालना :** बौद्ध धर्मामुळे वैदिक धर्म प्रभावीत झाला. वैदिक धर्माची पिछेहाट थांबविण्यासाठी शंकराचार्यांसारख्यांनी वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करावयास सुरुवात केली. वैदिक धर्मातील कर्मकांडाचे स्तोम, हिंसाचार यावर बंधने आली. हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान सोपे करण्यात आले. चातुर्वण्य व्यवस्थेबद्दल काही प्रमाणात उदार धोरण स्वीकारले. संस्कृत भाषेतील ग्रंथ लोकभाषेतून उपलब्ध करून दिले.

**६. मठपद्धती :** आपले संघटन करून, ठिकठिकाणी मठ स्थापन करून धर्माचा प्रसार करता येतो. ही गोष्ट बौद्ध धर्माने भारताला प्रथमतः दाखवून दिली. समान विचारांचे लोक एकत्रित येऊन त्यांनी सांघिक जीवन घालवावे. ईश्वरचिंतन करीत असताना आपल्या धर्माचा प्रसारसुद्धा करावा ही नवीनच कल्पना बौद्ध धर्माने भारताला दिली.

**७. मूर्तिपूजा :** हिंदू धर्मामध्ये मूर्तिपूजेला विशेष स्थान नव्हते. परंतु बौद्ध धर्मातील महायान पंथामुळे हिंदू धर्मात सुद्धा मूर्तिपूजेला जास्त प्राधान्य मिळू लागले.

**८. बोलीभाषांचा विकास आणि विस्तार :** बौद्ध धर्माचा प्रसार बोलीभाषेून झाल्यामुळे त्यांचा मोठ्या प्रमाणात विकास घडून आला. त्यामुळे प्राकृत भाषेत मोठ्या प्रमाणावर वाङ्मय निर्माण झाले.

**९. इतर पंथाचा उदय :** भागवत धर्म, शैव व इतर पंथाच्या निर्मितीसाठी अप्रत्यक्षपणे बौद्ध धर्मच कारणीभूत ठरला.

**१०. भारतीय संस्कृतीचा विदेशात प्रसार :** इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात मध्य आशिया, जपान, चीन, कोरीया, खोतान, तिबेट, ब्रह्मदेश, नेपाळ, श्रीलंका, जावा, सुमात्रा, कंबोडिया आणि मलाया देशात बौद्ध धर्माचा प्रसार झाला. सम्राट अशोकाने आपली कन्या संघमित्रा आणि मुलगा महेंद्र यांना धर्माच्या प्रसारासाठी श्रीलंकेत पाठविले होते. त्यापैकी जपान, सयाम, चीन, तिबेट व ब्रह्मदेश यासारख्या अनेक देशात आजही बौद्ध धर्म टिकून आहे. भारतीय साहित्य, तत्त्वज्ञान, शिल्पकला, नृत्यकला, महाकाव्ये इत्यादींचा यामुळे भारतीय संस्कृतीचा परदेशात प्रसार झाला. त्या देशांचे भारताशी मैत्रीपूर्ण संबंध राहिले.

**११. भारतीय कला व स्थापत्य क्षेत्रातील विकास :** या क्षेत्रात बौद्धधर्माने क्रांतीच घडवून आणली. बौद्ध भिक्षुंनी स्तूप, स्तंभ, विहार, चैत्य यासारख्या अप्रतिम कलाकृती निर्माण केल्या. सारनाथ सांची येथील स्तूप, गया येथील बौद्ध मंदीर, अजिंठा-वेरुळ, पितळखोरा येथील बुद्धांच्या जीवनाशी संबंधीत अनेक जातक कथा पाषाणावर शिल्पबद्ध आहेत. यामुळे शिल्पकलेच्या गांधार, मथुरा शैलींना चालना मिळाली.

**१२. बौद्धिक स्वातंत्र्य :** वेदांचे प्रामाण्य, पुरोहितांचे वर्चस्व आणि यज्ञविधीतील गुंतागुंतीमुळे समाजात बौद्धिक स्वातंत्र्य शिल्लक राहिले नव्हते. गौतम बुद्धांनी ह्या सर्वांविरुद्ध बंड पुकारले. विचारांचा आणि बुद्धी स्वातंत्र्याचा त्यांनी जोरदार पुरस्कार केला. त्यामुळेच बौद्ध काळात नागार्जुन, असंग, वसुबंध यासारखे थोर तत्त्वज्ञानी निर्माण होऊ शकले.

**१३. साहित्य निर्मिती :** अमरकोश, जातक कथा, त्रिपिटीकावर आधारित साहित्य, बुद्ध चरित्र,

मंजुश्रीमूळकल्प, दिव्यावदान, ललित विस्तार, मिलिंद पन्हो, राजा हर्षाचे नागानंद नावाचे नाटक इत्यादी साहित्याची निर्मिती झाली.

बौद्ध धर्माच्या शिकवणुकीमुळे भारतीय संस्कृतीच्या संपन्नतेमध्ये महत्त्वाची भर टाकली गेली. भारताच्या सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, साहित्यिक आणि राजनैतिक इत्यादी सर्व क्षेत्रांच्या विकासाला बौद्ध धर्मानेच प्रभावित केले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

**(अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१. जैन धर्मातील २४ वे तीर्थंकर ............... हे होत.

(अ) पार्श्वनाथ (ब) अजितनाथ (क) शांतीनाथ (ड) महावीर

२. लिच्छवी राजाची ........... ही राजकन्या महावीरांची पहिली शिष्या होती.

(अ) पद्मावती (ब) यशोमती (क) चेलन्ना (ड) शुभ्रशी

३. वर्धमान महावीरांचे महानिर्वाण ........... या ठिकाणी झाले.

(अ) गया (ब) सांची (क) पावा (ड) पाटलीपुत्र

४. गौतम बुद्धांच्या वडिलांचे नांव ......... होते.

(अ) शुद्धोधन (ब) उदयन (क) अजातशत्रू (ड) दिवाकर

५. .......... येथे गौतम बुद्धांना दिव्यज्ञानाची प्राप्ती झाली.

(अ) कपिल वस्तु (ब) गया (क) लुंबिनी (ड) वैशाली

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. जैन धर्माची त्रिरत्ने कोणती ?

२. जैन धर्माची पंच महाव्रते कोणती ?

३. गौतम बुद्धांनी धर्मप्रचाराच्या दृष्टीने पहिले प्रवचन कोणत्या ठिकाणी दिले ?

४. बौद्ध धर्म ग्रंथाची नावे सांगा

५. बौद्ध धर्मातील दोन उपपंथ कोणते ?

## ३.३ सारांश

इ.स.पू. सहावे शतक प्राचीन भारताच्या इतिहासात युगप्रवर्तक ठरले. धार्मिक क्रांती याच काळात घडून आली. लोखंडाच्या उपकरणामुळे कृषी व्यवसायात फार मोठी प्रगती झाली. धान्याचे प्रचंड उत्पादन निघू लागले. अतिरिक्त उत्पादनामुळे व्यापाराची गरज निर्माण झाली. संपन्न शेती, कारागीर, वेगवेगळे व्यवसाय, नाणी, लेखन कलेचा विकास, गरजेच्या वस्तूंचे उत्पादन यातून नागरी समाजाचा उदय झाला व अनेक नगरांचा, व्यापारी केंद्रे म्हणून उदय झाला. श्रावस्ती, अयोध्या, कपिलवस्तू, कुशिनगर, बनारस, वैशाली, पाटलीपुत्र, चिरांद, राजगीर, चंपा ही त्या काळातील भरभराटीस आलेली महानगरे होती. सर्व नगरांचा उदय हा मुख्यतः उत्तर हिंदुस्थानामध्ये घडून आल्याचे दिसते. इ.स.पू. सहाव्या शतकामध्ये सोळा मोठी राज्ये अस्तित्वात होती. या राज्यांनाच महाजनपदे असे म्हणतात. बौद्ध व जैन ग्रंथातून, परकीय प्रवास वृत्तांतातून १६ महाजन पदांची माहिती मिळते. याच कालखंडात वैदिक धर्मास विरोध करण्याच्या प्रक्रियेतून समानता व अहिंसेवर आधारीत जैन आणि बौद्ध धर्माचा उदय झाला. सर्वसाान्यांना समजेल अशी शिकवणूक या धर्मने दिल्याने अनेक लोकांनी हा धर्म स्वीकारला. प्राचीन तीर्थंकरांची परंपरा असलेल्या जैन धर्माची वाढ ही भारतात मर्यादितच राहिली. लोकाश्रय आणि राजाश्रयाचा आधार लाभलेला धर्म म्हणजेच बौद्ध धर्म होय. गौतम बुद्धांनी प्रभावी प्रचारयंत्रणा, व्यवहारवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार केल्याने बौद्ध धर्म हा भारताबाहेर मोठ्या प्रमाणात प्रसारीत झाला. जैन व बौद्ध धर्माने भारतीय समाजाच्या सामाजिक, धार्मिक वाङ्मय, स्थापत्य, कला क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याचे महान कार्य केले.

## ३.४ पारिभाषिक शब्द - शब्दार्थ

- **महाजनपदे** - प्रादेशिक राज्ये
- **तीर्थंकर** - ईश्वराचा दूत, प्रेषित
- **जिन** - जिंकणारा, इंद्रियावर विजय प्राप्त करणारा
- **महापरिनिर्वाण** - महान व्यक्तींचा मृत्यू
- **त्रिपिटक** : गौतमांच्या वचनाचे तीन भाग.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं अध्ययन प्रश्न-१

**(अ)** (१) १६, (२) द्रौपदी (३) मथुरा (४) प्रसेनजीत (५) प्रद्योत

(ब) १. ब्रह्मदेश, सिलोन

२. बुद्धकालीन भारत

३. इंद्रप्रस्थ

४. कौसल देवी

५. उदयन

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**(अ)** (१) महावीर (२) पद्मावती (३) पावा (४) शुद्धोधन (५) गया.

**(ब)** १. सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान, सम्यक चरित्र.

२. सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह.

३. सारनाथ

४. दीपवंश, महावंश दिव्यावदान, मिलिंदपन्हो, मंजूश्रीमूळकल्प

५. हिनयान, महायान.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. सोळा महाजनपदांची थोडक्यात माहिती सांगा.

२. भगवान महावीरांचे जीवन व शिकवण स्पष्ट करा.

३. गौतम बुद्धांचे जीवन चरित्र व शिकवण सांगा.

**(ब) टीपा लिहा.**

१. प्राचीन भारतातील नागरीकरणाची प्रक्रिया

२. भारतीय संस्कृतीस जैन धर्माची देणगी

३. बौद्ध धर्म परिषदा

४. भारतीय संस्कृतीस बौद्ध धर्माची देणगी.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. कठारे अनिल - प्राचीन भारत, कल्पना प्रकाश, नांदेड, २००१.

२. शहा जी. बी. - प्राचीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, पुणे, २००४.

३. दीक्षित ना. सी. - प्राचीन भारताचा इतिहास, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर १९८७.

४. कोलारकर श. गो. - प्राचीन भारताचा राजकीय सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर १९९१.

५. आठल्ये वि. भा. - प्राचीन व मध्ययुगीन भारत सर साहित्य केंद्र, नागपूर - २००८.

६. चौधरी प्र. का. - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००२.

७. काटे पी. व्ही. - प्राचीन भारताचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९३.

८. आचार्य, केशवट्टीवार - प्राचीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८८

९. जोशी पी. जी. - भारताचा इतिहास विद्या प्रकाशन, नागपूर, २००२.


## ३.८ क्षेत्रीय कार्य

आपल्या परिसरातील जैन मंदिरे, बौद्ध लेणी यांना भेटी देवून माहिती संकलित करा.

## घटक - ४

# मौर्य काळ


२.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

४.२.१ साधने - अर्थशास्त्र आणि इंडिका

४.२.२ प्रमुख राजे व त्यांचे कार्य : चंद्रगुप्त आणि अशोक

४.२.३ मौर्यांचे प्रशासन

४.२.४ सम्राट अशोकाचा धर्म आणि मौर्यकालीन कला

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- मौर्य घराण्याच्या इतिहासाच्या साधनांमध्ये कौटिल्याचे अर्थशास्त्र व इंडिका ग्रंथ अभ्यासता येईल.
- मौर्य घराण्यातील प्रमुख राजे चंद्रगुप्त आणि अशोकाचे कार्य अभ्यासता येईल.
- मौर्यकालीन केंद्रीय व प्रांतिक प्रशासन व्यवस्था अभ्यासता येईल.
- मौर्यकालीन धार्मिक जीवनात सम्राट अशोकाचा धर्म अभ्यासता येईल.
- मौर्यकालीन कला स्पष्ट करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये अनेक महत्त्वपूर्ण घराणी होऊन गेली. त्यांनी भारताच्या इतिहासामध्ये महत्त्वपूर्ण ठसा उमटविला. एक आदर्श निर्माण केला. यापैकी मौर्य साम्राज्याची स्थापना ही महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. या काळापासून एका नव्या युगाला सुरुवात झाली. या मौर्य घराण्याची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आपल्याला पुढील प्रमाणे पाहता येतील : प्रजाहितदक्ष राजे, विशाल साम्राज्य, बलवान सत्ता, कार्यक्षम प्रशासन यंत्रणा, आर्थिक सुबत्ता, धार्मिक सहिष्णुता, व्यापार उद्योग, वाङ्मय, कला, स्थापत्य मध्ये प्रगती इ. राधाकुमूद मुखर्जी यांच्या मतानुसार ''मौर्य साम्राज्य भारताच्या इतिहासाची वैभवशाली व साम्राज्यवादी मुहुर्तमेढ होय.''

या घराण्यातील राजकीय, प्रशासकीय धार्मिक सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यास अनेक साधनांच्या आधारे आपल्याला करता येईल. या घराण्यात चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक यांनी आपल्या कारकिर्दीचा उत्कृष्ट ठसा उमटविला. या कार्यक्षम, प्रजाहितदक्ष राजांची कारकिर्द महत्त्वपूर्ण ठरली. धार्मिक बाबतीत भारतात नव्हे तर भारताबाहेर शांततामय मार्गाचा आदर्श निर्माण केला.

### ४.२.१ साधने

मौर्य साम्राज्याचा इतिहास अनेक साधनाच्या आधारे अभ्यासता येईल. भौतिक साधनामध्ये सम्राट अशोकाचे खारोष्टी व ब्राह्मी लिपीतील शिलालेख, पाकिस्तान, अफगाणिस्तान, भारतात महाराष्ट्र-सोपारा, गुजरात, गिरनार, ओरिसा-कलिंग, सांची, सारनाथ इ. तसेच मास्की, जुनागड येथील अभिलेखांत, मौर्य घराण्याची माहिती मिळते. शिलालेखाबरोबर चंद्रगुप्तमौर्य, अशोक, बिंदूसार यांच्या काळातील नाण्याच्या आधारे अनेक घटनावर प्रकाश टाकता येईल.

वाङ्मयीन साधनामध्ये कौटिल्याचे अर्थशास्त्र, मॅगेस्थेनिसचा इंडिका ग्रंथ, सिंहली भाषेतील दीपवस्स महावस्स ग्रंथ, तारानाथचा दिव्यावदान, विशाखादत्ताचे मुद्राराक्षस नाटक इ. उपयुक्त साधने म्हणून अभ्यासता येतील. वाङ्मयीन साधनातील कौटिल्याचे अर्थशास्त्र व मेगॅस्थेनिसचा इंडिका ग्रंथ महत्त्वपूर्ण साधन असल्याने याद्वारे मौर्य घराण्याचा सविस्तर अभ्यास करता येईल.

**कौटिल्याचे अर्थशास्त्र**

मौर्य काळाचा इतिहास समजून घेण्यासाठी कौटिल्याचे अर्थशास्त्र हा अत्यंत उपयुक्त ग्रंथ आहे. अर्थ हा राज्याचा पाया असल्याने राज्यनितीशास्त्र असलेल्या या ग्रंथाला 'अर्थशास्त्र' हे नाव देण्यात आले आहे. ६००० श्लोकांचा हा ग्रंथ, १५ विभाग व १८० उपविभागामध्ये विभागला आहे. डॉ. शामाशास्त्री यांनी ग्रंथाचा शोध लावला.

**अर्थशास्त्र ग्रंथात पुढील विषयाची सविस्तर मांडणी केली आहे :**

**राजा :**

या संदर्भातील आपले विवेचन देताना कौटिल्य सांगतो, राजा कल्याणकारी हुकुमशहा असावा. प्रजाहितदक्ष,

कूटनीतिज्ञ, राजनितीतज्ञ, दंडनीतीतज्ञ असावा. त्यांचे परराष्ट्र धोरण संधिसाधू असावे. त्याने शत्रूशी कधी मित्रत्वाने तर कधी शत्रूत्वाने वागावे. प्रशासनात त्याने आपल्या मंत्र्याचा सल्ला घ्यावा. त्याने नैसर्गिक आपत्तीत जनतेला नुकसान भरपाई द्यावी. गुन्हेगारांकडून कबुली करून घेण्यासाठी १८ प्रकार शारीरिक छळांचे सांगितले आहेत. प्रजेचा पालनकर्ता या नात्याने प्रजेचे कल्याण व रक्षण करावे. आपल्या साम्राज्यातील नगर, प्रांत प्रशासन, सैन्यव्यवस्था व्यवस्थित ठेवावी. राजाने दुर्गुण, अत्याचार व व्याभिचार पासून दूर रहावे. राजाचे व्यक्तिमत्व आकर्षक, चैतन्यमयी असावे.

**मंत्रीपरिषद :**

राजाने राज्यकारभार करताना मंत्र्यांची मदत घ्यावी. कौटिल्याने अष्टप्रधान व १८ महत्त्वाच्या खात्याचा उल्लेख केला आहे. राजाने मंत्र्याची परिक्षा घेऊन नेमणूक करावी. त्यांना रोख वेतन व बढती द्यावी. त्यांचा गौरव करावा.

**न्यायदान :**

न्यायव्यवस्थेत राजा हा सर्वश्रेष्ठ असल्याने त्याने कायदे करताना प्रजाहित लक्षात घ्यावे. शिक्षा कडक असाव्यात. न्यायदान कामकाजात विद्वान, पुरोहित, यांची मदत घ्यावी. न्यायालयाचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी त्याचे विविध विभागात विभाजन करावे.

**जनपद :**

कौटिल्याने 'जनपद' हा शब्द राष्ट्र किंवा राज्य यांना वापरला आहे. जनपदाच्या सीमा नैसर्गिक म्हणजे नद्या, पर्वत यांनी निर्धारित असाव्यात. जनपदात घनदाट जंगल, दलदल, खडकाळ, हिंस्त्र प्राणी नसावेत. जनपद भरपूर पाणी, प्रदूषणमुक्त व निसर्गरम्य असावे.

**दुर्ग :**

कौटिल्याने आपल्या ग्रंथात दुर्ग म्हणजे किल्ले याबद्दल सविस्तर लेखन केले आहे. शत्रूपासून राज्याचे रक्षण करण्यासाठी दुर्ग उपयोगी ठरत असून त्याचे औदिक दुर्ग (चार बाजूने पाणी), पार्वत दुर्ग (डोंगरी), धान्वत दुर्ग (पाणी, हिरवळ नसावी), वनदुर्ग (घनदाट अरण्य) प्रकार सांगितले आहेत.

**हेर व्यवस्था :**

हेरव्यवस्थेबद्दल कौटिल्य म्हणतो की राजाचे कान व डोळे म्हणजे उत्तम हेरव्यवस्था होय. राज्यातील सर्व गोष्टीची माहिती गुप्तपणे राजापर्यंत पोहचवण्यासाठी कार्यक्षम हेरयंत्रणा आवश्यक असते.

**दंड :**

कौटिल्याने दंड हा शब्द सैन्य या अर्थाने वापरला आहे. सैन्यदल पायदळ, घोडदळ, रथदल आणि हत्तीदळ असे चार विभागात असावे. कौटिल्याने सैन्याचे सात प्रकार सांगितले आहेत.

१. मोलसेना- राजधानी सुरक्षेसाठी

२. भूतसेना- पैसे देऊन लढण्यासाठी

३. श्रेणी- लढाऊ सैन्य

४. मित्र सेना- मित्र राज्याची सेना

५. अमित्रसेना- शत्रुराजाची सेना

६. अटवी सेना- इतर जमातीचे सैन्य

७. ओत्साहिक सेना- युध्दप्रसंगी लुटालुट करणारी सेना

सैनिक हे शूर पराक्रमी, धाडसी राजाप्रती निष्ठा असणारे असावे.

**अर्थव्यवस्था :**

आर्थिक व्यवस्थेबद्दल कौटिल्य म्हणतो की राजाचा खजिना भरलेला असावा. विविध कराच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न वाढवावे, शेतकऱ्यांकडून १/६, व्यापारी व उद्योजक १/१० कर घ्यावा. तसेच खरेदी, विक्री, जकात, आयात-निर्यात, सरकारी जंगले, खाणी उद्योग, धरणे, पाणीपुरवठा यापासून तसेच नजराणा खंडणी, दंड यापासून मिळणारे उत्पन्न सरकारी खजिन्यात जमा करावे.

अशा प्रकारे कौटिल्याच्या अर्थशास्त्रात वरील विविध बाबींचा आपल्याला आढावा घेता येतो. प्रजेचे सुख तेच राजाचे सुख, प्रजेचे हित तेच राजाचे हित, स्वतःला प्रिय असे राजाचे हित नाही, प्रजेला प्रिय तेच राजाला प्रिय अशी अपेक्षा राजाकडून असे.

- **इंडिका :**

मौर्य कालखंडाचा अभ्यास करण्यासाठी ग्रीक भाषेत लिहिलेल्या इंडिका या ग्रंथाचाही उपयोग होतो.

ग्रीक राजा अलेक्झांडर (सिंकदर) याच्या मृत्यूनंतर त्याने जिंकलेल्या भारतातील प्रदेश मिळवण्यासाठी सेल्युक्स निकेटरने प्रयत्न केला. चंद्रगुप्त मौर्याने सेल्युकसचा पराभव केला. दोघांत झालेल्या तहानुसार सेल्युकसने मेगॅस्थेनीस याला आपला वकील म्हणून चंद्रगुप्ताच्या दरबारी पाठवले.

**मेगॅस्थेनीस :**

जवळ जवळ पाच वर्षे तो भारतात वास्तव्यास होता. या काळात त्याने जे अनुभवले, ज्या ज्या ठिकाणांना भेटी दिल्या, चंद्रगुप्ताचे प्रशासन, त्या काळातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, जीवन, प्रथा परंपरा या सगळ्याचे वर्णन आपल्या इंडिका या ग्रंथात केले. दुभाषकाच्या माध्यमाने त्याला जे समजले ते त्याने आपल्या भाषेत लिहिले.

**इंडिकातील भारताचे वर्णन :**

भारताचे भौगोलिक वर्णन करताना मेगॅस्थॅनीस म्हणतो भारत या महाद्वीपाचा आकार चौकोनी असून त्याच्या उत्तर सीमेवर हिमालय पर्वत आहे. गंगा ही भारतातील सर्वात मोठी नदी आहे.

**राजकीय जीवन :**

राजकीय जीवन विशद करताना तो म्हणतो की राजा सर्वश्रेष्ठ असल्याने राजाच्या संरक्षणासाठी व अंतःपुरात स्त्री हेरांची नेमणूक केली जात असे राजाच्या जीवाची काळजी घेतली जाई. राजा एका शयनकक्षात कधी दोन रात्री झोपत नसे. तो समारंभावेळी उत्तम पोषाख, अलंकार, हिरे-माणके परिधान करी. मेगॅस्थॅनीसने चंद्रगुप्ताच्या दरबाराचे विस्तृत वर्णन केले आहे. चंद्रगुप्त अत्यंत तेजस्वी होता. राजाच्या दरबारात सोने चांदी वापरून बनवलेल्या मौल्यवान खुर्च्या होत्या. रत्नजडीत सुवर्णाच्या सिंहासनावर राजा बसत असे. राजाच्या महालाच्या भोवती सुंदर बागीचा, पक्षी, प्राणी, असत. राजमहालात स्वर्गात असल्याची भास होत असे.

**सामाजिक जीवन :**

समाजजीवन अत्यंत सुखी व समृद्ध होते. सुपीक जमीन, खनिज संपत्ती विपूल प्रमाणात होती. समाजात जातीयता पाळली जात होती. जातीची बंधने अत्यंत कडक होती. श्रीमंत लोक अनेक स्त्रियांशी विवाह करत. लोकांना सुंदर वस्त्रे अलंकार वापरण्याची हौस होती. भारतीय सामाजाची सात विभागात विभागणी होती. (१) तत्ववेत्ता (२) गृहस्थ शेतकरी (३) धनगर व मेंढपाळ (४) कलाकार (५) सैनिक (६) हेर व दूत (७) सल्लागार.

**आर्थिक जीवन :**

आर्थिक जीवन सुखी व समृद्ध होते. शेती मुख्य व्यवसाय होता. दुष्काळात जनतेला सरकारकडून मदत मिळत असे. युद्धप्रसंगी शेतीचे नुकसान होऊ दिले जात नसे.

**धार्मिक जीवन :**

भारतीय लोक धार्मिक असून त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. मेगॅस्थॅनीसने साधू संताचाही उल्लेख केला आहे. तो तक्षशिलेच्या साधूचा उल्लेख करतो.

**पाटलीपुत्राचे वर्णन :**

मेगॅस्थॅनीसने आपल्या ग्रंथात पाटलीपुत्र या राजधानीचे उत्कृष्ट वर्णन केले. गंगा व शोण नदीच्या संगमावर वसलेले हे शहर भक्कम तटबंदीयुक्त होते. या शहरात प्रवेश करण्यासाठी १२ दरवाजे, ६४ उपदरवाजे व ५०० बुरुज उभारण्यात आले. सरदार, अधिकारी मंत्री यांच्या निवासस्थानाची उत्तम सोय होती. या शहराच्या व्यवस्थापनासाठी ३० सदस्यांचे मंडळ होते. त्यांच्या सहा उपसमित्या होत्या.

**लष्कर :**

लष्करी व्यवस्थेसाठी ३० सदस्यांच्या समितीने सहा विभागात विभाजन करून, त्यामध्ये प्रत्येकी पाच सदस्यांची नेमणूक केली जात असे. घोडदळ, पायदळ, हत्तीदळ, नविक दळ, रसद दळ, रथदळ असून सैनिक धनुष्यबाण, ढाल तलवार या हत्यारांनी लढत.

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**(अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ ............ आधारलेला आहे.

(अ) समाजशास्त्र (ब) राज्यनितीशास्त्र

(क) धर्मशास्त्र (ड) तर्कशास्त्र

२. कौटिल्याने दंड हा शब्द ............ अर्थाने वारला आहे.

(अ) न्यायव्यवस्था (ब) हेरव्यवस्था

(क) अर्थव्यवस्था (ड) सैन्य व्यवस्था

३. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात शेतकऱ्याकडून ............ टक्के कर घेतल्याचा उल्लेख आहे.

(अ) १/१० (ब) १/८ (क) १/६ (ड) १/४

४. सेल्युकसने आपला ............ हा वकील चंद्रगुप्ताच्या दरबारी पाठवला

(अ) मेगॅस्थेनिस (ब) डिमॅक्स (क) पेट्रोक्लीज (ड) डायनोसियस

५. मेगॅस्थेनिसने ............ हा ग्रंथ लिहिला

(अ) अर्थशास्त्र (ब) इंडिका (क) दिव्यादान (ड) महावस्स

६. मेगॅस्थेनिसने चंद्रगुप्ताच्या ............ राजधानीचे उत्कृष्ट वर्णन केले आहे.

(अ) वैशाली (ब) राजगृह (क) पाटलीपुत्र (ड) अवंती

७. मेगॅस्थेनिसने पाटलीपुत्र येथे नगराच्या व्यवस्थापनासाठी ............ सदस्याचे मंडळ होते असा उल्लेख केला आहे.

(अ) २० (ब) ३० (क) ४० (ड) ५०

### ४.२.२ चंद्रगुप्त मौर्य

**पूर्ववृतांत :**

मौर्य घराण्याचा संस्थापक म्हणून चंद्रगुप्तला ओळखले जाते. बौद्ध साधनातील उल्लेखावरुन चंद्रगुप्तचे वडील युद्धात मारले गेल्याने, त्याची आई आपल्या माहेरी पाटलीपुत्र नगरात राहू लागली. चंद्रगुप्ताने तक्षशिलेत वेद, धर्मशास्त्र, राजनितीशास्त्र, युद्धशास्त्राचे धडे घेतले. तो शूर पराक्रमी व महत्त्वाकांक्षी असल्याने तरुण वयातच नंदराजाच्या सैन्यात दाखल झाला. अत्याचारी नंद राजाची सत्ता उलथवून टाकण्यासाठी त्याने आर्य चाणक्य याच्याशी संगनमत केले. नंदसत्ता उलथवून टाकण्याचा त्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्याने नंद राजाने त्याला हद्दपार केले.

**अलेक्झांडरकडे नोकरी :**

हद्दपारीचे जीवन जगत असताना चंद्रगुप्त पंजाबमध्ये पोहोचला. यादरम्यान अलेक्झांडरची भारतावर स्वारी झाली होती. चंद्रगुप्ताने अलेक्झांडरच्या सैन्यात नोकरी करण्यास सुरुवात केली. आपल्या पराक्रमाने अनेक विजय संपादन केल्याने त्याची किर्ती अलेक्झांडरपर्यंत पोचली. पुढे स्वाभिमानी चंद्रगुप्ताने अलेक्झांडरची नोकरी सोडली.

**मगधावर स्वारी व नंदघराण्याचा शेवट**

अलेक्झांडरचे सैन्य सततच्या मोहिमांनी थकल्याने मायदेशी परत जात असताना मार्गात बॅबिलोन येथे, इ.स. पूर्व ३२३ मध्ये अलेक्झांडरचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याने जिंकलेल्या प्रदेशात गोंधळ निर्माण झाला. याचा फायदा चंद्रगुप्त व चाणक्याने घेवून, सैन्य जमवून, सुसज्ज सैन्याच्या मदतीने मगधावर आक्रमण करण्याचे ठरविले. त्याने काश्मिरचा राजा पर्वतक याच्याशी संधान बांधून, पंजाब, गंधार, कंबोज, येथील सैन्यनिशी मगधावर आक्रमण केले. पाटलीपुत्र येथे झालेल्या लढाईत धनानंद व त्याचे सहकारी मारले गेले. या युद्धाचा वृत्तांत 'मुद्राराक्षस' नाटकात व 'मिलिंदपन्हो' ग्रंथात येतो. या विजयानंतर चंद्रगुप्ताने मगधावर स्वतंत्र व प्रबल अशा मौर्य घराण्याची सत्ता स्थापन केली.

**चंद्रगुप्ताचे विजय :**

**१. ग्रीकसत्ता उच्चाटन :** मगध येथे सत्ता स्थापन करताच चंद्रगुप्ताने साम्राज्यविस्ताराचे धोरण आखले. त्यानुसार वायव्य भागावर स्वारी करून सिंधू नदीपर्यंतचा प्रदेश ग्रीकांकडून जिंकून घेतला. ग्रीक राज्यपाल युडेमॉस व फिलीप यांना भारतातून हाकलून लावले. ग्रीक सत्तेचे उच्चाटन केले.

**२. सेल्यूकस निकेटरशी युद्ध व विजय :** अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर पश्चिम आशियाच्या भागावर त्याचा सेनापती सेल्यूकस याची सत्ता निर्माण झाली. सेल्यूकस व चंद्रगुप्त यांच्यात इ. स. पूर्व ३०५ मध्ये युद्ध झाले. त्यात सेल्यूकसचा पराभव झाला. दोघांत झालेल्या तहानुसार सेल्यूकसने चंद्रगुप्ताला काबूल, कंदहार, बलुचिस्तान प्रदेश दिला. तसेच आपला राजदूत मेगॅस्थेनिस मौर्य दरबारी पाठवला. आपली कन्या हेलनचा विवाह चंद्रगुप्ताशी केला. याबदल्यात चंद्रगुप्ताने त्याला नजराणा म्हणून ५०० हत्ती भेट दिले.

**३. दक्षिण व पश्चिम विजय :** चंद्रगुप्ताचे सामाज्य पश्चिमेकडेही पसरले होते. सौराष्ट्रात त्यांचा पुष्पगुप्त नावाचा राज्यपाल होता. जुनागड शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.

चंद्रगुप्ताच्या दक्षिण विजयाबाबत इतिहासकरात मतभेद, असले तरी आपल्या आयुष्याच्या शेवटी जैन साधू भद्रबाहू यांच्याबरोबर तो म्हैसूर जवळील श्रवणबेळगोल येथे गेल्याची माहिती मिळते.

**साम्राज्यविस्तार :**

आपल्या  असामान्य पराक्रमी व लष्करी सामर्थ्याने चंद्रगुप्ताने प्रचंड साम्राज्यविस्तार केला. वायव्येस हिंदकुश पर्वतापासून आग्नेयेस बंगालच्या उपसागरापर्यंतच्या भागावर त्याचे वर्चस्व होते.

**योग्यता :**

महान योद्धा व उत्तम प्रशासक म्हणून चंद्रगुप्त हा इतिहासप्रसिद्ध राजा होऊन गेला. मौर्य घराण्याचा संस्थापक म्हणून त्याला इतिहासात स्थान आहे. छोटी राज्ये, समर्थ नेतृत्वाचा अभाव, अस्थिरता, अलेक्झांडरचे परकीय आक्रमण अशा परिस्थितीत भारतीय सत्ताधाऱ्यांना एकत्र आणून एकसंघ अंमल निर्माण करणारा व ग्रीकांना हुसकावून लावणारा चंद्रगुप्त मौर्य हा प्राचीन भारताच्या इतिहासातील महान क्रांतिकारक ठरतो. आपल्या समर्थ नेतृत्वाने त्याने अनेक संकटावर मात केली. निर्भयता व धाडस हे त्याच्या अंगचे खास गुण होते. मगधाची सत्ता मिळताच त्याने प्रचंड साम्राज्यविस्तार केला. प्रचंड साम्राज्य ताब्यात असतानाही मौर्य राजसत्ता, अनियंत्रित झाली नाही. त्याने प्रजेच्या अंतर्गत व बाह्य संरक्षणाला विशेष महत्त्व दिले व प्रजाहितदक्ष राजा म्हणून गौरव प्राप्त करून घेतला. चंद्रगुप्त कल्याणकारी प्रशासकही होता. त्याने प्रशासनाची व्यवस्था नीट लावली. सुसज्ज व कार्यक्षम अधिकारी नियुक्त केले. महसुलाची योग्य अकारणी केली. जनतेच्या सुविधासाठी रस्ते, कालवे, दवाखाने, पाटबंधारे निर्माण केले. राजा हा सर्वश्रेष्ठ न्यायाधीश असूनही न्यायालयाचे स्वातंत्र्य त्याने मान्य केले. धार्मिक बाबतीत सहिष्णू दृष्टीकोन ठेवला. आपल्या २४ वर्षांच्या दैदीप्यमान व यशस्वी कारकिर्दीनंतर त्याने राजवैभवाचा त्याग केला. जैन धर्म स्वीकारून कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथे तो मरण पावला.

- **सम्राट अशोक**

जगातील सर्व श्रेष्ठ राजांपैकी सम्राट अशोक एक आहे. बिंदुसारानंतर सत्तेवर आलेला सम्राट अशोक कार्यक्षम, प्रतिभावंत व महत्त्वाकांक्षी राजा होता. प्राचीन भारतात अशोकाने स्वतः लिहिलेली किंवा त्यांच्या आदेशानुसार अधिकाऱ्यांनी लिहिलेली साधने उपलब्ध झाली आहेत. त्याच्या मानसेहरा, कालसी, गिरनार, सोपारा इ. ठिकाणच्या १४ शिलालेखावरून तसेच कलिग, तराई, नागार्जुन स्तंभालेखावरून त्याच्या कार्याची सविस्तर माहिती घेता येईल.

**वारसा हक्कासाठी युद्ध :**

सिंहली इतिहासकारांच्या मते अशोकाला ९९ भाऊ होते. त्या सर्वांचा वध करून रक्तरंजित मार्गाने त्याने गादी मिळवली. परंतु हे मत पुष्कळांना मान्य नाही. बिंदुसारनंतर सूसीम गादीवर बसला. पण तो क्रूर, दृष्ट प्रवृत्तीचा

व्यसनी होता. अशोकाने सूसीम व त्याच्या सहकार्यांना ठार मारले. त्यामुळे तो चण्डअशोक म्हणून ओळखळा गेला.

**राज्यारोहण :**

वारसा संघर्षानंतर सर्व साम्राज्य सुस्थितीत करण्यास अशोकाला चार वर्षांचा कालावधी लागला. इ. स. पूर्व २६५ मध्ये त्याने स्वतःचा राज्यभिषेक करून घेतला व स्वतःला देवनाम प्रिय प्रियदर्शी असे बिरुद धारण केले.

**काश्मिर विजय :**

राज्यरोहणानंतर सम्राट अशोकाने साम्राज्यविस्ताराचे धोरण आखले. कल्हणच्या 'राजतरंगिणी' ग्रंथात अशोकाच्या काश्मिर विजयाचा उल्लेख येतो. अशोकाच्या काश्मिर विजयाने मौर्य साम्राज्य उत्तर भारतात हिमालयापर्यंत पोहचले.

**कलिंग विजय :**

कलिंग युद्धाने अशोकाच्या जीवनाला कलाटणी मिळाली. अशोकाचे मतपरिवर्तन होण्यास ही घटना कारणीभूत ठरली. अशोकाच्या १३ क्रमांकाच्या शिलालेखात या विजयाची माहिती मिळते. भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील कलिंग हा प्रदेश महानदी व गोदावरी नद्यांच्या दुआबातील समृद्ध प्रदेश होता. शेती, अंतर्गत व परराष्ट्र व्यापार यामुळे आर्थिकदृष्ट्या हा सधन भाग होता. अशोकाने कलिंगवर आक्रमण करताच चेदीवंशीय राजाने अशोकाला विरोध केला मात्र तो अयशस्वी ठरला. गिरनार येथील अशोकाच्या १३ व्या शिलालेखात या युद्धाचा वृत्तांत दिला आहे. त्यानुसार एक लाख लोक लढाईत मारले गेले, दीड लाख युद्धकैदी झाले. लढाईमुळे उद्भवलेल्या रोगराई व दुष्काळामुळे लाखो माणसे मृत्यूमुखी पडली. या विजयाने मौर्यांचे साम्राज्य हिंदकुश ते बंगालच्या उपसागर व हिमालय ते म्हैसूरपर्यंत विस्तारले.

**कलिंग युद्धाचे परिणाम :**

कलिंग युद्धात अशोकाला जरी विजय मिळाला असला तरी या युद्धाने त्याचे मत परिवर्तन घडून आले. आपल्या साम्राज्य विस्ताराच्या लालसेपोटी एका छोट्याशा प्रदेशासाठी त्याला मोठा मानवसंहार करावा लागला. याचा त्याला पश्चात्ताप झाला. तो जुनागढ येथील १३व्या शिलालेखात व्यक्त केला आहे. साम्राज्यविस्तार व मानवीसंहारापेक्षा मानवाचा सांस्कृतिक विकास घडवून आणण्याचा विचार त्याला पटला व येथून पुढे कधीही युद्द न करण्याचा निर्णय व हातात शस्त्र न घेण्याचा निर्णय त्याने घेतला. तशी प्रतिज्ञा केली. ही घटना जगाच्या इतिहासात युगप्रवर्तक ठरली. येथून पुढील काळात त्याने आपले आयुष्य सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शांती, जनहित या करिता व्यतीत केले. बौद्ध धर्मगुरू उपगुप्ताच्या सान्निध्यात येऊन तो बौद्ध धर्माचा उपासक बनला.

प्रसिद्ध इतिहासकार एच. जी. वेल्स म्हणतात, 'दिग्विजयी सम्राटाला अशाप्रकारे पश्चात्ताप झाल्याने व विजयी होऊन लढाई पासून परावृत्त झाल्याने उदाहरण जगाच्या इतिहासात दाखविता येणार नाही.'

**साम्राज्य विस्तार :**

अशोकाचा साम्राज्यविस्तार, त्याचे शिलालेख, साहित्य, परकीय प्रवासी वृत्तांत, पुरातत्त्वीय साधने याच्या अभ्यासावरून समजून घेता येईल. उत्तर व पश्चिमे कडील शाहबाजगढी, मनसेहरा येथे अशोकाचे शिलालेख सापडले. तसेच वायव्येला अशोकाच्या साम्राज्याच्या सीमा हिंदकुशपर्यंत होती. कालसी, रूम्मनदेई, सागर येथील शिलालेख व स्तंभालेखावरून हे सिद्ध होते. डेहराडून व नेपाळचा प्रदेश, तराईचा प्रदेश अशोकच्या राज्यात होता. ह्यु-एन-त्संगच्या उल्लेखावरून समतट (पूर्व बंगालमध्ये) अशोकाचे स्तूप मिळतात. दिव्यावदान मधील उल्लेखानुसार बंगाल, मगध साम्राज्याचा एक भाग होता. ओरिसा, पश्चिमेला सौराष्ट्रावर अशोकाचे साम्राज्य होते. सौराष्ट्रात जुनागड, व अपरांत (कोकण) मुंबई जवळील सोपारा येथे शिलालेख, सापडतात. दक्षिणेला येरागुडी, कार्नूल जिल्ह्यात शिलालेख सापडतात. अशोकच्या पाचव्या व तेराव्या शिलालेखातून दिसते की यवन, कंबोज, गंधार हे पश्चिम सीमेवर होते. त्यांच्या विशाल साम्राज्यात काबूल, अफगाणिस्तान व हिंदकुश शिवाय बलुचिस्तांन, मकरांन, सिंघ, काश्मिर, नेपाळ दक्षिणेला तामिळ प्रदेशापर्यंतचा संपूर्ण प्रदेश येतो.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

१. ............... ग्रंथात नंद व मौर्य यांच्यातील युद्धाचे वर्णन आहे.

(अ) इंडिका (ब) मिलिंद पन्हो (क) दिव्यावदान (ड) दिपवस्स

२. चंद्रगुप्त मौर्य जैन साधू ............... बरोबर दक्षिणेत श्रवणबेळगोळला गेले.

(अ) भद्रबादू (ब) चंद्रप्रभू (क) पुण्यदंत (ड) शीतल

३. 'देवनामप्रिय प्रियदर्शी' बिरूदावली ............... याने घेतली.

(अ) चंद्रगुप्त (ब) हिंदुसार (क) महेंद (ड) सम्राट अशोक

४. ............... युद्धाने सम्राट अशोकाच्या जीवनाला कलाटणी मिळाली.

(अ) काश्मिर (ब) कलिंग (क) मस्की (ड) कार्नूल

५. अशोकाच्या काश्मिर विजयाचे वर्णन कल्हणच्या ............... ग्रंथात येते.

(अ) राजतरंगिणी (ब) अर्थशास्त्र (क) दिव्यावदान (ड) इंडिका

## ४.२.३ मौर्यांचे प्रशासन

प्राचीन भारताच्या इतिहासात विशाल साम्राज्य निर्मितीबरोबर, कार्यक्षम प्रशासन यंत्रणा उभारण्याचे श्रेय मौर्य सम्राटांना दिले जाते. भारतातील प्रसिद्ध राजनितीतज्ज्ञ व अर्थशास्त्राचा कर्ता याच काळात होऊन गेल्याने तो पहिल्या चंद्रगुप्ताचा प्रधानमंत्री व राजगुरू होता. त्याच्या विचारावर मौर्यांची प्रशासन यंत्रणा उभारली होती. अशोकानेही आपल्या काळात प्रशासनात थोडेफार बदल करून प्रजाहितकारी व कल्याणकारी प्रशासन यंत्रणा

उभारली. तो म्हणतो. राजाला जे चांगले वाटते ते चांगले समजू नये पण जे त्याच्या प्रजेला चांगले वाटते ते चांगले समजावे. राजाने आपल्या प्रजेशी पितृवत्सलतेने वागावे.

मौर्य राजांनी प्रशासनावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी साम्राज्याचे केंद्रिय प्रशासन, प्रांतीय जिल्हा (प्रदेश), तालुका (विषय) ग्राम (खेडे) व नगरप्रशासन असे विभाजन केले. त्यासाठी कुशल व कार्यक्षम अधिकारी नेमले. मौर्यांची प्रशासन व्यवस्था आपल्याला पुढील प्रमाणे अभ्यासता येईल.

**केंद्रीय प्रशासन :**

केंद्रिय प्रशासनाचे प्रमुख तीन भाग पाडता येतील.

**१. राजा :** मौर्य प्रशासनात राजा हा सर्वांचा केंद्रबिंदू मानला होता. प्रजाहित प्रत्येक मौर्य सम्राटाने पाहिले. कधीही सत्तेचा दुरुपयोग केला नाही. सम्राट अशोकाने तर ''देवनाम-प्रिय-प्रियदर्शी'' असे बिरूद धारण केले. पण कधी त्याने दैवी पदाचा दावा केला नाही. युवराज अवस्थेत त्याला त्रयी (तीनवेद), अन्विक्षिकी (तत्त्वज्ञान), वार्ता (व्यापारशास्त्र), दंडनिती (राज्यशास्त्र) या चार विषयाचे शिक्षण घेणे आवश्यक मानले होते.

प्रजाहित, प्रजेचे सरंक्षण, सैन्याचे नेतृत्व, वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक, न्यायदान, परराष्ट्र धोरण, राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे ही राजाची प्रमुख कर्तव्ये होती. ती सर्व मौर्य सम्राटानी पार पाडून कार्यक्षम प्रशासन यंत्रणा उभारली व प्रजेचा सर्वांगिण विकास केल्याचे दिसते.

**मंत्रि परिषद :**

कौटिल्याच्या मते ''राज्यरथाची राजा व मंत्री ही दोन चाके होत. यापैकी एकही चाक अकार्यक्षम झाल्यास राज्यरथ चालू शकत नाही.'' त्यामुळे राजकारभारात मंत्र्यांना महत्त्वाचे स्थान असे. मंत्री राजाला प्रशासन चालवण्यात मदत करत. सल्ला देत असत. त्यामुळे बुद्धिमान, कार्यक्षम, प्रामाणिक, अनुभवी व्यक्तीची या पदावर नेमणूक केली जात असे. राजपुरोहित, सेनापती युवराज या प्रमुख मंत्र्यासह १० ते १२ मंत्र्यांचा प्रशासनात समावेश असे. या परिषदेच्या सचिवास परिषदाध्यक्ष म्हणत. इतर मंत्र्याची कामे पुढील प्रमाणे :

१. **महामंत्री** : महामंत्री हा मंत्रिपरिषदेतील सर्वात उच्च स्थान असलेला मंत्री होय.

२. **मंत्री व पुरोहित** : चंद्रगुप्ताच्या काळात आर्य चाणक्याकडे ही दोन्ही पदे होती. परराष्ट्र धोरण हेरनियुक्ती व अधिकाऱ्यांची निवड प्रशिक्षण हे त्याचे काम असे.

३. **समाहर्ता (महसुलमंत्री)** : महसूल वसुली व इतर करवसुली हे काम. यांच्या मदतीला सुराध्यक्ष, शुल्काध्यक्ष, पोताध्यक्ष असत.

४. **सेनापती** : युद्धविभागाचे काम. सैन्य सुसज्ज व कार्यक्षम ठेवणे.

५. **युवराज** : राजाचा संभाव्य वारस म्हणून जेष्ठ पुत्राची नेमणूक. एखाद्या प्रांताचे प्रशासन त्याच्याकडे सोपवले जाई.

६. **प्रदेष्टा** : राज्यातील कंटकशोधन (फौजदारी) न्यायालय कामकाज पहाणे.

७. **व्यावहारिक** : राज्यातील धर्मस्थीय (दिवाणी) न्यायालयाचे काम पहाणे.

८. **कर्मान्तक** : शासनाच्या मालकीची शेती, जंगल, खाणी, उद्योग धंदे इ.चे व्यवस्थापन करणे.

९. **नायक** : सैन्य हालचाली, युद्ध छावण्याची जबाबदारी.

१०. **दंडपाल** : सैन्याच्या गरजांची पूर्तता करणे.

११. **अंतपाल** : आक्रमणापासून सीमांचे रक्षण करणे.

१२. **दुर्गपाल** : किल्ल्यांची व्यवस्था पहाणे.

१३. **दौवारिक** : राजप्रासादाचा प्रमुख राजप्रासादाची व्यवस्था व रक्षण करणे.

१४. **आटविक (वनमंत्री)** : राज्यातील जंगले सुरक्षित ठेवणे.

१५. **अंतर्वशिक** : राजाचे शरीरक्षक दलाचा प्रमुख.

१६. **पौर (नागरिक)** : नगरप्रशानाची जबाबदारी

१७. **प्रशास्ता** : राज्याच्या निरनिराळ्या विभागाच्या कागदपत्राच्या संरक्षणाची जबाबदारी.

**३. विविध खाती :**

**गुप्तहेर खाते :**

हेर हे राजाचे कान व डोळे समजले जात. राज्यात चालणारे बंड, कारस्थान याची सविस्तर माहिती राजाला हेरामार्फत कळत असे. त्यामुळे मौर्य राजांनी कार्यक्षम हेरयंत्रणा उभारली. हेरखात्यात स्त्रियांचाही सहभाग असे. हेरांना प्रतिवेदक म्हणत. तसेच गूढपुरूषही म्हणत. अत्यंत स्वामीनिष्ठ व प्रामाणिक व्यक्तीची निवड या खात्यात केली जाई. सांकेतिक भाषा, शब्द व कबुतराचा उपयोग हेरगिरीसाठी करत. व्यापारी, घरगडी, विषकन्या इत्यादी वेषांत हेर संपूर्ण साम्राज्यात विखुरलेले असत.

**लष्करी प्रशासन :**

आपल्या विशाल साम्राज्याच्या रक्षणाकरिता मौर्य शासकानी सुसज्ज व शिस्तबद्ध व्यवस्था निर्माण केली होती. युद्धप्रसंगी राजा स्वतः सैन्याचे नेतृत्व करत असे. लष्कराचा कारभार पाहण्यासाठी ३० सदस्यीय लष्कर मंडळ होते. त्याच्या सहा उपसमित्या होत्या. संरक्षण खाते सहा भागात विभागले होते. पायदळ, गजदळ, रथदळ, आरमार व पुरवठा विभाग. प्लिनी या ग्रीक इतिहासकार मते, मौर्याकडे ८ लाख भूदल, ३० हजार घोडदळ, ९ हजार हत्तीदळ, १ हजार रथ शिवाय वाहतुकी साठी बैलगाड्या, जलवाहतुकीसाठी नावा व जहाजे अशी प्रचंड सेना होती. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही सैन्य व्यवस्थेविषयी माहिती आलेली आहे.

**महसूल व्यवस्था :**

जनहिताच्या अनेक सुविधा निर्माण करण्यासाठी भक्कम आर्थिक स्थिती असावी असे मत कौटिल्याने मांडले आहे. त्यासाठी राज्याचा खजिना भरलेला असावा. त्याकरिता जमीन महसूल हा महत्त्वाचा भाग आहे. मौर्यकाळात जमीन महसूलला 'भाग' म्हणत. एकूण उत्पन्नाच्या १/६ ते १/२ या प्रमाणात महसूल वसूल करत. योग्य अधिकाऱ्याकडून तो गोळा केला जात असे. उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाकडून प्रेरणा दिली जात असे. स्त्रिया, ब्राह्मण, अपंग, अनाथ व राजपरिवाराला करातून वगळले जात असे. कर चुकविणाऱ्यांना कठोर शासन असे. 'बलि' व 'भाग' हे कराचे दोन प्रकार होते. 'बलि' हा धार्मिक 'कर' असे तर 'भाग' शेतीवरील कर असे.

**राज्याच्या उत्पन्नाची इतर साधने**

महसूला व्यतिरिक्त विणकर, पिंजकर, व्यापार, आयात-निर्यात, बंदरे, बाजार, जुगार, पाणीपट्टी, खरेदी-विक्री कर, जंगल, खाणी, उद्योगधंदे, धरणे, कालवे, नजराणे भेटी ही उत्पन्नाची साधने असत.

**खर्चाच्या बाबी**

मुलकी व लष्करी अधिकाऱ्याचे वेतन, दरबार खर्च, लोककल्याण योजना, धर्मप्रसार, स्थापत्य यावर खर्च होत असे अर्थखात्याच्या प्रमुखास भाङ्गारिक म्हणत. त्याच्या मदतीस कोषाध्यक्ष असे. महसूल अधिकाऱ्यास 'महाअक्षपटलिक' म्हणत.

**न्याय प्रशासन**

मौर्यकाळात राजा हा सर्वोच्च न्यायाधीश असे. त्याच्या मदतीला न्यायाधिकारी व न्यायालये असत. न्यायव्यवस्था धर्म, रूढी, परंपरा यावर आधारलेली असे. अर्थशास्त्रातील उल्लेखनावरून न्यायव्यवस्थेत धर्मस्थीय (दीवाणी) व कंटकशोधन (फौजदारी) न्यायालये होती. विवाह, वारसा, सीमावाद, करारभंग, ऋण यांचा समावेश धर्मस्थीय न्यायालयात होत असे. तर चोरी दरोडे, मारामारी, खून, बलात्कार, भेसळ, लाचलुचपत, राजद्रोह, गुन्ह्यांचा समावेश कंटकशोधन न्यायालयात केला जाई. ग्रामातील किरकोळ गुन्ह्यांचा निकाल गावपातळीवर दिला जात असे. गुन्हेगारांना दंड, जप्ती, फटके, कारावास, अवयव तोडणे, देहांत शासन यासारख्या शिक्षा दिल्या जात असत.

नगर व जनपदासाठी 'महामात्र' व 'राजुक' यांची अध्यक्षीय न्यायालये असत. मौर्यकालीन न्यायव्यवस्थेची प्रशंसा करताना मेगॅस्थेनीस म्हणतो, 'गुन्हे क्वचित होत. खून, चोरी हे गुन्हे कोणाला माहीत नव्हते. लोक आपल्या घरांना कुलूपे लावत नसत कारण लोकांच्या जीविताचे मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाची असे.'

**सार्वजनिक कामे :**

मौर्य राजे प्रजाहितदक्ष असल्याने त्यांनी जनतेच्या हिताची अनेक कामे केली. राष्ट्रीय राजमार्ग बांधले. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली, रस्त्यावर मैलाचे दगड, दिशादर्शक खुणा, धर्मशाळा, पशुपक्षी व मानवासाठी

मोफत औषधालये, शाळा, धर्ममंदिर, पूल, धरणे कालवे, विश्रामगृहे, मदत केंद्रे अशा अनेक लोकोपयोगी सुविधा त्यांनी निर्माण केल्या.

**सार्वजनिक आरोग्य :**

आरोग्याच्या बाबतीत मौर्य शासकानी दक्षता घेतल्याची दिसते. अशोकाने पशू-पक्षी व माणसांसाठी सार्वजनिक दवाखाने सुरू केले. औषधी वनस्पतीच्या बागा लावल्या. वैद्य, शल्यचिकित्सक, परिचारिका, दाया इत्यादींची नेमणूक केली. संशयास्पद मृतदेहाचे विच्छेदन करून मृत्यूचे कारण शोधले जात असे. भेसळ गंभीर गुन्हा समजला जाई. सार्वजनिक स्वच्छतेविषयी कडक नियम असत.

**जनगणना**

मौर्य शासकानी जनगणणेसाठी स्वतंत्र खात्याची निर्मिती केली त्यातील अधिकाऱ्यामार्फत गावातील लोकांची सविस्तर माहिती नोंदवली जाई.

**पाटबंधारे विभाग :**

शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने या खात्याची निर्मिती केली. नवीन कालवे बांधणे, जुने दुरुस्त करणे ही कामे शासनाकडून केली जात. गिरनार येथील प्रसिद्ध सुदर्शन तलाव चंद्रगुप्ताच्या काळात बांधला त्याची दुरुस्ती व विस्तार अशोकाचा सुभेदार तुशास्प याने केला.

- **प्रांतिक प्रशासन**

मौर्य शासकानी विशाल साम्राज्य निर्माण केल्याने प्रशासनाच्या सोयीसाठी साम्राज्याने सहा विभाग केले. चंद्रगुप्त व अशोकाच्या काळात गृहराज्य, उत्तरापथ, दक्षिणापथ, मध्यदेश, सुराष्ट्र असे निरनिराळे प्रांत होते. प्रांताच्या प्रमुखाला प्रांताधिपती किंवा प्रांताधिकारी म्हणत. या पदी राजपुत्राची नेमणूक होत असे. प्रांताधिपतीच्या मदतीला प्रांतपरिषद असे. प्रांतिक प्रशासनाचे प्रमुख सहा विभाग पुढीलप्रमाणे -

१. उत्तरापथ    २. दक्षिणापथ    ३. पश्चिमपथ किंवा अवंतीपथ

४. पूर्वपथ    ५. सेल्युकसजित प्रदेश    ६. सुराष्ट्र

**जिल्हा प्रशासन :** प्रांताचे विभाजन निरनिराळ्या जिल्ह्यात किंवा प्रदेशात केले जात असून त्याच्या प्रमुखाला प्रादेशिक म्हणत. रज्जूक आणि युक्त असे दोन अधिकारी असते. रज्जूक भूमापन अधिकारी तर युक्त जिल्ह्याचा पत्रव्यवहार व हिशेबाचे काम पहात असे.

**तालुका (विषय) :** प्रदेशाचे /जिल्ह्याचे विभाजन विषय यात केले जाई त्याच्या प्रमुखाला विषयपती किंवा तहसिलदार म्हणत.

**ग्राम**

विषय याचे ग्रामात विभाजन केले जाई. प्रशासनाव्यवस्थेतील सर्वात शेवटचा हा घटक असे. त्याच्या प्रमुखास ग्रामिक म्हणत. ग्रामपंचायतीच्या साहाय्याने त्याचा कारभार चालत असे.

**नगर प्रशासन**

मौर्यकाळात काही महत्त्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण नगरे होती. अशोकाच्या शिलालेखात पाटलीपुत्र, तक्षशिला, उज्जयिनी, सुवर्णगिरी, कोशांबी यासारख्या नगरांचा उल्लेख आहे. तसेच मेगॅस्थेनीसने पाटलीपुत्र या राजधानीच्या नगरप्रशासनाची माहिती दिली आहे. या नगराचा कारभार स्वतंत्रपणे केला जात असे. त्यासाठी स्थानिक लोकांची स्वतंत्र प्रशासन व्यवस्था निर्माण केली जात असे. पाच सभासदांच्या सहा समित्या निर्माण केल्या जात असत. याच्या प्रमुखास नगरपिता (महापौर), नगराध्यक्ष, पौरपाल म्हणत. या सहा समित्यांची कामे पुढीलप्रमाणे

१. पहिली समिती : जन्ममृत्यू नोंद ठेवणे, जनगणना करणे.

२. दुसरी समिती : उद्योगधंदे व हस्तव्यवसायावर देखरेख.

३. तिसरी समिती : खरेदी-विक्री नियंत्रण ठेवणे.

४. चौथी समिती : जकात, कर वसूल करणे.

५. पाचवी समिती : कामगार हिताचे रक्षण करणे.

६. सहावी समिती : परकीयांची नोंद ठेवणे.

अशा प्रकारे मौर्यसत्ताधिशांनी प्रशासन व्यवस्थेत सत्तेचे विकेंद्रीकरण करून आदर्श व लोकाभिमुख व्यवस्था निर्माण केली. शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. काही प्रमाणात दोष जरी जाणवत असले तरी एक कार्यक्षम व प्रजाहितदक्ष राज्यव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न मौर्य शासकांनी केलेला दिसून येईल.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

१. मौर्यकाळात जमीन महसूल एकूण उत्पन्नाच्या ............. वसूल करत.

(अ) १/४ (ब) १/६ (क) १/८ (ड) १/१०

२. मौर्य काळात बलि ............. कर असे.

(अ) शेती (ब) धार्मिक (क) व्यापार (ड) उद्योग

३. मौर्य काळात अर्थखात्याच्या प्रमुखास ............. म्हणत.

(अ) समाहर्ता (ब) कर्मान्तक (क) भांडरिक (ड) प्रशास्ता

४. मौर्य काळात नगराच्या प्रमुखास ............ म्हणत.

(अ) नगरपति (ब) ग्रामप्रति (क) विशयपती (ड) प्रादेशिक

५. ............ येथे सुदर्शन तलाव बांधला.

(अ) सारनाथ (ब) सांची (क) भारूत (ड) गिरनार

### ४.२.४ अ) सम्राट अशोकाचा धर्म

मौर्य सम्राटानी बौद्ध व जैन धर्म स्वीकारला असला तरी इतर धार्मियाबाबत त्यांचे सहिष्णू धार्मिक धोरण होते. सर्व धर्माप्रति समान दृष्टिकोन मौर्य सत्ताधिशानी स्वीकारला होता. इतर धर्माना धार्मिक स्वातंत्र्य असल्याने बौद्धधर्म राष्ट्रधर्म झाला.

### सम्राट अशोकाचा धर्म

कलिंगच्या युद्धाने अशोकाच्या जीवनाला कलाटणी मिळाली. त्याचे मनपरिवर्तन होऊन, मानवता व अहिंसा या तत्वाचा विचार मांडण्यास सुरुवात झाली. त्याने आपले जीवन धर्म व नैतिक आचरणाच्या प्रसारासाठी व्यतीत केले. इतिहासकारांच्यात अशोकाच्या धर्माविषयी धोरणाबद्दल मतभिन्नता आहे. डॉ. भांडारकरांनी त्याच्या धर्माला बौद्ध धर्म मानले. तर स्मिथ मते तो काही काळ बौद्ध धर्म अनुयायी बनला. तारानाथांच्या मते तो बुद्धधर्मी होता. मुखर्जी नीलकंठशास्त्री, रोमिला थापर, एस. डब्ल्यू थॉमसनी अशोकाच्या धर्माविषयी मत व्यक्त करताना अशोकाचा संबंध कोणत्या एका धर्माशी नसून विश्वधर्माशी आहे असे सांगितले आहे.

दीपवंश ग्रंथात अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याचा उल्लेख आहे. सारनाथच्या स्तंभातही त्याने स्वत:ला बुद्धाचे अनुयायी म्हटले. ह्यू-एन-त्संगनेही त्यास बौद्ध धर्मीय म्हटले आहे. इत्सिंग या चिनी प्रवाशाच्या मते अशोक बौद्ध भिक्षू होता. थोडक्यात, अशोकाच्या धर्मावरती बौद्ध धर्माच्या तत्त्वाचा प्रभाव असला तरी त्याच्याकडे नैतिक आचरण, गुरूजन, ब्राह्मण यांच्या प्रति आदर, सदाचार परधर्मसहिष्णुता, सहानुभुती, दया, प्रेम ही वैशिष्ट्ये दिसून येतात. म्हणून त्याचा धर्म हा मानवतावादी धर्म होय.

### सार्वभौम धर्म :

अशोकाचा धर्म हा बौद्ध नसून सार्वभौम धर्म होता असे मत स्मिथ यांनी मांडले आहे. कारण हा धर्म म्हणजे कोणता विशिष्ट धर्म किंवा संप्रदाय नव्हता. विधी किंवा उपासना यातून धार्मिकता व्यक्त होत नसून रोजच्या वागण्यात तिचा प्रत्यय येणे गरजेचे आहे असे अशोकाचे मत आहे. आपल्या सार्वभौम धर्माचे स्पष्टीकरण करताना सम्राट अशोक म्हणतो, ‘दास व सेवक यांना मानवी वागणूक देणे, माता-पित्याची सेवा करणे, नातेवाईकांबरोबर प्रेमाची वागणूक ठेवणे, प्राणिमात्राची हिंसा न करणे, ब्राम्हण व भिक्षू यांना दान करणे हेच धर्माचे आदर्श होत.

### अशोकाच्या शिलालेखातील आदर्श तत्त्वे

सम्राट अशोकाने आपल्या धर्माचा प्रसार करताना शिलालेखाचा आधार घेतला. त्याने आपल्या ७ क्रमांकाच्या शिलालेखातून काही आदर्श तत्त्वाचे पालन करण्याची शिकवण आपल्या जनतेला दिली. यामध्ये

(१) शुश्रुषा (२) गुरू व माता पित्याप्रति मान (३) दया (४) दान (५) अहिंसा (६) सत्य (७) नैतिक आचरण इ. तत्त्वांचा समावेश होता.

या तत्त्वाबरोबर सद्‌वृत्तीच्या विकासासाठी मानवाने वाईट प्रवृत्तीपासून दूर रहावे. क्रोध, कठोरता, कपट, गर्व, इर्ष्या यापासून दूर रहावे इत्यादी तत्त्वाचा समावेश होतो. मानवाच्या दैनंदिन जीवनातील शुद्ध आचारणाच्या आपल्या विचारांना व्यावहारिक धर्माचे स्वरूप देवून ''विश्वधर्म'' म्हणून त्याची लोकप्रियता निर्माण केली. सार्वभौम धर्माच्या वैशिष्ट्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणावर अनुयायी व लोकप्रियता मिळाली. ''जगाच्या इतिहासात शस्त्राच्या मदतीने जग जिंकणारे अनेक सत्ताधीश निर्माण झाले. तथापि धार्मिकतेच्या व नैतिक आचरणाच्या नियमाच्या बळावर जग जिंकण्याचा प्रयत्न करणारा सम्राट अशोक एकमेव सत्ताधीश होय.''

**स्वत:चे आचरण**

सम्राट अशोकाने आदर्श तत्त्वाचे स्वत: आचरण करून एक आदर्श निर्माण केला. त्याने शिकार करणे बंद केले. राजवाड्यातील मेजवानीसाठी करण्यात येणारी प्राणिहत्या बंद केली. प्रचंड दानधर्म केला. अनेक धार्मिक स्थळांना भेटी दिल्या. रोगी व पशुप्राण्यासाठी दवाखाने उघडले. रस्त्याच्या दुतर्फी झाडे लावली. धर्मशाळा बांधल्या अन्नछत्रे सुरू केली. पाणपोया उघडल्या व स्वत: जनसेवेचे व्रत अंगिकारले. तोच आदर्श जनतेने घेतला.

**अशोकाचे धर्मप्रसाराचे कार्य :**

सम्राट अशोकाने आपल्या साम्राज्याबाहेर व साम्राज्यात धर्मप्रसार करणेसाठी विविध उपक्रम राबविले.

**धर्मविभाग :**

सम्राट अशोकाने धर्मप्रसारासाठी प्रांतवार विभागणी करून त्यावर अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्यासाठी त्याने 'धर्ममहामात्र' नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केली. तसेच स्त्रियांना मदत करणेसाठी 'स्त्रीधर्ममहामात्रची' नेमणूक केली. तसेच रजूक, प्रादेशिक युक्त, प्रतिवेदक, नगर व्यावहारिक या अधिकाऱ्यांकडे त्या-त्या विभागाने धर्मप्रसाराची जबाबदारी सोपवली.

**तीर्थक्षेत्रांना भेटी**

बौद्ध धर्मातील अहिंसेच्या विचारांनी अशोक प्रभावित झाल्याने त्याने बौद्ध तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. उदा. गया, सारनाथ, सांची, कौशांबी, पावा, कुशीनगर, लुंबीनी ग्राम. इ. स्थळांना भेटी दिल्या.

**धार्मिक सभा व चर्चा**

धर्माच्या प्रसारासाठी ठिकठिकाणी सभा, संमेलन, चर्चासत्रे, वादविवाद स्पर्धा त्याने आयोजित केल्या.

**तिसऱ्या बौद्धधर्म परिषदेचे आयोजन**

सम्राट अशोकाच्या काळात बौद्धधर्मात दोन पंथ निर्माण होऊन त्यांच्यातील मतभिन्नता वाढू लागली. ती दूर करण्यासाठी अशोकाने पाटलीपुत्र येथे मोग्गलीपुला तिस्सच्या अध्यक्षतेखाली या परिषदेचे आयोजन केले.

**धर्मदूतांची नेमणूक**

सम्राट अशोकाने धर्माचे प्रचार व प्रसार करण्यासाठी साम्राज्यातील व साम्राज्याबाहेरील प्रदेशात धर्मदूतांना पाठवले. नेपाळ, सिलोन, सिरिया, इजिप्त, मॅसिडेनिया इ. देशात पाठवले. या कामी त्याने आपला पुत्र महेंद्र व कन्या संघमित्राची बंधु तिस्स, महाराणी कारूवकी इत्यादी परिवारातील लोकांनाही धर्मप्रसारासाठी पाठवले.

**आलेख लेखन :** अशोकाने आपल्या साम्राज्यातील विविध भागात खडकांवर, स्तंभावर आलेख लेखन करून त्याद्वारे धर्माज्ञा, धर्मतत्त्वे, नीतितत्त्वे, राजाज्ञा, आदर्शतत्त्वांचा प्रसार केला.

**पाली भाषेचा स्वीकार :** धर्मप्रसार व साहित्यनिर्मितीसाठी पाली भाषेचा स्वीकार केला.

**विहार व स्तूपाची निर्मिती**

सम्राट अशोकाने धर्मप्रसारासाठी ठिकठिकाणी विहार व स्तूपांची निर्मिती केली. या विहारातून बौद्ध भिक्षू व भिक्षुणी अध्ययन व अध्यापनाचे कार्य करत. सम्राट अशोकाच्या कलिंगवरील विजयापेक्षा हा श्रेष्ठ प्रकारचा धर्मविजय होय. त्याच्या प्रयत्नाने भारतीय धर्म, नैतिक आदर्श, सदाचार विषयक तत्त्वाचा जगभर प्रसार झाला. मानवी जीवनातील आदर्श तत्त्वाचे केवळ विश्लेषण न करता त्याचा विश्वातील मानवामध्ये प्रसार घडवून आणण्यासाठी अशोकाने स्वतंत्र यंत्रणा उभारली. त्याच्या या प्रयत्नाने बौद्धधर्माला विश्वधर्म म्हणून मान्यता मिळाली. अशोकाच्या या कार्याचे स्पष्टीकरण करताना प्रसिद्ध इतिहासकारक एच. जी. वेल्स म्हणतात, ''इतिहासाच्या पानोपानी आढळणाऱ्या राजांमध्ये सम्राट धर्माधिकारी व संत महात्मे यांच्यात अशोकाचे नाव दैदीप्यमानपणे झळकत आहे. आकाशात हा एकाकी चमकणाऱ्या ताऱ्याप्रमाणे आहे.''

**अशोकाची योग्यता**

जगातील सर्व थोर सम्राटांमध्ये अशोकाचे स्थान अद्वितीय आहे. सर्वजगभर त्याची ख्याती धार्मिक धोरणाने पसरली. कलिंगच्या संघर्षानंतर तो खरा धर्माशोक बनला. आपले पुढील संपूर्ण जीवन त्याने धर्म व लोककल्याणात घालवले. प्रजेचे हित हे त्याच्या राजकारणाचे सूत्र बनले. त्याने केलेल्या सुधारणांवरून लोककल्याणाची त्याची तळमळ दिसून येते. महान सेनापती, प्रजाहितदक्ष सम्राट, आदर्श व्यक्तिमत्त्व, परधर्माबाबत सहिष्णुता, न्यायप्रिय राजा, धर्म प्रचारक, कलाकारांचा आश्रयदाता हे सर्व गुण सम्राट अशोकात दिसून येतात.

आपल्या प्रजेला मुलांप्रमाणे मानून त्यांच्या सर्वांगीण सुखासाठी तो प्रयत्नशील असे कलिंगच्या एका शिलालेखात तो म्हणतो, ''सर्व माणसे माझी लेकरे आहेत. ज्याप्रमाणे मी माझे मुलांचे चांगले व्हावे म्हणून जशी इच्छा करतो त्याचप्रमाणे प्रजेचे इहलोकी व परलोकी भले व्हावे असे मला वाटते.'' आणि म्हणून अशोक मौर्य काळातच नव्हे तर प्राचीन भारतातील श्रेष्ठ सत्ताधीश मानला जातो.

- **मौर्यकालीन कला :**

मौर्यकालीन विशाल साम्राज्य, शांतता व सुव्यवस्था, कार्यक्षम प्रशासन यंत्रणेमुळे सांस्कृतिक विकास

मोठ्या प्रमाणात झाला. आर्थिक स्थिती चांगली असल्याने अनेक कलांना व कलाकारांना राजाश्रय मिळाला. यामुळे या कालखंडात कलेच्या क्षेत्रात झालेली प्रगती विशेष उल्लेखनीय ठरते.

### लिपी, शिक्षण

मौर्य कालखंडात लेखन कला अवगत झाल्याने सरकारी, पत्रव्यवहार, दप्तर, रेकॉर्ड लिहिणे, शिलालेख, स्तंभालेख, गुहालेख कोरण्याची प्रथा रूढ झाली होती. वायव्य भारतात खारोष्टी व इतरत्र ब्राह्मी लिपी वापरली जाई. उच्चवर्णीय लोक संस्कृत भाषा वापरत. सर्वसामान्य लोक लोकभाषा पाली, अर्धमागधी इ. प्राकृत भाषांचा वापर करीत होते.

शिक्षण पारंपारिक पद्धतीने दिले जाई. गुरूकुल शिक्षण पद्धत अस्तित्वात होती. विद्यार्थ्यांना गुरूच्या आश्रमात राहून वेद-उपनिषदे, धर्मशास्त्रे, तत्त्वज्ञान, राजनीती, युद्धशास्त्र, नीतीशास्त्र, अर्थशास्त्र, वैद्यक, ज्योतिष, खगोलशास्त्राचे ज्ञान प्राप्त करावे लागे. बौद्ध विहार व जैन मठातून धर्माचे शिक्षण दिले जाई.

### स्थापत्य व शिल्पकला

या काळात स्थापत्य व शिल्पकलेत मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. कुमारस्वामी यांनी मौर्यकलेचे दोन विभागात विभाजन केले.

**१. दरबारी कला :** यामध्ये राजप्रसाद, स्तंभ स्तूप, गृहा यांचा समावेश होतो.

**२. लोककला :** यामध्ये मातीच्या मूर्ती, यक्ष, यक्षिणी, यांचा समावेश होतो.

### राजप्रासाद

मौर्यकाळात भव्य राजप्रासाद उभारले होते. पाटलीपुत्र येथील भव्य राजप्रासाद पाहून मेगॅस्थेनिसने त्यातील प्रगत वास्तूकलेबद्दल आश्चर्य व्यक्त करून त्याची मुक्तकठांने स्तुती केली. भव्य इमारती, शहराची रेखीव आखणी, संरक्षणासाठी तटबंदी ही मौर्य स्थापत्यकलेची खास वैशिष्ट्ये होती.

### स्तंभ

सम्राट अशोकाने उभारलेले स्तंभ प्रसिद्ध आहेत. पन्नास टन वजनाचे, ५० ते ६० फूट उंचीचे, स्वतंत्र दगडाचा वापर करून त्यांना कलात्मकतेने आकर्षक आकार दिला. सांची, भारहूत हे स्तंभ उत्कृष्ट कलेची उदाहरणे आहेत. त्यावर सिंह, बैल, प्राण्यांची कोरलेली चित्रे आकर्षक आहेत. सारनाथ स्तंभ हा सर्वोत्कृष्ठ कलेचे मानचिन्ह आहे. हा स्तंभ गोल असून वर किंचीत निमुळता होत गेलेला आहे. त्यावर वर्तुळाकार चिरेबंदी असून त्यावर स्तंभध्वज म्हणून चार सिंह पाठीमागून एकमेकास चिकटून उभे आहेत. स्तंभावर २४ आरे असलेले चक्र आहे. अखंड एकाच पाषाणातून कोरलेले असे हे स्तंभ गुळगुळीत व घोटीव आहेत.

**गुहा**

सम्राट अशोकच्या काळात स्तूप, चैत्य, लेण्यांची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. त्याच्या काळातील लेणी कठीण व एकसंध दगडामध्ये निर्माण केलेली आहेत. त्याबद्दल परकीय प्रवाशांनी गौरवोद्‌गार काढले. अशोकाच्या काळातील अनेक स्तूप, तक्षशिला, श्रीनगर, कपिलवस्तू, प्रयाग, कनौज येथे पहावयास मिळतात. कनिंगहॅम म्हणतो भारहूत येथील स्तूप हा अशोकाच्या काळातील सर्वोत्तम स्तूप होय.

**लोककला :**

मौर्यकालीन लोककलेत अनेक यक्ष व यक्षिणीच्या मूर्ती यांचा समावेश होतो. मथुरापासून ओरिसा, वाराणसीपासून विदिशा व पाटलीपुत्र पर्यंत मूर्ती मिळतात. मूर्तींची प्रमाणबद्ध शरीर व भावसूचकता ही वैशिष्ट्ये दिसून येतात. याबरोबर दागिने, खेळणी, हस्तव्यवसाय या क्षेत्रातही मौर्य काळात वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविलेला दिसतो.

अशा प्रकारे मौर्य राजांनी कलेच्या विविध क्षेत्रात केलेली प्रगती दिसून येते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-४**

१. ............. क्रमांकाच्या शिलालेखात सम्राट अशोकाने आदर्श तत्वे सांगितले आहेत.

(अ) ३ (ब) ७ (क) १३ (ड) १५

२. अशोकाच्या काळात ............. बौद्ध धर्मपरिषद भरली.

(अ) पहिली (ब) दुसरी (क) तिसरी (ड) चौथी

३. बौद्धधर्मप्रसारासाठी अशोकाने पुत्र महेंद्र व कन्या संघमित्रा ............. देशात पाठवले.

(अ) जावा (ब) सुमत्रा (क) सिलोन (ड) इजिप्त

४. जनपदान धर्मप्रसाराचे काम ............. अधिकारी करीत असे.

(अ) अंतमहामात्र (ब) रजूक (क) युक्त (ड) प्रतिवेधक

५. मौर्याचा ............. येथील भव्य प्रासाद पाहून मेगॅस्थेनिसने अश्चर्य व्यक्त केले.

(अ) वैशाली (ब) पाटलीपुत्र (क) कौशांबी (ड) राजग्रह

६. अशोकाच्या सारनाथ स्तंभावर ............. आरे असलेले चक्र आहे.

(अ) ८ (ब) १२ (क) २४ (ड) २६

## ४.३ सारांश

मौर्य घराण्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्याने बलाढ्य साम्राज्याची निर्मिती केली. तो शूर, पराक्रमी व महत्त्वाकांक्षी सम्राट होता. आर्य चाणक्याच्या मदतीने त्याने नंद घराण्याची सत्ता उलथवून टाकली. अलेक्झांडरच्या लष्करात तो नोकरी करू लागला. पण स्वाभिमानी चंद्रगुप्त व अलेक्झांडरचे पटले नाही. त्याने काश्मिरच्या पर्वतक राजाच्या मदतीने मगधातील नंद घराण्याचा शेवट केला. राजपद मिळताच साम्राज्यवादी धोरण आखून ग्रीक सत्तेचे उच्चाटन केले. सेल्युकस निकेटरचा पराभव करून काबूल, कंदहार, बलुचिस्तानवर प्रभुत्व निर्माण केले. महान योद्धा व उत्तम प्रशासक म्हणून अनेक इतिहासकारांनी त्याची स्तुती केली. आपल्या समर्थ नेतृत्वाने त्याने अनेक संकटावर मात केली. भारताच्या इतिहासातील महान शासक बनला.

चंद्रगुप्तानंतर बिंदुसार सत्तेवर आला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा सम्राट अशोक सत्तेवर आला. प्रतिभावंत व महत्त्वाकांक्षी असलेल्या अशोकाने वारसा संघर्ष करून सत्ता प्राप्त केली. राज्यरोहणानंतर राज्यविस्ताराचे धोरण आखले व काश्मिरवर विजय संपादन केला. राज्यविस्तारातील कलिंग युद्ध त्याच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले व पुढील जीवनात युद्ध न करता मानव जातीचा सांस्कृतिक विकास घडवून आणण्याकडे त्याचे मन वळले. पुढील काळ अशोकाने सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शांती जनहित याकरिता व्यतीत केले. तो धर्माशोक बनला. केवळ भारतात नव्हे तर भारताबाहेरही त्याने बौद्ध धर्माचा प्रसार केला.

मौर्य सत्ताधिशानी विशाल साम्राज्य निर्मितीबरोबर कार्यक्षम प्रशासन यंत्रणाही उभारली. आपल्या प्रशासनाचे केंद्रिय, प्रांतिक, जिल्हा, तालुका, ग्राम, नगर असे विभाजन केले. कार्यक्षम अधिकारी वर्ग नियुक्त करून आदर्श व लोकाभिमुख प्रशासन यंत्रणा निर्माण केली. यामुळे या काळात सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवनात स्थैर्य लाभले. समाजात सदाचार, नितीमत्तेसाठी अशोकाची शिकवण, आदर्श तत्त्वे, परधर्म सहिष्णुता यामुळे समाजात धार्मिक दंगल कधीही झाली नाही. आपली सर्व शासनयंत्रणा त्याने धर्मप्रसाराच्या पवित्र कामी लावल्याने धर्मप्रसार मोठ्या प्रमाणात देशात व देशाबाहेर झाला व विश्वधर्म म्हणून अशोकाच्या धर्माला जगाच्या इतिहासात मान्यता मिळाली.

कलाप्रिय सम्राटामुळे या काळात सांस्कृतिक जीवनात प्रगती झाली. वाचन-लेखन कलेत प्रगती झाली. या काळातील वास्तूकलेच्या कौशल्याची स्तुती मेगॅस्थेनिसने केली. सम्राट अशोकाचा सारनाथ स्तंभ सर्वोत्कृष्ठ कलेचे मानचिन्ह ठरले.

अशाप्रकारे मौर्यशासकानी एकसंघ साम्राज्य, सहिष्णू धार्मिक धोरण, उत्कृष्ट प्रशासन यंत्रणेद्वारे भारतीय इतिहासात एक उत्कृष्ट आदर्श निर्माण केला.

## ४.४ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

**प्रदेष्टा :** फौजदारी न्यायालयीन अधिकारी

**दंडपाल :** सैन्याच्या गरजांची पूर्तता करणारा अधिकारी

**प्रशास्ता :** कागदपत्र, रेकॉर्ड, अधिकारी

**दुर्ग :** किल्ले

**जन :** राष्ट्र

**हेर :** गुप्त दूत

**बलि :** धार्मिक कर

**भाग :** शेतीवरील कर

**प्रादेशिक :** जिल्ह्याचा अधिकारी

**रज्जूक :** भूमापन अधिकारी

**भांङ्गारिक :** अर्थखाते प्रमुख

**स्तूप :** गौतमबुद्धाच्या अस्थीवर बांधलेले स्मारक

**विहार :** बौद्ध भिक्षूंचे निवास स्थान

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नाची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

(१) ब (२) ड (३) क (४) अ (५) ब (६) क

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

(१) ब (२) अ (३) ड (४) ब (५) अ

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

(१) अ (२) ब (३) क (४) अ (५) क

**स्वयं अध्ययन प्रश्न-४**

(१) ब (२) क (३) क (४) क (५) ब (६) क

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. चंद्रगुप्त मौर्याच्या कामगिरीचे वर्णन करा.

२. सम्राट अशोकाचे धार्मिक धोरण विशद करा.

३. मौर्यांच्या प्रशासन यंत्रणेची सविस्तर माहिती स्पष्ट करा.

**(ब) टिपा लिहा.**

१. अर्थशास्त्र

२. इंडिका

३. कलिंग युद्ध

४. मौर्यकालीन कला

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. प्रा. भिडे गजानन (१९९६) प्राचीन भारत, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. मार्डीकर, मदन (१९९७), प्राचीन भारताचा इतिहास, विद्या बुक्स, पब्लिशर्स, औरंगाबाद.

३. प्रा. चौधरी प्र. का. (२००२)प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

४. प्राचार्य कदम य.ना. (२०१२) प्राचीन भारताचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. कोसंबी डी. डी. (गर्दे दि. का. अनुवादक) (२००६) भारतीय इतिहासाचा अभ्यास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

६. शर्मा रीता (१९९६) प्राचीन भारत का इतिहास, बोहरा प्रकाशन, जयपूर

७. कोलारकर श. गो. (१९९१) प्राचीन भारताचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर

८. गायधनी र.ना. (१९५५), प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिन्टल प्रकाशन, पुणे.

९. झा. द्विजेन्द्र (१९८१) प्राचीन भारत का इतिहास, न्यू झान ऑफसेट प्रिंटर्स, दिल्ली.

१०. Sharma S. R. (Ed.) (1956), Arthashastra of Kautilya.

११. Altekar A.S. (1949), State and Government in Ancient India, Benaras.


❋❋❋

## घटक - १

# सातवाहन आणि कुशाण


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ साधने

१.२.२ प्रमुख सम्राट व त्यांचे कार्य

१.२.३ अर्थव्यवस्था - व्यापार व उद्योग

१.२.४ कला व स्थापत्य (स्तूप व लेणी)

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक संज्ञा, संकल्पना व अर्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


### १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला -

- सातवाहन घराण्याने प्रथम दक्षिणेत राजकीय सत्तेचा पाया घातला हे समजते.
- महाराष्ट्राच्या ज्ञात इतिहासात सातवाहन युग एक सुवर्णयुग होते हे समजते.
- दक्षिण भारतात सातवाहनांनी प्रथम एक मोठे व समृद्ध साम्राज्य निर्माण केले हे समजते.
- सातवाहनांनी दक्षिणेत राजकीय इतिहासाची परंपरा निर्माण केली हे समजते.
- सातवाहनांच्यामुळे दक्षिणेत स्वतंत्र सत्ता अस्तित्वात आल्या हे समजते.
- सातवाहनांच्या पासून दक्षिण भारतात नागरीकरणास सुरुवात झाली हे समजते.

- महाराष्ट्रातील पहिले राजकीय घराणे म्हणून सातवाहन घराण्याची ओळख होते.
- जगाच्या नकाशावर महाराष्ट्राला सर्वप्रथम झळकविणारे सातवाहन आद्य राजघराणे होय हे समजते.
- चार शतकाहून अधिक काळ अधिसत्ता गाजविणारे भारतातील एकमेव राजघराणे सातवाहन होते हे समजते.
- सातवाहनांचा कालखंड म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा पाया हे समजते.
- महाराष्ट्रात वैदिक धर्माचा पाया सातवाहनांनी घातला हे समजते.
- दक्षिणेत बलाढ्य सम्राटांची परंपरा सातवाहन घराण्याने निर्माण केली हे समजते.
- सातवाहन कालखंड म्हणजे महाराष्ट्रीयन प्राकृत भाषेचा सुवर्ण काळ होता हे समजते.
- सातवाहन काळात महाराष्ट्राच्या नागरीकरणास सुरुवात झाली हे समजते.
- सातवाहनांचे आंतरराष्ट्रीय व्यापारावरील वर्चस्व व महाराष्ट्राची आर्थिक प्रगती समजते.
- सातवाहनांनी सर्वप्रथम कला, स्थापत्य, साहित्य या क्षेत्रात असामान्य प्रगती केली हे समजते.
- परकिय आक्रमणापासून दक्षिण भारताला सुरक्षित ठेवण्याचे कार्य सातवाहनांनी केले हे समजते.
- कुशाण सम्राट कनिष्कने भारतात बलाढ्य साम्राज्य निर्माण करून नवा इतिहास घडविला हे समजते.
- कुशाण सत्तेमुळे भारतात आशियायी संस्कृतीचा उदय झाला हे समजते.
- कनिष्क ने बौद्ध धर्माला राजाश्रय दिल्यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार खऱ्या अर्थाने संपूर्ण आशिया खंडात झाला हे समजते.
- भारतीय सम्राटांच्या मालिकेत कनिष्कला आदराचे स्थान आहे हे समजते.
- इ.स. पहिल्या शतकापासून कुशाण व सातवाहन सत्ता म्हणजे भारताचा इतिहास हे समजते.

## १.१ प्रास्ताविक

प्राचीन भारताच्या इतिहासात पहिले विस्तारित साम्राज्य निर्माण करण्याचा मान मौर्य घराण्यातील सम्राट चंद्रगुप्त मौर्य व सम्राट अशोक यांना आहे. मौर्य काळात प्रथमच भारतीय समाजाचा सर्वांगीण विकास झाला. मात्र मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर भारतात मोठे राजकीय अराजक माजले. परिणामी मौर्यांच्या मांडलिक सत्तानी आपल्या स्वतंत्र सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. उत्तर भारतात शुंग व कण्व या ब्राह्मण घराण्यांच्या सत्ता निर्माण झाल्या, तर दक्षिणेत सातवाहन या ब्राह्मण घराण्याने आपले प्रभुत्व निर्माण केले. त्याचवेळी भारतावर शक, कुशाण या परकिय सत्तांनी आक्रमणे करून त्यांनीही भारतात आपल्या सत्ता निर्माण केल्या होत्या. कुशाण हे भारतीय धर्म व संस्कृतीशी एकरूप झालेले परकीय होते. त्यांनी निर्माण केलेले साम्राज्य भारतीयांचा जगाशी संबंध येण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. कुशाण राजा कनिष्क भारतातील बलाढ्य सम्राट होता. त्याने बौद्ध धर्माला राजाश्रय दिल्यामुळे

त्याची कारकीर्द वैशिष्ट्यपूर्ण ठरली. म्हणून त्याच्या कार्याचा आढावा घेणे गरजेचे भासते. तसेच दक्षिण भारतातील सातवाहनांची सत्ता ही दक्षिणेतील पहिली राजकीय सत्ता होय. त्यांनी पश्चिम किनारपट्टीपासून ते पूर्व किनारपट्टीपर्यंत आपल्या साम्राज्याच्या विस्तार केला होता. सातवाहन काळात दक्षिण भारताची सामाजिक, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात फार मोठी प्रगती झाली होती. सातवाहन घराण्यातील श्री सातकर्णी पहिला, गौतमीपुत्र सातकर्णी, वसिष्टपुत्र पुलमावी या सम्राटांच्या कारकिर्दी वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या आहेत. म्हणून त्यांच्या कार्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर सातवाहन घराणे महाराष्ट्रातील पहिले राजकीय घराणे. त्यामुळे या घराण्याचा अभ्यास आपल्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ साधने

कोणत्याही कालखंडातील इतिहासाच्या अभ्यासासाठी साधने महत्त्वाची आहेत. साधनाशिवाय इतिहासाचे लेखन करता येत नाही. सातवाहन व कुशाणकालीन इतिहासाची माहिती देणारी विपूल साधने आज उपलब्ध झाली आहेत. त्यामध्ये लिखीत व अलिखित स्वरूपाची साधने आहेत. लिखीत साधनामध्ये धार्मिक साहित्य व धर्मातीत साहित्य अशा दोन प्रकारची साधने आहेत. तर अलिखित साधनांमध्ये आलेख, शिलालेख, लेणी, नाणी, प्राचीन अवशेष, स्तूप इत्यादी विपूल साधने उपलब्ध झाली आहेत.

### (अ) धर्मातीत साहित्य

सातवाहन व कुशाण काळात शर्ववर्माचे कातंत्र व्याकरण, वात्स्यायनाचे कामसूत्र, शुद्रकाचे मृच्छकटिक नाटक, गुणाढ्याची बृहत्कथा आणि राजा हाल सातवाहनाचा गाथासप्तशती या ग्रंथाचा प्रामुख्याने समावेश होतो. शर्ववर्म्याच्या व्याकरणामधून सातवाहनकालीन भाषा, तिचे स्वरूप व अन्य भाषांचा परस्परांशी असणारा संबंध या बाबी स्पष्ट होतात. वात्स्यायनाच्या कामसूत्रातून काम हे मोक्षाप्रत नेणारे एक साधन असल्याचा आविष्कार याच कालखंडात झाल्याने स्पष्ट होते. शूद्रकाच्या ‘मृच्छकटिक’ नाटकातून सातवाहनकालीन समाजजीवनाचे दर्शन होते. सातवाहनांचा प्रधान गुणाढ्य याने बृहत्कथा हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथातील जातक कथांच्या आधारे अजिंठा लेण्यातील अनेक चित्रे काढली आहेत. या ग्रंथाच्या आधारे आपणास सातवाहनांच्या सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते.

**१. गाथासप्तशती** : सातवाहन घराण्यातील १७ वा नृपती (राजा) हाल याने गाथासप्तशती हा प्राकृत भाषेतील ग्रंथ संपादित केला आहे. महाराष्ट्राच्या विकासाच्या सुरुवातीचा कालखंड म्हणजे सातवाहन घराण्याची राजसत्ता होय. कारण या काळात प्रथमच महाराष्ट्राला राजकीय स्थैर्य लाभले. अनेक टोळ्यांना एकत्र करून त्यांनी महाराष्ट्रात पहिले साम्राज्य निर्माण केले. आपल्या साम्राज्यातील सामान्य लोकांची प्रगती आणि विकास झाल्याशिवाय समाजात सुख-शांती निर्माण होणार नाही हे जाणून सामान्यांच्या बोलीभाषेला महत्त्व देऊन प्राकृत भाषांच्या विकासाला चालना दिली. भाषेच्या विकासावर तेथील समाजाचा विकास अवलंबून असतो म्हणून सातवाहन राजानी सामान्यांच्या

बोलीभाषेला महत्त्व देऊन प्राकृत भाषांच्या विकासाला चालना दिली. एवढेच नव्हे तर आपल्या दरबारातील शासकीय व्यवहार प्राकृत भाषेत करण्याच्या आज्ञा दिल्या. परिणामी खेड्या-पाड्यात बोलली जाणारी प्राकृत भाषा विकसित होऊन राजदरबारातील विद्वानांच्या ही लेखणीची भाषा प्राकृत झाली. त्यामुळे स्वतः हाल राजाने 'गाथासप्तशती'सारख्या श्रेष्ठ ग्रंथांची रचना करून साहित्य निर्मितीत मोलाची भर घालून आदर्श प्रस्थापित केला.

हाल राजाने लिहिलेल्या गाथासप्तशतीच्या आधारे आपणाला सातवाहनकालीन महाराष्ट्राच्या राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. सातवाहन कालखंडातील गुणाढ्य हा पंडीत हाल राजाच्या दरबारात राजपंडीत होता. तर हाल राजा स्वतः सातवाहन घराण्यातील १७वा राजा होता. त्यामुळे दोघांची माहिती अधिक विश्वसनीय आहे. हाल राजाची कारकीर्द अत्यल्प असली तरी गाथासप्तशतीच्या रूपाने त्याने साहित्यक्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. प्रणय ही गाथासप्तशतीच्या निर्मितीमागील प्रेरणा असली तरी त्या अनुषंगाने आलेल्या गाथामधून सातवाहनकालीन समाजजीवनावर व्यापक प्रकाश पडतो.

- **गाथासप्तशतीचा कालखंड**

सातवाहन राजा हाल याचा कालखंड इ.स. २० ते २४ असल्याचे मत अनेक इतिहासकारांनी मांडले आहे. परंतु राजा हाल याने लिहिलेल्या किंवा संग्रहित केलेल्या गाथेनंतर या ग्रंथात पुढील काळातील गाथांची भर पडत गेली आहे. इ.स. ६-७ व्या शतकात जे श्रेष्ठ प्राकृत ग्रंथ निर्माण झाले त्यातील काही निवडक गाथांचा समावेश या ग्रंथात झालेला दिसून येतो. त्यामुळे या ग्रंथाच्या कालखंडाविषयी निश्चित सांगणे कठीण आहे.

- **गाथासप्तशतीतील नायिका**

प्रणय हा या ग्रंथाचा मुख्य विषय आहे. त्यामुळे या ग्रंथात सहा प्रकारच्या नायिकांचा समावेश आहे. या ग्रंथात नायिकांच्या जन्मापासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंतचे वर्णन आहे. या ग्रंथातील सर्व नायिका ग्रामीण भागात राहणाऱ्या आहेत. त्यामुळे त्या शारीरिक व मानसिक सुदृढ असल्याचे दिसून येते. सर्व नायिका अत्यंत सुंदर वेशभूषा केलेल्या आहेत. यावरून ग्रामीण भागातील आर्थिक स्थितीची माहिती मिळते. सर्व नायिका कष्टाळू, वडिलधाऱ्यांना मान देणाऱ्या, अधिक धाडसी, परिस्थितीशी जुळवून घेणाऱ्या दिसून येतात. आपल्या प्रियकराला भेटण्यासाठी त्या नदीच्या किनाऱ्यावर, कापसाच्या, तुरीच्या शेतामध्ये गेल्याची वर्णने आहेत. क्रोध व्यक्त करणाऱ्या, धाडसी, मुग्धा, कुलवधू, विरहिणी व खंडिता अशा सहा प्रकारच्या नायिकांची वर्णने या ग्रंथात आहेत.

- **शेती व शेतीविषयक धोरण**

गाथासप्तशती ग्रंथाच्या आधारे तत्कालीन ग्रामीण महाराष्ट्राची माहिती होते. सातवाहन काळात शेती हा सर्वसमाजाचा आधारभूत उद्योग होता. सातवाहन काळात दक्षिण भारत खऱ्या अर्थाने कृषीसमृद्ध होता. हालाच्या गाथासप्तशतीमध्ये तत्कालीन कृषी-उत्पादनाच्या भिन्न प्रकारची माहिती मिळते. त्या काळात पर्जन्यमान अधिक होते. त्यामुळे दक्षिण भारताचे तांदूळ हे मुख्य पीक होते. जव, गहू, ज्वारी, बाजारी व कापूस ही मुख्य पिके होती. भुईमूग, एरंडी, हरभरा, द्विदल धान्ये मोठ्या प्रमाणात पिकवली जात होती. गाथासप्तशतीमध्ये शेतीसाठी वापरात

असलेल्या अवजारांचा तपशील दिला आहे. हाल व नांगल असे दोन प्रकारचे नांगर प्रचलित होते. म्हणून शेतकऱ्यास हालिक असे म्हटले जात होते. शेतीसाठी बैलांचा उपयोग केला जात होता. या ग्रंथाच्या आधारे सातवाहनकालीन लोकजीवनाची व शेती व्यवसायाची माहिती मिळते.

- **ग्रामीण समाजजीवन**

गाथासप्तशतीमध्ये ग्रामीण समाजजीवनाचे प्रतिबिंब पहावयास मिळते. तसेच व्यक्तिजीवनाचे अंतरंगही समजण्यास मदत होते. समाजाला आर्थिक स्थैर्य प्राप्त झाल्याचे आणि व्यापार हे आर्थिक समृद्धीचे मूलभुतकारण असल्याचे अनेक गाथेवरून स्पष्ट होते. या ग्रंथाच्या आधारे आपणास काही ठरावीक मर्यादेपर्यंत तत्कालीन सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक परिस्थितीचे प्रतिबिंब पहावयास मिळते व त्यातून सातवाहनकालीन सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचीही ओळख पटते. हा ग्रंथ म्हणजे महाराष्ट्रातील ग्रामीण लोकांचे दैनंदिन जीवन आहे. ग्रामीण कवींनी ग्रामीण लोकांसाठी रचलेली काव्यमधूर अमृतधारा आहे. जीवनाच्या अंगप्रत्यांगाला स्पर्शून जाणारी भावना त्या शब्दाशब्दात आहे. या काव्यात पूर्णपणे मराठमोळे वातावरण आहे. महाराष्ट्रातील खरा निसर्ग यामध्ये पहावयास मिळतो. विंध्यपर्वत, रेवा, तापी, गोदावरी या नद्यांची वर्णने आहेत. नद्यांच्या किनाऱ्यावरील सुखी ग्रामीण जीवनाचे वर्णन यामध्ये आहे. या ग्रंथात समाजातील समृद्धीचे गोडवे गायले आहे. तसेच दुर्जनाना मात्र कावळे म्हटले आहे. सातवाहन नृपती हाल हा त्याच्या गाथासप्तशती या शृंगारप्रधान काव्यसंग्रहामुळे सर्व परिचित आहे. यामुळेच त्याचे नांव संस्कृत व प्राकृत साहित्यात अजरामर झाले आहे. त्याच्या कारकीर्दीत श्रीलंकेसह सर्व दक्षिण भारत सातवाहन सत्तेच्या वर्चस्वाखाली होता हे स्पष्ट होते. गाथासप्तशती हा ग्रंथ सातवाहनांची माहिती देणारे महत्त्व साधन आहे.

### (ब) परकीय प्रवाशांची इतिवृत्ते (पेरिप्लस ऑफ दि इरिथ्रिअन सी)

सातवाहन आणि कुशाणकालीन इतिहासाची लिखीत साधने विपुल आहेत. त्यामध्ये एतद्देशीय लेखकाप्रमाणे परकीय लेखकांचे लिखाणही महत्त्वाचे साधन मानले जाते. सातवाहन आणि कुशाण काळात भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला मोठी गती मिळाली होती. सातवाहन आणि कुशाण राजांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराला मोठ्या प्रमाणात उत्तेजन दिले होते व रोम, अथेन्स सारख्या बाजारपेठांशी थेट संबंध प्रस्थापित केला होता. त्यामुळे सातवाहनांचा व्यापार, त्यांची महत्त्वाची व्यापारी केंद्रे, त्यांची महत्त्वाची बंदरे, व्यापारी मार्ग, श्रेण्या याविषयी संबंधितांनी महत्त्वाची माहिती नोंदवून ठेवली आहे. यामध्ये प्लीनी, टॉलेमी, स्ट्रॅबो, तांबड्या समुद्राचा अज्ञात मार्गदर्शक आणि एरियन हे प्रवासी प्रमुख आहेत.

- **कालखंड**

पेरिप्लस ऑफ दि इरिथ्रिअन सी म्हणजे तांबड्या समुद्राचा अज्ञात मार्गदर्शक हा ग्रंथ इ.स. ५० ते १०३ या कालखंडात भारतात येऊन गेलेल्या एका अज्ञात ग्रीक खलाशाने लिहिला आहे. अनेक इतिहासकारांनी एरियन हा या ग्रंथाचा लेखक असावा असे म्हटले आहे. हा ग्रंथ लिहिणारा लेखक इ.स. ८०च्या सुमारास भारतात आला असावा. त्याने आपल्या लिखाणातून दक्षिणेतील महत्त्वाच्या व्यापारी केंद्राची माहिती दिली आहे. व्यापारी केंद्राची माहिती देताना तो लिहितो की - 'दक्षिणपथामध्ये बॅरिगाझा पासून दक्षिणेस वीस दिवसांच्या प्रवासाने गाठता येणारे

तगर (तेर) हे फार मोठे व्यापारी केंद्र आहे. बॅरिगाझा म्हणजे गुजरातमधील भडोच हे बंदर होय. याशिवाय त्याने सर्व भारतीय स्वतंत्र आहेत. त्याच्यापैकी एकही गुलाम नाही असे म्हटले आहे.

**● सातवाहन घराणे व पैठण**

या ग्रंथात सातवाहन घराण्याची व त्यांची राजधानी असणाऱ्या पैठणची माहिती आहे. सातवाहनांच्या काळातील पश्चिमी किनाऱ्यावरील भरूच-भडोच-कल्याण, चौल व नालासोपारा ही बंदरे तसेच तेर, पैठण, भडोच या शहरांचे भौगोलिक स्थान, दळणवळणाचे मार्ग, साधने, व्यापारी वस्तू इ.ची माहिती दिली आहे.

**● व्यापारी मार्ग**

सातवाहनांच्या व्यापार विकासात पश्चिमी मार्गांचा मोठा वाटा होता असे त्याने म्हटले आहे. कारण सर्व व्यापारी मार्ग किनाऱ्यावरील बंदरांशी जोडलेले होते, आणि या पश्चिमी बंदराचे पाश्चिमात्य देशांशी दळणवळण होते. सातवाहनांचा पाश्चात्त्य देशांशी होणारा व्यापार खूप फायद्याचा होता. भडोच, नालासोपारा, कल्याण आदी बंदरातील मालाला पश्चिमी देशात असलेली मागणी व त्या देशांशी असलेला व्यापाराचा तपशील पेरिप्लसच्या अज्ञात लेखकाने अतिशय काळजीपूर्वक दिला आहे. त्याच्या मते जुन्नरच्या शिलालेखातील भरूकच्छ (भडोच) हे पश्चिमेतील सर्वांत महत्त्वाचे बंदर होय. या केंद्रात उज्जैन, पैठण व नगर येथील माल वाहून आणला जात होता. या बंदरात पैठणवरून गोमेद व तेरहून कापड फार मोठ्या प्रमाणात येत होते व तेथून ते पाश्चिमात्य देशात पाठविले जात होते. भृगुकच्छकडे जाणारे दोन नैसर्गिक मार्ग होते. एक पैठण येथून सुरू होणारा मार्ग वेरूळ, पितळखोरा, बहाल, प्रकाशे मार्गे तापी खोऱ्यातून भडोचला येत होता, तर दुसरा प्रतिष्ठान-नेवासा-नाशिक म्हणजे गोदाखोऱ्यातून येत होता. पेरिप्लसने बैथन (पैठण) व तगर (तेर) ही दक्षिण देशातील महत्त्वाची व्यापारी केंद्रे असल्याचे म्हटले आहे. त्याच्या मते पैठण भडोचहून २० दिवसाच्या अंतरावर तर तेर पैठणहून १० दिवसाच्या अंतरावर होते. भडोच हे तुलनात्मक दृष्टिकोनातून पैठणपासून दूर असले तरी सातवाहनांचा माल प्रामुख्याने भडोच बंदरातूनच जात होता. कारण कल्याण परिसरावर क्षत्रपांनी आपले वर्चस्व निर्माण केले होते.

**● सोपारा व कल्याण महत्त्वाची बंदरे**

भडोच नंतर सोपारा हे प्रसिद्ध बंदर होते. पेरिप्लसने याला सुपारा असे म्हटले आहे. हे सुपारा म्हणजे आजच्या ठाणे जिल्ह्यातील नालासोपारा होय. कल्याण बंदराला पेरिप्लसने कलियाण म्हटले आहे. पैठणहून कल्याणला जाणारा रस्ता जुन्नरच्या इतिहासप्रसिद्ध नाणेघाटातून जात होता. पैठणहून कल्याणला जाणारा दुसरा रस्ता रांजणगांव, पुणे, भाजे, काले असा जात होता. कल्याण हे सातवाहनांचे आवडते बंदर होते. कल्याण क्षत्रपांच्या ताब्यात गेल्यानंतर भडोचचे महत्त्व आणखी वाढले होते. तेथील समुद्रात शेकडो गलबते सदैव नांगरलेली असत असे त्याने म्हटले आहे. पैठण सातवाहन काळात मध्य आशियाशी जोडले होते. पैठण येथील पैठणी मध्य आशियात प्रसिद्ध होत्या.

**आयात-निर्यात धोरण**

सातवाहन काळात भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंचा तपशील पेरिप्लसने दिला आहे. यामध्ये गोमेद, कार्नेलियन,

ॲगटे, लिसियम् आदी सिलिकांची मौल्यवान संयुगे, हस्तिदंती, कलाकुसरीच्या वस्तू, रेशमी व सुती कापड, तलम कापड, कापूस, काळी मिरी, मसाल्याचे पदार्थ काही प्राणी व पक्षी, काचेच्या वस्तू, सुगंधी द्रव्ये, लोणी, तूप, मध, चंदन, लाख आदी विविध वस्तूंचा समावेश होता. कापडाशिवाय अन्य वस्तूवर फारशी प्रक्रिया करावी लागत नसे.

आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये इटालियन तांबे, जस्ताचे व कथलांचे मणी, सुरमा, सोने-चांदी, रत्ने, प्रवाळ , काच, विविध प्रकारचे कापड, औषधे इ. वस्तू प्रामुख्याने होत्या. शक-क्षत्रपांसाठी किमती वस्तू, चांदीची नक्षीकाम केलेली भांडी, उंची मद्ये, सुंदर स्त्रिया आणि उत्कृष्ट सौंदर्यप्रसाधने यांची आयात केली जात होती. आयात-निर्यातीचा विचार केल्यास युरोपातील व्यापार भारतास अनुकूल होता. पेरिप्लसने म्हटले आहे की, भारत, चीन व अरेबिया या तीन देशातील मालाला रोममध्ये मोठी मागणी होती. मसाल्याचे पदार्थ, रेशमी कापड वापरण्याची फॅशन तेथे होती. या दोन वस्तूवर भारताची मक्तेदारी होती. रोममधील सिनेटने भारतातील मालामुळे आमचे दिवाळ वाजले आहे तेव्हा तो माल कोणीही घेऊ नये असा फतवा काढला होता. रोम आणि पूर्वेकडील देश यांच्यामध्ये होणाऱ्या व्यापाराचा बराच तपशील पेरिप्लिसने दिला आहे. पेरिप्लसच्या माहितीच्या आधारे त्या कालखंडातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या स्वरूपाची माहिती होते. म्हणून हा साधनग्रंथ महत्त्वाचा आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**रिकाम्या जागा भरा.**

१. गाथासप्तशती ग्रंथात शेतकऱ्यास ............. नावाने संबोधले आहे.

२. गाथासप्तशती हा ग्रंथ ............. भाषेत लिहिला आहे.

३. गुणाढ्य हा सातवाहनांच्या दरबारातील .......... होता.

४. सातवाहन कालखंडात ........... हे शहर मध्य आशियाशी जोडले गेले होते.

५. पेरिप्लस ऑफ दी इरिथ्रियन सी या ग्रंथात ........... यांच्यात होणाऱ्या व्यापाराचा तपशील दिला आहे.

## १.२.२ सातवाहन व कुशाण घराण्यातील प्रमुख राजे व त्यांचे कार्य

दक्षिण भारताच्या इतिहासात सातवाहन सत्तेला महत्त्व आहे. सातवाहनांनी दक्षिण भारतात सुमारे ४०० वर्षे राज्य केले आहे. सातवाहन घराणे महाराष्ट्रावर अधिसत्ता गाजवणारे पहिले स्थानिक घराणे होय. सातवाहन मौर्यांचे मांडलिक घराणे होते. मौर्यांची दक्षिण भारतावरील पकड ढिली झाल्यामुळते संधी मिळताच सातवाहनांनी स्वातंत्र्य घोषित केले व दक्षिणेत वैदिक धर्माची प्रतिष्ठापना केली. सातवाहन नावाचा राजा या घराण्याचा मूळ पुरुष पण सिमुक हा पहिला संस्थापक राजा होता. त्याची राजधानी पैठण होती. त्याने नासिकच्या आसपासचा प्रदेश ताब्यात घेतला होता. याने स्वतंत्र राजा म्हणून २२ वर्षे राज्य केले. इ.स.पूर्व २३४ ते २१३ असा सिमुकचा कालखंड होता. सिमुकनंतर त्याचा लहान बंधू कृष्ण किंवा कन्ह याने १८ वर्षे राज्य केले. त्याने नासिकच्या पश्चिमेला प्रदेश विस्तार केला होता. नासिक येथील गुफालेख त्याच्याच कारकीर्दीत तयार झाला आहे.

## १. श्री सातकर्णी पहिला

सातवाहन सम्राटामध्ये श्री सातकर्णी पहिला हा पहिला बलाढ्य सम्राट होय. हा सिमुकचा मुलगा होता. त्याने स्वतःला 'दक्षिणपथपती' अशी पदवी लावून घेतली होती. सांचीच्या स्तुपाभोवतीच्या तोरणावर श्री सातकर्णी पहिला याची माहिती मिळते. नाणेघाट शिलालेख त्याच्या कारकीर्दीची माहिती देणारा शिलालेख आहे. पुराणांच्या मते सातकर्णी पहिला हा कन्हचा पुतण्या होता. नाणेघाट शिलालेखावर सिमुक हा सातकर्णी पहिला याचे वडील असा उल्लेख आहे. त्याचे आणि कन्हचे संबंध कसे होते आणि तो कोणत्या परिस्थितीमध्ये सत्ताधीश झाला हे समजू शकत नाही. नाणेघाटातील प्रतिमांमध्ये पहिली प्रतिमा सिमुकची, दुसरी नायनिकेची व तिसरी सातकर्णीची आहे. सातकर्णीने महारथी राजाची कन्या नायनिका हिच्याशी विवाह केला होता. तिच्यापासून सातकर्णीला एकूण पाच पुत्र झाले होते. एक विदिश्री, दुसरा भय्या, तिसरा शक्तीश्री चौथा हाकूश्री आणि पांचवा सातवाहन हा होय.

### ● साम्राज्यविस्तार

सातकर्णीने महारथी राजाच्या मदतीने मोठ्या प्रमाणात साम्राज्यविस्तार केला होता. त्याने पश्चिमेस माळवा, नर्मदा खोरे, संपूर्ण विदर्भचा प्रदेश ताब्यात घेतला होता. अल्पावधीत फार मोठे यश मिळण्याचे कारण उत्तरेत ग्रीक आक्रमणामुळे राजकीय अशांतता निर्माण झाली होती. त्यामुळे त्याला दक्षिणेत आला दरारा प्रस्थापित करता आला. नाणेघाटातील लेखावरून मोठा राजा होता असे दिसते. सातकर्णीने आपला अंमल मध्य प्रदेशातील विदिशापर्यंत बसविला होता. सातकर्णीचा मुकादम वसिष्ठीपुत्र आनंद याने सांची येथील स्तुपाच्या तोरणावर आपला लेख कोरून ठेवला आहे. त्यात तो स्वतःचा 'राजाश्री सातकर्णीचा आवेशनिक' असा निर्देश करतो. सातकर्णीच्या या स्वारीमुळे उत्तर भारतातील शुंगांची व कण्वांची सत्ता खिळखिळी होण्यास सुरुवात होऊन सातकर्णीचा उत्तर भारतात प्रभाव निर्माण झाला होता. या विजयामुळे त्याने दोन अश्वमेध व एक राजसूय यज्ञ केला होता. दक्षिण भारताच्या इतिहासा राजसूय यज्ञ करणारा पहिला सम्राट सातकर्णी पहिला हा आहे.

श्री सातकर्णीस कलिंगच्या खारवेलच्या आक्रमणास तोंड द्यावे लागले होते. खारवेलने वैनगंगा नदीपर्यंत मुसंडी मारून खानदेशात सातकर्णीला मोठे आव्हान दिले होते. तेथे पौनी परिसरात युद्ध होऊन खारवेलचा पराभव झाला होता. दुसऱ्या आक्रमणात खारवेलने सातकर्णीशी युद्धप्रसंग टाळून त्याच्या रठिक व भोजिक या मांडलिकांशी युद्ध केले होते. त्यात सातकर्णीच्या मांडलिकांचा पराभव झाला होता. तथापि दोन्ही आक्रमणांनी खारवेलस सातकर्णीस पराभव करता आला नाही. पौनी येथील उत्खननात सातकर्णीची नाणी सापडली आहेत. यावरून उपरोक्त विधानास बळकटी येते.

### ● धार्मिक धोरण

सातकर्णी पहिला जसा पराक्रमी होता तसाच तो धार्मिक प्रवृत्तीचा राजा होता. तो वैदिक धर्माचा अभिमानी होता. त्यामुळे त्याने आपली कारकीर्दीत दोन अश्वमेध, एक राजसूय आणि अनेक श्रोतयाग करून हजारो गायी, अनेक अश्व, गज, वस्त्रे, नाणी, धान्याच्या राशी, यज्ञातील ब्राह्मणांना दान म्हणून दिल्याचे नाणेघाट येथील शिलालेखात

स्पष्ट म्हटले आहे. श्रीसातकर्णीची पत्नी नायनिका स्वतः यज्ञदीक्षादिकात निष्णात असून या सर्व यज्ञामध्ये तिने उत्साहाने भाग घेतला होता. नायनिका ही अत्यंत जिद्दीची व मानी स्त्री असल्याचे तिच्या नाणेघाटातील लेखावरून स्पष्ट होते. सातकर्णी नंतर त्याच्या दोन पुत्रांच्या प्रतिमा आणि नंतर त्याच्या श्वशुराची म्हणजे नायनिकेच्या वडिलांची प्रतिमा आहे. सातवाहन कुळात आपल्या पित्याची प्रतिमा कोरणारी नायनिका ही इतिहासातील बहुधा पहिली स्त्री असावी. पित्याच्या प्रतिमेखाली पृथ्वीवरील श्रेष्ठ वीर व महारठी अशा पदव्याही कोरल्या आहेत. यावरून तिचा दरारा स्पष्ट होतो.

- **इतर कार्य**

अश्वमेध यज्ञाची स्मृती म्हणून सातकर्णीने आपले व नायनिकेचे चांदीचे जोडनाणे प्रचारात आणले होते. त्यावर अश्वमेधाच्या अश्वाची सूचक प्रतिमा आहे. सातकर्णीने अनेक प्रकारची नाणी प्रचारात आणली होती. त्यामध्ये चांदी, तांबे, शिसे, पोटीन या धातूंची नाणी महत्त्वाची आहेत. तसेच त्याने आपल्या कारकीर्दीत सातवाहन ऐवजी सातकर्णी हे नाव प्रचारात आणले. त्यामुळे सातवाहन घराण्यातील पुढील राजांनी आपल्या नावापुढे सातकर्णी वंशनाम जोडल्याचे दिसते. उदा. शक्तीश्री सातकर्णी, कौशिकीपुत्र सातकर्णी, गौतमीपुत्र सातकर्णी, वसिष्ठपुत्र सातकर्णी, कुंभ सातकर्णी, विजय सातकर्णी इत्यादी. वैदिक धर्माप्रमाणे यज्ञ करून त्याने स्वतःला दक्षिणाधिपत व अप्रतिहतचक्र अशी बिरुदे धारण केली होती. यज्ञप्रसंगी त्याने ४२००० गायी, १० हत्ती, १००० घोडे, १७ चांदीचे कलश. १ चांदीचा रथ व ६० हजार चांदीची नाणी दान केली होती.

अशा या महान पराक्रमी राजाचा कलिंगच्या पिंग नरेशाने शेवटी पराभव केला होता. पुराणानी या महान पराक्रमी राजाची कारकीर्द अवघी दहा वर्षाची होती असे म्हटले आहे. इ.स.पूर्व १९४ ते १८५ असा त्याला कालखंड पुराणानी सांगितला आहे. पण तो बरोबर नसावा. या सम्राटाची कारकीर्द अधिक म्हणजे सुमारे ५० वर्षांची असली पाहिजे. ती पुराणकारानी दुसऱ्या सातकर्णीस जोडली आहे. एकंदरीत सातकर्णी पहिला याच्याइतका पराक्रमी राजा सातवाहन कुळात दुसरा झाला नाही.

## २. गौतमीपुत्र श्री सातकर्णी

गौतमीपुत्र सातकर्णी हा राजा सातवाहन घराण्यातील सर्वश्रेष्ठ सम्राट म्हणून ओळखला जातो. त्याच्या इ.स. १०६ ते १३० हा कालखंड सातवाहन सत्तेच्या पुनरुत्थानाचे युग मानले जाते. पुराणात म्हटल्याप्रमाणे शिवस्वातीनंतर गादीवर येणारा गौतमीपुत्र सातकर्णी हा सातवाहन घराण्यातील तेवीसावा सम्राट होय. त्याने सुमारे २४ वर्षे राज्य केले. गौतमी बलश्री हा सातवाहन घराण्यातील दुसरी महत्त्वाकांक्षी स्त्री ही गौतमीपुत्र सातकर्णीची माता होती. गौतमीपुत्र सातकर्णी हा मातृभक्त राजा होता. त्याने आपल्या नावापुढे आपल्या मातेचे नाव लावलेले आहे. गौतमी बलश्री हिने नाशिक येथील आपल्या लेखात आपल्या पुत्राच्या पराक्रमाचे अतिशय समर्पक असे वर्णन केले आहे. सातवाहन घराण्यातील दुसऱ्या गटातील राजांच्यापैकी गौतमीपुत्र हा सर्वांत पराक्रमी सम्राट होता. सातकर्णी या घराण्यातील नावाशिवाय त्याने गौतमीपुत्र असे मातृपूरक नाव धारण केल्यामुळे त्याच्यानंतर सत्तेवर आलेल्या सातवाहन घराण्यातील

राजांनी अशाप्रकारची मातृपरक नावे धारण केल्याचे स्पष्ट होते. उदा. वसिष्ठीपुत्र पुलमावी, कौशिकीपुत्र सातकर्णी इत्यादी.

**गौतमीपुत्र सातकर्णीचे कार्य**

**१. शक-क्षत्रपांचा पराभव :** गौतमीपुत्र सातकर्णी सत्तेवर येण्याअगोदर सातवाहन सत्ता विनाशाकडे झुकली होती. शक-क्षत्रपानी सातवाहन साम्राज्यावर आक्रमण करून नासिक-जुन्नरचा प्रदेश ताब्यात घेतला हेता. त्यांनी शिवस्वातीचा पराभव करून सातवाहन कुळाच्या राजलक्ष्मचे हरण केले होते. म्हणजे क्षमप राजा नहपान याने आपले सत्ताकेंद्र नासिक-जुन्नर परिसरात निर्माण करून पश्चिमी व्यापारावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. क्षत्रपांच्या नासिक-जुन्नर परिसरातील प्रभावामुळे सातवाहनांचा व्यापार पूर्णपणे ठप्प झाला होता. म्हणून त्याना या परिसरातून हुसकावून लावणे क्रमप्राप्त होते. गौतमीपुत्राने आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या १५-१६ वर्षात क्षत्रपाविरुद्ध लढण्याची जोरदार तयारी केली. हा संघर्ष व्यापक ठरण्याची शक्यता गृहीत धरून त्याने प्रथम विदर्भावर आक्रमण करून वेणातीरीच्या पौनी परिसरात क्षत्रपांचा पराभव केला आणि स्वतःला 'वेणाकरकस्वामी' असे घोषित केले.

● **नहपान क्षत्रपाचा पराभव :** गौतमीपुत्राने आपल्या कारकीर्दीच्या १८व्या वर्षी नहपान या क्षत्रप राजास नाशिक परिसरातील गोवर्धन येथे गाठून त्याचा मोठा पराभव केला. पण तेथील लढाईतून नहपान डोंगर-दऱ्यांच्या आश्रयाने पळून गेला होता. त्यामुळे तो अजून जीवंत राहिल्याने गौतमीपुत्राने अवघ्या पंधरा दिवसात त्याचा शोध घेऊन त्याला ठार केले होते. हे युद्ध अतिसंहारक झाले होते. म्हणूनच नासिक येथील शिलालेखात 'क्षहरात वंश निर्वंश करस' नहपान क्षत्रपाचे कुळ नष्ट करणारा म्हणून स्वतःला गौरविले आहे. या विजयानंतर गौतमीपुत्राने गोवर्धनातील आपला अमात्य विष्णूपंडीत किंवा पालीत मारू आज्ञा देऊन नासिक येथील बौद्ध भिक्षु संघास अजकालकीय नामक शेत दान केले. नहपानाच्या कारकीर्दीचे अंतिम वर्ष इ.स. १२५-२५ हे होते.

**गौतमीपुत्राचे साम्राज्य**

राजा 'सिमुक' हा सातवाहन घराण्याचा संस्थापक होय. परंतु नंतरच्या काळात शक-क्षत्रपांच्या वर्चस्वामुळे सातवाहन साम्राज्य विनाशाकडे झुकलेले होते. पण पुन्हा सातवाहन सत्तेला नावारूपास आणण्याचे कार्य, गौतमी पुत्राने केले म्हणून त्याला 'सातवाहन सत्तेचा पुनर्रचितार्थ' असे म्हटले जात होते. गौतमीपुत्राच्या साम्राज्यात संपूर्ण महाराष्ट्र म्हणजे अपरान्त (उत्तर कोकण) अश्मक (नांदेड परिसर) मुलक (पैठण, नगर परिसर), औरंगाबाद, बीड, ऋषिक (खानदेश) विदर्भ व सेटगिरी (जुन्नर), कृष्णगिरी (कान्हेरी), सह्याद्री, कुकुर (राजस्थान) आकारावन्ती (माळवा) अनूप (महेश्वरी) परियान (अबू पर्वत) सौराष्ट्र, काठेवाड याशिवाय विंध्य, सातपुडा, मंचगिरी, श्रीस्तान (श्रीशैल) मल्य, महेन्द्र (पूर्वाघाट) इत्यादी प्रदेशाचा समावेश होता. सातवाहनांचा मूळ प्रदेश क्षत्रपाकडून जिंकून घेतल्यामुळे गौतमीपुत्राचा 'सातवाहन यश प्रतिष्ठा करस' असा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. या काळात त्याच्याइतका बलाढ्य नृपती भारतात अन्य नव्हता. म्हणूनच त्याच्या घोड्यांनी तीनही समुद्राचे पाणी चाखले होते असे अभिमानाने म्हटले जात होते. उत्तरेकडील मोहिमत त्याची शक, यवन व पल्लव राजकर्त्यांशी गाठ पडली आणि या सर्वांचा त्याने निःपात केला. म्हणून 'शक मनत-पल्हव निदुसनस' असाही त्याचा गौरव केलेला आहे.

**● गौतमीपुत्राची नाणी**

नहपानाचा पराभव केल्यानंतर त्याने त्याच्या नाण्याचे साठे जप्त केले आणि ते आपल्या नावाने पुनर्मुद्रित करून प्रचारात आणले. अशा प्रकारची पुनर्मुद्रित नाणी पैठण, कोल्हापूर येथे सापडली आहेत. याशिवाय अशा प्रकारची नाणी अजमेर, जोगरटेंकी, उज्जैन, बालापूर आदी ठिकाणी उपलब्ध झाली आहेत. गज, अश्व व कमानी छापाची त्याची अन्य चांदी व तांब्याची नाणीही प्रचारात होती.

**● कुशल प्रशासक**

गौतमीपुत्र जसा पराक्रमी होता तसाच तो उत्तम प्रशासकही होता. त्याने आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था रहावी म्हणून आपल्या साम्राज्याचे अनेक विभागात विभाजन करून त्यावर अमात्य नांवाचे अधिकारी नेमले होते. अमात्यांनी गावातील पाटील व कुलकर्णी यांच्या मदतीने राज्यकारभार पाहिला होता. त्यामुळे गौतमीपुत्राच्या कारकीर्दीत नव्हे तर त्याच्या मृत्यूनंतर बरीच वर्षे सातवाहन साम्राज्यात शांतता नांदत होती. त्याने प्रजेवर योग्य असे कर लादले होते. तो प्रजाहितदक्ष राजा होता. त्यामुळे त्याच्या कारकीर्दीत असा राज्यकारभार केल्यामुळे त्याला लोककल्याणकारी राजा असे म्हटले जात होते.

**● वैदिक धर्माला राजाश्रय**

गौतमीपुत्राने आपल्या कारकीर्दीत वर्णसंकर बंद करून वैदिक धर्माला राजाश्रय दिला होता. त्याला आपण ब्राह्मण आहोत याचा अभिमान वाटत होता. त्याने संस्कृत भाषेला राजभाषेचा दर्जा दिला होता. तो निस्सीम मातृभक्त होता. त्याने २४-२५ वर्षे राज्यकारभार केला होता. तो वयाच्या ५०व्या वर्षी मरण पावला होता. त्याची माता ८३ वर्षांपर्यंत जिवंत होती. तिने नाशिक येथील देवी लेण्याच्या (क्र.३) एका शिल्पपटात गौतमीपुत्राचे गौरवशाली वर्णन केले आहे.

**● गौतमीपुत्राच्या पदव्या**

गौतमीपुत्र सातकर्णीच्या असामान्य पराक्रमामुळे त्याला अनेक पदव्या बहाल करण्यात आल्या होता. अनुपम ब्राह्मण, पहल निदुसनस, सत्यमहिंद्र, वेदाचा आश्रयदाता, एकब्रह्म, त्रि-समुद्र-तोय-पितवाहन, मातृभक्त, महाराजा-धिराज अशा अनेक पदव्या त्याने लावून घेतल्या होत्या.

**● मूल्यमापन**

गौतमीपुत्राने साधारणपणे २४-२५ वर्षे राज्यकारभार केला आणि वयाच्या ५० व्या वर्षीच्या जवळपास त्याचा मृत्यू झाला होता. त्याने सातवाहनकुळात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती. तो स्वतःच्या जातीची निष्ठेने जपणूक करीत होता. त्याला आपल्या मातेबद्दल नितांत आदर होता. त्याला युद्धात कधीच पराभव पत्करावा लागला नाही. तो धीरगंभीर असून शरीराने भक्कम होता. त्याचे मुखकमल पौर्णिमेच्या चंद्रासारखे सुंदर होते. त्याची चाल हत्तीसारखी गंभीर होती. त्याचे बाहू शेषाप्रमाणे पुष्ट होते. तो जसा शूर तसाच नीतिवान होता. तो शत्रूलाही क्षमा करीत असे. नाशिक लेण्यावर गौतमीपुत्राच्या व्यक्तिमत्वाचे मोठे लोभस चित्र रेखाटले आहे. सातवाहन घराण्यातील तो सर्वश्रेष्ठ सम्राट होता.

### ३. वसिष्ठीपुत्र पुलुमावि

गौतमीपुत्र सातकर्णीला वसिष्ठिपुत्र पुलुमावि, वासिष्ठिपुत्र सातकर्णी, वासिष्ठिपुत्र स्कंद सातकर्णी असे तीन पुत्र होते. पैकी पुलुमावि हा पित्याच्या कारकिर्दीतच राज्यकारभारात मदत करीत असल्याने व तो सर्वांत ज्येष्ठ असल्याने गौतमीपुत्रानंतर तो सातवाहन गादीवर आला असावा. त्याने एकूण अठ्ठावीस वर्षे राज्य केले. त्याची कारकीर्द इ.स. १६० मध्ये संपली असावी. त्याच्या आईचे गोत्र वसिष्ठी असल्याने त्याला वसिष्ठीपुत्र पुलुमावि म्हटले आहे. तसेच त्याला शिवश्री पुलुमावि असेही म्हटले आहे. नासिकच्या शिलालेखात पुलुमाविचा 'दक्षिणापथपती' असा उल्लेख आहे.

- **वैवाहिक संबंध**

पुलुमाविच्या कारकीर्दीचे तपशील सांगणारे लेख नासिक, कार्ले, वनवासी, अमरावती आदी ठिकाणी उपलब्ध झाले आहेत. तसेच त्याची नाणी महाराष्ट्रभर सापडतात. रुद्रदमनच्या गिरनार प्रस्तर लेखात पुलुमावि रुद्रदमनचा जावई असावा असा उल्लेख आहे. गौतमीपुत्र सातकर्णीनंतर कांही काळ सातवाहन व क्षत्रप यांच्यात मैत्री निर्माण झाली होती आणि त्या अवधीतच रुद्रदमनने आपली मुलगी पुलुमाविस दिली असल्याचे दिसते. रुद्रदमनची कन्या पुलुमाविची पट्टराणी होती. त्यामुळे सातवाहनांच्या चालीरिती व पोषाख यामध्ये मोठे बदल घडून आले. पुलुमाविच्या मुखवटाछाप नाण्यावर हा बदल स्पष्ट जाणतो. त्यावर दाखविलेला पुलुमावि ग्रीक-रोमन राजपुत्रासारखा दाखविला असून नाणेही ग्रीक-रोमन नाण्याप्रमाणे जोडभाषेत काढण्यात आले आहे.

- **साम्राज्यविस्तार**

पुलुमाविच्या कारकीर्दीत क्षत्रपांनी पुनः उठाव करून नर्मदेचा भूप्रदेश व उत्तर कोकणचा प्रदेश जिंकून घेतला होता. पुलुमावि आणि उज्जैनच्या क्षत्रपाचा नातू रुद्रदमन यांच्यामध्ये उपरोक्त भूप्रदेशावर वर्चस्व गाजविण्यासाठी दोन वेळा युद्ध झाले होते. या युद्धात दक्षिणापथपती पुलुमाविचा पराभव झाला होता. परंतु पुलुमावि रुद्रदमनचा जावई असल्याने त्याला सोडून देण्यात आले होते. क्षत्रपांचे हल्ले पुलुमाविने परतवून लावून दक्षिणेतील कुंतलचा विस्तृत भूप्रदेश जिंकून दक्षिण भारतावरील सातवाहनांची पकड दृढ केली. पैठण ही आरंभापासून अखेरपर्यंत त्याची राजधानी होती. क्षत्रपाप्रमाणे त्याने स्वतःचा मुखवटा असलेली प्राकृत व द्राविडी भाषेतील नाणी प्रचारात आणली होती. पैठण येथे त्याची नाणी उपलब्ध झाली आहेत.

महाराष्ट्राच्या दृष्टिकोणातून वसिष्ठपुत्र पुलमाविची कारकीर्द ही अखेरची समृद्ध कारकीर्द होय. पुलुमाविने क्षत्रपांचे आक्रमण थोपवून महाराष्ट्रश्रीला वाचविले ही गोष्ट महत्त्वाची ठरते. पुलुमाविनंतर सातवाहनांच्या साम्राज्याचे दोन विभागात विभाजन झाले. पश्चिम महाराष्ट्रात स्कंद सातकर्णी तर दक्षिणेत आंध्र प्रदेशात वसिष्ठिपुत्र सातकर्णीने राज्य केले. स्कंद सातकर्णीच्या नाण्यावर प्राकृत लेख आहे तर वसिष्ठिपुत्राच्या नाण्यावर तेलगू भाषेतील लेख आहे. इ.स. २३० च्या सुमारास महाराष्ट्रातील सातवाहनांची सत्ता संपुष्टात आली.

## ४. कुशाण राजा : कनिष्क

ग्रीक-शक यांच्यानंतर भारतात राजकीय सत्ता स्थापन करणारे परकीय आक्रमक म्हणजे 'कुशाण' होय. कुशाण हे भारतीय धर्म व संस्कृतीशी एकरूप झालेले आक्रमक होते. कुशाणांचे शिलालेख, ताम्रपट, नाणी, विपुल प्रमाणात मिळाली आहेत. तसेच कुशाणांच्यावर चिनी इतिहासकारांनी विपुल लेखन केले आहे. कुशाणांचे भारतातील साम्राज्य खूप मोठे होते. पेशावर शहर कुशाणांच्या राजधानीचे शहर होते. कुशाण सत्तेमुळे भारताचा खऱ्या अर्थाने आशियायी देशांशी संबंध प्रस्थापित झाले. कुशाण सम्राट कनिष्कने बौद्ध धर्माला राजाश्रय दिला होता. त्यामुळे संपूर्ण आशिया खंडात बौद्ध धर्माचा प्रभाव प्रस्थापित झाला. म्हणून आपणाला कनिष्कच्या कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. सांस्कृतिकदृष्ट्या कनिष्कचा कालखंड महत्त्वाचा आहे.

- **कनिष्कचा कालखंड**

चीन इतिहासकार फॅन-कु आणि फॅन-चे यांनी इ.स. २०० पर्यंतची कुशाण घराण्याची माहिती लिहून ठेवली आहे. भारतात कुशाणांचे अनेक ताम्रपट सापडले आहेत. गांधार, सिंध व उत्तर प्रदेशात अनेक ठिकाणी कनिष्कची नाणी सापडली आहेत. विम कॅडफिशस नंतर कुशाणांच्या गादीवर कनिष्क राजा आला. डॉ. त्रिपाठी म्हणतात की, ''कनिष्क हा चंद्रगुप्त मौर्यासारखा महान पराक्रमी व अशोकासारखा धार्मिक होता. बौद्ध अनुश्रुतीमध्ये कनिष्कला अशोकाच्या बरोबरीचे स्थान देण्यात आले आहे. कनिष्क इ.स. ७८ मध्ये गादीवर आला आणि इ.स. १०१ मध्ये मरण पावला. याबाबत बहुतेकांचे एकमत आहे. पण तो इ.स. १२० मध्ये गादीवर आला आणि एकूण ४२ वर्षे राज्य करून इ.स. १६२ मध्ये मरण पावला असेही मत व्यक्त करण्यात येते. डॉ. स्मिथ यांनी कनिष्कचा काळ इ.स. १२५ ते १५३ असा दिला आहे.

### कनिष्कचा साम्राज्यविस्तार

कनिष्क अत्यंत पराक्रमी सम्राट होता. त्याने ''देवपूत्रशाही शहानुशाही शकमुरुंड'' अशी पदवी लावून घेतली होती. सम्राट अशोकानंतर भारतात बलाढ्य साम्राज्य निर्माण करणारा सम्राट कनिष्कच होता. त्याचे साम्राज्यविस्ताराचे धोरण आक्रमक असे होते. त्याने खालीलप्रमाणे साम्राज्यविस्तार केला होता.

**१. काश्मिर** : कलहणकृत 'राजतरंगिणी' या ग्रंथात कनिष्कच्या काश्मिर स्वारीची माहिती आहे. काश्मिरचा बराच प्रदेश त्याने जिंकून घेतला होता. त्याने काश्मीरमध्ये एक नवीन शहर वसविले होते. त्याचे नाव कनिष्कपूर ठेवण्यात आले होते. आज बारामुला श्रीनगर मार्गावर कनिसपूर या नांवाने ओळखले जाते.

**२. मगध** : 'श्रीधर्मपटीवा निदानसुत्र' या बौद्ध ग्रंथात कनिष्कच्या मगध स्वारीची माहिती आहे. कनिष्कने पाटलीपुत्रचा राजा काटेकूल याचा पराभव करून मगधाचा बराच प्रदेश जिंकला होता. मगध देशातच त्याला गौतम बुद्धाचे एक पाणी पिण्याचे भांडे सापडले होते. गोरखपूर व गाझीपूर या जिल्ह्यात कनिष्कची बरीच नाणी सापडली आहेत. यावरून कनिष्कची मगध देशात सत्ता हेती हे मान्य करावे लागते.

**३. माळवा** : कनिष्कने उज्जैनीचा राजा चष्टन (शक) याचा पराभव करून माळव्याचा संपूर्ण प्रदेश जिंकला होता. तो पूर्व भारतात असताना पार्थियाच्या राजाने त्याच्यावर आक्रमण केले होते. पण कनिष्कने त्याचे आक्रमण परतावून लावले होते.

**४. चीन** : कनिष्कने पामिरच्या मार्गाने चिनी प्रदेशावर आक्रमण केले होते. त्याने चिनी सेनापती पालयंग याचा पराभव करून खोतान, काश्गर, यारकन्द हा प्रदेश जिंकून घेतला होता. त्या ठिकाणी त्याने आपली सत्ता निर्माण केली होती. अशा प्रकारे पूर्वेकडे बनारस पासून वायव्येकडे खोरासान, अफगाणिस्तान, उत्तरेकडे खोतान व काश्गरपासून दक्षिणेकडे विंध्य पर्वतापर्यंत कनिष्कचे साम्राज्य पसरले होते. अशोकानंतर एवढे मोठे साम्राज्य स्थापन करणारा कनिष्क हा पहिलाच राजा होय. पेशावर, रावळपिंडी, कौशांबी, बनारस, मथुरा या ठिकाणी कनिष्कच्या कारकीर्दीची माहिती देणारे शिलालेख सापडले आहेत. तर उत्तर भारतात अनेक ठिकाणी त्याची नाणी सापडली आहेत.

- **कनिष्कची राजधानी**

ह्युएनत्संग याने म्हटल्याप्रमाणे कनिष्कच्या विशाल साम्राज्याची राजधानी पुरुषपूर किंवा आजचे पेशावर शहर या ठिकाणी होती. पेशावर शहरात कनिष्कच्या साम्राज्याचे बरेच अवशेष आढळून येतात. कनिष्कने बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर एक प्रचंड स्तूप उभारला होता. हा स्तूप १२० मीटर उंच होता. त्याला एकूण तेरा मजले होते. सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यूएनत्संग ही इमारत पाहून आश्चर्यचकीत झाला होता. त्याच्या कारकिर्दीत पेशावर शहर महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र बनले होते.

- **कनिष्कचा धर्म**

कनिष्कने बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. पूर्व भारतात मोहिमेवर असताना अश्वघोष या बौद्ध पंडिताची भेट घेतली होती. त्याच्या सांगण्यावरून त्याने बौद्ध धर्म स्वीकारला होता. बौद्ध धर्म स्वीकारला असला तरीही तो शिवाची पूजा करीत होता. त्याच्या नाण्यावर ग्रीक, इराणी, बौद्ध, हिंदू, सुमेरियन देवदेवतांच्या प्रतिमा आहेत. तो धर्मसहिष्णु होता व प्रजेला धर्मस्वातंत्र्य होते. कनिष्कने आपल्या कारकीर्दीत बौद्ध धर्मातील मतभेद मिटविण्यासाठी तसेच बौद्ध तत्त्वज्ञानाचे स्पष्टीकरण सोप्या भाषेत करण्यासाठी काश्मिरमधील कुंडलवन येथील प्रसिद्ध बौद्ध विहारात इतिहासप्रसिद्ध अशी चौथी बौद्ध भिक्षु धर्म परिषद भरविली होती. या परिषदेला ५०० बौद्ध भिक्षु हजर होते. बौद्ध पंडित वसुमित्र या परिषदेचा अध्यक्ष तर अश्वघोष या परिषदेचा उपाध्यक्ष होता. नागार्जुन, पार्श्वनाथ यासारखे अनेक पंडीत या परिषदेला हजर होते. या परिषदेत त्रिपिटिकांचे संस्कृतमध्ये भाषांतर करण्यात आले. ते भाषांतर टीका म्हणून 'महाविभाषी' या नावाने एका ताम्रपटावर लिहिण्यात आले. तो ताम्रपट विशाल स्तूपामध्ये सुरक्षित ठेवण्यात आला. अशा प्रकारे कनिष्कने बौद्ध धर्माची सेवा केली. त्याने बौद्ध धर्माला राजाश्रय देऊन संपूर्ण आशिया खंडात बौद्ध धर्माचा प्रसार केला.

मौर्यांच्या पाडावानंतर नांव घेण्यासारखे बलाढ्य साम्राज्य कनिकने निर्माण केले होते. बौद्ध धर्माचा आश्रयदाता व कलेचा भोक्ता म्हणून कनिष्कचे नाव भारताच्या इतिहासात अजरामर झाले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**रिकाम्या जागा भरा.**

१. श्री सातकर्णी पहिला या सातवाहन राजाने स्वतःला .............. अशी पदवी लावून घेतली होती.

२. श्री सातकर्णीची पत्नी .............. हिने नाणेघाट शिलालेख तयार करून घेतला आहे.

३. गौतमीपुत्र सातकर्णी हा .......... भक्त राजा होता.

४. गौतमीपुत्र सातकर्णीने ........... क्षत्रपाचा पराभव केला होता.

५. नासिक येथील देवी लेणी ........... हिने तयार करून घेतली आहेत.

६. ........... या सातवाहन राजाने 'त्रि समुद्र तोत्र पितवाहन' ही पदवी लावून घेतली होती.

७. रुद्रादमन या क्षत्रप राजाने आपल्या मुलीचा विवाह ......... या सातवाहन राजाशी लावून दिला होता.

८. कुशाण सम्राट कनिष्कने आपली राजधानी ........... येथे केली होती.

९. सोन्याचे नाणे तयार करणारा पहिला भारतीय राजा .......... हा होय.

१०. कनिष्कने बौद्ध धर्माची चौथी परिषद ............. येथे भरविली होती.

### १.२.३ सातवाहन व कुशाण कालीन आर्थिक व्यवस्था - व्यापार आणि उद्योग

सातवाहन व कुशाण कालखंडात भारताचा शेजारच्या देशांशी तसेच युरोपियन देशांशी संबंध प्रस्थापित झाला होता. मौर्य सत्तेच्या विनाशानंतरच्या काळात भारतावर परकीयांची आक्रमणे मोठ्या प्रमाणात झाली. या परकीय सत्तानी भारतात प्रामुख्याने व्यापार केला. त्यामुळे या कालखंडात फार मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण होऊन अनेक नगरांची व बंदरांची निर्मिती झाली. तत्कालीन समृद्धीचे चित्र आपणास त्या काळात खोदल्या गेलेल्या लेण्यावरून समजू शकते. तसेच प्लिनी, टॉलेमी, एरियन आणि पेरिप्लसने भारताच्या अफाट समृद्धतीची प्रशंसा केली आहे. उत्खननातून प्राप्त झालेल्या वास्तू व वास्तूवरून उपरोक्त समृद्धीची प्रचिती येते. मान्सूनच्या वाऱ्याच्या शोधामुळे सातवाहन साम्राज्याचे पाश्चिमात्य जगतातील व्यापारी पेठांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले. ग्रीक, शक, क्षत्रप, व कुशाण या परकीय सत्तांनी भारतात आपल्या सत्ता निर्माण करून भारतीय मालाला देशांतर्गत व बाहेरील बाजारपेठा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे सातवाहन व कुशाण कालखंड आर्थिक भरभराटीचा कालखंड ठरला. गोदावरीच्या खोऱ्यात सातवाहन साम्राज्याचा विस्तार झाल्यामुळे गोदा खोऱ्याची समृद्धता हे सातवाहनांच्या समृद्धीचे मुख्य कारण होते. कृषिविकास मोठ्या प्रमाणात होऊन महाराष्ट्रात नागरीकरणास सुरुवात होऊन व्यापारात प्रचंड प्रगती झाली.

**१. सातवाहनकालीन शेती-विकास :** सातवाहन काळात भूमी लागवडीखाली आणण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न झाला. पांडव लेण्यात भूदानाचा उल्लेख आहे. दान जमिनी करमुक्त होत्या तसेच जमिनधारणेवर मर्यादा नव्हती. जमीन तीन भागात विभागलेली होती. राजाची जमीन, सरंजामदाराची जमीन व शेतकऱ्यांची जमीन. शेती निसर्गावलंबी असल्यामुळे शेतकऱ्याला दैववादी होण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. गाथासप्तशतीमध्ये व उत्खननात

मिळालल्या धान्यकणांवरून भात लोकप्रिय पीक असावे. तसेच कापूस, हरभरा, डाळी, गळीताची धान्ये, ज्वारी, बाजरी, गहू व ऊस इत्यादी पिके घेतली जात होती. हळदीच्या शेतीचा उल्लेख आहे हे विशेष महत्त्वाचे. जमिनीची मालकी शेतकऱ्यांकडे होती. शेतसारा कमी आकारला जात होता. त्यामुळे जमीन मोठ्या प्रमाणात लागवडीखाली आली होती. राजाच्या मालकीच्या जमिनी होत्या. त्यापासून राजाला उत्पन्न मिळत होते. जमिनीला कृत्रिम पाणी पुरवठा पद्धतीने पाणी दिले जात होते. बंधारे किंवा तलाव बांधल्याचे उल्लेख आहेत. विद्वान ब्राह्मणांना गावे दान देण्याची पद्धती होती. अशा गांवात कोणत्याच प्रकारचा राजकीय हस्तक्षेप होत नसे.

**२. व्यापार व वाणिज्य :** मौर्य काळात उत्तरपथापेक्षा दक्षिणपथात व्यापार मोठ्या प्रमाणात होता. सातवाहनांच्यामुळे व्यापाराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. विशेषतः आंतरराष्ट्रीय व्यापारात वर्चस्व निर्माण झाले. सातवाहनांच्या राजकीय स्थैर्यामुळे पश्चिम किनारपट्टीवरील बंदरे व अंतर्गत पैठण, नगर, जुन्नर, नासिक, भोगवर्धन, कोल्हापूर या व्यापारी पेठा व्यापारी मार्गांनी जोडल्या. परिणामी, दक्षिणभागात व्यापाराचे व उद्योगाचे एक प्रचंड जाळे निर्माण झाले. पैठण हे राजधानीचे ठिकाण भारतातील सर्व प्रमुख व्यापारी पेठांशी जोडले गेले होते.

**व्यापारी मार्ग व सार्थवाहपथ**

भारतातील सर्व व्यापारीपेठा एकमेकांशी व्यापारी मार्गानी जोडल्या होत्या. व्यापारी मार्गाचे प्रामुख्याने चार मुख्य विभाग झाले होते. त्यामध्ये उत्तरपथ विभाग महत्त्वाचा होता. दक्षिणेतून उत्तरेकडे जाणारा महामार्ग माळवा आणि अवतींमधून जात होता. श्रावस्ती प्रतिष्ठान हा सर्वात प्राचीन मार्ग होय. दक्षिणेतून उत्तरेकडे जाणारा एक महामार्ग मारखिंड पर्वतातून जात होता. या मारखिंडीत अजिंठ्याची बौद्ध लेणी आहेत. प्रतिष्ठान-उज्जैन हा महामार्गही अतिशय महत्त्वाचा होता. या मार्गावर भोगवर्धन हे सातवहनकालीन प्रसिद्ध व्यापारी केंद्र होते. या बऱ्हाणपूर व बहाळ ही प्राचीन केंद्रे होती. भारतहून नासिककडे जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग होता. अजिंठा, पितळखोरा आणि औरंगाबाद ही प्रसिद्ध लेणी बहाळ प्रतिष्ठान मार्गावर होती. मथुरा, उज्जैन (अवंती) ही व्यापारी केंद्रे अति समृद्ध होती. म्हणूनच या केंद्रावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सातवाहन व क्षत्रप यांच्यात सतत संघर्ष होत असे.

**पश्चिमी व्यापारी मार्ग**

सातवाहन व कुशाण काळात व्यापाराच्या दृष्टीने पश्चिमपथ सर्वात महत्त्वाचे होते. भडोच, नालासोपारा व कल्याण ही बंदरे पाश्चिमात्य देशांशी जोडली गेली होती. उज्जैन, पैठण, नगर, तगर, पितळखोरा, बहाळ ही व्यापारी केंद्रे या बंदरांशी व्यापारी मार्गांनी जोडली होती. पेरिप्लसने पश्चिमी व्यापारी मार्गाने होणाऱ्या व्यापाराची बारकाईने माहिती दिली आहे. तापी खोऱ्यातून वेरूळ, पितळखोरा, बहाळ, प्रकाशमार्गे भडोचला माल येत होता. तर दुसरा मार्ग प्रतिष्ठान नेवासा, नासिक म्हणजे गोदा खोऱ्यातून येत होता. पेरिप्लसने बैथन (पैठण) व तगर (तेतर) ही दक्षिण देशातील महत्त्वाची व्यापारी केंद्रे असल्याचे म्हटले आहे. त्याच्या मते पैठण भडोचहून वीस दिवसांच्या अंतरावर, तर तेर पैठणहून दहा दिवसाच्या अंतरावर होते. भडोचप्रमाणे सोपारा हे प्रसिद्ध बंदर होते. टॉलेमी व पेरिप्लसने या बंदराची माहिती दिली आहे. कल्याण हे समृद्ध व्यापारी केंद्र होते. कल्याणला जाणारा दुसरा मार्ग रांजणगाव, पुणे, भाजे, कार्ले असा जात होता. कल्याण हे सातवाहनांचे आवडते बंदर होते. चोल हे पश्चिम किनारपट्टीवरील महत्त्वाचे बंदर होते. पश्चिम किनाऱ्यावरील बंदराना जोडणारा नाणेघाट महत्त्वाचा घाट होता. त्यामुळे नाणेघाटावर वर्चस्व

निर्माण करण्यासाठी सातवाहन-क्षत्रप यांयात सतत संघर्ष होत होता. पश्चिमीपथातील व्यापारी मार्गाने पैठण मध्य आशियाशी जोडले होते. हा मार्ग पैठण-भडोच मार्गे तक्षशीला व पुढे गांधारकडे जात होता.

**दक्षिणेकडील व्यापारी मार्ग**

दक्षिणभागातील सर्व व्यापारी मार्ग पैठणशी जोडले होते. पैठण दक्षिणपथातील प्रमुख केंद्र होते. पूर्व-पश्चिम किनारपट्टीवरील सर्व बंदरे पैठणला व्यापारी मार्गानी जोडली होती. भडोच ते मच्छलीपट्टम हा महत्त्वाचा व्यापारी मार्ग होता. त्यावर मच्छलीपट्टम, विनुकोंडा, हैद्राबाद, कल्याणी, तेर, पैठण, नासिक, सुरत व भडोच ही व्यापारी केंद्रे होती. दक्षिणपथातील दूसरे व्यापारी केंद्रे कोल्हापूर हे होते. कोल्हापूरहून वनवासी, चितळदुर्ग, कन्याकुमारी असा मार्ग होता. पैठण कन्याकुमारीशी जोडले होते. सातवाहन साम्राज्यात अनेक लहान व्यापारी मार्ग होते. व्यापारी मार्गावर मोठ्या प्रमाणात लेण्या कोरल्या आहेत. सर्व लेण्या बौद्ध लेण्या आहेत. यावरून व्यापार बौद्धांच्या हाती असल्याचे स्पष्ट होते. जुन्नर, कान्हेरी, नासिक येथील लेण्यांच्या अफाट संख्येवरून अडचणीच्या प्रसंगी लेण्यातील विहारांचा वखारीसारखा उपयोग केला जात असावा असे वाटते. बौद्ध संघानी व्यापाराला चालना देऊन नागरीकरणास हातभार लावला होता.

**३. परराष्ट्र व्यापार :** या काळात परकीय आक्रमकांच्या आगमनाने भारतीय मालाला परदेशी बाजारपेठा मिळाल्या व भारतीय उद्योगधंदे भरभराटीस आले. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात सिरियात पार्शियन साम्राज्याचा उदय झाला व मोठे अराजक माजले. त्यामुळे भारताचा खुष्कीच्या मार्गाने पश्चिमेशी होणारा व्यापार मंदावला व समुद्रमार्गाचे महत्त्व वाढले. सागरी मार्ग किनाऱ्याकिनाऱ्याने इजिप्त व रोमपर्यंत जाणारे होते. इ.स. ४५ च्या सुमारास हिप्पालस या व्यापाऱ्याने व्यापारी वाऱ्यांचा (मान्सून वाऱ्याचा) शोध लावल्यामुळे कमी खर्चात, सागरी दळणवळण सुरू झाले. त्यामुळे भारताचा परदेशी व्यापार मोठ्या प्रमाणात वाढला.

- **आयात-निर्यात वस्तू**

भारतातून पश्चिमी देशांकडे वाघ, सिंह, माकडे इत्यादी पशू, पोपट, मोर इत्यादी पक्षी, कातडी लोकर, कस्तुरी, हस्तीदंत, मोती, रेशीम, आले, मिरची, मसाल्याचे पदार्थ, नीळ, चंदन, साखर, मलमल, सुती व रेशमी कापड, तांदूळ, सागवान लाकूड, औषधी वनस्पती, हिरे-माणके, चैनीच्या वस्तू इत्यातदी वस्तू किंवा माल निर्यात हो होता. पश्चिमी देशातून भारतात सुंदर दासी, प्रवाळ, लिनन, उंची दारू, शिसे, तांबे, कथिल, काच, सोने, चांदी इत्यादी आयात होई. प्लीन म्हणतो की रोमन सम्राटांना भारतीय मलमलीच्या आयातीवर बंधने घालावी लागली. या काळात लाखो रुपये किमतीच्या सोन्याच्या ओघ च भारताकडे वाहत होता. भारतीय मालावर बहिष्कार घालण्याच्या चळवळीही त्याकाळी रोममध्ये झाल्या होत्या. सोन्याची शेकडो नाणी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आजही उपलब्ध होतात. या सर्व गोष्टीवरून आयत-निर्यात बाबत माहिती होते.

- **नाणी**

इ.स.पूर्व ५०० ते ३०० या काळात तांबे हा धातू नाण्यासाठी वापरात आणला. या काळात स्वस्तिक, बोधिवृक्ष,

विहार इत्यादी ठसे मारलेली नाणी रूढ होती. नाण्याचे मूळ प्रमाण 'रत्ती' म्हणजे 'गुंजा' हे असे. सोन्याचे प्रमाणभूत नाणे ८० रत्तीचे असे. पुराण, धरण ही नाणी ३२ रत्तीची असत. त्याहून लहान नाणी चांदीची असत. मथुरा येथील नाण्यावर परकीयांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. कुशाण राजाच्या नाण्यावर रोमची छाप दिसते. कुशाण राजानी भारतात प्रथम सोन्याची नाणी पाडली. त्यांनी चांदीची नाणी तयार केली नव्हती. सातवाहनांची नाणी तांबे व चांदीची होती. चांदीच्या नाण्याचे वजन ८० रत्ती होते. ३५ चांदीच्या नाण्याला १ सुवर्ण नाणे मिळे. म्हणजे चांदीच्या पस्तीस पट सोन्याची किंमत होती असे दिसते. कनिष्कने चांदीची नाणी पाडली नव्हती. सातवाहनांची नाणी इ.स.पूर्व १५० च्या सुमाराची असून त्यावर ब्राह्मी लिपीतील लेख आहेत. गौतमीपुत्र सातकर्णीने नहपान क्षत्रपाच्या नाण्यावर आपले शिक्के मारून ती प्रचारात ठेवली. यज्ञश्री सातकर्णीच्या नाण्यावर जहाजाचा ठसा आढळतो. तो सागरी व्यापार व आरमाराचा निदर्शक असावा. सातवाहनांच्या सुरुवातीच्या नाण्यावर ग्रीकांची छाप दिसते. पण पुढे त्यांचे संपूर्ण भारतीयनुकरण झाले. कुशाण काळात तर नाण्यावर केवळ भारतीय कलेचाच प्रभाव दिसून येतो.

### ४. उद्योग

सातवाहन व कुशाण काळात पाश्चिमात्य संपर्काचा भारतीय समाजजीवनावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला होता. उत्खननातून असंख्य वस्तू उपलब्ध झाल्या आहेत. त्यामध्ये मणी, बांगड्या, मातीची शिल्पे, दीप यासारख्या वस्तू मोठ्या प्रमाणात आहेत. अनेक शिलालेखातून ग्रीक, रोमन व्यापाऱ्यांचा उल्लेख आहे. पैठण व इतर ठिकाणी रोमन नाणी सापडली आहेत. यावरून त्या काळात व्यापार व उद्योगधंद्यात मोठी प्रगती झाली होती असे म्हणावे लागते. तत्कालीन उद्योगामध्ये कापूस व रेशमावर प्रक्रिया करणारे उद्योग, खनिज पदार्थावर प्रक्रिया करणारे उद्योग, काच, रत्ने, गारगोटी, हस्तीदंत आदीवर प्रक्रिया करणारे उद्योग आदींचा समावेश होता.

**१. खनिजे व त्यावर आधारीत उद्योग** : गोदावरी खोऱ्यात मौल्यवान संयुगे म्हणजे दगड मोठ्या प्रमाणात सापडत होते. आजही गोमेद हे संयुग मोठ्या प्रमाणात आढळते. या दगडापासून सुंदर मणी तयार केले जात होते. त्यांना युरोपात मोठी मागणी होती. या दगडापासून मौल्यवान वस्तू, भांडी, पदके इत्यादी वस्तू होत. पैठणचे कलाकार या वस्तू बनविण्यात निष्णात होते. या परिसरात संयुगाशिवाय विविध प्रकारची रत्ने मिळत होती. यापासूनही भिन्न प्रकारचे दागिने व अलंकारिक वस्तू घडविल्या जात. या वस्तूना युरोपात मोठी मागणी होती.

**२. वस्त्रोद्योग** : वस्त्रे तयार करण्याची कला मानव कसा व केव्हा शिकला हे सांगता येत नाही. तथापि वस्त्राचे अस्तित्व मात्र हजारो वर्षे पुरातन आहे. भारतीयांच्या निर्यातीमध्ये वस्त्राचे स्थान वरती होते. पैठण व तेर येथील तलम कापड विशेष प्रसिद्ध होते. आशिया, युरोप व इजिप्तमध्ये त्याला विशेष मागणी होती. वस्त्रोद्योग निर्मितीमध्ये भारताने एकाधिकारशाही प्रस्थापित केली होती. पेरिप्लसने भडोच येथून निर्यात होणाऱ्या तलम कापडाची स्तुती केली आहे.

कापसाप्रमाणे भारतीयांनी रेशीम धाग्याचा वापर करून रेशमी भरजरी वस्त्रे तयार केली होती. रेशमी कपड्यावर मणिचिरा म्हणजे रेशमावर जरी व मोत्याचे काम होय. हा भारतीय विणकलेतील परमोच्च बिंदू होता. सातवाहन

राजानी वस्त्रोद्योगाला राजाश्रय दिला होता. महावस्त्र किंवा पैठणीने एके काळी आंतरराष्ट्रीय वस्त्रांची पेठ काबीज केली होती. पैठणच्या वस्त्रांना युरोपातील बाजारपेठांमध्ये मोठी मागणी होती. वस्त्र निर्यातीमुळे भारताच्या समृद्धीत भर पडली होती.

**३. श्रेणी** : सातवाहन व कुशाण काळात निर्यातीचा माल भिन्न-भिन्न प्रदेशातून एकत्र केला जात असे. म्हणजे उत्पादन, एकत्रीकरण व वितरण अशा व्यापारातील तीन अवस्था होत्या आणि राज्यातील भिन्न घटक यामध्ये गुंतले होते. त्यांचा थोडक्यात परामर्श घेऊ. व्यापार व उद्योग संघटनात्मक ऐक्याला महत्त्व होते. विणकरांचे संघटन, कारागिरांचे संघटन, शिंप्यांचे संघटन, जवाहिरे, रंगारी आदी भिन्न गटांचे संघटन झाले होते. या प्रकारच्या संघटनात्मक गटाला श्रेणी म्हटले जात होते. श्रेणी म्हणजे एका विशिष्ट प्रकारचा उद्योग करणाऱ्या गटाच्या सहकार्यातून साकारलेले संघटन होय. सातवाहन काळात १८ श्रेण्या होत्या. श्रेण्यांचा सर्व व्यवहार श्रेणीप्रमुख पाहत होता. त्याचे वास्तव्य मोठ्या व्यापारी केंद्रात किंवा राजधानीच्या ठिकाणी असे. श्रेणीप्रमुखास श्रेष्ठी म्हटले जात होते. श्रेष्ठींना राजदरबारात मोठा मान होता. राजाच्या मंत्रिमंडळात श्रेष्ठीला महत्त्व होते. गुणाढ्याच्या बृहतनुभते तसेच हालाच्या गाथासप्तशतीमध्ये श्रेष्ठीच्या कथा आढळतात. श्रेष्ठ्याच्या विधिनियमांना राजमान्यता होती. थोडक्यात उद्योगधंदे व व्यापार यामध्ये या काळात प्रचंड प्रगती झाली होती. त्यामुळे देश समृद्ध बनला. परराष्ट्र व्यापारात भारताची एकाधिकारशाही होती.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**रिकाम्या जागा भरा.**

१. सातवाहनांच्या .............. लेण्यात भूदानाचा उल्लेख आहे.

२. सातवाहन काळात ब्राह्मणांना .............. दान देण्याची पद्धती सुरू झाली.

३. भोगवर्धन हे व्यापारी केंद्र .............. मार्गावर होते.

४. पैठण ते कल्याण हा महामार्ग जुन्नरच्या .............. घाटातून जात होता.

५. इ.स. ४५ च्या सुमारास .............. ने व्यापारी वाऱ्याचा म्हणजे मान्सून वाऱ्याचा शोध लावला.

६. भारतात इ.स. पूर्व ६०० ते ३०० या काळात .............. हा धातू नाणी करण्यासाठी वापरात आला.

७. .............. या राजाने भारतात सर्वप्रथम सोन्याचे नाणे तयार केले.

८. गौतमीपुत्र सातकर्णीने .............. च्या नाण्यावर आपले शिक्के मारून ती प्रचारात ठेवली.

९. एका विशिष्ट उद्योग करणाऱ्या संघटनात्मक ऐक्यास .............. म्हणत असत.

१०. सातवाहन काळात भारताने .............. निर्यातीमध्ये एकाधिकारशाही निर्माण केली होती.

### १.२.४ कला व स्थापत्य

मौर्यांच्या नंतर भारतात अनेक परकीय सत्तांनी आपल्या सत्ता प्रस्थापित केल्या. त्यामध्ये कुशाण शकांच्या प्रमाणे भारतीय धर्म व संस्कृतीशी एकरूप झालेले होते. कुशाणांच्या समकालीन दक्षिण भारतात सातवाहनांनी आपले साम्राज्य निर्माण केले होते. कुशाण व सातवाहन काळात इंडो-ग्रीक कलेचा प्रभाव वाढला होता. पण या काळात खऱ्या भारतीय कलांना महत्त्व प्राप्त होऊन कला व स्थापत्य क्षेत्रात भारतीयांनी मोलाची कामगिरी केली आहे. सातवाहनांनी स्थापत्य व लेणी या क्षेत्रात विशेष काम केले. त्यामुळे पैठण, तेर, भोगवर्धन, ब्रह्मपुरी सारख्या अनेक कला केंद्रांचा उदय झाला. या कला केंद्रामध्ये जागतिक किर्तीचे कलाकार निर्माण झाले. त्यांनी सह्याद्रीच्या कुशीत म्हणजे कान्हेरी, कार्ले, भाजे, बडेसा, नासिक, जुन्नर, अजिंठा आदी ठिकाणी शेकडो लेणी तयार केली. राजकीय स्थैर्य, आर्थिक सुबत्ता व धार्मिक औदार्य यांच्या जोरावर कला व स्थापत्य या क्षेत्रांत प्रचंड काम केले. म्हणून आपणाला कुशाण व सातवाहन काळातील कला-स्थापत्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

**स्थापत्य**

कुशाण व सातवाहन कालखंड हा कलेच्या इतिहासातील सोनेरी पान मानला जातो. त्यांनी भारतात एक दैदिप्यमान परंपरा निर्माण केली. या काळात आंतरराष्ट्रीय किर्तीच्या अजोड अशा कलाकृती निर्माण झाल्या. सातवाहन काळात दोन प्रकारच्या वास्तू निर्माण झाल्याचे दिसते. एक नागरी वास्तू व दुसरी धार्मिक वास्तू.

**१. नागरी वास्तू** : नागरी वास्तूमध्ये सार्वजनिक व खाजगी वास्तुंचा समावेश होतो. सार्वजनिक वास्तूमध्ये राजप्रासाद, उद्याने, धर्मशाळा यांचा समावेश होतो. पैठण, तेर, अमरावती इत्यादी ठिकाणी अशा प्रकारच्या वास्तू निर्माण झाल्या होत्या. तत्कालीन अनेक लेखकांनी या वास्तूबद्दल लिहिले आहे. गुणाढ्याने पैठणमधील वास्तुचे वर्णन केले आहे. अमरावती, नागार्जुनकोंडा, नासिक, ब्रह्मपुरी, पैठण, तेर येथील उत्खननातून अनेक खाजगी वास्तू प्रकाशात आल्या आहेत. शुद्रकाच्या मृच्छकटीकात श्रीमंत लोकांच्या वास्तूंचे वर्णन आढळते. त्याने वसंतवाडा आठ चौकी होता. अशाप्रकारचे वाडे काही एकर क्षेत्रफळावर उभारले जात असावेत असे वाटते.

**२. धार्मिक वास्तू** : कुशाण व सातवाहन काळात प्रामुख्याने बौद्ध धर्माचा प्रसार अतिव्यापक प्रमाणावर झाला. बौद्ध धर्माच्या प्रसारामुळे वास्तूकलाक्षेत्रात एका नव्या युगाचा आरंभ झाला. त्यामधून शेकडो विहार, अनेक चैत्य व स्तूप आकारास आले. धर्मप्रसाराच्या निमित्ताने बौद्ध भिक्षू वर्षाचे आठ महिने देशभर प्रवास करीत. पण वर्षा ऋतूत त्यांना फिरणे कठीण जात असे. प्रचलित नियमाप्रमाणे ते लोकवस्तीमध्ये किंवा नगरामध्ये थांबू शकत नसत. वर्षा ऋतूत त्यांना स्वस्थपणे एका जागी निवास करता यावा म्हणून विहारांची निर्मिती करण्यात आली. या प्रेरणेतून सह्याद्रीच्या कुशीत शेकडो विहार निर्माण झाले. लौकिक अर्थाने त्यांना लेण्या म्हटले जाते. अनेक लेण्यामध्ये दानलेख सापडतात. नंतरच्या काळात भिक्षूंना पूजाअर्चा व्यवस्थित करता यावी म्हणून विहारातच लहानसे प्रतिकात्मक स्तूप कोरले जाऊ लागले. अशा प्रकारच्या स्तूपमुक्त विहारास चैत्य म्हटले जाऊ लागले. अशा प्रकारे धार्मिक वास्तूंचे तीन गटात वर्गीकरण केले जाते. स्तूप, चैत्य व विहार. गौतम बुद्ध व प्रसिद्ध भिक्षूंच्या अवशेषावर जी स्मरणवास्तू उभारली जाते तिला स्तूप म्हटले जाते. आच्छादनयुक्त विहारातील स्तुपाला चैत्य म्हटले जाते. तर भिक्षूंच्या विहरणासाठी

जी वास्तू कोरली जाते तिला विहार म्हटले जाते. हे स्तूप हे चिरंतन आनंद देणारे श्रद्धास्थान असल्याने त्याच्या निर्मितीमध्ये कलात्मकतेचा उच्चांक आढळतो. तर चैत्य दगडात कोरलेले असल्याने कल्पनेच्या भरारीवर मर्यादा येतात. याउलट संन्यस्त जीवन जगणाऱ्या भिक्षूंना साध्यातील साधे निवासस्थान हवे म्हणून विहार कलात्मक पद्धतीचा अभाव दर्शविणारे दिसतात. कान्हेरी, जुन्नर, नाशिक, कार्ले, भाजे, पितळखोरा ही सर्व स्थळे व्यापारी मार्गावर असून ती विहारांच्या दृष्टीने प्रसिद्ध आहेत.

### स्तूप

स्तूप हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ लोकांची श्रद्धा असणारे स्मारक होय. गौतम बुद्धाच्या किंवा प्रसिद्ध भिक्षूंच्या अवशेषावर अशा प्रकारच्या वास्तू उभारण्यात येत असत. स्तूपांची निर्मिती ही मौर्यकालीन प्रेरणा असून सातवाहनकाळात तिचा फार मोठ्या प्रमाणात विकास झाल्याचे दिसते. अमरावती येथे उभारलेला स्तूप यांचे उत्तम उदाहरण होय.

स्थूलमानाने स्तूपाचे तीन प्रकार आहेत. (१) शारीरिक, (२) उद्देशिक, (३) पारिभौगिक. शारीरिक अवशेषावर उभारलेला शारीरिक स्तूप होय. उद्देशिक स्तूप म्हणजे बौद्ध प्रार्थना मंदिरे होत आणि पारिभौगिक स्तूप म्हणजे बुद्धाच्या किंवा श्रेष्ठ भिख्खूच्या प्रातिनिधीक अवशेषावर उभारलेला स्तूप होय. महाराष्ट्रात व संपूर्ण देशात या सर्व प्रकारचे स्तूप अस्तित्वात असल्याचे दिसते. सम्राट अशोकाने सांची येथे उभारलेल्या अतिभव्य स्तूपाच्या भोवती सातवाहन काळात कलाकुसरीची तोरणे बांधण्यात आली. ही तोरणे म्हणजे सातवाहनकालीन कलेचा उत्तम नमुना आहे. सातवाहनांनी स्तूपाची प्रेरणा मौर्यांच्याकडून घेतलेली असल्याने सुरुवातीच्या कला उत्तरेतील कलेशी जवळीक असणारी आहे. पण पुढे रोमन संपर्क वाढत गेल्यामुळे रोमन प्रभावाचे दर्शन घडविणारी आणि दक्षिणेची जवळीक असणारी कला साकार झाली.

बौद्ध धर्माचा आरंभ प्रथम विदर्भात झाला. भंडारा जिल्ह्यातील पौनी हे बौद्ध धर्म प्रसाराचे केंद्र होते. पौनी येथे दोन स्तूपाचे अवशेष सापडले आहेत. चांडकपूर स्तूप पौनीजवळ २ कि.मी. अंतरावर चांडकपूर टेकडीवरील उत्खननात सापडला आहे. त्याचा व्यास ४१.६० मीटर असून त्याची उंची ७.५० मीटर होती. स्थापत्य कलेच्या दृष्टीने हा स्तूप महत्त्वाचा आहे. चांडकपूर टेकडीच्या जवळच हरखेलालच्या टेकडीचे उत्खनन केले असता तेथेही एका स्तूपाचे अवशेष सापडले आहेत. नागरा येथे अलिकडे झालेल्या उत्खननातून आणखी एका स्तूपाचे अवशेष हाती आले आहेत. मराठवाड्यात धाराशिव जिल्ह्यातील तेर येथे थेरवादी भिक्खूचे पवित्र स्थान असून तेथे स्तूप बांधलेले आहेत.

### अमरावतीचा स्तूप

आंध्र प्रदेशातील अमरावती हे शहर मथुरा, तक्षशिला या शहराप्रमाणे प्राचीन शहर आहे. ते भारतातील कलेचे तिसरे महत्त्वाचे केंद्र आहे. अमरावतीचा स्तूप भारतातील वास्तूकलेचा अप्रतिम नमुना होता. या स्तूपाचा व्यास १६२ फूट, बाजूच्या कोरीव शिल्पाचे क्षेत्र सुमारे १७०० चौरस फूट असल्याचा तज्ज्ञांचा अंदाज आहे. या स्तूपाचे बांधकाम संगमरवरी दगडात केलेले होते. भारहूत व सांची येथील स्तूपापेक्षा हा स्तूप वेगळा ठरतो. अमरावतीच्या स्तूपावर रोमन

शिल्पकलेचा प्रभाव आहे. अमरावती व नागार्जुनकोंडा येथील स्तूप बौद्ध वास्तूकलेचे व शिल्पकलेचे अखेरचे नमुने होत. या स्तूपावरून सातवाहनकालीन बौद्ध धर्माचे व्यापकत्व स्पष्ट होते. सातवाहन कालीन वास्तूकला व शिल्पकला अत्यंत उच्च प्रतीची होती हे या स्तूपावरून स्पष्ट होते.

**कनिष्कचे स्तूप व विहार**

कनिष्कने गांधार कलेला आश्रय दिला होता. त्याने आपल्या साम्राज्यात अनेक स्तूप व विहार बांधले होते. तक्षशिलेजवळ सिरमक व कश्मिरमध्ये कनिष्कपूर ही नगरे त्याने वसविली होती. कनिष्कपूर-पुरुषपूर म्हणून प्रसिद्ध होते. पुरुषपूर येथे १३ मजली एक लाकडी इमारत बांधली होती. कनिष्कच्या साम्राज्यात शिल्पकलेचे उत्तम नमुने आढळतात. त्याने पुरुषपूर म्हणजे पेशावर येथे चैत्यमूर्ती तयार केली होती. ती मूर्ती पाहून अनेक परकीय प्रवासी आश्चर्यचकीत होत असत. त्याने कलेला मोठा आश्रय दिला होता.

**चैत्यगृहे व लेणी**

चैत्यगृहे ही स्तूपयुक्त प्रार्थना मंदिरे होत. चैत्याचा आकार दंडगोलाकृती असून त्याच्या मागील अर्धवर्तुळाकार जागेत स्तूपाची दगडावरील प्रतिकृती कोरलेली असते. या गुंफा सम्राट अशोकाने प्रथम कोरल्या. या गुंफापासून चैत्य व विहार किंवा शौलगृहाच्या कलेच्या विकासाचा आरंभ होतो. लेणी किंवा विहार परिसरातील गुंफा तीन प्रकारच्या आहेत. एक आयताकृती गुंफा, अर्धगोलाकार गुंफा आणि तिसरी वरील दोहोंचे एकत्रीकरण. चैत्याच्या छताचा आकार गजपृष्ठाकार पद्धतीचा, तर विहाराच्या छताच्या आकार आयताकृती असतो. हा या वास्तूंमधील महत्त्वाचा फरक होय. सातवाहनांच्या काळात महाराष्ट्राच्या सह्याद्री पठारात लहानमोठी ९१२ लेणी आकारास आली. नासिक, जुन्नर, पैठण, ठाणे, कल्याण, कऱ्हाड तसेच व्यापारी महामार्गावर महत्त्वाच्या थांब्याला लागून शैलगृहे निर्माण झाली असावी असे वाटते. भाजे येथील लेणे सर्वांत प्राचीन तर त्यालगत असणारे कार्ल्याचे लेणे सर्वांत नंतरचे आहे.

या सर्व वास्तू दगडात कोरलेल्या वास्तू आहेत. अकरणात्मक कोरीव काम म्हणून या वास्तू ओळखल्या जातात. विहार सामान्यतः भिक्षूंच्या विश्रांतीसाठी असल्याने त्यांचा आकार साधा, खोलीसारखा, आयताकृती दालनासारखा असतो. विहारात भिक्षुंना बसण्यासाठी आसने कोरलेली आहेत. चैत्य हे प्रार्थनामंदीर असल्याने तो अधिक देखणे करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. मुख्य चौकोनी प्रार्थना मंडप, बाजूला दोन पारखे आणि मागील बाजूस वर्तुळाकृती गाभारा असे आरंभीच्या चैत्याचे स्वरूप असते. पुढे त्यात बदल घडून आले. भाजे, कोंडाणे, पितळखोरे, अजिंठा, बेंडसे, नासिक, जुन्नर,कार्ले, कान्हेरी, महाड, कुडा इत्यादी ठिकाणी सातवाहन कालीन शैलगृहे (चैत्य व विहार) खोदलेली आहेत. भाजे येथे सर्वात जुन्या लेण्या आहेत. पितळखोरे येथील लेण्या उद्ध्वस्त झाल्या आहेत.

**अजिंठा लेणी**

भारतीय कलेचे सुवर्णपान म्हणून अजिंठा लेण्याचा गौरव केला जातो. येथील चित्रकलेने साऱ्या मानवजातीस आकर्षून घेतले आहे. येथील चित्रकला तर मोहमयी आहेच, शिवाय तिला शिल्प व वास्तूकलेची जोड लाभली आहे. काळाच्या उदरात अदृश्य असलेली ही लेणी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात योगायोगाने प्रकाशात आली.

सातवाहन काळात लेण्या क्र. ८, ९, १०, १२, १३, १५, खोदल्या गेल्या आहेत. या लेण्यांचा कालखंड इ.स.पूर्व २०० ते इ.स. १५० असा आहे. इतर २५ लेण्या उत्तर वाकाटक काळात खोदलेल्या आहेत. त्यांचा कालखंड इ.स. ४५० ते ५५० असा आहे. सातवाहन काळातील लेण्या हिनयान पंथीय तर दुसऱ्या लेण्या महायान पंथीय आहेत. महायान लेण्या कलात्मकदृष्ट्या सरस आहेत.

लेणी क्र. ८ व १० चैत्य आहेत तर उर्वरित विहार आहेत. क्र. १० चैत्य हे अजिंठा लेण्यातील केंद्रभागी आहे. लेणे क्र. १० हे अजिंठा मालिकेतील सर्वात प्राचीन चैत्यगृह आहे. याची लांबी २० मी. तर रुंदी १२.५ मीटर आहे. यांची उंची ११ मीटर आहे. यामध्ये एक कोरीव लेख व चित्रलेख आहे. क्र. ९ हे लेणे दुसरे चैत्य आहे. याला २३ स्तंभ आहेत. लांची १३.६ मीटर, रुंदी ६.५ मीटर तर उंची ७ मीटर असून ते चापाकार आहे. या लेण्यात चित्राचे एकावर एक असे दोन थर आहेत.

### शिल्पकला

तुलनात्मकदृष्ट्या सातवाहन काळात शिल्पकलेला मोठा वाव असावा असे वाटत नाही. कारण या काळात बहुतांश लेण्या हीनयान बौद्ध पंथीय असल्याने बुद्धाचे शिल्प कोरण्यास प्रतिबंध होता. पुढे महायान काळात बुद्ध-शिल्पांच्या निर्मितीने शिल्पकलेचे एक नवे दालन उघडले गेले असे असले तरी तेर, पैठण, भोकरदन, ब्रह्मपुरी, कार्ले, नाशिक इ. ठिकाणची शिल्पे अत्यंत सुरेख आहेत. उत्तर सातवाहनकालीन शिल्प उत्कृष्ट शिल्प आहे पण त्यावर रोमन कलेचा प्रभाव दिसतो. यक्ष, स्तूप, स्तंप, गवाक्ष इत्यादी ठिकाणी यक्षाची शिल्पे मोठ्या प्रमाणात आहेत. सातवाहन कालीन शिल्पकलेच्या क्षेत्राची व्यापकता खूप मोठी आहे. बहुतेक शिल्पे श्रेष्ठ कलाभिरुचीचे दर्शन घडविणारी आहेत.

### चित्रकला

सातवाहनकालीन चित्रकलेचा विचार करताना आपणास अजिंठ्याच्या हीनयान लेण्यातील चित्रकलेचा विचार करावा लागतो. येथे हिनयान काळात सहा गुंफा खोदण्यात आल्या. येथील लेण्यापैकी क्र. ९ व १० सर्वांत प्राचीन आहेत. या उभय लेण्यात कधी काळी सर्वत्र चित्रे काढली होती. त्यापैकी फारच थोडी शिल्लक आहेत. त्यांना फ्रेस्को पद्धतीची चित्रकला म्हटले जाते.

क्रमांक ९ मधील लेण्यात भिंतीवर रंगाचे दोन थर दिसतात. पहिला थर जुना असून नंतर दुसरा दिलेला आहे. या लेण्यात एका खांबावर बौद्ध भिक्षूचे चित्र आहे. बोधीवृक्षाला वंदन करण्यासाठी राजा आपल्या परिवारासह जात आहे असे चित्र आहे. क्र. १० लेण्यात बौद्ध वाङ्मयाची षड्दंत जातक कथा चित्रीत केली आहे. सातवाहन काळात चित्रकला उच्च दर्जाची होती याची साक्ष अजिंठा येथील चित्रावरून येते. पितळखोरे, कार्ले लेण्यातूनही एकेकाळी भित्तीचित्रे होती. नेवासे, पैठण, नाशिक, जुन्नर, तेर, कोल्हापूर येथील उत्खननात सापडलेल्या नाण्यावर बैल, हत्ती, सिंह, स्वस्तिक, चैत्य इत्यादी प्रतिके आहेत. मातीची व शंखाची कर्णफुले, मातीचे व काचेचे मणी, दगडी साचे, लाख, हस्तिदंत यांचे विविध मणी, फासे, बैल, हत्ती इत्यादी लहान मुलांची खेळणी अत्यंत कलात्मक आहेत. या अल्पशा चित्रावरूनही सातवाहनकालीन कलाकारांनी दोन हजार वर्षांपूर्वी केलेली प्रगती केली होती हे समजू शकते.

प्रसंगाची निवड, रंगसंगती व विरोध, दृष्टीसादृश्य रेषा रेखाटन, भावसूचकता सारेच अप्रतिम, अजोड असल्याचे जाणवते.

**स्वयं अध्ययन प्रश्न-४**

**रिकाम्या जागा भरा.**

१. सातवाहन काळात ......... प्रकारच्या वास्तू निर्माण झाल्या.

२. शूद्रकाने .......... लोकांच्या वास्तूंचे वर्णन केले आहे.

३. कुशाण व सातवाहन काळात प्रामुख्याने ......... धर्माचा प्रसार अतिव्यापक प्रमाणावर झाला.

४. लौकीक अर्थाने स्तूप म्हणजे ............ होय.

६. महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रचार प्रथम .......... मध्ये झाला.

७. अमरावती स्तूपाचे बांधकाम ............. दगडात केले होते.

८. भारतात सर्वप्रथम स्तूप ........... याने कोरले.

९. सातवाहनांचे सर्वांत पहिले लेणे .......... हे होय.

१०. अजिंठा येथे सातवाहन कालीन .............. लेण्या कोरल्या आहेत.

## १.३ सारांश

सातवाहन व कुशाण कालखंड प्राचीन भारताच्या इतिहासातील सुवर्णयुग होते. एकछत्री साम्राज्याचा अभाव व परकीय आक्रमणे यामुळे देशाची होणारी दुर्दशा लक्षात घेऊनच राजसत्ता प्रबळ करण्याकडे ओढा होता. परकीय राज्यकल्पनांचीही त्यात भर पडून राजसत्ता निरंकुश ठेवण्याचा प्रयत्न होऊ लागला. त्यामुळे दक्षिण भारतात सातवाहनांचे बलाढ्य साम्राज्य अस्तित्वात आले. तसेच कुशाण घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली. कुशाण सम्राट कनिष्कने बलाढ्य साम्राज्य निर्माण करून बौद्ध धर्माचा भारताबाहेर प्रचार केला. तर दक्षिणेत सातवाहन घराण्यातील सातकर्णी पहिला, गौतमीपुत्र सातकर्णी, वसिष्ठीपुत्र पुलुमावि या राजांनी दक्षिणेत निरंकुश सत्ता प्रस्थापित केली. राजसत्तेने वर्णाश्रम धर्माचे पालन करवून घ्यावे, ब्राह्मणांच्या अनुशासनानेच राज्य करावे असे विचार सातवाहन कालखंडात सर्वमान्य झाले. तरीही सातवाहन राजानी बौद्ध धर्माच्या प्रचाराला हातभार लावल्यामुळे दक्षिण भारतात खऱ्या अर्थाने बौद्ध धर्माचा प्रचार झाला. सातवाहन राजे वैदिक धर्माचे अभिमानी होते तरीही त्यांनी बौद्ध धर्मियांना उदार हस्ते मदत केली त्यामुळे दक्षिण भारतात कलेच्या क्षेत्रात सुवर्णयुग अवतरले.

कुशाण व सातवाहन काळात व्यापार व उद्योगात मोठी प्रगती झाली होती. त्युामळे आर्थिक स्थिती भक्कम होऊन राजांनी कलेच्या क्षेत्राकडे लक्ष दिले होते. या कालखंडात परदेशांशी व्यापार वाढला होता. अनेक व्यापारी पेठा अस्तित्वात आल्या होत्या. अनेक व्यापारी महामार्ग बांधले गेले होते. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर अनेक बंदरे नावारूपास आली. विशेषतः युरोपशी भारताचा मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू झाल्यामुळे युरोपमधील अमाप

संपत्ती भारतात आली. कुशाण राजा कनिष्कने प्रथमच भारतात सोन्याचे नाणे पाडले होते. या काळात भारतात आर्थिक सुबत्ता निर्माण झाली होती. या आर्थिक सुबत्तेमुळे कला व स्थापत्य या क्षेत्रात मोठी क्रांती घडून आली. जगप्रसिद्ध लेण्या, स्तूप, चैत्य, चित्रकला भारतात अवतीर्ण झाली. साहित्याच्या क्षेत्रात या काळात मोठी प्रगती झाली. कुशाण सत्तेमुळे गांधार कलेचा प्रभाव प्रस्थापित झाला. अतिपूर्वेकडील देशांतील कलेला गांधार कलेने उजाळा दिला. या कालखंडात खऱ्या अर्थाने सर्व क्षेत्रात भारतीयीकरण झाले.

## १.४ पारिभाषिक शब्द - अर्थ

कुश-कुशाण - सरदार (क्षत्रप)

तक्षम - बलवान

पुरुषपूर - पेशावर

संघरक्ष - कनिष्कचा धर्मगुरू

शालिवाहन शक - सातवाहनांचा कालगणना

कनिष्कपूर - बारामुल्ला-श्रीनगर रस्त्यावरील कनिसपूर

सातवाहन - कूळनाम, घराण्याचे नाव

महारठी - एक किताब

दक्षिणापथपती - राजाने घेतलेली पदवी

गाहा सत्तसई - गाथा सप्तशती

अश्मक - पैठणचा परिसर

कुकूर - काठेवाड

त्रिसमुद्रतोयपतिवाहन - ज्याचे घोडे तीनही समुद्राचे पाणी प्याले आहेत

कर्षापण - चांदीचे नाणे

सुवर्णकार - सोनार

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**उत्तरे : (अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) हालिक (२) प्राकृत (३) राजपंडीत (४) पैठण (५) रोम व पूर्वेकडील देश

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**उत्तरे : (अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) दक्षिणपतपती (२) नायनिका (३) मातृ (४) नहपान (५) गौतमी बलश्री (६) गौतमीपुत्र सातकर्णी (८) वसिष्ठपूत्र पुलुमावि (८) पुरुषपूर (९) कनिष्क (१०) कुंडलवन.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**उत्तरे : (अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) पांडवलेणी (२) गांवे (३) प्रतिष्ठान - उज्जैन (४) नाणे (५) हिप्पालिस (६) तांबे (७) कनिष्क (८) नहपान (९) श्रेणी (१०) वस्त्रोद्योग.

**स्वयं अध्ययन प्रश्न-४**

**उत्तरे : (अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) २ (२) श्रीमंत (३) बौद्ध (४) लेण्या (५) स्मारक (६) विदर्भ (७) संगमरवरी (८) अशोक (९) भाजे (१०) सहा.

**१.६ सरावासाठी स्वाध्याय**

**(अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. कुशाण राजा कनिष्कच्या कामगिरीचा आढावा घ्या.

२. गौतमीपुत्र सातकर्णीच्या कार्याचे मूल्यमापन करा.

३. सातवाहनांचे सांस्कृतिक योगदान स्पष्ट करा.

४. सातवाहनकाळातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आढावा घ्या.

५. पितळखोरा लेण्यातील शिल्पकलेची माहिती द्या.

**(ब) टीपा लिहा.**

१. गाथासप्तशती

२. कनिष्कचा धर्म

३. सातकर्णी पहिला

४. सातवाहनांची लेणी

५. अजिंठा लेणी

**१.७ अधिक माहितीसाठी संदर्भ ग्रंथ**


१. माटे म. श्री. - प्राचीन भारतीय कला.

२. सांकलिया ह. धी. - महाराष्ट्रातील पुरातत्व

३. देव प्रभाकर - प्राचीन भारतीय संस्कृती

४. डॉ. मोरवंचीकर रा. श्री. - प्राचीन भारत

५. भिडे गजानन - प्राचीन भारत

६. गायधनी र. ना. - प्राचीन भारतीय संस्कृतीचा इतिहास

७. डॉ. मोरवंचीकर रा. श्री. - सातवाहनकालीन महाराष्ट्र

८. गायधनी र. ना. - प्राचीन भारताचा इतिहास.

## घटक - २

# गुप्त आणि वाकाटक

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

   २.२.१ प्रमुख राजे आणि त्यांचे कार्य

   २.२.२ समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था

   २.२.३ साहित्य - विज्ञान आणि बृहतभारत संकल्पना

   २.२.४ धर्म, कला व स्थापत्य
   (शिल्पकला, अजिंठा लेणी-चित्रकला व मंदिरांची सुरुवात)

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

### २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला -

- गुप्त व वाकाटक या समकालीन सत्तांचा राजकीय इतिहास समजेल.
- गुप्त व वाकाटक घराण्यातील प्रमुख राजांचे कार्य समजेल.
- गुप्त व वाकाटक कालीन समाजव्यवस्थेची माहिती होईल.
- गुप्त व वाकाटक कालीन अर्थव्यवस्थेची माहिती होईल.
- गुप्त व वाकाटक धार्मिक परिस्थितीची माहिती होईल.

● गुप्त व वाकाटक कालीन बृहत भारताचा वैभवशाली कालखंड समजेल.

● गुप्त व वाकाटक कालीन शिल्पकला पाहता येईल.

● गुप्त व वाकाटक चित्रकला समजते.

● गुप्त व वाकाटक कालीन स्थापत्यकला समजते.

## १.१ प्रास्ताविक

प्राचीन भारताच्या इतिहासात समकालीन असलेल्या उत्तर भारतातील गुप्त व दक्षिण भारतातील वाकाटक सम्राटांनी आपल्या पराक्रमाच्या व बुद्धिमत्तेच्या जोरावर कार्यक्षम, प्रजाहितदक्ष व सामर्थ्यशाली साम्राज्ये प्रस्थापित केली. या साम्राज्याद्वारे दीर्घकालीन शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. परिणामी समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणला. सर्वसामान्य जनता, सुखी, समृद्ध व समाधानी झाली. शेती, व्यापार, उद्योगधंदे, चलन व्यवस्था, व्यापारी संघटना इ.च्या प्रगतीमुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली. साहित्य, विज्ञानक्षेत्र, स्थापत्यकला, चित्रकला, मंदिर उभारणी, वास्तकला, मूर्तिकला, संगीतकला, धातकाम या क्षेत्रातही गुप्त व वाकाटक सम्राटांनी भरीव कामगिरी करून आपल्या अतुलनीय कार्याचा या कालखंडावर एक ठसा उमटविला. सर्वच क्षेत्रात उच्चतम प्रगतीचा कळस गाठला. या काळात भारतीयांनी आपल्या सांस्कृतिक ठेवा भारताबाहेरील देशांनाही दिला. म्हणूनच हा कालखंड प्राचीन भारताचे सुवर्णयुग किंवा भारताचा वैभवशाली कालखंड मानला जातो.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ गुप्त व वाकाटककालीन प्रमुख राजे आणि त्यांचे कार्य

### (अ) गुप्त घराण्यातील प्रमुख राजे

**गुप्त कालखंड - इ.स. ३०० ते इ.स. ४७०**

गुप्त कालखंड हा प्राचीन भारतीय इतिहासातील वैभवाचा कालखंड मानला जातो. मौर्य कालखंडानंतरचे कार्यक्षम, प्रजाहितदक्ष, सामर्थ्यवान, सत्ताधीश म्हणजे गुप्तराजे होत. मौर्य साम्राज्याच्या विघटनानंतर निरनिराळ्या प्रदेशात स्वतंत्र बनलेल्या शुंग, कण्व, सातवाहन खारवेल तसेच परकीय आक्रमकापैकी ग्रीक, शक, कुशाण इ. ना भारतात विशाल साम्राज्याची निर्मिती करता आली नाही. त्यांच्यातील परस्पर संघर्षामुळे राजकीय जीवनात दीर्घकालीन अशांतता होती. राजकीय जीवनातील ही अशांतता दूर करून भारतात विशाल साम्राज्याची प्रस्थापना करण्याचे व या साम्राज्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे श्रेय गुप्त घराण्यातील सत्ताधिशांना दिले जाते.

### गुप्त घराण्याच्या इतिहासाची साधने

गुप्त काळापासून प्राचीन भारतीय इतिहास अधिक स्पष्ट समजतो. कारण तत्कालीन असंख्य ऐतिहासिक साधने उपलब्ध आहेत. पुराणग्रंथ, स्मृतीवाङ्मय, कालीदास, भास, भवभूती इत्यादी विद्वानांचे अभिजात संस्कृत

वाङ्मय, प्राकृत वाङ्मय, बौद्ध व जैन धर्मियांचे या वाङ्मय, राजाने स्वतः किंवा मांडलिकांनी अगर मंत्री किंवा भाट यांनी लिहिलेले आलेख, सुवर्ण, तांबे व चांदीची नाणी उपलब्ध आहेत. उत्तर भारतात आधुनिक काळात ठिकठिकाणी झालेल्या उत्खननात मिळालेले अवशेष, चिनी प्रवाशी फाहीयानचे प्रवासवर्णन यावरून काळातील सर्वांगीण माहिती मिळणे शक्य होते.

गुप्तांनी भारतात विशाल व भक्कम साम्राज्याची निर्मिती केली. इ.स ३ ऱ्या शतकाच्या अखेरीस या राज्याचा उदय झाला. श्रीगुप्त हा गुप्त घराण्याचा संस्थापक होय. त्याने पाच वर्षे राज्य केले. श्रीगुप्तानंतर महाराज घटोत्कच गुप्त सत्तेवर आला.

## (१) पहिला चंद्रगुप्त (इ.स. ३२० ते इ.स. ३३५)

महाराजा घटोत्कच गुप्तनंतर सत्तेवर आलेला गुप्त वंशातील पहिला कार्यक्षम व महत्त्वाकांक्षी सत्ताधीश म्हणजे पहिला चंद्रगुप्त होय. गुप्त घराण्याची प्रतिष्ठा वाढवून गुप्त राजाला महाराजाधिराजाचा दर्जा त्याने प्राप्त करून दिला. राजा, महाराज, महाराजाधिराज, एकराट या पदव्या प्राचीन भारतीय राजसत्तेचे स्वरूप, त्याची व्याप्ती दर्शविणारे पुरावे आहेत. चंद्रगुप्ताने अनेक राजांना आपल्या अधिपत्याखाली आणले होते. साम्राज्य विकासातला एक महत्त्वाचा टप्पा या काळात गाठला गेला हे चंद्रगुप्ताचे सर्वांत मोठे योगदान होय.

**१. साम्राज्यविस्तार** : पुराणातील उल्लेखावरून व नाण्यांच्या आधारे चंद्रगुप्ताचा राज्यविस्तार सांगता येतो. अयोध्या, प्रयाग, द. बिहारमधील मगध, वैशाली साम्राज्यात समाविष्ट असावे. अलाहाबाद शिलालेखात नेपाळ हे राज्य गुप्त साम्राज्याचे राज्य म्हणून उल्लेखलेले आहे.

**२. लिच्छवी घराण्याशी संबंध** : चंद्रगुप्ताने लिच्छवी राजकन्या कुमारदेवीशी विवाह करून मगध राज्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली. कौमुदी महोत्सव या नाटकातून व नाण्यातून या घटनेचे संदर्भ आढळतात. लिच्छवी राजसत्तेसारख्या बलवान आणि प्रभावी राजघराण्याशी सोयरसुतक प्रस्थापित झाल्यामुळे गुप्तांचीही प्रतिष्ठा वाढली म्हणूनच असे मानले जाते की चंद्रगुप्ताने आपल्या नाण्यांवरही अभिमानाने लिच्छवी राजकन्या कुमारदेवीचा उल्लेख केला आहे.

**३. गुप्तशक कालगणनेस सुरुवात** : पहिला चंद्रगुप्त हा शककर्ता होता. नवीन कालगणना आपल्या राज्यारोहणाच्या तारखेपासून (२६ फेब्रुवारी, ३२०) नवीन वर्षगणना सुरू केली. आपल्या व आपल्या पत्नीच्या नावे कुमारदेवी हिच्या नावाची नाणी पाडली. पण काही शतकेच ही कालगणना प्रचलित राहिली. चंद्रगुप्ताने इ.स. ३३५ पर्यंत राज्य केले.

**४. पहिल्या चंद्रगुप्ताचा अखेरचा काळ** : चंद्रगुप्ताच्या मृत्यूविषयी फारशी माहिती मिळत नाही. काही इतिहासकारांच्या मते त्याचा मृत्यू नैसर्गिक झाला असावा तर काहींच्या मते त्याने आपला पुत्र समुद्रगुप्ताला सिंहासनावर बसविले व वानप्रस्थाश्रम स्वीकारून अरण्यात गेला. त्याने सिंहासन कधी सोडले याबाबत माहिती उपलब्ध नाही.

## (२) समुद्रगुप्त (इ.स. ३३५ ते इ.स. ३८०)

चंद्रगुप्तानंतर समुद्रगुप्त सत्तेवर आला. विविध प्रकारची नाणी, संस्कृत, धार्मिक व लौकिक वाङ्मय, बौद्ध व जैन ग्रंथ, अलाहाबाद येथील स्तंभालेख इत्यादी साधनांच्या आधारे समुद्रगुप्तांच्या जीवन व कार्याची माहिती मिळते. प्राचीन भारतातील पराक्रमी राजा, कुशल संघटक व विद्वान राजा म्हणून त्याला सर्वश्रेष्ठ स्थान मिळाले. पहिल्या चंद्रगुप्ताच्या राज्यविस्ताराचे कार्य पुढे चालवून सामर्थ्याच्या मदतीने गुप्तांच्या सत्तेला उत्तर व दक्षिण भारतातील सर्वश्रेष्ठ विस्तारित सत्ता बनविण्याचे श्रेय समुद्रगुप्ताला दिले जाते.

**१. समुद्रगुप्ताचे राज्यविस्ताराचे कार्य** : युवराज असतानाच समुद्रगुप्ताने शस्त्रविद्या व इतर निरनिराळ्या विषयांमध्ये प्रावीण्य मिळविण्यास सुरुवात केली होती. राज्यकारभार ज्ञान, साहित्य, कला, संगीत इत्यादी विषयांची आवड होती. सत्तेवर येताच समुद्रगुप्ताने साम्राज्यविस्ताराचे धोरण आखले. आपले पराक्रम व लष्करी सामर्थ्याच्या जोरावर संपूर्ण भारतीय प्रदेशावर एकसंघ सत्ता निर्माण करण्याची इच्छा होती. त्यानुसार गुप्त साम्राज्य प्रचंड प्रदेशविस्तार करून संपूर्ण भारतीय प्रदेशावर गुप्तांचे वर्चस्व निर्माण करण्याची त्यांची अपेक्षा होती. त्याच्या नाण्यावर ''सर्वराजोच्छेता'' अशी पदवी कोरलेली आहे. त्यावेळची राजकीय परिस्थिती अवघड होती. सर्व उत्तर भारत छोट्या राज्यांमध्ये विभागला होता. परकीय आक्रमणाचा धोका संभवत होता. छोट्या राज्यांची राजकीय व्यवस्था एकाच प्रकारची नव्हती. कही राज्ये राजसत्ता तर काही राज्ये गणराज्ये होती. विंध्य प्रदेशात अनेक छोटी राज्ये होती. गुजरात व बंगाल विभागला होता. दक्षिणेत चेर, चोल, पांड्य, पल्लव यांची स्वतंत्र राज्ये होती व त्यांचा परस्परांत संघर्ष सुरू होता अशा परिस्थितीत समुद्रगुप्ताला आपले दिग्विजयाचे धोरण अंमलात आणणे सोपे नव्हते. यावर मार्ग काढून गुप्त साम्राज्याचा उत्तर व दक्षिण भारतात विस्तार करण्यासाठी पुढील काळात त्याने निरनिराळ्या मोहिमांची काढल्या. अलाहाबाद प्रयाग-प्रशस्तीमध्ये या मोहिमांच्या स्वरूपाची व त्या मोहिमांद्वारे जिंकलेल्या प्रदेशाची सविस्तर माहिती दिली आहे.

**(अ) आर्यावर्तातील मोहीम** : पाटलीपुत्राच्या आसपास अनेक लहान-लहान राज्ये होती. त्यांच्यात सदैव संघर्ष चाललेला असल्याने राजकीय जीवनात अशांतता होती. ही राज्ये गुप्तराज्यालाही विरोध करीत होती. रुद्रदेव, नागदेव, चंद्रवर्मा, गणपतीनाथ, नागसेन, नंदिन व अच्युत या राजांनी समुद्रगुप्ताविरुद्ध संघ केला होता. रुद्रदेव या राजाकडे याचे नेतृत्व होते. त्यामुळेच पाटलीपुत्रांच्या आसपासची ही राज्ये जिंकणे समुद्रगुप्ताला आवश्यक वाटल्याने त्याने पहिल्या लष्करी मोहिमेची आखणी केली. या मोहिमेत पश्चिम व पूर्वेकडील सरहद्दीवर असलेल्या सर्व राजांवर आक्रमण केले व त्यांना पराभूत करून तो प्रदेश आपल्या साम्राज्यात समाविष्ठ केला. या विजयामुळे समुद्रगुप्ताला राजधानीच्या आसपासच्या प्रदेशात दीर्घकालीन शांतता निर्माण करणे शक्य झाले. बुंदेलखंड, पश्चिम उत्तर प्रदेश, मध्य भारत या प्रदेशाचा समावेश त्यात होतो. यातील बहुतेक राजे नाग वंशीय होते म्हणून या उत्तर मोहिमेच्या विजयाप्रीत्यर्थ समुद्रगुप्ताने आपले राजचिन्ह म्हणून 'गरूड' या नाग-सर्पाला ठार मारून खाणाऱ्या पक्षाला स्वीकारले.

या विजयानंतर समुद्रगुप्ताने आपले लक्ष जबलपूर व छोटा नागपूर या भागात राज्य करणाऱ्या १८ राजांकडे वळविले. हे प्रदेश पर्वतराजींनी व घनदाट अरण्यांनी वेढलेला असल्यामुळे या राज्यांना 'अटविक राज्ये' असे नाव होते. या सर्व अटविक राजांना समुद्रगुप्ताने जिंकले. परंतु त्यांना आपल्या साम्राज्यात समाविष्ट न करता, मानसन्मानाने वागवून फक्त नाममात्र मांडलिकत्व स्वीकारण्यास लावले. समुद्रगुप्तला आपली दक्षिण मोहीम राबविण्यासाठी या राज्यांचा उपयोग होईल या धोरणाने त्यांना आपलेसे करून घेतले.

**(ब) दक्षिण भारतातील साम्राज्यविस्तार** : राजधानीच्या आसपासच्या प्रदेशात स्थैर्य निर्माण केल्यानंतर समुद्रगुप्ताने दक्षिण भारतात नर्मदा व गोदावरी नदीच्या प्रदेशात वाकाटक घराण्याची प्रबळ सत्ता होती. त्यामुळे या सत्तेशी संघर्ष न करता पूर्व किनाऱ्याने दक्षिण भारतात प्रवेश करण्याचे मुत्सद्देगिरीचे धोरण आखले. दक्षिण भारतात एकूण १४ राज्ये होती. त्या सर्वांचा पराभव समुद्रगुप्ताने केला पण हा विजय सोपा नव्हता. कारण या राजांनी कांचीच्या विष्णूगुपताच्या नेतृत्वाखाली समुद्रगुप्ताला शह देण्यासाठी एक संयुक्त संघ तयार केला. पण इतिहास संशोधक प्रा. घोष यांनी म्हटल्याप्रमाणे समुद्रगुप्ताने अलेक्झांडरप्रमाणे अतिशय कौशल्याने सेनेची रचना करून या संघाचा पराभव केला. पण ती राज्ये आपल्या साम्राज्यास न जोडता मोठ्या उदार मनाने अंतर्गत स्वायत्तता बहाल केली. दूरवरच्या प्रदेशात दळणवळणाच्या अडचणी व संपर्काचा अभाव यामुळे दक्षिणेतील जिंकलेल्या प्रदेशावर नियंत्रण ठेवणे शक्य नव्हते ही व्यावहारिक अडचण लक्षात घेऊन समुद्रगुप्ताने या राजाविषयी सलोख्याचे व मैत्रीचे संबंध ठेवले. त्यांनी आपले मांडलिकत्व स्वीकारावे एवढीच माफक अपेक्षा समुद्रगुप्ताने ठेवली होती. दक्षिणेतील मांडलिकत्व पत्करलेले कोसलचा महेंद्र, कोट्टूरचा स्वामिदत्त, एरंडपलाचा दामन, कांचीचा विष्णूगुप्त, वेगीचा हस्तिवर्मन, पिस्तापूरचा महेंद्र, पल्लवचा उग्रसेन, देवराष्ट्राचा कुबेर, कस्तलपूरचा धनंजय हे राजे होते. दक्षिण दिग्विजयाच्या पराक्रमाचे विश्लेषण करताना आर. सी. मुजूमदार म्हणतात, 'अलाहाबाद स्तंभालेखात संपूर्ण भारताचे साम्राज्य उभारण्याची समुद्रगुपची महत्त्वाकांक्षा होती. पण संपूर्ण भारत आपल्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आणण्याचे महाकठीण काम आहे हे जाणून त्याने तसा प्रयत्न केला नाही.'

दक्षिण भारतात मिळविलेल्या या विजयामुळे इतिहासकार व्हिसेंट स्मिथ यांनी त्याला 'भारतीय नेपोलियन' म्हटले आहे. दक्षिण भारतात कांचीपर्यंत मिळविलेल्या त्याच्या विजयामुळेच माळवा व सौराष्ट्राच्या प्रदेशातील शकांनी सरहद्दीच्या प्रदेशात राज्य करणाऱ्या कुशाणांनी व सिलोनच्या राजाने यावेळी समुद्रगुप्ताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. थोडक्यात, उत्तर भारतात विजय मिळविल्यानंतर दक्षिण भारतात कांचीपर्यंत गुप्तांचे साम्राज्य विस्तारित करण्यात यावेळ समुद्रगुप्ताला यश आलेले दिसते.

**(क) सीमेवरील राज्यांचा पराभव** : आपल्या साम्राज्याच्या सरहद्दीच्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था टिकविणे आवश्यक आहे. याची जाणीव असल्यानेच समुद्रगुप्ताने सीमेवरील राज्यांच्या विरोधात तिसरी मोहीम आखली पण दक्षिण भारतात मिळविलेल्या विजयामुळे या राजांनी मोहिमेच्या प्रारंभीच शरणागती स्वीकारली. त्यामध्ये पूर्व राजस्थानचे मालव, अजमेर, जयपूरचे अर्जुनायन, भरतपूरचे योर्धेय, सियालकोटचे मद्रक, झांशीचे अभीर, मध्यप्रांताचे परजून यांचा समावेश होतो. याशिवाय सनफनिक, काक, खरपरिक व इतर काही आदिवासी राजांनाही समुद्रगुप्ताचे श्रेष्ठत्व व सत्ता मान्य करून मांडलिकत्व पत्करले होते. उत्तरेतील काही प्रदेश वगळता त्याने बहुतेक

सर्व राजांकडून आपले वर्चस्व मान्य करवून ठरावीक रक्कम खंडणीच्या स्वरूपात घेऊन त्यांना स्वातंत्र्य बहाल केले होते. दवाक, कामरूप, नेपाळ व कर्तपूर येथील राजांनी गुप्ताचे मांडलिकत्व स्वीकारले. यामुळे उ. भारतात हिमालयापर्यंत गुप्तांनी नियंत्रण प्रस्थापित केले.

**(ड) पश्चिमेकडील गणराज्यांचा पराभव** : या काळात पश्चिम भारतात अनेक गणराज्ये अस्तिवात असून त्यांच्यात सदैव संघर्ष होत होता. त्यामुळेच परकीय आक्रमणांनी या संधीचा फायदा घेऊन भारतीय प्रदेशावर आक्रमण केले व वायव्य सरहद्द प्रांतात त्यांनी राजकीय वर्चस्व निर्माण केले. त्यामुळे समुद्रगुप्ताने आपली चौथी लष्करी मोहीम गणराज्यांविरुद्ध आखली. त्यांचा पराभव करून गणराज्याचा प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट करून घेतला. त्यांना अंतर्गत स्वातंत्र्य दिले.

**(इ) परकीय सत्तांशी संबंध** : वरील लष्करी मोहिमांतील समुद्रगुप्ताच्या असामान्य पराक्रमामुळे वायव्येच्या प्रदेशातील कुशाण व अवंतीचे क्षत्रप यांनी समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व स्वीकारले. दक्षिण कांचीपर्यंतचा प्रदेश जिंकताना समुद्रगुप्ताने दाखविलेल्या लष्करी कौशल्य व पराक्रमाची जाणीव झाल्याने सिलोनचा राजा व हिंदी महासागरातील काही बेटांवरील राजांनी समुद्रगुप्ताबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. सिलोनचा राजा मेघवर्ण याने सिलोनहून भारतात येणाऱ्या तीर्थयात्रेसाठी बौद्धगयेला येणाऱ्या यात्रेकरूंसाठी एक विहार व विश्रामगृहे बांधण्याची समुद्रगुप्ताकडे परवानगी मागितली व ही परवानगी समुद्रगुप्ताने दिल्याची माहिती मिळते. यावरून आपल्या पराक्रमाच्या प्रभावावर परकीय सत्तांना मैत्रीचे संबंध जोडण्यासाठी जाणीव करून देण्यात समुद्रगुप्त यशस्वी झाला असे दिसते.

**२. समुद्रगुप्ताचे साम्राज्य** : इ.स. चौथ्या शतकाच्या मध्यास समुद्रगुप्ताचे साम्राज्य देशातील सर्वात सुपीक व समृद्ध लोकजीवन असलेल्या प्रदेशात विस्तारले होते. पूर्वेस ब्रह्मपुत्रेपासून पश्चिमेस यमुना व चंबळ नदीपर्यंत व उत्तरेस हिमालयाच्या पायथ्यापासून दक्षिणेस कावेरी नदीपर्यंत गुप्त साम्राज्य पसरले होते. या मर्यादेच्या बाहेर आसाम व गंगेच्या मुखापर्यंत प्रदेश, हिमालयाच्या उतारावरील राज्ये, माळवा व राजपुतांना या भागातील राज्ये राजनिष्ठा दर्शविणाऱ्या तहांनी व मैत्रीसंबंधानी समुद्रगुप्ताच्या साम्राज्याशी जोडली गेली होती. दक्षिणेतील राज्यांना आपल्या सैनिकी सामर्थ्याने नमवून त्यांना मांडलिकत्व पत्करायला समुद्रगुप्ताने भाग पाडले. थोडक्यात सहा शतकापूर्वी अस्तित्वात अशोकाच्या साम्राज्याहून जास्त प्रदेश समुद्रगुप्ताच्या साम्राज्यात समाविष्ट होता. त्यामुळे परकीय सत्ताही समुद्रगुप्ताच्या नियंत्रणाखाली राहिल्या. काश्मिर, पश्चिम पंजाब, पश्चिम राजपुताना, सिंध व गुजरात वगळता पूर्ण उत्तर भारत, छत्तीसगड, ओरिसा, दक्षिणेत अपरांतपर्यंतची लांब पूर्व किनारपट्टीइतका मोठा समुद्रगुप्ताचा साम्राज्य विस्तार होता.

**३. समुद्रगुप्ताची बिरूदे** : समुद्रगुप्ताने आपल्या कर्तृत्वाला शोभतील अशी अनेक बिरूदे आणि पदव्या आपल्या नावाशी जोडून घेतल्या होत्या. 'अप्रतिरथ' (अद्वितीयरथी), 'अप्रनिवर्यावीर्य' (अद्वितीय पराक्रमी), 'किरातान्तपरशू' (मृत्यू देणारा परशूधारक), 'सर्वराज उच्छेता' (सर्व राजांना उखडून टाकणारा), 'व्याघ्रपराक्रम' (वाघाचे शौर्य असलेला) अशी काही बिरूदे त्याने नाण्यावर कोरली आहेत. या नाण्यांच्या दुसऱ्या बाजूस 'सिंहवाहिनी

दुर्गा' (दुर्गा किंवा पार्वती), 'विंध्यवाहिनी', 'हेमावती' (साम्राज्यविस्तार पर्वतापासून हिमावतापर्यंत) मकरवाहिनी अशीही अक्षरे कोरलेली असून ती अर्थपूर्ण आहेत.

**४. समुद्रगुप्ताची समाजव्यवस्था :** आपल्या असामान्य पराक्रमाने साम्राज्याची निर्मिती करणारा सत्ताधीश म्हणून समुद्रगुप्त जितका प्रसिद्ध आहे तितकाच भविष्यकाळाची जाणीव ठेवून साम्राज्याची व्यवस्था करणारा द्रष्टा राजा म्हणूनही समुद्रगुप्त प्रसिद्ध आहे. या काळात संपूर्ण साम्राज्याच्या कारभार पाटलीपुत्र या राजधानीच्या शहरातून केला जात होता. या काळात जलद दळणवळणाची कोणतीही साधने उपलब्ध नव्हती. त्यामुळेच एखाद्या प्रांतात उठाव किंवा बंड झाल्यास राजधानीच्या ठिकाणाहून सैन्य किंवा मदत पाठविणे अशक्य होते. याची जाणीव ठेवून समुद्रगुप्ताने विशाल साम्राज्याच्या निर्मितीइतकेच त्याने या साम्राज्याच्या व्यवस्थेकडे लक्ष दिले. त्याने मिळविलेल्या प्रदेशातबाबत ग्रहण, मोक्ष व अनुग्रह असे धोरण स्वीकारले. राजधानीच्या आसपास असलेल्या राजांना त्याने पराभूत केले. ही राज्ये नष्ट केली व तो प्रदेश आपल्या साम्राज्यात समाविष्ट करून प्रत्यक्ष शासनयंत्रणेच्या खाली आणला. आपल्या राजधानीच्या आसपासचा प्रदेश निष्कलंक करणे, हे त्याचे यामागील धोरण होते. त्याच्या पलीकडे असलेल्या राजांना समुद्रगुप्ताने पराभूत केले पण नष्ट केले नाही किंवा त्यांचा प्रदेश कायमस्वरूपी आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचाही आग्रह त्याने धरला नाही. काही राजांना आपल्या अंतर्गत कारभाराच्या बाबतीत स्वातंत्र्य दिले व त्यांना मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडले तर काही राजांबरोबर केवळ मित्रत्वाचे संबंध स्थापन केले. समुद्रगुप्ताने साम्राज्याच्या व्यवस्थेच्या दृष्टीने घेतलेल्या या विशेष काळजीमुळेच गुप्तांचे साम्राज्य दीर्घकाळ टिकणे शक्य झाले असे म्हटले जाते. साम्राज्य निर्मितीबरोबरच साम्राज्याची व्यवस्था करण्याचे समुद्रगुप्ताचे हे कार्य महत्त्वपूर्ण व अनन्यसाधारण मानले जाते.

**६. प्रशासन व्यवस्था :** समुद्रगुप्ताने आपल्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या प्रदेशाचा राज्यकारभार करण्यासाठी विविध प्रशासकीय अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे, कर वसुलीच व काही प्रमाणात न्यायदानाचे काम सोपविले. या अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणाही निर्माण करण्यात आली. ही प्रशासन यंत्रणाच या साम्राज्याचे दीर्घकाळ अस्तित्व टिकविण्यास उपयुक्त ठरली असे दिसते.

**७. समुद्रगुप्ताचे सांस्कृतिक कार्य :** समुद्रगुप्त हा वैदिक धर्मानुयायी होता. लष्करी मोहिमामध्ये विजय मिळाल्यानंतर त्याने अश्वमेध यज्ञ केल्याची माहिती मिळते. अनेक वर्षांपासून प्रचलित नसलेल्या यज्ञ परंपरेला त्याने प्रतिष्ठा मिळवून दिली. वैदिक धर्माला प्रतिष्ठा मिळवून दिली. समुद्रगुप्त युवराज असतानाच विविध विषय, कला, काव्य इत्यादी विषयात प्रावीण्य मिळविण्याचा प्रयत्न केलेला होता. तो प्रतिभावान कवी व संगिततज्ञ होता. त्याने रचलेली काव्ये उपलब्ध नसली तरी अलाहाबादच्या आलेखात त्याला 'कवींचा राजा' म्हटले आहे. एका नाण्यावर वीणावादनात तल्लीन झालेल्या समुद्रगुप्ताची प्रतिमा कोरलेली आहे. यावरून त्याच्या संगीताच्या आवडीची कल्पना येते. विविध विषयाच्या विद्वानांना व कलाकारांना त्याने राजाश्रय दिलेला होता. म्हणूनच या काळात साहित्याच्या क्षेत्रात प्रगती झाली. बौद्ध पंडित वसुबंधू व प्रयागप्रशस्ती लिहिणारा हरिसेन यासारख्या विद्वानांना त्याने राजाश्रय दिलेला होता. साम्राज्य निर्मितीबरोबरच राजकीय जीवनात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे समाजाचा आर्थिक

विकास घडवून आणणे. धार्मिक जीवनातील सहिष्णुता धोरणाचा स्वीकार व विद्वान व कराकारांना दिलेला राजाश्रय यामुळे त्या काळात समाजाचा सांस्कृतिक विकास झाला.

**समुद्रगुप्ताच्या कार्याचे मूल्यमापन**

भारताच्या संपूर्ण इतिहासात समुद्रगुप्ताचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याने प्रचंड साम्राज्य मिळविले आणि ते सुस्थितीत ठेवले. समुद्रगुप्त हा राजकारणी, मुत्सद्दी व उत्तम प्रशासक आणि सुबुद्ध राज्यकर्ता होता. जवळजवळ सर्वच युद्धे त्याने जिंकली पण पराभव झाला नाही किंवा त्याच्या साम्राज्यावर आक्रमण करण्यास कोणी धजावला नाही. विशाल साम्राज्य एकसंघ ठेवण्यासाठी त्याने काही राजांशी मैत्री केली. काहीशी तह केले. काहींना मांडलिकत्व करून त्यांच्याकडून भरघोस खंडणी वसूल केली. त्याची सैन्यरचना कुशल होती. हरिसेन म्हणतो त्याने शेकडो लढाया जिंकल्या.

थोडक्यात आपल्या सत्तेच्या विशाल व एकसंध साम्राज्याच्या स्थापनेबरोबरच विविध योजनांद्वारे समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे कार्य केले. समाजाचा या सांस्कृतिक प्रगतीमुळेच समुद्रगुप्ताच्या कारकिर्दीतच सुवर्णयुगाच्या निर्मितीला प्रारंभ झाला. प्राचीन भारतातील व गुप्त घराण्यातील एक सर्वश्रेष्ठ, पराक्रमी, कर्तृत्ववान, विद्वान व व्यासंगी सत्ताधीश म्हणून समुद्रगुप्त ओळखला जातो.

### (३) दुसरा चंद्रगुप्त (विक्रमादित्य) (इ.स. ३८० ते इ.स. ४१५)

समुद्रगुप्तानंतर त्याच्या अनेक मुलांपैकी ज्येष्ठ पुत्र रामगुप्त हा सत्तेवर आला. त्याच्या कारकिर्दीतील शकांच्या आक्रमणाशिवाय इतर कोणत्याही घटनेची किंवा त्याच्या कार्याची माहिती मिळत नाही. त्यानंतर दुसरा चंद्रगुप्त हा गुप्त घराण्यातील एक सामर्थ्यशाली, धाडसी किंवा उत्तम प्रशासक राजा झाला. समुद्रगुप्ताच्या काळातील सुवर्णयुगाची परंपरा चंद्रगुप्ताने कायम ठेवली. किंबहुना अधिकच वैभवशाली परंपरा निर्माण केली. लहानपणापासूनच पराक्रमी व धाडसी असलेल्या चंद्रगुप्ताने शकांविरुद्धच्या युद्धात आपल्या पराक्रमाची व मुत्सद्देगिरीची प्रजेला जाणीव करून दिली. रामगुप्ताच्या काळात अकार्यक्षम बनलेल्या केंद्रीय सत्तेचा फायदा घेऊन पाटलीपुत्राच्या आसपासच्या काही राजांनी बंड व उठाव करण्यास सुरुवात केली होती. माळवा, गुजरात व वायव्येकडच्या प्रदेशातील काही सत्ताधीशांनी आपली स्वतंत्र राज्ये निर्माण करण्याचे प्रयत्न चालविले होते. या बंडखोर राजांवर आक्रमण करून त्यांना आपल्या नियंत्रणाखाली आणणे हे दुसऱ्या चंद्रगुप्ताचे पहिले कर्तव्य ठरले.

महाराणी दत्तदेवीचा हा पुत्र विक्रमादित्य, नरेंद्रचंद्र, सिंहचंद्र, नरेंद्रसिंह, सिंहविक्रम या नांवानीही ओळखला जात होता. शिवाय त्याचा देवगुप्त, देवराज, देवश्री असा उल्लेख करण्यात आला. दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपले साम्राज्य पूर्व सीमेपर्यंत व्यवस्थित राखले. गुप्तकाळातील १८२१ सुवर्ण नाण्यापैकी दुसऱ्या चंद्रगुताची सुमारे ६८३ नाणी आहेत. यावरून दुसऱ्या चंद्रगुप्ताचा गुप्ता साम्राज्यावर खूपच प्रभाव होता असे दिसते. वाकाटकांशी सहकार्याचे संबंध ठेवण्याच्या दृष्टीने आपली कन्या प्रभावती गुप्ता हिचा विवाह वाकाटक राजा पहिला पृथ्वीसेन (इ.स. ३६० ते ३८५) यांचा वारस दुसरा रुद्रसेन याच्याशी करून दिला त्यामुळे पश्चिम भागातील शकांचा प्रदेश ताब्यात आणणे शक्य झाले.

### दुसऱ्या चंद्रगुप्ताचे कार्य

सत्तेवर येताच दुसऱ्या चंद्रगुप्ताने बंड किंवा उठाव करणाऱ्या राजांविरुद्ध प्रथम मोहिमा सुरू केल्या. या राजांना पराभूत करून आपल्या नियंत्रणाखाली आणले. या राजांनी किंवा मांडलिकांनी पुन्हा अशा प्रकारचे प्रयत्न करू नयेत यासाठी त्याने आपल्या प्रशासनयंत्रणेचा विस्तार केला. राजधानीच्या आसपासच्या प्रदेशात शांतता व स्थैर्य निर्माण केल्यानंतर साम्राज्यविस्ताराचे प्रयत्न त्याने सुरू केले.

**(अ) शकांविरुद्ध आक्रमण** : सत्तेवर येताच दुसऱ्या चंद्रगुप्ताने प्रथम शकांविरुद्ध मोहीम आखली. शक व गुप्त राजांतील हे युद्ध दीर्घकाळ चालले. अखेर या युद्धात शकांचा पराभव झाला. पराभूत झालेल्या शकांचे राज्य आपल्या साम्राज्यास जोडले. या युद्धाची माहिती गुप्तांच्या सांची येथील आलेखात मिळते. सुमारे तीनशे वर्षे परकीय सत्ताधीशांच्या ताब्यात असलेला प्रदेश परत मिळवून गुप्त साम्राज्यात समाविष्ट करण्याचे श्रेय दुसऱ्या चंद्रगुप्ताला दिले जाते. यामुळे पूर्व किनाऱ्यापासून पश्चिम किनाऱ्यापर्यंत प्रदेश गुप्त राजांच्या ताब्यात आला. याबरोबरच कल्याण, भडोच, सोपारा ही बंदरेही गुप्तांच्या ताब्यात आल्याने भारतीय व्यापाऱ्यांना पूर्वेकडील व पश्चिमेकडील देशांशी व्यापार करण्याची संधी मिळाली. त्यामुळेच परराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळून भारतात या व्यापाराच्या बदल्यात मोठ्या प्रमाणावर सोने येण्यास सुरुवात झाली. या व्यापारामुळेच उत्तर भारतातील उज्जैनी, तक्षशीला यासारख्या व्यापारी केंद्राचाही विकास झाला. या विजयामुळे दुसरा चंद्रगुप्त हा 'शकारी' या नावानेही ओळखला जातो. गुप्त साम्राज्याला लागून असलेली लहानलहान गणराज्ये आपापसात लढत होती. या गणराज्याविरुद्ध मोहीम आखली त्यांचा पराभव करून हा प्रदेश गुप्त साम्राज्यात समाविष्ट केला. या विजयामुळे त्याला 'गणारी' म्हणूनही ओळखले जाते.

**(क) पूर्व व दक्षिणेकडील साम्राज्यविस्तार** : रामगुप्ताच्या काळात पूर्वेकडील राजांनी स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यांनी संघटितपणे गुप्तांच्या सत्तेवर आक्रमण करण्याचे ठरविले. दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपल्या सुसज्ज सैन्यासह या राजांवर आक्रमण केले. यावेळी केलेल्या या युद्धात त्याने या राजांचा पराभव केला व तो प्रदेश आपल्या साम्राज्यात जोडला. दक्षिणेकडील राज्यांवर आपल्या पराक्रमाने व मुत्सद्देगिरीने राजकीय वर्चस्वाची पुर्नस्थापना केली.

**(ड) कुशाणांचा पराभव** : साम्राज्यात व साम्राज्याच्या सरहद्दीच्या प्रदेशात शांतता प्रस्थापित केल्यानंतर वायव्य सरहद्द प्रांतात सुमारे २५० ते ३०० वर्षे राज्य करणाऱ्या कुशाणविरुद्ध दुसऱ्या चंद्रगुप्ताने मोहीम आखली. मेहरोली येथील आलेखात दिलेल्या माहितीवरून दुसऱ्या चंद्रगुप्ताने या मोहीमेच्या काळात सिंध व सहा नद्यांच्या प्रदेश ओलांडून बाहलकींना पराभूत केले. हिंदुकूश पर्वत ओलांडून बाल्ख येथील राजाला पराभूत केले. पंजाब व सिंध प्रदेशावर गुप्तांचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

**(फ) नाग व वाकाटकांशी संबंध** : दुसऱ्या चंद्रगुप्ताने स्वतंत्रपणे राज्य करणाऱ्या राजाविरुद्ध प्रत्यक्ष युद्ध न करता वैवाहिक संबंध प्रस्थापित करून मुत्सद्देगिरीने त्यांना जिंकण्याचे धोरण स्वीकारले मध्य भारतात यावेळी नाग घराण्याची प्रबळ सत्ता होती. कुबेरनागा या कन्येशी दुसऱ्या चंद्रगुप्ताने विवाह करून मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित केले.

यातून त्यांना प्रभावतीगुप्ता ही मुलगी झाली. तिचा विवाह वाकाटक राजा दुसरा रुद्रसेन याच्याशी केला. पुढील काळात दुसरा रुद्रसेन यांच्या मृत्यूनंतर आपल्या लहान मुलाच्या नावाने प्रभावतीगुप्ताने राज्यकारभार केला. या काळात दुसऱ्या चंद्रगुप्ताचे अमात्य, अधिकारी व काही विद्वान वाकाटकाच्या दरबारात होते. त्यामुळेच या काळात गुप्तांचे वर्चस्व निर्माण झाले होते असे दिसते. युद्धाऐवजी वैवाहिक संबंधाद्वारे शत्रू राष्ट्राशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचे मुत्सद्देगिरीचे धोरण दुसऱ्या चंद्रगुप्ताने स्वीकारले. त्यामुळेच या काळात भारतात गुप्तांच्या सत्तेला विरोध करणारा कोणताही सत्ताधिश राहिला नाही. हे दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या कार्याचे वैशिष्ट्य होय.

**(ग) सांस्कृतिक कार्य** : दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या मोहिमा व त्यात मिळालेले विजय राजकीयदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या होत्या. यामुळे भारतीय एक संघता व एकात्मकता होण्यास गुप्ताचे साम्राज्य अत्यंत उपयोगी पडते. भारतीय संस्कृती परदेशातही रुजविण्यास उपयुक्त ठरली. दुसऱ्या चंद्रगुप्ताला विविध विषयाची आवड होती. त्यामुळेच त्याने निरनिराळ्या विषयातील विद्वानांना आपल्या दरबारी राजाश्रय दिला होता. धन्वंतरी, क्षपणक, अमरसिंह, शंकू, वेताळभट्ट, धरकपूर, कालिदास, वराहमिहीर, वारूची या त्याच्या दरबारातील विद्वानांना 'नवरत्न दरबार' म्हणून ओळखले जात होते. या विद्वानांना दिलेल्या राजाश्रयामुळेच या काळात अभिजात संस्कृत साहित्याची निर्मिती झाली असे दिसून येते. बौद्ध व जैन विद्वानांना व कलाकारांना या काळात दुसऱ्या चंद्रगुप्ताने राजाश्रय दिला होता. त्यामुळे वास्तुकला, मूर्तिकला, शिल्पकला इत्यादी प्रगतीलाही गती मिळाली. समाजाचा सर्वांगीण विकास होऊन व्यापार व उद्योगधंद्यांना चालना मिळाली. साहित्य व कला या क्षेत्रात बरीच प्रगती घडून आली. म्हणून हा कालखंड सुवर्णयुगाचा कालखंड किंवा वैभवाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. विस्तारित साम्राज्य व समाजाचा सर्वांगीण प्रगतीच्या सुवर्णयुगाच्या निर्मितीचे श्रेय दुसऱ्या चंद्रगुप्ताला दिले जाते.

### (४) कुमारगुप्त महेंद्रादित्य (इ.स. ४१५ ते इ.स. ४५५)

दुसऱ्या चंद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र कुमारगुप्त गादीवर आला. त्याच्या राज्यारोहणासाठी त्याचा कनिष्ठ बंधू गोविंदपूत्र विरोध करू लागला पण त्याला माळव्याकडे पाठवून आपल्या मार्गातील अडचण दूर केली. कुमारगुप्ताने ४९ वर्षांहून अधिक काळ समर्थपणे राज्यकारभार केला त्याच्या कारकिर्दीसंबंधीचे १३ शिलालेख उपलब्ध झाले आहेत. पण राज्यकारभाराविषयी फारशी माहिती मिळत नाही. त्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती त्याच्या सुमारे १३८५ चांदीच्या नाण्यातून मिळू शकते. ही नाणी सातारा जिल्ह्यात व आणखी १३ नाणी वऱ्हाडातील एलिचपूर येथे सापडली आहेत. यावरून दक्षिणेत त्याचा प्रभाव होता असे दिसते. आपले वडिलोपार्जित साम्राज्य व्यवस्थितपणे सांभाळले होते यात शंका नाही. त्याने साम्राज्यविस्तारासाठी केलेल्या लढ्यातील विजयाप्रीत्यर्थ अश्वमेध यज्ञही केला होता.

कुमारगुप्ताने दक्षिणेवर स्वारी केली. त्यावेळी हूणांनी उत्तरेत आकमण केल्यामुळे त्यास आपली दक्षिण मोहीम आवरती घ्यावी लागली. दरम्यान वृद्धत्वामुळे कुमारगुप्तांचे निधन झाले. कुमारगुप्त हा उत्तम प्रशासक होता. आपल्या प्रजेला त्याने संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न केला. शेजारच्या राजांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. प्रधानमंत्री, सेनापती, इतर मंत्री व अधिकारी त्याच्या प्रशासनात होते. त्यांचा सल्ला घेतला जात होता. 'उपरिक महाराज' हे प्रांतप्रमुखाचे

पद राजपरिवारातील किंवा निकटच्या मित्राकडे सोपविले. साम्राज्य अनेक प्रांतात व प्रांत अनेक जिल्ह्यात प्रशासन सोयीसाठी सोपविण्यात आले. प्रशासनातील सर्वात लहान घटक म्हणून 'ग्राम' होते. बंगाल, माळवा व सौराष्ट्र हे साम्राज्यातील महत्त्वाचे प्रांत होते. कुमारगुप्ताचे धार्मिक धोरण सहिष्णू होते. बौद्ध संघांनी बौद्ध प्रतिमा उभारण्यासाठी अनेक मंदीरे बांधली.

## (५) स्कंदगुप्त विक्रमादित्य (इ.स. ४५५ ते इ.स ४६७)

हुणांचे आक्रमण परतावून लावत असतानाच कुमारगुप्ताचा मृत्यू झाला या संधीचा फायदा घेऊन कुमारगुप्ताच्या ज्येष्ठ पुत्राने पुरुगुप्ताने गादी बळकावली. पुरूगुप्त हा ज्येष्ठ पुत्र असल्याने गादीचा कायदेशीर वारस होता पण स्कंदगुप्ताला हे आवडले नाही. म्हणून त्याच्याशी युद्ध करून पराभूत केले व सत्ता आपल्याकडे घेतली. हुणांवरील विजयामुळे स्कंदगुप्ताची प्रतिष्ठा वाढली होती व सैनिकांचाही त्यास पाठिंबा होता. त्यामुळे पुरुगुप्तास परतावून लावणे त्यास सहज शक्य झाले.

स्कंदगुप्ताने एकूण बारा वर्षे राज्य केले. पण त्यास त्या काळात अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागले. अंतर्गत व हुणांशी संघर्ष करण्यात त्याची जास्त शक्ती खर्च झाली. हुणांनी भारतावर आक्रमण करून कंबोजवर ताबा मिळविला. त्यानंतर गुप्त साम्राज्याच्या गांधार देशावर आक्रमण केले. हुणांचे हे राक्षसी आक्रमण स्कंदगुप्ताने यशस्वीपणे परतावून लावले.

**स्कंदगुप्ताचे कार्य**

**१. हुणांचा पराभव** : स्कंदगुप्ताच्या कारकिर्दीत अतिशय महत्त्वपूर्ण घटना म्हणजे हुणांचे आक्रमण होय. युरोप व आशिया खंडातील सत्ताधीश व प्रजेला हुणांनी त्रस्त केले होते. राक्षसी महत्त्वाकांक्षा व पाशवी अत्याचाराबद्दल हूण प्रसिद्ध होते. गुप्ताच्या राज्यावर त्यांनी हल्ला केला. तेव्हा स्कंदगुप्ताने त्यांना पराभूत करून भारताबाहेर हाकलले. गुप्तांच्या इतिहासातील ही एक महत्त्वपूर्ण घटना ठरली. आशिया व युरोपमध्ये स्कंदगुप्ताचे श्रेष्ठ कर्तृत्व सिद्ध झाले. या विजयाचे वर्णन करताना आलेखात म्हटले आहे की कंसाला ठार करून कृष्ण देवकीकडे कसा गेला तसाच स्कंदगुप्त हुणांचा पराभव करून साश्रूनयनांनी वाट पाहणाऱ्या आपल्या मातेकडे गेला. स्कंदगुप्ताच्या कारकीर्दीतील या महत्त्वपूर्ण विजयानंतर त्याने 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली. स्कंदगुप्ताची ही पदवी त्याच्या कर्तृत्वाची निदर्शक व यथार्थ होती.

**२. प्रशासन व्यवस्था** : गुप्ताच्या विशाल साम्राज्याच्या रक्षणासाठी स्कंदगुप्ताने प्रशासनयंत्रणाही कार्यक्षम असावी याकडे लक्ष दिले. भविष्यकाळाची जाणीव ठेवणाऱ्या राज्यकर्त्याप्रमाणे त्याने साम्राज्याच्या संरक्षणासाठी विशेष व्यवस्था केली. पश्चिम व वायव्येकडील सर्व प्रांतात त्याने गोप्त नावाच्या विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती करून प्रदेश संरक्षणाची जबाबदारी त्याच्यावर सोपविली. वायव्येकडून भविष्यकाळात होणाऱ्या संभाव्य आक्रमणाची जाणीव ठेवून विशेष काळजी घेणारा हा शेवटचाच सत्ताधीश होय.

**३. स्कंदगुप्ताची लोकोपयोगी कामे** : स्कंदगुप्ताने हुणाविरुद्ध केलेल्या आक्रमणाचा साम्राज्याच्या आर्थिक

स्थितीवर परिणाम झाला पण या अवस्थेतही त्याने लोकोपयोगी कार्याकडे लक्ष दिले. गिरनाथ येथील शिलालेखात त्याच्या लोकोपयोगी कार्याची माहिती दिली आहे. सुदर्शन नावाचा तलाव चंद्रगुप्त मौर्याच्या पुष्यगुप्त नावाच्या प्रांतिक अधिकाऱ्याने बांधला. अशोकचा राज्यपाल 'तुशास्प' याने या तलावातून कालवे काढले. उजैनिया महाक्षत्रप रुद्रदामन याने इ.स. १५०च्या सुमारास या तलावाची दुरूस्ती केली. स्कंदगुप्ताच्या काळात या तलावाचा अतिवृष्टीमुळे बांध फुटला. त्यामुळे आसपासचा प्रदेश वाहून जाण्याची भिती निर्माण झाली. तेव्हा स्कंदगुप्ताने तत्परतेने त्याची दुरूस्ती केली व लोकांच्या जीवनाचे व प्रदेशाचे रक्षण केले.

**४. स्कंदगुप्ताच्या कार्याचे मूल्यमापन :** गुप्त घराण्यातील शेवटचा कर्तृत्ववान व प्रजाहितदक्ष व कार्यक्षम राजा स्कंदगुप्त याचा मृत्यू इ.स. ४३७ मध्ये झाला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे दिवंगत झाला. आपल्या पराक्रमाने सत्ता मिळविण्यास स्कंदगुप्ताला यश मिळाले असले तरी त्याला सत्तेचा उपभोग शांततेने घेता आला नाही. धर्मसहिष्णु, प्रजाहितदक्ष, कार्यक्षम अशा गुप्तघराण्यातील शेवटचा राजा स्कंदगुप्त होता. पण त्याच्या कारकिर्दीनंतर गुप्त घराण्याचा हळूहळू प्रभाव कमी होत गेला. इ.स. ५४४ मध्ये गुप्त साम्राज्य संपुष्टात आले.

## (ब) वाकाटक घराण्यातील प्रमुख राजे (इ.स. २५० ते इ.स. ५५०)

दक्षिण भारताच्या इतिहासात सातवाहनानंतर दुसरी प्रभावशाली सत्ता म्हणजे वाकाटकांची सत्ता होय. दक्षिण भारतात आपली स्वतंत्र सत्ता स्थापन करून उत्तर भारतातही या सत्तेचा प्रभाव निर्माण करण्याचे काम सातवाहनांनी केले. पण इ.स. २५० च्या सुमारास सातवाहन घराणे नष्ट झाले. आभीर, शक, इस्वाकू इत्यादी राजांनी आपली सत्ता निर्माण केली. सातवाहनानंतर आलेल्या वेगवेगळ्या घराण्याचे उल्लेख पुराणात आढळतात. पण वाकाटकांचा उल्लेख आढळत नाही. गुप्तांच्या समकालीन असलेल्या व विदर्भाच्या प्रदेशावर सुमारे तीनशे वर्षे राज्य करणाऱ्या प्रबळ अशा वाकाटक सत्तेविषयी इ.स. १८३६ पर्यंत काहीही माहिती मिळत नव्हती. सन १८३६ मध्ये शिवनी येथे द्वितीय प्रवरसेन याचा एक ताम्रपट मिळाला व त्याआधारे या घराण्याच्या इतिहासावर प्रकाश टाकणे शक्य झाले. वाकाटक घराण्याची व त्याकाळातील समाजजीवनाची माहिती मोठ्या प्रमाणावर प्रकाशत आणण्याचे श्रेय महामहोपाध्याय डॉ. बा. वि. मिराशी यांना दिले जाते.

१६ व्या शतकाच्या उत्तरार्धात उपलब्ध झालेल्या विविध साधनांवरून वाकाटकाची माहिती मिळविता येते. अजिंठ्याच्या लेण्यातील काही शिलालेख, पुराणग्रंथ, दुसरा विंध्यशक्ती या वाकाटक राजाचा वाशिम ताम्रपट व प्रभावी गुप्ता हिचा पुणे येथील ताम्रपट, अमरावती व इतरत्र मिळालेले शिलालेख, उत्खननात मिळालेले स्थापत्य व शिल्पकलेचे अवशेष, नागपूरजवळ रामटेक व पवनार येथे महत्त्वपूर्ण मूर्तीचे अवशेष. नांदेड जिल्ह्यातील पेणगंगेच्या काठावर शिदुरची लेणी या विविध साधनावरून वाकाटकांचे सत्ताधीश, त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या घटना व त्या काळातील समाज जीवन यावर प्रकाश टाकणे शक्य होते. महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी यांनी विदर्भ व मराठवाडा परिसरात वाकाटकाचे अस्तित्व दाखवणारे अनेक अवशेष शोधून काढले व डॉ. जयस्वाल यांचे मत खोडून काढले. दक्षिण भारतात स्वतंत्र सत्तेची प्रस्थापना करणाऱ्या वाकाटकाचे मूळ स्थान विदर्भातील रामटेकजवळ असलेले नंदीवर्धन हेच असल्याचे त्यांनी सिद्ध केले. वाशिम येथे उपलब्ध झालेल्या ताम्रपटावरून वाकाटकांच्या

'वत्सगुल्म' शाखेचा इतिहासही प्रकाशात आला. महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील वाशिम ही वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची राजधानी होती हेही सर्वमान्य झाले आहे. तरीही वाकाटकांच्या सर्वांगीण इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी अजूनही साधनाची अपूर्णता आहे.

## १. पहिला विंध्यशक्ती (इ.स. २५० ते इ.स. २७०)

गुप्ताच्या समकालीन असलेल्या वाकाटक घराण्याचा संस्थापक पहिला विंध्यशक्ती होय. इ.स. २५० च्या सुमारास त्याने या स्वतंत्र सत्तेची स्थापना केली. अजिंठा येथील शिलालेखावरून विंध्यशती हा ब्राह्मण विष्णूगुप्त शाखेचा होता असे समजते. श्री मिराशीच्या मते हे घराणे दक्षिणेकडे वेल्लूरजवळ राहणारे असावे व विदर्भाचा बराच मोठा प्रदेश त्यांनी जिंकलेला असावा. हरितीपूत्र विंध्यशक्ती असा या संस्थापकाचा उल्लेख आढळतो. काही शिलालेखात विंध्यशक्ती वंशकेतू म्हणून त्याचा उल्लेख आहे. पुराणग्रंथात व अजिंठ्याच्या शिलालेखात त्याचे नाव प्रथम आढळते. वंशकेतू म्हणजे पहिला नृपती होय. त्याच्या दोन राजधानीचे उल्लेख मिळतात. एक राजधानी 'पुरिया' या नगरीत तर 'चनका' ही दूसरी राजधानी होय. पण अद्यापही या दोन शहरांची निश्‍चित माहिती मिळालेली नाही. विंध्यशक्तीने विविध लढायाद्वारे आपल्या सत्तेचा विस्तार केला. आलेखात तो औदार्य व शौर्यात अतुलनीय असून इंद्रासारख्या श्रेष्ठ व विष्णूसारखा प्रबळ होता असे वर्णन आढळते. विदर्भाच्या प्रदेशात वाकाटकाची स्वतंत्र सत्ता प्रस्थापित करण्याचे कार्य याने केले असे मानतात.

## २. प्रवरसेन पहिला (इ.स. २७० ते इ.स. ३३०)

हा वाकाटक वंशातील सर्वात प्रबळ राजा होता असे मानले जाते. त्याने उत्तरेत पूरिका नगरी जिंकून येथे आपली राजधानी केली. पुराणात त्याने ६० वर्षे राज्य केल्याची माहिती दिली आहे. सत्तेवर येताच आपला पराक्रम व सैन्यसामर्थ्याद्वारे त्याने साम्राज्यविस्ताराला सुरुवात केली. उत्तरेस नर्मदा नदीपर्यंत स्वाऱ्या करून त्याने पुरिका शहर आपल्या ताब्यात घेतले व तेथेच आपली राजधानी निश्‍चित केली. दक्षिणेत उत्तर कुंतलातील कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पूर्वेस दक्षिण कोसल, कलिंग, आंध्र हे भाग आपल्या वर्चस्वाखाली आणले.

प्रवरसेन हा वैदिक धर्माचा अनुयायी होता. एकूण सात यज्ञ केल्याची माहिती मिळते. अग्निहोम, अत्यग्निस्टोम, उवथ, षोडशी, वाजपेय, अतिराज व आष्टोर्याम हे सात यज्ञ होत. घटोत्कच लेण्यातील शिलालेखात त्याने केलेल्या अश्‍वमेध यज्ञाचा स्पष्ट उल्लेख आहे. या अश्‍वमेध यज्ञामुळे अनेक सत्ताधिशांनी त्याचे मांडलिकत्व स्वीकारले असावे वाजपेय यज्ञाच्या शेवटी त्याने मोठ्या प्रमाणावर दानधर्म करून 'सम्राट' ही पदवी धारण केली. त्याने स्वतःला 'धर्ममहाराज' असेही म्हटले होते. पूरिका राजधानीच्या परिसरात असलेल्या नागराजांना त्याने पराभूत केले व या राजधानीच्या शहरातून साम्राज्याचा कारभार करण्यास त्याने राजधानीच्या शहरातून साम्राज्याचा कारभार करण्यास त्याने सुरुवात केली. तत्कालीन भारतातील धाराशिव सत्तेशी त्याने वैवाहिक संबंध जोडले. आपला युवराज गौतमीपुत्रचा विवाह त्याने धाराशिव राजा भवनाग याच्या कन्येशी केला. या वैवाहिक संबंधामुळे वाकाटक सत्तेला राजनैतिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. प्रवरसेनाच्या दरबारी देव नावाचा अत्यंत विद्वान व कर्तबगार मंत्री होता. घटोत्कच येथील लेण्यामध्ये त्याचा उल्लेख आढळतो.

### वाकाटक सत्तेचे विभाजन

पहिल्या प्रवरसेनानंतर वाकाटक सत्तेच्या विघटनाला सुरुवात झाली. त्याला चार पुत्र असल्याची माहिती मिळते. गौतमीपुत्राचा विवाह धाराशिवच्या कन्येशी झाल्याची माहिती मिळते. पण त्यांची नाणी मिळत नाहीत किंवा त्याच्या राज्याभिषेकाचीही माहिती मिळत नाही. यावरून अल्पवयातच त्याचे निधन झाले असावे. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा रुद्रसेन पहिला हा सत्तेवर आला त्याने उत्तर विदर्भाचा प्रदेशावर पुरिका किंवा नंदिवर्धन येथून राज्य केले. प्रवरसेनाचा दुसरा मुलगा सर्वसेन याने दक्षिण विदर्भच्या प्रदेशावर वत्सगुल्म (वाशिम, जि. अकोला) येथून राज्य केले. ही माहिती अजिंठ्याच्या शिलालेखात मिळते.

### नंदीवर्धनशाखा

#### १. पहिला रुद्रसेन (इ.स. ३३० ते इ.स. ३५०)

पहिल्या प्रवरसेनच्या मृत्यूनंतर वाकाटक सत्तेचे विभाजन झाले. उत्तर विदर्भाच्या प्रदेशावर गौतमीपुत्राचा मुलगा पहिला रुद्रसेन याने आपले वर्चस्व स्थापन केले. इ.स. ३३० मध्ये तो सत्तेवर आला. हीच वाकाटकाची किंवा नंदीवर्धन शाखा म्हणून ओळखली जाते. हा गुप्त राजा समुद्रगुप्ताच्या समकालीन होता. अलाहाबादच्या आलेखात याचा उल्लेख आहे. रुद्रसेन नावाच्या राजाने समुद्रगुप्ताच्या विरोधी आठ राजांचा एक संघ केला होता अशी माहिती मिळते. समुद्रगुप्ताने या राज्यसंघाचा पराभव केला. त्यामुळे वाकाटकांच्या मध्य भारतातील प्रभाव कमी झाला असावा. 'भारशिव महाराज भवनाग दौहित्र' असा पहिल्या रुद्रसेनचा उल्लेख त्याच्या वंशजाच्या आलेखात आढळतो. यावरून भावशिव महाराजाचे त्याला साहाय्य झाले असावे. समुद्रगुप्तच्या दक्षिण भारतातील मोहिमेच्या वेळी महाकांतारचा व्याघ्रराज, कूळचा भंटराज व पिष्ठपूरचा महेंद्रगिरी या राजांनी रुद्रसेनचे वर्चस्व झुगारून समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व स्वीकारले. पहिल्या रुद्रसेनच्या कारकिर्दीत नंदीवर्धन शाखेची सत्ता नर्मदा नदी व विंध्य पर्वत याच्यातील प्रदेशापुरतीच मर्यादित राहिली असे दिसते. पण जरी सत्ता मर्यादित असली तरी त्याने आपले स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम टिकविले. प्रभावशाली गुप्त राजांचे मांडलिकत्व स्वीकारले नाही हे त्याच्या कारकीर्दीचे खास वैशिष्ट्य होय.

#### २. पहिला पृथ्वीसेन (इ.स. ३५० ते इ.स. ४००)

रुद्रसेनच्या मृत्यूनंतर पहिला पृथ्वीसेन सत्तेवर आला. तो गुप्तराजा दुसरा चंद्रगुप्त याचा समकालीन होता. चंद्रगुप्ताने शक क्षत्रपांवर आक्रमण केले. त्यावेळी गुप्तराजाला पहिल्या पृथ्वीसेनने मदत केली म्हणूनच चंद्रगुप्ताला भारतात सुमारे ३०० वर्षे असलेली परकीय सत्ता नष्ट करणे शक्य झाले. चंद्रगुप्ताने आपली कन्या प्रभावतीगुप्ता हिचा विवाह पहिला पृथ्वीसेनचा मुलगा रुद्रसेन याच्याशी केला. गुप्तराजांनी प्रस्थापित केलेल्या या वैवाहिक संबंधावरून या काळात वाकाटक सत्ता एक प्रबळ सत्ता म्हणून ओळखली जात होती. त्याने नंदीवर्धन ही राजधानी केली. ही राजधानी नागपूरपासून ४५ कि.मी. अंतरावर असलेल्या नागरधन येथे होती. येथे केलेल्या उत्खननात वाकाटककालीन अनेक अवशेष मिळाले आहेत.

#### ३. दुसरा रुद्रसेन - प्रभावती गुप्ता (इ.स. ४०० ते इ.स. ४०५)

पहिल्या पृथ्वीसेननंतर त्याचा मुलगा रुद्रसेन हा सत्तेवर आला पण अल्पकाळात त्याचा मृत्यू झाला. त्याच्या

मृत्यूमुळे त्याची पत्नी प्रभावती गुप्ता आपल्या अल्पवयीन मुलाच्या नावाने राज्यकारभार करत होती. तिच्या उपलब्ध असलेल्या ताम्रपटावरून ती स्वतः राज्यकारभार करीत होती असे मानता येते. वाकाटकाच्या एकूण शासनावर तिचा प्रभाव होता. गुप्त सत्ताधिशांचे मोठ्या प्रमाणावर साहाय्य झाल्याने आर्थिक व राजकीय जीवनात स्थैर्य प्रस्थापित करणे तिला शक्य झाले. या काळात गुप्ताचे निरनिराळे अधिकारी तिला मदत करत असत. गुप्ताच्या दरबारातील कवी कुलगुरू कालीदास या काळात दक्षिण भारतात आला होता. नागपूर परिसरातील रामटेक किंवा रामगिरी येथे त्याचे वास्तव्य होते. प्रभावती गुप्ताच्या मुलाना दिवाकरसेन व दामोदरसेन यांना कालीदासने शिक्षण दिले असावे. 'मेघदूत' या महाकाव्याची रचना कालीदासाने याच काळात केली. प्रभावती गुप्ता ही रामभक्त असून तिने कलाकारांना व विद्वानांना आश्रय दिला होता. रामटेक व पवनार येथील राममंदिरे हिच्या काळातच बांधली गेली. प्रभावती गुप्ताच्या काळात स्थापत्यकलेच्या विकासाला चालना मिळाली. नांदेड जिल्ह्यातील शिऊर येथील लेणी याच काळात कोरली असावीत. येथे रामाचे एक असामान्य शिल्प आहे. साम्राज्याचे रक्षण, राजकीय शांतता, आर्थिक स्थैर्य, कला व साहित्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रगती घडवून आणणारी एक कर्तबगार स्त्री राज्यकर्ती म्हणून प्रभावती गुप्ता ओळखली जाते. दिवाकरसेन अकाली मृत्यू पावल्यामुळे तिचा दुसरा मुलगा दामोदरसेन सत्तेवर आला.

### ४. दामोदरसेन (इ.स. ४२० ते इ.स. ४५०)

दामोदरसेनने राज्यारोहणप्रसंगी दुसरा प्रवरसेन असे आपल्या पूर्वजाचे नाव धारण केले. या राजाची माहिती देणारे चौदा ताम्रपट व काही शिलालेख मिळतात. ताम्रपटाच्या उपलब्धतेरून त्याच्या कर्तृत्वाची कल्पना येते. आपल्या सत्तेचे योग्यप्रकारे रक्षण करून त्यात वाढ करण्याचे काम दुसऱ्या प्रवरसेनने केले. त्याने नंदिवर्धनाच्या शेजारी प्रवरपूर हे नवे शहर वसविले व काही काळातच त्याने प्रवरपूर (पवनार) येथे आपली राजधानी वसविली.

दुसरा प्रवरसेन वैदिक धर्माचा अनुयायी व शिवोपासक होता. आपल्या वैष्णपंथीय मातेचा त्याच्या मनावर प्रभाव होता. या मातेच्या आग्रहास्तव त्याने श्रीरामाच्या चरित्रावर 'सेतूबंध' नावाचे काव्य महाराष्ट्री प्राकृतात लिहिले. त्याने काही गाथाही लिहिल्या. तो विद्वान व कलाकारांचा आश्रयदाता होता. समकालीन सत्ताधीश असलेल्या कुंतलाबरोबर त्याचे प्रारंभी मैत्रीचे व नंतर नातेसंबंध प्रस्थापित झाले. त्याने आपला मुलगा नरेंद्रसेन याचा विवाह कुंतल राजकन्या अजितमभट्टारिका हिच्याशी केला. या विवाहसंबंधामुळे वाकाटकाची राजकीय प्रतिष्ठा आणखीनच वाढली.

### ५. नरेंद्रसेन (इ.स. ४५० ते इ.स. ४७०)

दुसऱ्या प्रवरसेननंतर सत्तेवर आलेल्या नरेंद्रसेनने गुप्तराजांच्या अकार्यक्षमतेचा फायदा घेतला व उत्तरेत आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. माळव्याचा काही भाग त्याने जिंकला. कोसल व मालव येथील राजांनी त्याचे मांडलिकत्व स्वीकारले. नरेंद्र सेनच्या कारकिर्दीच्या शेवटी नलवंशीय राजा भवदत्त वर्मा याने वाकाटकाच्या प्रदेशावर आक्रमण केले. वाकाटकचा बराचसा प्रदेश त्याने जिंकून घेतला.

### ६. दुसरा पृथ्वीसेन (इ.स. ४७० ते इ.स. ४८०)

नलवंशीय राजा भवदत्त वर्मा याने वाकाटकाचा बराचसा प्रदेश जिंकून घेतल्यावर दुसऱ्या पृथ्वीसेनने आपली

राजधानी प्रवरापूरहून पद्मपूरहून (आमगावजवळ भंडारा) येथे हलविली व तेथून नलावर स्वारी करून त्याची राजधानी पुष्करी उद्ध्वस्त केली. त्याने उत्तरेस आपली सत्ता वाढवून चेदी देशापर्यंत वाढविली. पण वाकाटकांना ही सत्ता दीर्घकाळ टिकवता आली नाही. नलवंशीय राजा भवदत्त वर्मा याचा प्रभाव वाढत गेला. हरिसेन या शेवटच्या वाकाटक राजाच्या कारकिर्दीत नंदीवर्धन शाखेची सत्ता नष्ट झाली. कोणीही पराक्रम राजा सत्तेवर नसल्याने या नंदीवर्धन शाखाचे अस्तित्व नष्ट झाले व हा प्रदेश वत्सगुल्म शाखेच्या राजांनी ताब्यात घेतला. सातवाहनानंतर दक्षिण भारतात काही काळ स्वतंत्र व बलवान सत्ता निर्माण करण्याचे कार्य वाकाटकांच्या नंदीवर्धन शाखेने केले. या शाखेतील शूर, धाडसी राजांनी आपल्या सत्तेचा विस्तार केला. आर्थिक प्रगती, कला, साहित्य इत्यादींना त्यांनी चालना दिली. वैदिक धर्म व त्या धर्मातील पंथांना त्यांनी राजाश्रय दिला.

**वत्सगुल्म शाखा**

वाकाटकांच्या या वत्सगुल्म शाखेचे राज्य मराठवाडा व विदर्भ परिसरात विस्तारित होते. वत्सगुल्म ही त्यांची राजधानी म्हणजे आजच्या अकोला जिल्ह्यातील वाशिम होय. वाशिमच्या परिसरात व पेणगंगेच्या काठावरही आज अवशेष मिळतात. मराठवाड्यात निरनिराळ्या लेण्या या काळात कोरल्या गेल्या. विदर्भातील काही मंदिराचे बांधकामही या काळातच झाले. वाकाटकाची नाणी व ताम्रपट विदर्भ व मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर मिळतात. या विविध वाङ्मयीन व भौतिक साधनांवरून वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची माहिती मिळणे शक्य होते.

### १. सर्वसेन (इ.स. ३३० ते इ.स. ३८५)

इ.स. ३३० ते ३५० च्या सुमारास पहिला प्रवरसेनचा मुलगा सर्वसेन याने वाकाटकाच्या वत्सगुल्म या स्वतंत्र शाखेची स्थापना केली. यावेळी नंदीवर्धन शाखेवर सर्वसेनचा पुतण्या म्हणजेच पहिल्या प्रवरसेनचा नातू पहिला रुद्रसेन हा सत्ताधीश होता. दक्षिण विदर्भाच्या प्रदेशावर त्याने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. पर्वतापासून दक्षिणेस गोदावरी नदीपर्यंत त्याचे साम्राज्य पसरलेले होते. साम्राज्यविस्ताराच्या या कार्यात त्याला 'रवि' नावाच्या त्याच्या सचिवाने मोठ्या प्रमाणात मदत केली होती. सर्वसेनच्या कारकिर्दीत वत्सगुल्म किंवा वाशिम या शहराला विद्या व संस्कृती यांचे प्रमुख केंद्र म्हणून प्रसिद्धी मिळाली असे दिसते. सर्वसेन हा उत्तम कवी होता. त्याने 'हरिविजय' नावाचे काव्य महाराष्ट्री प्राकृतात रचले. याशिवाय त्याने काही प्राकृत गाथा रचल्याचीही माहिती मिळते. सर्वसेनने वैदिक धर्माला राजाश्रय दिलेला असून धर्ममहाराज ही उपाधी लावलेली होती.

### २. विंध्यसेन (इ.स. ३५५ ते इ.स. ४७०)

वाशिमच्या ताम्रपटात याचा दुसरा विंध्यशक्ती म्हणून उल्लेख आढळतो. याच्या कारकिर्दीत विदर्भ व मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांचा प्रदेश वत्सगुल्म शाखेत समाविष्ट झाला. आपल्या कारकिर्दीच्या ३७व्या वर्षी लिहिलेल्या ताम्रपटात वाकाटक राजाने नदी तटावरील आग्रहाराला एक गाव दान दिल्याची माहिती मिळते. नंदितट किंवा नंदितरू हा नांदेडचा पहिला उल्लेख या ताम्रपटात आढळतो. यावरून नांदेडपर्यंतचा प्रदेश त्याच्या साम्राज्यात समाविष्ट झालेला होता असे दिसते. हा नंदिवर्धन शाखेचा राजा पहिला पृथ्वीसेन याच्या समकालीन होता. कुंतल

देशाच्या राजाचा त्याने पराभव केल्याची माहिती मिळते. हा वैदिक धर्मानुयायी होता. त्याने 'धर्ममहाराज' अशी उपाधी धारण केली होती. वाकाटकाच्या वत्सगुल्म शाखेचा राज्यविस्तार याच्या कारकिर्दीतच झाला.

**३. हरिसेन (इ.स. ४७५ ते इ.स. ५००)**

अजिंठ्याच्या शिलालेखात त्याच्या पुसट नावाखेरीज इतर काही माहिती मिळत नाही. दुसरा प्रवरसेननंतर देवसेन राजा सत्तेवर आला. देवसेननंतर सत्तेवर आलेला हरिसेन हा वत्सगुल्म शाखेचा शेवटचा पराक्रमी व महत्त्वाकांक्षी राजा होय. त्याने अवंती (माळवा), कोसल (छत्तीसगड व त्यालगतचा प्रदेश), कलिंग (ओरिसा), आंध्र, लाट (गुजरात), पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंतचा प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणला. हरिसेनचा सचिव वराहदेव (हस्तिभोजचा मुलगा) हा बौद्ध धर्मीय असल्याने जगप्रसिद्ध अजिंठ्यातील १६व्या क्रमांकाचे लेणे यानेच खोदवून त्याला शिल्प चित्राकृतीने भूषविले. याशिवाय या काळात अजिंठ्यातील १, २, १७ व १८ क्रमांकांची लेणी कोरली गेली व त्याबराबेरच चित्रितही केल्या गेल्या. या लेण्याच्या स्वरूपात भारतीय कलाकारांनी शैलस्थापत्य व चित्रकला या क्षेत्रात असामान्य प्रगती केली असे मानता येते. अजिंठा लेण्यांना UNESCO (युनेस्कोने) जागतिक वारसा स्थळ म्हणून निश्चित केले. हरिसेनच्या कारकीर्दीत वाकाटक घराण्याची सत्ता व प्रतिष्ठा शिखरावर होती. त्याच्या काळात भारतातील कोणतीही अन्य सत्ता हरिसेनइतकी प्रभावशाली व विस्तृत नव्हती. इतिहासकार आळतेकर म्हणतात, 'हरिसेन समर्थ राज्यकर्ता, कुशल प्रशासक आणि ख्यातनाम सेनापती असावा.' हरिसेननंतर एक-दोन राजे झाले असावेत. पण त्यांचा उल्लेख सापडत नाही इ.स. ५५० च्या सुमारास महिष्पतीच्या कलचूरीनी वाकाटकांच्या विदर्भात आपले राज्य स्थापन केले. इ.स. ३ ऱ्या शतकापासून ते ६व्या शतकापर्यंत दक्षिणेत जी राजघराणी झाली त्यामध्ये वाकाटक हे सर्वश्रेष्ठ असून त्याच्या कामगिरीने दक्षिण भारताच्या संस्कृतीवर मोठा परिणाम झाला आहे. वाकाटक राजे कला व साहित्याचे दिलदार आश्रयदाते होते. वत्सगुल्म शाखेचा वाकाटक राजा सर्वसेन याने 'हरिविजय' ही काव्यरचना केली आहे. वैदर्भीशाखेच्या वाकाटक गिलावचित्रे (Frescoes) वाकाटकाच्या काळात खोदली आहे याची इतिहासाने नोंद घेतली आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न-१**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............. च्या नाण्यावर सर्व राजोच्छेता अशी पदवी कोरली आहे.

(अ) श्रीगुप्त (ब) समुद्रगुप्त (क) पहिला चंद्रगुप्त (ड) स्कंदगुप्त.

२. ........... या राजाने नवी कालगणना सुरू केली.

(अ) श्रीगुप्त (ब) पहिला चंद्रगुप्त (क) समुद्रगुप्त (ड) दुसर चंद्रगुप्त.

३. प्रभावती गुप्ताचा ताम्रपट ........... येथे आहे.

(अ) अलाहाबाद (ब) पुणे (क) कोसल (ड) सांची.

४. वाकाटक घराण्याचा शेवटचा राजा ........... हा होय.

(अ) सर्वसेन (ब) देवसेन (क) विंध्यसेन (ड) हरिसेन

५. वाकाटकांचे राज्य दक्षिणेत ........... या प्रदेशावर होते.

(अ) कर्नाटक (ब) तामिळनाडू (क) केरळ (ड) विदर्भ व मराठवाडा

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. समुद्रगुप्ताने आपले राजचिन्ह म्हणून कोणत्या पक्षाला निवडले ?

२. शकांचा पराभव करणारा शकारी म्हणून कोणत्या राजाला ओळखले जाते ?

३. सर्वसेन या वाकाटक राजाने कोणते काव्य लिहिले ?

४. जगप्रसिद्ध अजिंठ्यातील १६व्या क्रमांकाचे लेणे कोणी खोदले ?

५. वाकाटक राजाच्या कोणत्या दोन शाखा निर्माण झाल्या ?

## २.२.२ समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था

### (अ) समाजव्यवस्था

गुप्त व वाकाटक काळात भारतात राजकीय जीवनात शांतता, सुव्यवस्था व आर्थिक स्थैर्य निर्माण झाले होते. साहजिकच सामाजिक जीवनातही स्थैर्य निर्माण झाले. या काळापर्यंत विविध परकीय जमाती स्वारीच्या निमित्ताने भारतात येऊन स्थायिक झाल्या होत्या. त्यांना भारतीय समाजात सामावून घेण्याची क्षमता निर्माण झालेली होती. या रानटी टोळ्यांनीही भारतीय भाषा, धर्म, पंथ इत्यादीचा स्वीकार केल्यामुळे धर्म प्रमुखांनीही सहानुभावाने व समंजसपणे त्यांना क्षत्रिय वर्णाचे स्थान देऊन भारतीय समाजजीवनात सामावून घेतल्याचे दिसते.

**१. वर्णव्यवस्था / जाती पद्धती** : वैदिक धर्माला समाजजीवनात महत्त्व मिळाले त्यामुळे चातुर्वर्ण्य पद्धतीला प्रतिष्ठा मिळाली होती. विविध यज्ञ, पूजा व आचारपद्धतीमुळे ब्राह्मण वर्णाला महत्त्व मिळण्यास सुरुवात झाली होती. अध्ययन, अध्यापन, यज्ञयाग इत्यादी ब्राह्मणाची कर्तव्ये होती तर प्रजेचे रक्षण व राज्यकारभाराची जबाबदारी क्षत्रियांची होती. शेती, पशुपालन, व्यापार इत्यादी वैश्याकडे जबाबदारी होती. शूद्रावर निरनिराळी बंधने होती. अस्पृश्यता मानली जात होती. शूद्रांनी स्वीकारलेले तथाकथित कमी प्रतीचे व्यवसाय वगळता अन्य व्यवसाय कोणत्याही इतर जातींच्या लोकांना करण्याचे स्वातंत्र्य होते.

**२. विवाह** : विवाहाला धार्मिक बंधन मानले जात असून विवाहाच्यावेळी आवश्यक त्या संस्काराचे योग्य प्रकारे पालन केले जात होते. बालविवाह, बहुपत्नी विवाह, विधवाविवाह, अनुलोम-प्रतिलोम विवाह होत असल्याचे उल्लेख मिळतात, दुसऱ्या चंद्रगुप्ताने बंधुची विधवा पत्नी ध्रुवदेवीशी विवाह केल्याची माहिती मिळते. प्रसंगी आंतरवर्णीय विवाहही होत असत. समाजमान्य असलेल्या विवाहातून होणाऱ्या औरस संततीला संपत्तीचे अधिकार मिळत असत.

**३. कुटुंबव्यवस्था :** संयुक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. पितृप्रधान संस्कृती असल्याने वडीलधाऱ्या पुरुषांना कुटुंबात मानाचे स्थान होते. कुटुंबप्रमुखाच्या आज्ञांचे विनातक्रार पालन होत असे. आज्ञाभंग करणाऱ्यास बहिष्कृत केले जाई. कुटुंबाची मालमत्ता-संपत्ती कुटुंबप्रमुखाच्या मालकीची होती व तो आपल्या इच्छेनुसार तिची विल्हेवाट लावू शकत असे.

**४. स्त्रियांचे स्थान :** स्त्रियांचे स्थान फारसे चांगले नव्हते. त्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. कुटुंबातील पिता, बंधू, पती, पुत्र यांच्या नियंत्रणात रहावे लागे. राजघराण्यातील स्त्रियांना शिक्षण घेता येत असे. उदा. प्रभावती गुप्ता हिने शिक्षण घेतल्यामुळे पती निधनानंतर दहा वर्षे मुलांच्या नावे राज्यकारभार केला होता. शाकुंतल, मालविकाग्नीमित्र, अमरकोश इत्यादी ग्रंथातील उल्लेखावरून स्त्रिया शिक्षण घेत असल्याची माहिती मिळते. विवाहोत्तर काळातही स्त्रियांना कौटुंबिक जीवनात मानाचे स्थान दिले जात होते. बालविवाह पद्धत रूढ होऊ लागली. विधवा विवाह संमत होता. सती पद्धत असली तरी ती फारशी रूढ झालेली नव्हती. वेश्या व्यवसाय व देवदासी प्रथा सर्वमान्य होती. विधवेला पुनर्विवाह करायचा नसल्यास तिला कठोर नियंत्रणाखाली रहावे लागत असे. स्त्रीने पतीनिष्ठ राहून नैतिकतेचे जीवन जगावे अशी अपेक्षा होती. मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती' तरीही 'यत्र नार्यस्तू पूज्यन्ते तत्र देवता' असे स्त्रीचे समाजात स्थान होते.

**५. आहार :** शाकाहार लोकप्रिय होता. कनिष्ठ लोक मांसाहार करीत. फाहायन या चिनी प्रवाशाने कांदासुद्धा न खाणारे शाकाहारी लोक होते असे लिहिले आहे. तांदूळ, डाळी, भाज्या, कडधान्ये, फळे, दूध हा शाकाहार सर्वमान्य होता. मद्यपान निषिद्ध होते. संस्कृत काव्य व नाटकातील वर्णनावरून सुखवस्तू कुटुंबातील स्त्री-पुरुष मद्यपान करीत. आहाराच्या बाबतीत बौद्ध, वैष्णव व जैन यांचा समाजजीवनावर प्रभाव पडला होता असे दिसते.

**६. वेशभूषा/केशभूषा :** शिल्पकला व साहित्य यांच्या मदतीने या काळातील वेशभूषेची माहिती मिळविता येते. स्त्री-पुरुष सुती, रेशमी व लोकरीचे कपडे वापरत. वस्त्रालंकाराच्या विविधतेवरून त्याची समृद्धता लक्षात येते. धोतर, उपरणे व पागोटे हा सर्वमान्य वेश पुरुषांचा होता. स्त्रिया साडी, परकर, चोळी, काचोळी, सर्रास वापरत. घोड्यावर बसताना किंवा शिकारीच्या वेळी पुरुष तुमान घालून गुडघ्यापर्यंत लांबीचा कोट घालीत. काही पुरुष उत्तरीय उपरणे वापरीत ही वस्त्रे निरनिराळ्या रंगाची कलाकुसरीची व क्वचित पारदर्शकही असत. स्त्रिया लांब केसांच्या विविध केशरचना करीत. पुरुषांनाही केस वाढविण्याची आवड होती.

**७. सौंदर्यप्रसाधने व अलंकार :** सौंदर्यप्रसाधने म्हणून अत्तरे, सुगंधी तेल, चंदनाचा लेप इत्यादीचा वापर केला जाई. याशिवाय गालांना व ओठांना रंग लावणे, नखे रंगीत करणे, डोळ्यात काजळ घालणे इत्यादी सौंदर्य सुशोभित करण्याचे प्रकार होते. स्त्रियांना अलंकाराची आवड असून विविध धातूंचे अलंकार बनविले जात. कर्णभूषण, बाहुभूषणे, विविध प्रकारच्या माळा, बांगड्या, अंगठ्या, पैंजणे इत्यादी प्रकार रूढ होते. बिंदीसारखा अलंकार स्त्रिया केसात घालीत त्याला ललाटिका म्हणत. ललाटिकेच्या पुढील बाजूस असलेल्या मोत्याचा झुपका कपाळावर रूळत असल्यास त्याला चटुलातिलक म्हणत. वक्षस्थळावर यज्ञोपवित्रासारखे लोंबकळणारे रत्नाचे, सोन्याचे अनेक पदरी अलंकार असत. त्याला रत्नवैकक्षक किंवा हेमवेक्षक म्हणत. हे निरनिराळे अलंकार अतिशय कलात्मकतेने केलेले दिसतात.

**८. करमणूक** : सोंगट्या, बुद्धिबळ, शिकार याद्वारे करमणूक करत. नृत्य, गायन, सारीपाट, वादन इत्यादी करमणूक साधने होती. बैलाची व कोंबड्याची झुंज हा प्रकार होता.

**९. निवासस्थाने** : श्रीमंत व राजपरिवारातील लोकांची घरे भव्य होती. उंच लाकडी खांबाच्या आधारावर ही घरे उभारली जात. घरातील दिवाणखाणे, भव्य चौकोनी किंवा गोल आकाराचे असत. राजवाड्यातील एका भागाहून दुसऱ्या भागात जाण्यासाठी व्हरांडा असे. सर्वसामान्य लोकांची घरे एकमजली किंवा दुमजली असत. गरीबांची घरे क्वचित गवताच्या छपराची असत. चित्रे काढून घराच्या भिंती रंगविल्या जाई.

## (ब) अर्थव्यवस्था

या काळात समाजाच्या आर्थिक प्रगतीचे प्रतिबिंब सामाजिक जीवनाच्या स्थैर्यात, विविध अलंकार व सौंदर्यप्रसाधनात दिसते. गुप्त काळ व वाकाटक काळात शेती, व्यापार व उद्योगधंदे इत्यादी प्रगतीमुळे आर्थिक विकासाची चालना मिळाली म्हणून या काळाला वैभवशाली कालखंड किंवा सुवर्णयुग म्हटले जाते. जमिन महसूल, प्रत्यक्ष कर, जकात कर, आयात-निर्यात कर, जंगले, मिठागर, खाणी, विविध कर शासनाची उत्पन्नाची साधने होती.

**१. शेती** : समाजातील मोठा वर्ग हा शेती व्यवसाय करत असे. या काळात जमिनीची मोजणी करून उत्पादनक्षमतेनुसार तिची प्रतवारी केली जात असे. शेती कसण्याचा पद्धतीच्या व अवजारांच्या उल्लेखावरून या काळात शास्त्रशुद्ध पद्धतीने शेती केली जात होती असे दिसते. शेतीतून मोठ्या प्रमाणावर पीक येण्यासाठी तलाव व कालव्याच्या आधारे पाणीपुरवठा केला जात होता. स्कंदगुप्ताने सुदर्शन नावाचा तलाव दुरूस्त केल्याचा उल्लख मिळतो. चरक व सुश्रृंत संहितेत बियाणांची निवड, धान्याची प्रतवारी इत्यादीची माहिती दिली आहे. या काळात शेतीतून तांदूळ, गहू, कापूस, निरनिराळी फळे व पालेभाज्या उत्पादन केल्या जात असत. पशुपालन हा ही व्यवसाय होता. शेतीकामासाठी गुलामांचाही वापर करत असल्याचा उल्लेख आढळतो. त्यांची खरेदी-विक्री होत होती अशी माहिती मिळते. शेतीतील मोठ्या प्रमाणावरील उत्पन्नामुळे समाज सुखी व समृद्ध बनला होता.

**२. व्यापार** : व्यापार हा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उपकारक घटक होता. साम्राज्यविस्तार, दीर्घकालीन शांतता व सुव्यवस्था, संरक्षणाची दक्षता, रस्ते, धर्मशाळा इत्यादींमुळे याकाळात अंतर्गत व्यापाराला चालना मिळाली. कोशांबी, उज्जयिनी, तक्षशिला, प्रतिष्ठान, नंदिवर्धन, प्रवरपूर, वत्सगुल्म या शहरांचा व्यापारी केंद्रे म्हणून विकास झाला. परदेशाशीही व्यापार चालत असे. मंगलोर, कल्याण, भडोच, जयगड, सलिदूत, ताम्रलिप्ती ही बंदरे प्रसिद्ध होती. तेथून चीन, जावा, सुमात्रा, चंपा, इराण, रोम देशाशी व्यापार चालत असे. चंदन, अत्तर, केशर, सौंदर्य प्रसाधने यांची निर्यात होई. तर रेशीम, घोडे, हस्तिदंत, नीलमणी इत्यादींची आयात होई. देशांतर्गतही मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत होता. व्यापार हा अतिशय फायद्याचा व समृद्धता वाढविणारा होता.

विविध वस्तूंना व्यापार करणाऱ्यांनी व्यावसायिक समस्यांची उकल करण्यासाठी श्रेणी व संघटनांची निर्मिती केली होती. या श्रेणीचे नियम सभासदांवर बंधनकारक असून या श्रेणी बँक म्हणूनही काम करीत असत. लोकांकडून विश्वासाने मिळालेल्या ठेवीतून व्यापाऱ्यांना आर्थिक सहकार्यही केले जात होते.

**३. उद्योग :** या काळात रेशमी व सुती कापड विणणे, अलंकार तयार करणे, अशुद्ध धातूपासून शुद्ध धातू बनविणे, जहाज बांधणे, घरातील उपयुक्ततेची भांडी व शेती अवजारे तयार करणे, हस्तकलेच्या वस्तू बनविणे इत्यादींना मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली होती. या विविध उद्योगांना शासनाच्या वतीने चालना देण्यात आली होती. उद्योगांच्याही स्वतंत्र श्रेणी असत. विविध उद्योगातील कामगारांचे कौशल्य टिकविणे, उद्योगाला साहाय्य करणे हे काम या श्रेणी करत. छोटे-छोटे व्यावसायिकही होते. परीट, सुतार, सोनार, लोहार, शिंपी, चर्मकार, कापड रंगविणारे, शिलाई करणारे व्यावसायिक होते.

**४. चलनव्यवस्था :** या काळात नाण्यांचा चलनव्यवस्थेसाठी सर्रास वापर करत. क्वचितप्रसंगी वस्तूविनिमय पद्धत होती. सोने, चांदी, तांबे या धातूंच्या नाण्याचा वापर केला जाई. गुप्तराजांनी सुवर्णनाण्याची चलनात जास्तीत जास्त वापर केला. शुद्ध सोन्याची नाणी अतिशय प्रगत होती. समुद्रगुप्ताची नाणी सुमारे ११८ ते १२२ ग्रॅम वजनाची होती. स्कंदगुप्ताची नाणी ही १४६ ग्रॅम वजनाची होती. सुवर्णनाण्याप्रमाणे चांदीचीही नाणी होती. तांब्याची मात्र अतिशय कमी प्रमाणात होती. ही नाणी शासनाच्या वतीने तयार केली जात. व्यापारी श्रेणी किंवा संघटनांचीही नाणी प्रचलित होती. नाण्यावर गरूड, लक्ष्मी, घोडा, धनुष्यबाण, राजा यांचे चित्र रेखाटले जात असत.

प्राचीन भारताच्या इतिहासात समुद्रगुप्ताच्या नाण्याइतकी प्रगत व अर्थपूर्ण नाणी क्वचितच आढळून आली आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपल्या भावाची विधवा पत्नी ........... हिच्याशी विवाह केला.

(अ) अंबिका (ब) नंदिनी (क) श्वेतालिका (ड) ध्रुवदेवी.

२. गुप्त व वाकाटककालीन समाजजीवनात .......... या धर्माला महत्त्व प्राप्त झाले होते.

(अ) जैन (ब) वैदिक (क) बौद्ध (ड) भागवत.

३. .............. या वाकाटक राणीने काही काळ राज्यकारभार केला.

(अ) कुमारनागा (ब) कौशल्या (क) प्रभावतीगुप्ता (ड) ध्रुवदेवी

४. गुप्त व वाकाटक कालीन राज्याचे मुख्य उत्पन्न ........... मिळत असे.

(अ) शेती कर (ब) व्यापारी कर (क) व्यवसाय कर (ड) जकात.

५. ............. या राजाने आपल्या नाण्यावर लिच्छवी राजकन्या कुमारदेवीचा उल्लेख केला आहे.

(अ) देवगुप्त (ब) पहिला चंद्रगुप्त (क) समुद्रगुप्त (ड) दुसरा चंद्रगुप्त

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या वाकाटक राजाने सुदर्शन तलाव दुरूस्त केल्याचा उल्लेख आहे ?

२. गुप्त व वाकाटक काळात कोणत्या धातूची नाणी मोठ्या प्रमाणात चलनात होती ?

३. कोणकोणत्या परकीय देशाशी गुप्त व वाकाटक काळात व्यापार चालत असे ?

४. स्कंदगुप्ताची नाणी किती ग्रॅम वजनाची होती ?

५. इ.स. ३३० ते इ.स. ६०० चा कालखंड प्राचीन भारताच्या इतिहासात कोणता कालखंड म्हणून ओळखला जातो ?

### २.२.३ साहित्य - विज्ञान आणि बृहद् भारत संकल्पना

गुप्त व वाकाटक राजांचा कालखंड हा संस्कृत भाषेतील साहित्याच्या दृष्टीने 'सुवर्णयुगाचा किंवा वैभवाचा कालखंड मानला जातो. सत्ताधिशांनी साहित्य निर्मिती केली शिवाय विविध विद्वानांना राजाश्रय दिल्यामुळे प्रचंड संस्कृत साहित्याची निर्मिती झाली. यापूर्वी संस्कृत ही राजभाषा म्हणून ओळखली जाण्यास सुरुवात झाली. यापूर्वी संस्कृत ही भाषा ही प्रचलित असली तरी या काळात या भाषेला व भाषेतील साहित्य निर्मितीला मोठी चालना मिळाली.

### वाङ्मय निर्मिती

नारद, यज्ञवाल्क्य, वात्सायन, बृहस्पती व व्यास इत्यादी स्मृतीग्रंथातून जीवनाचा अनेक अंगोपांगाचा विचार करून धर्माधिष्ठित व विहीत मार्ग कोणता याचे विवेचन करण्यात आले. कालीदास, भवभूती, भारवी, माघ, वीरसेन, मातृगुप्त, भर्तुश्रेष्ठ, दंडी, सुबंधू, शुद्रक, विशाखदत्त इत्यादी प्रसिद्ध कवी व नाटककार यांनी या काळात मोठ्या प्रमाणावर साहित्याची निर्मिती केली. मेघदूत, ऋतुसंहार, कुमारसंभव, रघुवंश या सुंदर काव्याच्या रचनेमुळेच कालिदासाला 'कविकुलगुरू' म्हटले आहे. याशिवाय मालविकाग्नी मित्र, विक्रमोवंशीय व शाकुंतल ही कालिदासाची प्रसिद्ध नाटके होत. भारवीचे किरातार्जुनीय, दंडीचे काव्यदर्शन, व दशक कुमारचरित, भट्टीचे रावणवध, सुबंधूचे स्वप्नवासवदत्त, श्रीधरदासाचे सदुक्तीकर्णामुत, वाकाटक राजा, प्रवरसेन दुसरा याचे सेतूबंध व रावणहो हे प्रसिद्ध काव्य प्राकृत गाथांचा गाथासप्तशीही या ग्रंथात समावेश होता. राजा सर्वसेनचा हरिविजय, विशाखादत्तचे मुद्राराक्षस, शूद्रक राजाचे मृच्छकटिक, भारवीचे किरातार्जुनीय हे महाकाव्य, दंडीचे दशककुमार चरित्र, गद्य, काव्य, पंचतंत्र हा संस्कृत कथा वाङ्मयातील सर्वश्रेष्ठ कथासंग्रह त्याचे सिरियन, अरबी, ग्रीक भाषांत भाषांतर झाले आहे. वसुबंधू व धर्मपाल या बौद्ध विद्वानांनी बौद्ध धर्मग्रंथ लिहिले. पाली, तामीळ व प्राकृत भाषेतूनही वाङ्मयनिर्मिती झाली.

अशा प्रकारे भारतीय साहित्य वाङ्मयास मोठे प्रोत्साहन मिळाले गुप्त व वाकाटक राजे स्वतः साहित्यिक कवी व विद्वान असल्याने त्यांनी साहित्य, कला व संस्कृतीला उत्तेजन दिले.

## विज्ञान

गुप्त व वाकाटक राजांनी विविध विद्वानांना राजाश्रय दिल्यामुळे संस्कृत भाषेतील साहित्याबरोबरच या काळात खगोलशास्त्र, धातूविषयक इत्यादी विविध विषयावर स्वतंत्र ग्रंथनिर्मिती झाली.

**आर्यभट्टांचे आर्यभट्टीय :** आर्यभट्ट हा प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ व गणितशास्त्रज्ञ होता. त्याने गणितशास्त्रावर ग्रंथ लिहिला. त्याने सूर्यसिद्धांत मांडला. सूर्यग्रहण व चंद्रग्रहणाची शास्त्रीय कारणमीमांसा केली होती. पृथ्वी स्वतःच्या आसाभोवती फिरते हा सिद्धांत प्रथमच त्याने मांडला.

**वराहमिहीराची पंचसिद्धांतिका :** वराहमिहीर हा खगोलशास्त्र व ज्योतिषी म्हणजे पंचसिद्धांतिका ग्रंथाचा लेखक होय. या ग्रंथात भूगोल, वनस्पतिशास्त्र, खगोलशास्त्र या सर्वच शास्त्राची चिकित्सा आहे. अमरसिंहचा अमरकोश हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. बृहतगुप्त या शास्त्रज्ञाने 'गुरूत्वाकर्षणाचा सिद्धांत सांगितला. वैदिक व रसायनशास्त्रावरही लेखन केले आहे. भारतीय वैद्यक शास्त्राचा प्रणेता म्हणजे आयुर्वेदाचा प्रणेता धन्वंतरी हा गुप्त काळातील प्रसिद्ध वैद्य होय. वाग्भट्टाने अष्टांग संग्रह हा ग्रंथ लिहिला. पलकाव्य याने आयुर्वेदाच्या आधारे प्राण्यांना औषधोपचार करणारे शास्त्र विकसित केले. चरकने चरकसंहिता वैद्यकशास्त्रावर लेखन केले. हस्तायुर्वेद व अश्वशास्त्र या दोन वैद्यकीय ग्रंथात प्राण्यांच्या रोगावरील उपचाराविषयी माहिती दिली आहे. धातुशास्त्राचा विकास दर्शविणारा दिल्लीच्या कुतूबमिनारच्या शेजारील पंचधातूंचा स्तंभ या काळातीलच आहे. कामंदकचा राजनितीशास्त्रावरील ग्रंथ, वात्सायनचे कामसूत्र, ईश्वरकृष्ण, दिडनाग, प्रशस्तपाद इत्यादी दार्शनिकाचे ग्रंथ या काळातील आहेत.

बौद्ध आचार्य मैत्रेय, असंग, वसुवंधु, कुमारजीव, धर्मपाल यांनी या काळात विविध विषयावर लेखन केले. जैन आचार्य जिनचंद्रमणी, सिद्धसेनामणी, देवनंदी यांनी निरनिराळ्या विषयावर लेखन केले.

## बृहद् संकल्पना (Greater India)

गुप्त व वाकाटक काळात राजकीय एकता, राष्ट्रीयता, कलेचा प्रसार वाङ्मयीन कृती, संस्कृती यासारख्या क्षेत्रात प्रगतीचे अत्युच्च शिखर गाठले म्हणून या काळाला वैभवशाली कालखंडे किंवा सुवर्णयुग असे इतिहासकारांनी म्हटले आहे.

१. या काळात सर्वत्र शांतता व सुव्यवस्था होती.

२. आर्थिक सुबत्ता निर्माण झाली, जगभराच्या देशाशी आयात-निर्यात व्यापार चालू झाला.

३. भारतातील अनेक छोटी-छोटी राज्ये कौशल्यपूर्ण राजनैतिक संबंधानी साम्राज्यात सामावून घेण्यात आली त्यामुळे देशात प्रथमच राजकीय सगलता व एकता निर्माण झाली. एकततेतून राष्ट्रीयतेचा उदय झाला.

४. लोकजीवनात नैतिकता निर्माण झाली. त्यांची राहणी साधी असून अतिथ्यशील, सदाचारी, उदार, निर्मळ अंतकरणाचे लोक धर्माचरण व सचोटीने अर्थार्जन करू लागले. हे या काळातील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

५. या काळातील राजांनी 'लोकल्याण' हे ध्येय महत्त्वाचे मानले.

६. सार्वजनिक व लोककल्याणासाठी कामे पूर्ण करण्यात आली.

७. गुन्हेगारीचे प्रमाण कमी होते, अवयव विच्छेदनाची शिक्षा झाल्याची कोठेही नोंद नाही.

८. न्यायदानाची प्रक्रिया सुयोग्य व तात्काळ न्याय देणारी व सामान्य लोकांना परवडणारी अशी होती.

९. या काळातील सत्ताधीश धर्मसहिष्णू असल्याने मंदिरे, मठ, विहार या कार्यासाठी भरपूर मदत केली.

१०. कार्यक्षम सत्ताधीशांची परंपरा निर्माण झाली.

११. संस्कृत भाषा राजभाषा झाली. काव्य, नाट्य, गद्य, तत्त्वज्ञान, धर्म या क्षेत्रात अनेक दिग्गजांनी निर्मिलेल्या वाङ्मयीन कृतीमुळे संस्कृत भाषा व वाङ्मय निर्माण झाले. भाषेची वऱ्हाडी शैली नावारूपाला आली.

१२. नालंदा, तक्षशिला, सारनाथ येथे शिक्षणसंस्था स्थापन करून त्यांना भरघोस आर्थिक मदत केली. उज्जैनी, मथुरा, वाराणासी ही संस्कृत शिक्षणाची महत्त्वाची केंद्रे बनली. गणित, तत्त्वज्ञान, वैद्यक, भौतिक विज्ञान, रसायन या क्षेत्रांतही नवनवीन शोध लागले.

१३. भारतीय संस्कृतीचा प्रसार आग्नेय, आशिया, चीन, मध्य आशिया, इजिप्त, रोमन साम्राज्य या भागात भारतीयांनी आपल्या व्यापाराबरोबर संस्कृतीची निर्यात केली व ती तेथे रुजविली. थोडक्यात 'बृहद्‌भारत' (Greater India) ही संकल्पना या काळात निर्माण झाली व परिचित झाली.

१४. अजिंठा लेणी जगप्रसिद्ध झाली. युनेस्कोने त्याची दखल घेऊन त्यास World Heritage Site या जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. वाग्भटाने .............. हा आयुर्वेदावर ग्रंथ लिहिला.

(अ) अष्टांगसंहिता (ब) चरकसंहिता (क) पंचतंत्र (ड) रघुवंश.

२. वराहमिहीर याने .......... हा ग्रंथ लिहिला.

(अ) वाग्भट (ब) विशाखादत्त (क) वसुबंध (ड) कामंदक

३. शाकुंतल हे सुप्रसिद्ध नाटक .............. याने लिहिले.

(अ) आर्यभट्ट (ब) वराहमिहीर (क) कालिदास (ड) चरक

४. वात्सायन याने ........... लिहिले.

(अ) धातूशास्त्र (ब) राजनिती (क) कामसूत्र (ड) दिडनाग.

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. वाकाटक व गुप्त काळात कोणती भाषा राजभाषा म्हणून मान्यता पावली ?

२. गणितशास्त्रावर आधारीत कोणी ग्रंथ लिहिला ?

३. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत कोणी मांडला ?

४. कविकुलगुरू कोणाला म्हटले जाते ?

५. धातूशास्त्राचा विकास दर्शविणारा स्तंभ कोठे आहे ?

## २.२.४ धर्म, कला व स्थापत्य (शिल्पकला, अजिंठा लेणी-चित्रकला व मंदिरांची सुरुवात)

**धर्म**

वैदिक जैन व बौद्ध या तिन्ही धर्मालाही स्वातंत्र्य व लोकप्रियता होती. विविध धर्म व पंथाचे समाजात अस्तित्व असतानाही त्यांच्यात धार्मिक संघर्ष झाल्याची माहिती मिळत नाही. गुप्त व वाकाटक राजांनी परधर्मसहिष्णुतेच्या धोरणामुळे सर्व धर्मांना स्वातंत्र्य होते.

**१. हिंदू धर्म** : या काळात शैव, वैष्णव, भावत व सौर या वैदिक धर्मात उपपंथाना महत्त्व प्राप्त झाले होते. गुप्तराजे व वाकाटक राजे वैदिक धर्मानुयायी होते. त्यांनी अनेक यज्ञ केल्याचेही उल्लेख आढळतात. विष्णू, शिव, दुर्गा, चामुंडी, वामन, वराह, नृसिंह, जगदंबा, भवानी, महिषासूरमर्दिनी, उमा, सूर्य, हेमावती देवतांची उपासना केली जात असे व मंदिरे बांधण्यात आली.

**२. जैन धर्म** : जैन धर्माला स्वातंत्र्य व लोकप्रियता कमी असली तरी नंतर कठीण आचरणामुळे ती कमी होऊ लागली. आचारविरहित परकीय आक्रमकापासून धर्मरक्षण करण्यासाठी जैन धर्म दक्षिणेस जास्त प्रसारित झाला. या धर्मातील तीर्थंकरांच्या मूर्ती करून त्यांचे पूजन केले जाण्यास सुरुवात झाली. पूजेविषयी काही नियमही सांगितले गेले. श्वेतांबर व दिगंबर असे दोन्ही पंथ लोकप्रिय होते.

**३. बौद्ध धर्म** : फहियान या चिनी प्रवाशाने या काळात भारतात अनेक बौद्धविहार व चैत्यगृहे असल्याची माहिती दिली आहे. महायान पंथाची लोकप्रियता वाढण्यास सुरुवात झाली. गौतम बुद्धांची मूर्ती करून तिचे नियमित स्वरूपात पूजन केले जाऊ लागले. अजिंठा लेण्यामध्ये गौतम बुद्धांचे जीवन रेखाटले आहे. गौतम बुद्धाला सर्वज्ञ सर्वशक्तिमान मानण्यास प्रारंभ झाला. कोशांबी, मथुरा, सारनाथ येथे बौद्ध विहार व स्तूप होते. अजिंठा, वेरूळ, कान्हेरी येथे बौद्ध भिक्षू संघाचे वास्तव्य होते. या विहारातून बौद्ध धर्म व तत्तवज्ञानाचे शिक्षण दिले जाई. बौद्ध धर्माची शिकवण व शैव आणि वैष्णव या वैदिक धर्माच्या संप्रदायांनी मांडलेली भक्तिसंप्रदायाची विचारप्रणाली यात जवळपास सारखेपणा असल्याचे दिसून येते.

थोडक्यात विविध धर्माचे समाजजीवनात वास्तव्य असलेली त्यांच्या कोणत्याही प्रकारचे धार्मिक संघर्ष या काळात झाल्याची माहिती मिळत नाही.

**कला**

गुप्त व वाकाटक काळातील शांतता व आर्थिक संपन्नता ही साहित्याप्रमाणे कलेच्या विकासासाठी पूरक ठरली. या कलाप्रेमी राजांनी विविध कलाकारांना दिलेला राजाश्रय व आर्थिक सहकार्य या काळातील कलेच्या विकासासाठी पूरक ठरले. या काळातील कलेचे खास वैशिष्ट्य म्हणजे ही कला पूर्णपणे भारतीय होती. इतर कोणत्याही परकीय शैलीच्या प्रभावाखाली नसून स्वतंत्रपणे भारतीय परंपरेतून विकसित झाली होती असे दिसते.

**१. शिल्पकला/मूर्तीकला :** शिल्पकला व मुर्तीकला या क्षेत्राशी मोठ्या प्रमाणात प्रगती झाली होती. शिल्पकलेच्या क्षेत्रात या काळातील कलाकारांचे विशेष कौशल्य जाणवते. उदयगिरी, अजिंठा, बाघ येथील शैलस्थापत्यातील शिल्पे कलापूर्ण व नयनमनोहर आहेत. शिल्पाचे शरीरसौष्ठव दाखविण्याबरोबरच कलाकारांनी चेहऱ्यावरील हावभाव दाखविण्याला प्राधान्य दिले. विविध अलंकार, वेशभूषा, केशभूषा इत्यादीद्वारे मूर्ती सुशोभित करण्यात आल्या असे दिसते. या काळातील उत्खननात व इतर मिळालेल्या मूर्ती या प्रगतीची साक्ष देतात.

विविध शिल्पातून दिसणाऱ्या व या काळात तयार करण्यात आलेल्या बुद्धमूर्ती असामान्य आहेत. या मूर्ती उत्कृष्ट कलाकुसरीने युक्त अशा प्रभावलयाने अंगाला चिकटून बसलेल्या पारदर्शक वस्त्राने, उष्णीषात गोळा केलेल्या विविध केशरचनेमुळे नयनमनोहर कलात्मक झालेल्या आहेत. सारनाथ येथील धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेतील बसलेली गौतम बुद्धांची मूर्ती तर अनन्यसाधारण आहे. याशिवाय मथुरा येथील गौतम बुद्धाची मूर्ती, मथुरेची पद्मासन घातलेली महावीराची प्रतिमा, देवगड येथील गोवर्धनधारी कृष्णाची मूर्ती व कोसांबीची सूर्यप्रतिमा इत्यादी या काळात कलापूर्ण व अनन्यसाधारण मूर्ती होत. या काळातील विष्णू-शिव-पार्वती यांच्या मूर्ती चेहऱ्यावरील हावभाव, अध्यात्मिक तेज व रेखीव शरीरसौष्ठव यामुळे अनन्यसाधारण वाटतात. या काळात निरनिराळ्या देवदेवता बसलेल्या उभ्या किंवा शयन अवस्थेतील मूर्ती तयार करताना कलाकारांनी आपले कौशल्य पणाला लावले असे दिसते. अर्धोन्मीलित नेत्रामुळे मूर्तीच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो. त्यामुळेच या मूर्तीचा सजीवपणा लगेच जाणवतो. धातू व भाजलेल्या मातीच्याही मूर्ती या काळात केल्या जात असत.

या काळात कलाकारांनी मूर्तीकला व शिल्पकला या क्षेत्रात प्रावीण्य मिळविले. घटोत्कच लेणी या काळात कोरली गेली. अजिंठ्याच्या डोंगरातच पश्चिमेस २० कि.मी. अंतरावर ही घटोत्कच लेणी आहे. दुर्धर रस्त्यामुळे ही लेणी पर्यटन स्थळ म्हणून विशेष प्रसिद्ध नसली तरी शिल्प स्थापत्याचा अप्रतिम नमुना म्हणून ही लेणी उल्लेखनीय आहेत.

**चित्रकला**

या काळातील चित्रकलेच्या प्रगतीचे ज्ञान अजिंठा व बाघ येथील चित्रावरून दिसते. अजिंठा येथील क्र. १, २, १६, १७, १८ चित्रे अलौकिक सौंदर्याची आहेत. या चित्रातील मानवी आकृती, प्रसंग, निसर्ग ही इतकी हुबेहूब आहेत की शेकडो वर्षानंतरही त्यांचे रंग व सौंदर्य टिकून आहे. प्रमाणबद्ध शरीर, बोलके डोळे, भावपूर्ण चेहरा, सूचक हालचाली व विविधविषय यावरून या काळातील चित्रकारांनी चित्रकलेच्या क्षेत्रात प्राविण्य मिळविले होते असे मानता येते. निसर्गात उपलब्ध होणाऱ्या झाडाची साल, पाने, फुले, डिंक, काव इत्यादीचा उपयोग करून विविध

प्रकारचे रंग बनविले जात होते. या चित्रांना कलाकारांनी दिलेल्या रंगावरून रंगसंगतीच्या बाबतीतही त्यांनी ज्ञान आत्मसात केलेले दिसते. या विविध चित्रामध्ये रंगसंगतीच्या बाबतीत विशेष दक्षता घेतलेली दिसते. घराच्या भिंतीही विविध रंगानी रंगविलेल्या असाव्यात. मात्र त्याचे अवशेष उपलब्ध नाहीत.

सिद्धार्थ गौतमाच्या जीवनातील अनेक प्रसंग येथील चित्रकाराने मोठ्या प्रभावीपणे चितारले आहेत. बुद्धजन्म, मायादेवीचे स्वप्न, बुद्धाचे बालपण, बुद्धाचा संसार त्याग असे अनेक प्रसंग या चित्रकलेतून साकारले आहे. आजही जगातल्या लक्षावधी पर्यटकांचे ते प्रमुख आकर्षण ठरले आहे.

**संगीत, नृत्य व नाट्यकला**

गुप्तराजे संगीताचे रसिक व तज्ज्ञ होते. त्यामुळे त्यांनी या कलेलाही प्राधान्य दिले. एका नाण्यावर समुद्रगुप्त वीणा वाजवत असल्याचे दाखविले आहे. राजघराणे व परिवारातील स्त्रिया संगीताचे शिक्षण घेत. अजिंठा, बाघ येथील चित्रामध्ये तंतूवाद्य, आघातवाद्ये इत्यादी चित्रे आढळतात. तसेच नृत्यात मग्न असलेले स्त्री-पुरुषही दाखवले आहेत. काही प्रसिद्ध नाटके रंगमंचावर येत असत.

**धातूकला**

या काळात धातुकलेतही प्रगती झाली. सुलतानगंज येथील बुद्धाची ताम्रप्रतिमा साडेसात फूट उंच असून एक टन वजनाची आहे. तसेच नालंदा येथे बुद्धाचा ८० फूट उंचीचा तांब्याच्या पुतळ्याचा उल्लेख ह्युएनत्संग करतो. दिल्लीजवळील मेहरौली येथील सहा टनी लोहस्तंभ धातुकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. पंधराशे वर्षे झाली. ऊन पावसात अजून त्याला गंज चढलेला नाही. या स्तंभावर अडीच फूट उंचीची ब्राँझची गरूडाची मूर्ती आहे.

**नाणी**

गुप्त शासकांनी सोने, चांदी, तांबे या धातूंची नाणी पाडली. सर्व नाणी वजन, कला, सुबकता व विविधत याबाबत प्रशंसनीय आहेत. पहिल्या चंद्रगुप्ताच्या नाण्यावर एका बाजूस मुकूट, कोट, पायजमा घातलेला अलंकृत राजा चंद्रगुप्त व राणी कुमारदेवी उभे असलेले दाखविले आहेत. समुद्रगुप्ताने आठ प्रकारची सुवर्ण नाणी पाडली. त्याच्या सुवर्णनाण्याचे वजन ११८ ते १२१ ग्रॅम इतके आहे. नाण्यावर गरूडध्वज व दुसऱ्या बाजूस राजाचे चित्र आहे. काही नाण्यावर लक्ष्मीचे चित्र आहे. अश्वमेघ नाण्यावर एका बाजूस घोड्याचे चित्र आहे. एका नाण्यावर एका बाजूस मांडी घालून वीणा वाजवीत बसलेल्या राजाचे चित्र आहे. नाण्यावरील मजकुरात राजाचे शौर्य, अजिंक्यता, पृथ्वीजय याचे वर्णन आहे. अश्वमेध नाण्यावर 'अश्वमेध पराक्रम' असा उल्लेख आहे.

दुसऱ्या चंद्रगुप्ताने नऊ प्रकारची नाणी पाडली. नाण्याच्या एका बाजूस लक्ष्मी व दुसऱ्या बाजूस धनुर्धारी सिंह, हत्ती, छत्रधारी, घोडेस्वार इ. राजमुद्रा आहेत. घोडेस्वार नाण्यावर 'परमभागवत महाराजाधिराज श्रीचंद्रगुप्त' असा उल्लेख आहे. सुवर्णनाण्याचे प्रमाण १२६-१३२ ग्रेन दिसते. तसेच त्याने एकछत्री साम्राज्याची निदर्शक 'छत्रांक' नाणी काढली. अन्य नाण्यावर श्रीविक्रम, अजितविक्रम, विक्रमादित्य अशी विशेषणे आढळतात. पहिल्या कुमारगुप्ताने घोडेस्वार, धनुर्धारी, सिंहघातक, मयुरछाप राजमुद्रा असलेली सुवर्णनाणी पाडली. चंद्रगुप्त विक्रमादित्यच्या सांची व गढवाल येथील शिलालेखात दीनार नाण्याचा प्रथम उल्लेख येतो.

अशा प्रकारे वरील माहितीच्या आधारे गुप्तकाळात सांस्कृतिक प्रगती, राजकीय शांतता सुव्यवस्था, कार्यक्षम प्रशासन, आर्थिक संपन्नता, धार्मिक सहिष्णुता, ज्ञानाला राजाश्रय, उत्तेजन यामुळे सर्व क्षेत्रात प्रगती झाल्याचे दिसून येईल व खऱ्या अर्थाने गुप्तकाळात सांस्कृतिक प्रगतीत 'सुवर्णयुग' निर्माण झाल्याचे निदर्शनास येते.

**स्थापत्यकला**

गुप्तकाळात स्थापत्यकलेच्या बाबतीत एक नव्या युगाला सुरुवात झाली. या काळातील स्थापत्यकलेतील सौंदर्याविष्कार व बांधणीची धाटणी रचना पद्धती हे मूलभूत व महत्त्वाचे प्रवाह दिसतात. या काळता घडीव दगडाचा वापर करण्यास प्रारंभ झाला. तसेच ताशीव दगडाच्या मदतीने उभारणी झाली. विष्णू, शिवशक्ती देवतेची विविध मंदिरे उभारली गेली. देवगड येथील दशावतार मंदिर, भीतरगांव येथील पक्क्या वीटांचे मंदिर, नाचना येथील पार्वती मंदिर, तिगवा, भूमरा, सांची येथील मंदिरे, सारनाथ येथील धामेक स्तूप ही वास्तूकलेच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीची प्रतिके होत. उदयगिरी, अजिंठा, बाघ येथील शैल स्थापत्ये या काळात निर्माण झाली.

**स्वयं अध्ययन प्रश्न-४**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. श्वेतांबर व दिगंबर हे ........ या धर्माचे पंथ आहेत.

(अ) जैन (ब) बौद्ध (क) वैदिक (ड) शैव

२. ............. या परकीय प्रवाशाने आपल्या प्रवासवर्णनात बौद्ध विहार व चैत्यगृहाची माहिती दिली आहे.

(अ) हूण (ब) कुशाण (क) शक (ड) फहियान

३. पद्मासन घातलेली महावीराची मूर्ती ............. येथे आहे.

(अ) मथुरा (ब) काशी (क) सारनाथ (ड) देवगड

४. धर्मचक्रपरिवर्तन मुद्रेतील बुद्धाची मूर्ती ........... येथे आहे.

(अ) दिल्ली (ब) सारनाथ (क) पुणे (ड) देवगिरी

५. .................... याला युनेस्कोने जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे.

(अ) अजिंठा लेणी (ब) घटोत्कच लेणी (क) बाघ लेणी (ड) उदयगिरी लेणी.

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. देवगड येथे वाकाटककालीन कोणत्या देवतेची मूर्ती आहे ?

२. शैव व वैष्णव हे संप्रदाय कोणत्या धर्माचे आहेत ?

३. वाकाटक व गुप्त राजे कोणत्या धर्माचे अनुयायी होते ?

४. नाचना येथे कोणते मंदिर होते ?

५. गुप्तकाळात चित्रकलेत कोणत्या निसर्गघटकाचा वापर केला जाई ?

## २.३ सारांश

उत्तरेत गुप्त व दक्षिणेत वाकाटक सम्राटांनी राजकीय जीवनात सुव्यवस्था प्रस्थापित केली. समाजात शांतता व समृद्धता निर्माण करून समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणला. आपल्या कार्यक्षम प्रशासन यंत्रणेबरोबरच आर्थिक संपन्नता प्राप्त केली. साहित्य, विज्ञान, स्थापत्यकला, शिल्प, चित्रकला, वास्तूकला, मंदिरउभारणी, धातू या क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करून आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला. म्हणून या काळाला प्राचीन भारताचे सुवर्णयुग म्हटले जाते.

## २.४ पारिभाषिक शब्द

१. मांडलिक - सार्वभौम सत्तेच्या ताब्यातील राजा.

२. गणराज्य - लोकांच्या समूहाद्वारे चालवलेली शासनव्यवस्था

३. विहार - बौद्ध भिक्षूंचे निवासस्थान

४. स्तूप - गौतम बुद्ध व त्याच्या अनुयायांच्या पार्थिव अवशेषावर अथवा वापरातील वस्तूवर उभारलेली घुमटाकृती वास्तू हे एक पूजेचे प्रतिक होते.

५. चैत्य - बौद्ध भिक्षूंचे निवासस्थान.

६. हूण - प्राचीन काळातील परदेशातील एक भटकी जमात.

७. जागतिक वारसा स्थळ - World Heritage Site.

८. युनेस्को - UNESCO - United Nations Educational Scientific and Cultural Organization.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

(१) समुदगुप्त (२) पहिला चंद्रगुप्त (३) पुणे

(४) हरिसेन (५) विदर्भ मराठवाडा

**(ब) एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. गरूड
२. चंद्रगुप्त दुसरा
३. हरिविजय
४. वराहदेव
५. नंदीवर्धन व वत्सगुल्म

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

(१) ध्रुवदेवी (२) वैदिक (३) प्रभावती गुप्ता
(४) शेतीकर (५) पहिला चंद्रगुप्त

**(ब) एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. स्कंदगुप्त
२. सुवर्ण
३. रोम, इराण, सुमात्रा, जावा, चीन इ.
४. १४६ ग्रॅम
५. सुवर्णयुग किंवा वैभवाचा

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

(१) अष्टांगसंहिता (२) पंचसिद्धांतिका (३) विशाखा दत्त
(४) कालिदास (५) कामसूत्र

**(ब) एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. संस्कृत
२. आर्यभट्ट
३. बृहतगुप्त
४. कालिदास
५. दिल्ली

**स्वयं अध्ययन प्रश्न-४**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

(१) जैन (२) फहियान (३) मथूरा
(४) सारनाथ (५) अजिंठा लेणी

**(ब) एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. गोवर्धनधारी कृष्ण
२. हिंदू
३. वैदिक
४. पार्वती मंदिर
५. साल, पाने, फुले, डिंक इ.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) सविस्तर उत्तरे लिहा.**

१. समुद्रगुप्ताच्या कार्याची सविस्तर माहिती द्या.

२. दुसरा चंद्रगुप्त विक्रमादित्यच्या कार्याची माहिती द्या.

३. वाकाटक घराण्यातील सम्राटांच्या कार्याचा आढावा घ्या.

**(ब) टिपा लिहा.**

१. कला व स्थापत्य

२. बृहद् भारत संकल्पना

३. गुप्त कालीन साहित्य

४. वाकाटक कालीन साहित्य

५. गुप्त व वाकाटक कालीन व्यापार

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. प्रा. य. ना. कदम - प्राचीन भारताचा इतिहास

२. रोमला थापर - भारत का इतिहास

३. डॉ. प्रभाकर देव - प्राचीन भारत

४. प्रा. व्ही. डी. महाजन - प्राचीन भारत

५. प्रा. गजानन भिडे - प्राचीन भारत

६. डॉ. प्रा. सुधाकर देशपांडे - प्राचीन भारत

७. ना. सी. दीक्षित - प्राचीन भारताचा इतिहास

## घटक - ३

# गुप्तोत्तर काळ

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ साधने - युआन च्याँग किंवा ह्यु-एन-त्संग

  ३.२.२ वर्धन घराणे

  ३.२.३ प्रारंभीचे चालुक्य

  ३.२.४ प्रारंभीचे पल्लव

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द - अर्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

### ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील बाबी स्पष्ट होऊ शकतील जसे -

- गुप्तोत्तर कालखंडाच्या साधनांची माहिती होईल.
- गुप्त काळानंतरची राजकीय परिस्थिती समजेल.
- युआन च्याँग किंवा ह्यु-एन-त्संग बद्दल माहिती होईल.
- वर्धन घराण्याची माहिती होईल.
- वर्धन घराण्यातील राजांची माहिती घेता होईल.
- प्रारंभीचे चालुक्य घराणे व त्याची माहिती होईल.

## १.१ प्रास्ताविक

वैभवशाली अशा गुप्त सत्तेच्या अस्तानंतर (इ.स. ५५०) उत्तर भारतात राजकीय गोंधळ सुरू झाला. राजकीय अस्थिरता निर्माण झाली. उत्तर भारतात अनेक लहान-मोठी राज्ये उदयास आली. ती आपापसात संघर्ष करीत. अशा राजकीय गोंधळाच्या परिस्थितीत उत्तर भारतामध्ये गया येथे मौखरी घराणे राज्य करीत होते. सौराष्ट्रात भट्टारक याने मैत्रकांचे स्वतंत्र राज्य घोषित केले होते. कनोज येथे राजा गृहवर्मा हा राज्य करीत होता. राजस्थानात गुर्जर-प्रतिहारांचे राज्य होते. पूर्व माळव्यात देवगुप्त हा राज्य करीत होता. आसाममध्ये (कामरूप) भास्कर वर्मन हा सत्तेवर होता तर पूर्व पंजाबातील ठाणेश्वर येथे वर्धन घराणे राज्य करीत होते.

दक्षिण भारतात प्रभावशाली राजघराणी म्हणून चालुक्य व पल्लव ही घराणी उदयास आली होती. उत्तरेकडील वर्धन घराणे व दक्षिणेतली चालुक्य आणि पल्लव यांच्या काळातील राजकीय परिस्थितीची माहिती आपण या प्रकरणात घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ साधने

प्राचीन भारताचा अभ्यास करतांना आपल्याला वस्तुनिष्ठ लेखन करण्यासाठी पुराव्याची आवश्यकता असते. असे पुरावे आपल्याला भौतिक व लिखीत साधनातून मिळतात. गुप्तोत्तर राजकीय इतिहास लेखनासाठी आपणाला शिलालेख व ताम्रपट, बंसखेडा शिलालेख, सोनपत शिलालेख तसेच मौखरी, प्रतिहार, चालुक्य व मैत्रक या राजघराण्याचे शिलालेख. बाणभट्टाचा 'हर्षचरित' ग्रंथ, हर्षवर्धनाच नाटके - रत्नावली, प्रियदर्शिका व नागानंद आणि ह्यु-एन-त्संगचे प्रवास वर्णन तसेच हर्षवर्धनकालीन नाणी यांचा प्रामुख्याने उपयोग होतो.

दक्षिणेकडील राजवंशाचा अभ्यास करण्यासाठी पुराणे, जैन वाङ्मय, ह्यु-एन-त्संग व इत्सिंग या चिनी प्रवाशांची प्रवास वर्णने, चालुक्यांची मंदिरे-बदामी, पट्टदकळ, एहोळ येथील मंदिरे, चालुक्याचे शिलालेख - एहोळ शिलालेख तसेच चालुक्याचे ताम्रपट - कौठम ताम्रपट, लोणार ताम्रपट (चिपळूण, वेंगुले, सावंतवाडी, कोल्हापूर, सातारा, इगतपुरी येथे चालुक्याचे ताम्रपट सापडले आहेत.) त्याचबरोबर बिल्हणचे विक्रमांकदेवचरित या साधनांमधून आपणाला दक्षिणेकडील राजघराण्यांची माहिती मिळते.

### १) बाणभट्ट

बाणभट्ट हा हर्षवर्धनच्या दरबारातील राजकवी होता. तो संस्कृत भाषेचा फार मोठा अभ्यासक होता. हर्षवर्धनची कारकिर्द त्याने जवळून पाहिली होती. त्याने 'हर्षचरित' नावाचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात ठाणेश्वरचा इतिहास, हर्षाच्या युद्धमोहिमा, तत्कालीन धार्मिक ग्रंथ, हर्षवर्धनची शासन व्यवस्था, तत्कालीन समाजजीवन, रुढी परंपरा, हर्षवर्धनचा दरबार इत्यादी विषयी सविस्तर माहिती या ग्रंथ देण्यात आली आहे. 'हर्षचरित' या ग्रंथात काही दोष पण आहेत. उदा. (१) कालखंडाच्या कालानुक्रमाकडे लक्ष दिले गेलेले नाही. (२) परंपरा व इतिहास यात तो भेद करत नाही. (३) बाणभट्ट काही प्रसंगी हर्षाची खोटी स्तुती करतो. (४) स्थानिक भूगोलाकडे दुर्लक्ष झाले आहे.

**२) ह्यु-एन-त्संग किंवा युआन च्वांग** (इ.स. ६३०-६४५)

ह्यु-एन-त्संग किंवा युआन च्वांग हा चिनी प्रवासी हर्षवर्धनाच्या काळात बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी व पवित्र बौद्ध स्थळांना भेटी देण्यासाठी इ.स. ६३० मध्ये भारतात आला होता.

ह्यु-एन-त्संगचा जन्म चीन मधील 'होनान' प्रांतात झाला. त्याला चार भावंडे होती. तो सर्वात लहान होता. मोठा भाऊ बौद्ध भिक्षू असल्यामुळे त्याने त्याला वयाच्या १३व्या वर्षी बौद्ध धर्माची दीक्षा दिली. बौद्ध भिक्षू शाक्य मुनी व गौतम बुद्धाच्या जन्मभूमीस भेट देण्याच्या इच्छेने तो इ.स. ६२९ मध्ये भारत भेटीसाठी चीनमधून बाहेर पडला. ताश्कंद, समरकंद, गांधार मार्गे जीवावरील बेतलेल्या अनेक प्रसंगांना तोंड देत तो इ.स. ६३० मध्ये भारतात पोहोचला.

ह्यु-एन-त्संगने भारतातील वास्तव्यात काश्मीर, कनोज, नालंदा विद्यापीठ, आंध्र प्रदेश, पंजाब, महाराष्ट्र या प्रदेशात प्रवास केला. गया, कौशांबी, प्रयाग, श्रावस्ती, कुशीनगर, कपिलवस्तू, अयोध्या, पाटलीपुत्र या ठिकाणांना बौद्ध स्थळे पाहण्यासाठी भेटी दिल्या. हर्षवर्धनाला ह्यु-एन-त्संग हा बौद्ध धर्माचा गाढा अभ्यासक आहे असे समजताच हर्षवर्धनाने त्याला प्रयाग येथील धर्मसभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठी पाचारण केले. ह्यु-एन-त्संग बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी व संस्कृतचा अभ्यास करण्यासाठी नालंदा विद्यापीठात दोन वर्षे होता. काही काळ त्याने विद्यापीठात अध्यापनही केले. तो दक्षिण भारतात आला. त्यावेळी दक्षिणेत दुसरा पुलकेशी हा राजा होता. त्याचीही त्याने भेट घेतली. अजिंठा येथील जगप्रसिद्ध लेणी त्याने पाहिली. अप्रतिम कला पाहून त्याने गौरव उद्‌गार काढले.

ह्यु-एन-त्संग हा जिज्ञासू वृत्तीचा होता. त्यामुळे त्याने भारतात फिरत असतांना भारतातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केले. त्याबद्दलची माहिती आपल्या प्रवास वर्णनात लिहून ठेवली. त्यामुळे त्याचा प्रवास वृत्तांत हा त्यावेळच्या इतिहासाचा एक अमूल्य ठेवा आहे. त्याने भारतातील चाली-रिती, परंपरा, रूढी, धर्म याबद्दलची माहिती लिहिली आहे. तो लिहितो की, भारतातील जनता शांततेत आणि सुबत्तेत राहत होती. भारतात व्यवहारात सोन्याची व चांदीची नाणी पाहावयास मिळतात. लोकांच्या भोजनात दूध, तूप, साखर विविध धान्ये असतात. रेशीम, लोकर, सुती कापड यांचे लोक कपडे वापरतात. शुभ्र व तलम वस्त्रे पहावयास मिळतात. जंगली जनावरांच्या मऊसर लोकरीपासून शाली तयार करतात. समाजातील जातिव्यवस्थेबद्दलही त्याने लिहिले आहे. बालविवाह, सती पद्धत, विधवा विवाहास विरोध इत्यादी चालीरितीबद्दल माहिती दिली आहे. बौद्ध धर्माबद्दलही त्याने लिहिले आहे. बौद्ध धर्मात १८ संप्रदाय आहेत व त्यामध्ये अनेक वाद आहे. त्या वादाचे निराकरण करण्यासाठी धर्म परिषदा भरवल्या जात. त्यात चर्चा केली जाई. हर्षवर्धनबद्दलही त्याने लिहिले आहे. त्याच्या लढाया, त्याची प्रशासन व्यवस्था, त्याचे धार्मिक धोरण, त्याचा दानशूरपणा याबद्दल त्याने लिहिले आहे. हर्षवर्धन हा प्रजाहितदक्ष राजा होता. तो तहानभूक विसरून लोकांची कामे करी. दिवसाच्या तीन भागांपैकी तो एक भाग राज्यकारभार, व दोन भागात लोकोपयोगी कामे व दानधर्म यासाठी तो खर्च करीत असे. तो राज्यात दौरे काढून सर्वसामान्य माणसांचे जीवन जवळून पाहून त्यांच्या अडीअडचणी समजून घेत असे. हर्षवर्धनाने आपल्या राज्यात

पशूहत्या व मांसाहार यावर बंधने घातली होती. अशी माहिती त्याने दिली आहे. हर्षाने पंचभारतात (पंजाब, माळवा, मिथिला, बंगाल, ओरसा) आपले राज्य वाढविले. त्याच्या सैन्यात ६०,००० हत्ती, एक लाख घोडदळ व अगणित पायदळ होते असे तो लिहितो.

ह्यु-एन-त्संगने महाराष्ट्राविषयीही लिहिले आहे तो म्हणतो, ''मराठे शूर व स्वाभिमानी आहेत. शत्रूला सावध करून मग सूड उगवितात. ते उपकार कर्त्याबद्दल कृतज्ञ असतात. पण आपला अपमान करणाऱ्यांचा जीव धोक्यात घालूनही बदला घेतात व शरणागताला प्राणपणाने मदत करतात.''

भारत फिरून झाल्यावर व बौद्ध धर्माचा अभ्यास केल्यावर तो इ.स. ६४४ मध्ये भारतातून परत आपल्या मायदेशी चीनला जाण्यासाठी निघाला. जातेवेळी त्याने आपल्याबरोबर बुद्धाची सुवर्णमूर्ती, कौशांबीच्या राजाने दिलेली बुद्धाची चंदन व रौप्य प्रतिमा, गौतम बुद्धाच्या पार्थिक देहाचे ५०० रत्ती (एक किलो) भरतील एवढे अवशेष, महायान पंथाचे १२० ग्रंथ व इतर ५२० ग्रंथ एवढे साहित्य, २२ घोड्यावर घालून नेले. जातेवेळी तो सिंध, गझनी, काबूल, काश्गर, खोतान मार्गे गेला. चीनला गेल्यावर त्याने पुढील आयुष्यात भारतातून नेलेल्या ग्रंथांचे भाषांतर केले. तसेच प्रवास वृत्तांत लिहून काढला. त्याने लिहिलेल्या प्रवासवर्णनाचे 'ता-तांग-सियुकी' असे नाव आहे. हा ग्रंथ भारतीय इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

भारतातील प्राचीन आध्यात्मिक वाङ्मयाचे महत्त्व जाणणारा व त्याचे ज्ञान आपल्या चिनी बांधवांना व्हावे म्हणून भाषांतर करणारा हा एक आगळा-वेगळा विद्वान होऊन गेला.

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**(अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१. पूर्व माळव्यात ......... हा राजा राज्य करीत होता.

(अ) भास्कर वर्मन (ब) राजा गृहवर्मा (क) भट्टारक (ड) देवगुप्त

२. हर्षचरित ग्रंथ ........... ने लिहिला.

(अ) राजवर्धन (ब) बाणभट्ट (क) ब्रह्मगुप्त (ड) इत्सिंग

३. 'रत्नावली, प्रियदशिक्षका व नागानंद' ही नाटके ........... ने लिहिली.

(अ) अश्वघोष (ब) हर्षवर्धन (क) कालिदास (ड) भास

४. बिल्हणाने ........... हा ग्रंथ लिहिला.

(अ) महावीरचरितम् (ब) उत्तरराम चरितम् (क) विक्रमांकदेवचरित (ड) मालविकाग्निमित्र

५. ह्य-एन-त्संग ........... मध्ये भारतात आला.

(अ) इ.स. ५३० (ब) इ.स. ६० (क) इ.स. ६३१ (ड) इ.स. ७३१

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. बाणभट्ट हा कोणाच्या दरबारातील राजकवी होता ?

२. हर्षवर्धनाने ह्यु-एन-त्संगला कोणत्या धर्म सभेचे अध्यक्ष स्थान स्वीकारण्यासाठी पाचारण केले ?

३. ह्यु-एन-त्संगला बुद्धाची चंदन व रौप्य प्रतिमा कोणी दिली ?

४. ह्यु-एन-त्संगने महाराष्ट्रातील मराठ्यांविषयी काय लिहिले आहे ?

५. ह्यु-एन-त्संग याने लिहिलेल्या प्रवास वर्णनाचे नाव काय आहे ?

### ३.२.२ वर्धन घराणे

ठाणेश्वर येथे वर्धन घराण्याची स्थापना पुष्यभूती याने केली. तो गुप्ताचा संस्थानिक असावा. त्याने ६व्या शतकाच्या प्रारंभी वर्धन घराण्याचे राज्य स्थापन केले. तो शिवाचा उपासक होता.

त्याच्यानंतर नंदिवर्धन (नरवर्धन) व राज्यवर्धन प्रथम हे वर्धन राजे होऊन गेले. राज्यवर्धन प्रथम याचा पुत्र आदित्यवर्धन हा पराक्रमी होता. आदित्यवर्धन याचा विवाह मगधच्या गुप्त सम्राटाची कन्या महासेनागुप्त हिच्याशी झाला होता. या विवाहसंबंधामुळे वर्धन घराण्याची प्रतिष्ठा वाढीस लागली होती.

**प्रभाकरवर्धन**

या आदिलवर्धन व महासेनागुप्त यांचा पुत्र होय. आदित्यवर्धनानंतर प्रभाकरवर्धन हा सत्तेवर आला. प्रभाकरवर्धनच्या काळात वर्धन सत्तेचा विस्तार झाला. प्रभाकरवर्धनच्या काळात वर्धन साम्राज्य गुजरात, पंजाब, गांधार, माळव्यापर्यंत पसरलेले होते. उत्तर भारतातीला पराक्रमी सम्राट म्हणून त्याच्याकडे पाहिले जाई. प्रभाकरवर्धनचा विवाह माळव्याच्या यशोवर्माच्या मुलीशी झाल्याने त्याचीही प्रतिष्ठा वाढली होती. मधुबन व बन्सखेडा ताम्रपटात प्रभाकरवर्धन हा सूर्योपासक होता असे म्हटले आहे. बाणभट्टाने हर्षचरित या ग्रंथात प्रभाकरवर्धनाच्या पराक्रमाचे मोठे अलंकारिक वर्णन केले आहे. प्रभाकरवर्धनास दोन पुत्र होते. (१) राज्यवर्धन (दुसरा), (२) हर्षवर्धन व एक कन्या होती तिचे नाव राजश्री होते.

राजश्रीचा विवाह कनोजचा मौखरी राजा गृहवर्मन याच्याशी झालेला होता. हुणांच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्याच्या मोहिमेवर राज्यवर्धन गेला असतानाच प्रभाकरवर्धन मरण पावले. त्यांच्याबरोबर त्याची पत्नी यशोमतीदेवी सती गेली होती. वडिलांच्या मृत्यूची बातमी समजताच हुणाविरुद्धची मोहीम अर्धवट सोडून तो परत आला.

- **राज्यवर्धन**

राज्यवर्धन इ.स. ६०५ मध्ये सत्तेवर आला. आई-वडिलांच्या निधनामुळे त्याला विरक्ती आली. आपले राज्य कनिष्ठ भाऊ हर्षवर्धनला देऊन राज्यत्याग करावयास तयार झाला; परंतु हर्षाने खुद्द राज्य स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे त्यास राज्यारोहण करणे भाग पडले.

बंगालचा राजा शशांक व कनोजचा राजा गृहवर्मन (राजश्रीचा पती) यांच्यात शत्रुत्व होते. बंगालचा राजा शशांकने पूर्व माळव्याचा राजा देवगुप्त याच्याशी मैत्री करून कनोजच्या गृहवर्मनवर आक्रमण केले. या आक्रमणात गृहवर्मन (राजश्रीचा पती) ठार झाला. हर्षवर्धनची बहीण राजश्री हिला कैद करून नेण्यात आले. ही बातमी राजवर्धनला समजताच त्याने बंगाचा राजा शशांक व माळव्याचा राजा देवगुप्त या दोघांचा बदला घेण्यासाठी त्यांच्यावर आक्रमण केले. या आक्रमणात माळव्याचा राजा देवगुप्ताचा पराभव झाला. पण बंगालचा राजा शशांक याने मात्र कटकारस्थान करून राज्यवर्धनलाच ठार केले. राज्यवर्धनच्या मृत्यूनंतर हर्षवर्धन इ.स. ६०६ मध्ये वर्धन घराण्याचा राजा बनला. ठाणेश्वर येथे तो गादीवर बसला. राजश्री आईवडिलांच्या मृत्यूमुळे अति दुःखी झाली. तिला आपले जीवन नकोसे झाले. तिने आत्मघात करायचा ठरविले. दूर विंध्य पर्वतातील अरण्यात निघून गेली.

● **सम्राट हर्षवर्धन** (इ.स. ६०६-४७)

राज्यवर्धनच्या मृत्यूनंतर हर्षवर्धन ठाणेश्वरचा राजा झाला.

**पूर्वचरित्र** : हर्षवर्धनचा जन्म इ.स. ५९० मध्ये झाला. तो प्रभाकर वर्धन याचा कनिष्ठ पुत्र होय. त्याला राजपुत्राला योग्य अशा प्रकारचे शास्त्रे व शस्त्रांचे शिक्षण मिळाले होते. त्याच्याकडे राज्यकर्ता या नात्याने अनेक श्रेष्ठ प्रतीचे गुण होते. त्याशिवाय आई व वडिलांच्या घराण्याकडून शौर्य, धैर्य, संस्कार यांचा वारसा मिळाला होता.

**हर्षवर्धनापुढील समस्या** : इ.स. ६०६ साली हर्षवर्धन हा ठाणेश्वरचा राजा झाला. तेव्हा हर्षवर्धनापुढे खालील कांही अडचणी होत्या.

१. राज्यारोहणप्रसंगी हर्षाचे वय १६ वर्षाचे होते. राज्यकारभाराचा त्याला कोणताही अनुभव नव्हता.

२. हर्षवर्धनचे वडील प्रभाकरवर्धन यांचे निधन झाले होते व हर्षाची आई यशोमती ही सती गेली होती.

३. हर्षवर्धनची बहीण राजश्री ही विधवा झाली होती. तिने कैदेतून आपली सुटका करून घेऊन विंध्य पर्वतात पलायन केले होते. राजश्रीचा शोध घेणे ही हर्षवर्धन पुढील समस्या होती.

४. बंगालचा राजा शशांकने कटकारस्थाने करून हर्षाच्या वडिलबंधू राज्यवर्धनाचा खून केला होता. त्याचा बदला घेणे व शशांकचा कायमचा बंदोबस्त करणे ही एक समस्या होती. कारण त्याच्या सामर्थ्यात वाढ होत होती.

५. हर्षाची बहीण राजश्री विधवा होती. तेव्हा कनोजच्या वारसाचा प्रश्न सोडवणे आवश्यक होते.

६. ठाणेश्वरच्या वर्धनवंशाची डळमळीत झालेली राजकीय घडी पुन्हा व्यवस्थित बसवावयाची होती. वर्धन साम्राज्याचा विस्तार घडवून आणणे व प्रबळ सत्तेची स्थापना करणे हे हर्षापुढील एक आव्हानच होते.

हर्षवर्धनाने आपला राज्याभिषेक समारंभ करवून घेतला. ठाणेश्वर व कनोजच्या राज्यातून सैन्याची जमवाजमव केली. कामरूपचा (आसाम) राजा भास्कर वर्मा यास मदतीस बोलावले. शशांक व देवगुप्त यांचा पराभव करण्याची प्रतिज्ञा व योजना आखली. त्या दृष्टीने शशांकच्या पराभवासाठी आपला सेनापती भट्टी यास पाठविले व स्वतः देवगुप्तावर चालून गेला.

### देवगुप्ताचा पराभव

हर्षवर्धनाने कनोजजवळ देवगुप्ताचा पराभव केला. परंतु त्याचवेळी देवगुप्ताने राजश्रीची सुटका केली. ती दुःखी झाल्यामुळे तिला आपले जीवन नकोसे झाले. म्हणून विंध्य पर्वताच्या अरण्यात निघून गेली. हर्षाने तिचा शोध घेण्यास सुरुवात केली. अखेर अरण्यात चिता पेटवून जीव देत असताना हर्ष तिथे पोहोचला. त्याने तिचे मन वळवून तिला कनोजला परत आणले. भट्टीने शशांक गुप्ताचा पराभव करून त्यास त्यांच्या देशात परतावून लावले.

### कनोजचा राजा

राजश्री निपुत्रिक असल्याने कनोजच्या वारशाचा प्रश्न होता. कनोजच्या सभेने व मंत्रिपरिषदेने हर्षानेच कनोजचे राज्यपद सांभाळावे असा ठराव पास केला व अशा प्रकारे हर्ष कनोजचा राजा झाला. प्रथम त्याने ५ वर्षे राजपुत्र शिलादित्य या नावाने राज्यकारभार केला. परंतु पुढे मात्र राजश्रीच्या व कनोजच्या मंत्रिमंडळाच्या विनंतीवरून कनोजचे राज्यपद स्वीकारले. (इ.स. ६११) त्यानंतर कनोज व ठाणेश्वरचे राज्य एकत्र करून कनोज हीच आपली नवीन राजधानी बनविली. तेथून त्याच्या कार्याला अधिक गती मिळाली.

### हर्षवर्धन व शशांक संघर्ष

या दोघांमधील संघर्ष अनेक वर्षे चालू असावा. प्रथम जरी भट्टीला पाठवून त्याचा बंदोबस्त केला होता तरी परंतु त्याचा कायमचा बंदोबस्त झालेला नव्हता. त्याने माळव्याच्या देवगुप्ताशी मैत्री करून कनोजचा राजा गृहवर्माला ठार मारले होते. राजा शशांकाविषयी हर्षाच्या मनात चीड निर्माण होणे स्वाभाविक होते. शशांक हा गौड (बंगाल) देशाचा शासक असून तो ब्राह्मण धर्माचा पुरस्कर्ता होता तर बौद्ध धर्माचा कट्टर द्वेष्टा होता. त्याने पाटलीपुत्र व कुशीनगर येथील बौद्ध विहार व स्तूप उद्ध्वस्त केले होते. गया येथील बोधीवृक्ष त्याने कापला. तो शिवाचा उपासक होता. अशा या शशांकाविरुद्धची लष्करी मोहीम हाती घेण्यापूर्वी हर्षवर्धनाने खूप जय्यत तयारी केली होती. इ.स. ६१९ ते ६३५ या काळात त्याने शशांकविरुद्ध तीन मोहीमा हाती घेतल्या. पण हर्ष-शशांक यांच्यात कोठे व केव्हा युद्ध झाले व त्यात कोण विजयी झाले याची माहिती उपलब्ध नाही. इ.स. ६५९ पर्यंत राजा शशांक हा जिवंतच होता असे उल्लेख आहेत.

आर. सी. मुजुमदार यांच्या मते, हर्षवर्धनाला शशांकाच्या मृत्यूपर्यंत त्याचा पराभव करता आला नाही. तो हर्षवर्धनाच्या मार्गातील काटा बनून होता. तसे पाहिले तर शशांक प्रथम साधा सरदार होता; परंतु त्याच्या उत्तर आयुष्यात मात्र तो पूर्वेकडील एक शक्तिशाली राजा झाला. तो कर्णसुवर्णाचा अधिपती होता.

### हर्षाचा साम्राज्यविस्तार

ह्यु-एन-त्संगच्या प्रवास वर्णनाच्या आधारे हर्षाच्या दिग्विजयाविषयी माहिती मिळते. त्याने आपल्याबरोबर एक लक्ष घोडेस्वार, ६० हजार पायदळ घेतले होते. तो विजयासाठी बाहेर पडला होता.

### पश्चिम भारतावर स्वारी

पश्चिम भारतात त्यावेळी मैत्रक वंशातील ध्रुवसेन द्वितीय सम्राट राज्य करीत होता. हर्षवर्धनाने त्याच्यावर स्वारी

केली. त्यात ध्रुवसेन द्वितीयचा पराभव झाला. ध्रुवसेन जिवाच्या भितीने पळून गेला. तेव्हा हर्षवर्धनाने त्याला पकडून आणले व त्याला आपला जावई करून त्याच्याशी सख्य निर्माण केले. हर्षाने ही मोहीम केव्हा पार पाडली हे सांगता येत नाही. पण त्याला आपला मांडलिक बनवून त्यास आपले सार्वभौमत्व स्वीकारावयास लावले.

### हर्षवर्धन व चालुक्य राजा दुसरा पुलकेशी यांचे संबंध

हर्षाच्या समकालीन दक्षिण भारतात (वातापी) बदामी येथे दुसरा पुलकेशी हा चालुक्यसम्राट राज्य करीत होता. जसा हर्ष उत्तर भारताचा अधिपती होता तसा दुसरा पुलकेशी हा दक्षिण भारताचा स्वामी होता. दोघेही श्रेष्ठ प्रतीचे विजेते, योद्धे होते. हर्षवर्धनाने दुसऱ्या पुलकेशीशी युद्धासाठी प्रचंड सैन्य उभारले. त्याने मोठी मोहीम हाती घेतली. परंतु दुसऱ्या पुलकेशीने त्यास नर्मदेवरच अडविले. दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले. विजय कोणालाच मिळाला नाही; परंतु दुसऱ्या पुलकेशीचा पराभव करून त्यावर स्वामित्व मिळविण्याचे हर्षाचे स्वप्न मात्र धुळीस मिळाले. हर्ष व दुसरा पुलकेशी यांच्यात करार झाला. त्यानुसार दोघांनीही नर्मदा नदी ही आपल्या राज्याची सीमा मान्य केली व दोघांनीही एकमेकांच्या प्रदेशावर आक्रमण न करण्याचे मान्य केले.

त्याचप्रमाणे हर्षाने नेपाळ, पंजाब, काश्मीर, मिथिला, सिंध देशावर स्वारी केली व ती राज्य जिंकून घेतली. काहींच्या मते हर्षाने फक्त त्या प्रदेशावर स्वारी केली होती. प्रत्यक्षात तो प्रदेश त्याच्या साम्राज्यात नव्हता.

त्याशिवाय हर्षवर्धनाने मगधचा प्रदेश ओरिसा, कोंगाडा राज्यांवर स्वारी करून तो आपल्या साम्राज्यात विलीन केला. त्याशिवाय गौड (बंगाल), वंग (पू. द. बंगाल) राज्य आपल्या साम्राज्यात विलीन केले.

### हर्षाचे साम्राज्य व वैभव

इतिहासकारांमध्ये हर्षाच्या साम्राज्याविषयी मतभेद आहेत; परंतु उत्तरेस हिमालय पर्वत तर दक्षिणेस नर्मदा नदी पूर्वेस कामरूप तर पश्चिमेस सिंधपर्यंत पसरले होते.

नेपाळ, काश्मीर, सिंध, कामरूप येथील राज्यांशी त्याचे मैत्रीचे संबध होते. त्याशिवाय भारताबाहेर चीनचा सम्राट व पार्शियन सम्राट यांच्याशीही राजनैतिक संबंध होते. चीनचा राजदूत हर्षाच्या दरबारी होता. तर हर्षाचा राजदूत चीनच्या दरबारी होता.

## स्वयं अध्ययन प्रश्न-२

**(अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१. ठाणेश्वर येथे वर्धन घराण्याची स्थापना ......... याने केली.

(अ) नंदिवर्धन (ब) हर्षवर्धन (क) पुष्यभूती (ड) राज्यवर्धन.

२. प्रभाकरवर्धनास .......... पुत्र होते.

(अ) तीन (ब) दोन (क) चार (ड) पाच

३. बंगालचा राजा शशांक व कनोज राजा ........... यांच्यात शत्रूत्व होते.

(अ) देवगुप्त (ब) गृहवर्मन (क) आदित्यवर्मन (ड) रामगुप्त

४. हर्षवर्धन हा इ.स. ........... मध्ये वर्धन घराण्याचा राजा बनला.

(अ) ५०५ (ब) ६०६ (क) ७०८ (ड) ८०८

५. बंगालचा राजा शशांक हा ............. धर्माचा पुरस्कर्ता होता.

(अ) जैन (ब) ब्राह्मण (क) बौद्ध (ड) आजीवक

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. प्रभाकरवर्धनाच्या वडिलांचे नाव काय होते ?

२. हर्षवर्धनचा सेनापती कोण होता ?

३. हर्षवर्धनच्या आईचे नाव काय होते ?

४. हर्षवर्धनच्या बहिणीचे नाव काय होते ?

५. कामरूपच्या (आसामच्या) कोणत्या राजाची हर्षवर्धनाने मदत घेतली ?

### ३.२.३ चालुक्य

दक्षिण भारताच्या प्राचीन इतिहासात बदामीच्या चालुक्य घराण्यास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चालुक्यांच्या दोन शाखा होत्या. (१) पश्चिमेकडील शाखा - बदामीचे चालुक्य, (२) पूर्वेकडील शाखा - कल्याणीचे चालुक्य. इ.स. ५३५ ते इ.स. ७४५ या सुमारे २०० वर्षांहून अधिक काळ चालुक्यांची सत्ता होती. दक्षिण भारतातील सातवाहन व वाकाटक कालखंडानंतरचा सर्वात उल्लेखनीय कालखंड हा चालुक्यांचा होय. नर्मदेपासून कृष्णा नदीपर्यंतच्या प्रदेशावर चालुक्यांचे राज्य होते.

चालुक्य कोण व त्यांचा इतिहास काय याविषयी इतिहासकारांत मतभेद आहेत. व्ही. ए. स्मिथ यांच्या मते, चालुक्य परकीय आक्रमकाच्या जमातीची शाखा होय. इतर इतिहासकार हे मान्य करीत नाहीत. डी. सी. सरकारच्या मते कनारेस कुळाचे क्षत्रीय होते. ते स्वतःला हरितीपुत गोत्राचे क्षत्रीय म्हणवीत. सप्तमातृकाचे पूजक व कार्तिकेय स्वामींचे उपासक होते. विष्णू हे त्यांचे दैवत होते. कल्याणीचे चालुक्य आपला संबंध मनुचे सोम क्षत्रीय म्हणवीत असे. अयोध्येचे रहिवासी असून ५१ राजे झाले तर दक्षिण भारतात १६ अशी वंशावळ सांगतात.

**बदामीचा चालुक्य वंश**

विजापूर (कर्नाटक) जिल्ह्यात वातापी उर्फ बदामी येथे जयसिंगने मांडलिकाच्या स्वरूपात आपली सत्ता स्थापन केली. त्याच्यानंतर रणराग (रामराजा) हा होऊन गेला.

### पुलकेशी पहिला (५३५-५६६)

हा रणरागचा पुत्र होय. तो पहिला स्वतंत्र राजा होय. पुलकेशी पहिला हाच चालुक्य वंशाचा खरा संस्थापक होय. त्याने महाराज, सत्याश्रय, रणविक्रमसिंह, वल्लभ पदव्या घेतल्या. त्याने अनेक मोहिमा यशस्वी केल्या व अश्वमेध यज्ञही केला. विजापूरनजीकच्या वातापी किल्ल्याची पायाभरणी यानेच केली.

### कीर्तिवर्मन पहिला (५६७-५९७)

हा पुलकेशी प्रथमचा पुत्र होय. त्याने आपल्या ११ वर्षाच्या कारकीर्दीत मौर्य, कदंब आणि नळ राजांचा पराभव करून आपले राज्य मजबूत केले. त्याचप्रमाणे वंग, अंग, मद्रक, पांड्य, चोल आणि इतर राजांना त्याने आपले मांडलिक बनवले. त्याने अनेक मंदिरे उभारली.

### मंगलेश (५९७-६१०)

कीर्तिवर्मनचा पुत्र लहान असल्यामुळे त्याचा भाऊ मंगलेश राजा झाला. त्यानेही अजोड बिरुदे घेतली होती. तो विष्णूचा भक्त होता. त्याने कल्चुरी व रेवती राजांचा पराभव करून कल्चुरीच्या राजास कैद केले व रेवती राज्यावर इंद्रवर्मन याची राज्यपालपदी नेमणूक केली. त्याच्या कारकिर्दीच्या अखेरीस झालेल्या यादवी युद्धात त्याचा पुतण्या दुसरा पुलकेशी विजयी होऊन गादीवर आला.

### पुलकेशी दुसरा (६१०-६४२)

चालुक्य वंशातील हा सर्वश्रेष्ठ सम्राट होय. राज्यप्राप्ती हक्कासाठी त्याला संघर्ष करावा लागला. तो किर्तीवर्मनचा पुत्र होय. मंगलेशच्या अखेरच्या काळात झालेल्या यादवी युद्धामुळे चालुक्य साम्राज्यावर मोठे संकट कोसळले. त्याचा फायदा घेऊन शत्रू वरचढ होण्याची पाळी आली. परंतु दुसऱ्या पुलकेशीने परिस्थिती मोठ्या हिमतीने सावरली आणि ज्या शेजारच्या राजांनी बंडखोरी केली होती, आक्रमण केले होते, त्या सर्वांना नमवून बदामीच्या चालुक्याच्या इतिहासातील अतिउच्च शिखर प्राप्त केले. त्याच्या पराक्रमाची व विजयाची स्तुतिस्तोत्रे कर्नाटकातील ऐहोळ येथील जैन मंदिराच्या भिंतीवर कोरली आहेत. पुलकेशीच्या दरबारातील राजकवी रविकीर्ती याने 'प्रशस्ती' हे काव्यच पुलकेशीच्या पराक्रमावर लिहिले आहे.

पुलकेशी दुसरा याचे विजय

१. कदंबाची राजधानी वनवासी याने जिंकली.

२. म्हैसूर परिसरातील गंग राजांना पराभूत केले. गंगाच्या राजकन्येशी त्याने विवाह केला.

३. अपरान्त (उत्तर कोकण) येथील राजाचा पराभव केला. तेथे चालुक्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले.

४. गुर्जरांना पराभूत करून गुजरातमध्ये आपला सुभेदार नेमला.

५. लाट, मालव हे प्रदेशही त्याने जिंकले होते.

६. हर्षाशी संघर्ष : त्याच्या समकालीन उत्तर भारतात हर्षवर्धन राज्य करीत होता. त्याने उत्तर भारतातील अनेक राज्यांशी संघर्ष केला. उत्तर भारत काबीज केल्यावर हर्ष दक्षिण भारत जिंकण्यासाठी निघाला. प्रचंड सैन्य त्याच्याजवळ होते. त्याला दुसऱ्या पुलकेशीने चोख उत्तर दिले. त्याने इतरांचे साहाय्य घेऊन नर्मदेच्या पलीकडे अडविले. दोघांतील संघर्षात पुलकेशीने हर्षाचा पराभव केला. हा संघर्ष इ.स. ६३१ ते ६३४ या काळात घडून आला. चिनी प्रवासी ह्यु-एन-त्संग या भागात फिरतीवर असताना त्याने हा संघर्ष प्रत्यक्ष पाहिला होता.

हर्षावरील विजयाप्रीत्यर्थ त्याने स्वतः परमेश्वर ही पदवी घेतली. दोघांच्या राज्याची सीमा नर्मदा नदी ठरली.

७. दक्षिण कोसल व कलिंग देशाचे राज्य जिंकले. त्रिपूर व कुणाल किल्ले जिंकले. विष्णू कुंडिन घराण्याचा पाडाव केला. तेथील प्रदेशावर राजप्रतिनिधी म्हणून बंधू विष्णूवर्धनची नेमणूक केली. तोच पूर्वेच्या चालुक्य वेंगी घराण्याचा संस्थापक होय.

८. पल्लव सम्राट महेंद्र वर्मन (इ.स. ६००-६३०) यास पुलकेशी दुसरा याने पराभूत केले. त्यामुळे काही काळ कांचीवर चालुक्याचे वर्चस्व निर्माण झाले.

९. इ.स. ६४२ च्या सुमारास पल्लव राजा नरसिंहवर्मन याने पुलकेशी दुसरा याचा पराभव करून वातापी ऊर्फ बदामी ही त्याची राजधानी उद्ध्वस्त केली. नरसिंहवर्मनने सातत्याने चालुक्यांचा पराभव केला व त्याने केलेल्या एका युद्धात पुलकेशी दुसरा मारला गेला.

**विक्रमादित्य प्रथम (६५५-६८१)**

पुलकेशीच्या मृत्यूनंतर १३ वर्षे चालुक्यांचे राज्य पल्लवांच्या वर्चस्वाखाली होते. परंतु दुसऱ्या पुलकेशीच्या विक्रमादित्य या पुत्राने आपला बंधू जयसिंह वर्मन आणि गंग घराण्यातील राजा दुर्विनीत या आपल्या आजोबाच्या (आईचे वडील) मदतीने पल्लव राजा नरसिंहवर्मनच्या कब्जातून राजधानी बदामी परत मिळविली. त्याने आपले बरेच राज्य पल्लवांकडून परत मिळविले. त्याने अनेक पदव्या घेतल्या. सत्याश्रय, रणरसिक, राजमल्ल, श्रीवल्लभ, भट्टारक, परमेश्वर, महाराजधिराज. त्याने देवालयांना व ब्राह्मणांना देणग्या दिल्या.

त्याने आपला बंधू जयसिंहवर्मन यास गुजरात प्रांताचा प्रतिनिधी नेमले. तेथून गुजरात येथील चालुक्य वंशाची शाखा राज्य सुरू केले.

विक्रमादित्याचाही परमेश्वरवर्मन या पल्लव सम्राटाने पराभव केला.

**विनयादित्य (६८१-६९६)**

विनयादित्यानेसुद्धा अनेक बिरुदे घेतली होती. त्याने साम्राज्यविस्तारासाठी मोहीम होती घेऊन पल्लव, करभरी, केरळ, होयसळ, मालव, चोल, पांड्य, गंग यांचा पराभव केला. त्याला खेमर, पर्शियन, सिलोनच्या सम्राटांकडून खंडणी मिळाली होती.

**विजयादित्य (६९७-७३३)**

आपल्या वडिलांप्रमाणे व आजोबांप्रमाणेच मोहिमा काढल्या होत्या. त्याचप्रमाणे प्रशासकीय व्यवस्था उत्तम ठेवली. पल्लवांशी संघर्ष वगळता त्याचा काळ शांततेचा होता. परमेश्वरवर्मनचा पराभव करून त्याच्याकडून खंडणी घेतली. पट्टदकल येथे त्याने विजयाचे प्रतीक म्हणून शिवाचे मंदीर बांधले. त्याच्या बहिणीने लक्ष्मीधराचे जैन मंदिर बांधले. त्याच्या काळात अरबांनी सिंध घेतला.

**दुसरा विक्रमादित्य (७३३-७४४)**

युवराज असताना त्याने परमेश्वरवर्मन पल्लव सम्राटाचा पराभव केला. त्याने वाजत-गाजत मिरवणूक कांची नगरात काढली. कांची मंदिरात स्वतः नाव कोरले. त्याची राणी लोकमहादेवीने पट्टदकल येथे विरुपाक्षचे (लोकेश्वर) जैन मंदिर बांधले. तसेच त्याने चंदेल, केरळ, पांड्य, कलभरी या राजांचाही पराभव करून दक्षिण महासागराच्या (हिंदी महासागराच्या) किनाऱ्यावर आपल्या दक्षिण विजयाचे प्रतीक म्हणून विजयस्तंभ उभारला. अरबांचे आक्रमण त्याच्या गुजरातच्या सुभेदाराने परतावून लावले. तो विद्वानांचा व कलेचा भोक्ता होता.

**दुसरा कीर्तिवर्मन (७४४-७५७)**

कीर्तिवर्मन दुसरा हा बदामीच्या चालुक्य वंशातील शेवटचा राजा होय. राष्ट्रकूट सम्राट दंतीदुर्गने कीर्तिवर्मनचा पराभव करून त्याचे राज्य बुडविले. अशा रीतीने चालुक्य राज्याची अखेर झाली.

**पूर्वेकडील चालुक्य**

ही चालुक्य घराण्याची दुसरी शाखा होती. या शाखेने १८ वर्षे राज्य केले. दुसऱ्या पुलकेशीचा बंधू विष्णूवर्धन हा या शाखेचा पहिला राजा होता. तो त्या पूर्वी पिश्तेपूर विभागाचा राज्यपाल होता. त्याने पिश्तपूर राजधानी करून चालुक्याचे दुसरे राज्य जाहीर केले. त्याने आपली राजधानी वेंगी इथे आणली. म्हणून या शाखेला वेंगीचे चालुक्य असेही म्हटले जाते.

कल्याणीचे चालुक्य ही आणखी एक शाखा चालुक्य घराण्याची होती. राष्ट्रकुटांशी लढ्यात कमजोर झालेली कल्याणीचे चालुक्य ही शाखा राष्ट्रकुटांची मांडलिक सत्ताच होती. राष्ट्रकूट राजा दुसरा कर्क याच्या काळात चालुक्य मांडलिक सरदार दुसरा तैल याने आपले स्वतंत्र राज्य जाहीर केले. पुढे इ.स. १२ शतकात कल्याणीच्या चालुक्यांची सत्ता नष्ट झाली.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**(अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१. चालुक्य घराण्याच्या एकूण .......... शाखा होत्या.

(अ) एक (ब) दोन (क) तीन (ड) चार

२. विजापूर जिल्ह्यात बदामी येथे ........... याने मांडलिकाच्या स्वरूपात चालुक्य वंशाची सत्ता स्थापन केली.

(अ) कीर्तिवर्मन पहिला (ब) मंगलेश (क) जयसिंग (ड) विजयादित्य

३. चालुक्य वंशातील ........... हा सर्वश्रेष्ठ सम्राट होय.

(अ) कीर्तिवर्मन दुसरा (ब) विक्रमादित्य पहिला

(क) पुलकेशी पहिला (ड) पुलकेशी दुसरा

४. दुसरा विक्रमादित्याची राणी ............... ने पट्टदकल येथे विरुपाक्षचे जैन मंदिर बांधले.

(अ) महामायादेवी (ब) जनमहादेवी (क) लोकमहादेवी (ड) आदिमायादेवी.

५. ................. याने आपली राजधानी वेंगी येथे आणली म्हणून या शाखेला वेंगीचे चालुक्य असेही म्हटले जाते.

(अ) दुसरा पुलकेशी (ब) विजयादित्य (क) विष्णूवर्धन (ड) कीर्तिवर्धन.

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. चालुक्यवंशाची पश्चिमेकडील शाखा कोणती ?

२. कोणत्या नदीपर्यंतच्या प्रदेशावर चालुक्याचे राज्य होते ?

३. चालुक्य वंशाचा खरा संस्थापक कोण ?

४. दुसऱ्या पुलकेशीच्या पराक्रमावर लिहिलेली प्रशस्ती कोणी लिहिली आहे ?

५. पूर्वेकडील चालुक्य वेंगी घराण्याचा संस्थापक कोण ?

### ३.२.४ पल्लव

पल्लव राजवंश हा प्राचीन काळात दक्षिण भारतावर राज्य करणारा एक प्रमुख राजवंश होता. या पल्लव राजघराण्याच्या उदयासंबंधी इतिहासात फारशी माहिती मिळत नाही. आणि जी माहिती मिळते त्याबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. श्री. व्यंकय्या व बी.एल. राइस यांच्या मते पल्लव हे मूळचे पर्शियन (पल्लव) होते. तर डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार यांच्या मते, पल्लव राजे मूळचे द्रविडीयन वंशिक गटातील होते. पल्लव हे सातवाहनांचे मांडलिक होते व सातवाहनांच्या सत्तेच्या अस्तातनंतर ते स्वतंत्र झाले. ते सातवाहनांचे मांडलिक असल्याने त्यांना काही इतिहासकारांनी ब्राह्मण ठरविले आहे. ब्राह्मण व नागक्षत्रीय यांच्या संयोगातून त्यांची उत्पत्ती झाल्याचे एका शिलालेखात म्हटले आहे. ब्राह्मण व स्थानीय द्रविडी आदिवासी यांच्या मिलनातून त्यांचा जन्म झाला हे मत मान्य मत आहे.

**पल्लवांचा पूर्वेतिहास**

पल्लवांच्या एका प्राकृत शिलालेखात अनेक पल्लव राजांची नावे दिली आहेत. त्यात शिवस्कंदवर्मन नावाच्या प्राचीन राजाचा उल्लेख आहे. तो चौथ्या शतकात होऊन गेला. त्याच्याविषयी विशेष माहिती मिळत नाही. पण त्याने अश्वमेध, वाजपेय यज्ञ केले होते. त्याने कृष्णा नदीच्या प्रदेशावर राज्य केले.

**विष्णूगोप**

या पल्लव राजाचा उल्लेख समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद शिलालेखात आहे. समुद्रगुप्ताने दक्षिणेतील ज्या १२ राजांचा पराभव केला होता त्यापैकी कांचीचा विष्णुगोप हा एक आहे. इ.स. ३५० ते इ.स.३७५ या काळात त्याने राज्य केले असावे.

**सिंहविष्णू (इ.स. ५७५ ते ६००)**

पल्लव वंशाचा खरा संस्थापक म्हणून इतिहासकार सिंहविष्णू याचा उल्लेख करतात. याच्यापासूनच पल्लव घराण्याची सुसंगत माहिती मिळते. सिंहविष्णू स्वतःला 'पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ' (अवंतीसिंह) म्हणवून घेत असे. याच्या कारकिर्दीत पल्लवांच्या सत्तेचा विस्तार झाला. त्याने चोल राजांचा प्रदेश जिंकून कृष्णेपासून कावेरीपर्यंत आपली सत्ता निर्माण केली. सिलोनच्या राजाचा त्याने पराभव केला. तो विष्णूभक्त होता व भारवी या थोर संस्कृत कवीस त्याने आपल्या दरबारात स्थान दिले. महाबलीपूरमच्या अवशेषांमध्ये सिंहविष्णू व त्याच्या दोन राण्यांचा प्रतिमा आहेत.

**महेंद्रवर्मन (प्रथम) इ.स. ६०० ते ६३०)**

हा सिंहविष्णूचा पुत्र व पल्लव घराण्यातील सर्वात पराक्रमी राजा होता. तसाच तो संस्कृत विद्वानही होता. संस्कृतमध्ये काही श्लोक व संगीतावर एक ग्रंथही लिहिला आहे. संगीत, चित्रकला, शिल्पकला इत्यादींना त्याने प्रोत्साहन दिले. अखंड शिलेतून मंदिर खोदण्याची कला यानेच सुरू केली.

त्याने स्वतःला पुढील पदव्या लावल्या होत्या.

१. चैत्यकारी (मंदिर बांधणारा)

२. चित्रकारपुल्ली (सर्वश्रेष्ठ चित्रकार)

३. मस्तीविलास, विचित्रचित्र, गुणभर, तो दानशूर, उपकारकर्ता म्हणून प्रसिद्ध होता. त्याने अनेक मंदिरे बांधली.

याच्या काळातच पल्लव-चालुक्य संघर्ष सुरू झाला. चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याने महेंद्रवर्मनचा अनेक वेळा पराभव केला. पल्लवांना आपला बराच प्रदेश चालुक्यांना द्यावा लागला.

**नरसिंहवर्मन (प्रथम) (इ.स. ६३० ते ६६८)**

हा महेंद्रवर्मनचा पुत्र व पल्लव वंशातील सर्वश्रेष्ठ सम्राट होय. त्याने दुसरा पुलकेशी याचा तीन वेळा पराभव

केला. एवढेच नव्हे तर चालुक्यांची राजधानी बदामी (वातापी) त्याने जिंकून घेतली. त्याने स्वतःला 'वातापीकोंडा' ही पदवी लावली होती. 'महामल्ल' हे बिरुद त्याने लावले होते. त्या काळात ह्यु-एन-त्संगने याच्या राज्यास भेट दिली होती. ह्यु-एन-त्संग त्याच्या दरबारातही गेला होता. नरसिंहवर्मनने लंकेचा एक राजपुत्र मानवर्मा याला आश्रय देऊन त्याच्या साहाय्यार्थ लंकेवर दोनदा नौदल पाठविले व त्याला लंकेचे सिंहासन मिळवून दिले. नरसिंहवर्मनने चौल, चेर व कलभ्र यांचाही पराभव केला. त्याने महाबलीपूरम येथे अनेक मंदिरे उभारली.

### महेंद्रवर्मन (दुसरा) इ.स. ६६८-६७०)

याच्या दोन वर्षाच्या कारकिर्दीत घडलेली एकमेव महत्त्वाची घटना म्हणजे चालुक्य राजा पहिला विक्रमादित्य याचा त्याने पराभव केला.

### परमेश्वरवर्मन (पहिला) (इ.स. ६७० ते ६९५)

दुसऱ्या महेंद्रवर्मनचा हा पुत्र होय. त्याच्या कारकिर्दीत पुन्हा चालुक्यांशी सत्तासंघर्ष सुरू झाला. पहिला विक्रमादित्य चालुक्याने त्याचा पराभव केला. त्याची राजधानीसुद्धा त्याला गमवावी लागली; परंतु पुन्हा त्याने सैन्य जमवून चालुक्यांना कांचीवरममधून परत पाठविले. गेलेले राज्य पुन्हा मिळविले. तो शिवाचा भक्त होता. त्याने कांचीवरम येथे ईश्वराचे मंदिर बांधले.

### नरसिंहवर्मन (दुसरा) (इ.स. ६९५ ते ७२२)

हा परमेश्वर वर्मनचा पुत्र होय. त्याने स्वतःला 'राजसिंह' पदवी घेतली होती. त्याची कारकिर्द शांततेची व समृद्धीची होती. तो स्वतः विष्णूचा भक्त होता. महाबलीपूरम येथे सुप्रसिद्ध जलाशय मंदिर बांधले होते. सुप्रसिद्ध संस्कृत कवी दंडी त्याचा समकालीन होता. दंडीचे 'दशकुमारचरित' हे काव्य नाटक प्रसिद्ध आहे. त्याने बांधलेल्या अनेक मंदिरामध्ये कांची येथील कैलासनाथाचे मंदिर प्रसिद्ध आहे. त्याने आपला राजदूत व शिष्टमंडळ चीनच्या सम्राटाकडे पाठविले होते.

त्यानंतर परमेश्वरवर्मन दुसरा याने ८ वर्षे राज्य केले. त्याला पुत्र नव्हता.

### नंदिवर्मन (दुसरा) (इ.स. ७३० ते ८००)

परमेश्वरवर्मन (दुसरा) निपुत्रिक मरण पावला. त्यामुळे पल्लवांची गादी दुसऱ्या शाखेकडे गेली. तोच नंदिवर्मन द्वितीय होय. नंदिवर्मन वयाच्या १२ व्या वर्षी गादीवर आला. याची ७० वर्षांची दीर्घ कारकीर्द अनेक महत्त्वपूर्ण घटनांनी खच्चून भरली होती. त्याच्या कारकिर्दीत पुन्हा शेजारील राजसत्तांशी सतत संघर्ष, युद्ध, लढाया चालू होत्या. वेंगीचे चालुक्य, राष्ट्रकूट, चोल, पांड्य यांच्याशी लढा द्यावा लागला. चालुक्य सम्राट विक्रमादित्याने त्याचा पराभव करून कांचीच्या कैलास मंदिरावर विजयस्तंभ उभारला होता. त्याशिवाय इतर सत्तांशी लढताना पराभूत झाला. दंतीदुर्ग राष्ट्रकूट राजाने त्याचा पराभव करून स्वकन्या रेवा त्यास दिली. वेंगीच्या कीर्तिवर्मन चालुक्याने त्याचा पुन्हा पराभव केला.

तो विष्णूचा उपासक व भक्त होता. त्याने कांचीवरम येथे मुक्तेश्वराचे मंदिर बांधले होते. त्याने अश्वमेध यज्ञ केला होता. तो कला व वाङ्मय याचा भोक्ता होता. याच्या काळात थोर वैष्णव संत तिरुमंगाई होऊन गेला.

**दंतिवर्मन (इ.स. ८०० ते ८४०)**

हा नंदिवर्मनचा राष्ट्रकूट राजकन्या रेवापासून झालेला पुत्र होय. त्याच्याही काळात राष्ट्रकुटासह बाकीच्या सत्ताधीशाशी संघर्ष सुरू होता. पांड्य राजा वरगुणने त्याचा पराभव केला होता.

**नंदीवर्मन तिसरा (इ.स. ८४० ते ८६९)**

हा दंतिवर्मनचा पुत्र होय. तो एक समर्थ शासक होता. त्याने प्रबळ नौदल निर्माण केले होते. त्याच्या राजवटीच्या अखेरीस पांड्य राजाने नंदीवर्मनचा पराभव केला होता.

**नृपतुंगवर्मन (इ.स. ८६९ ते ८७९)**

नंदिवर्मन तिसरा याचा हा पुत्र होय. त्याने पांड्यांचा पराभव केला होता. त्याने विद्येच्या प्रसारास उत्तेजन दिले होते.

अपराजितवर्मन हा पल्लव राजकुळातील शेवटचा सम्राट होय. पहिला आदित्य चौल याने पल्लवांचे मांडलिकत्व पत्करण्यास नकार दिला व त्याने इ.स. ८९७ मध्ये पल्लव अपराजितवर्मनवर हल्ला करून तोंडमंडलम हा प्रदेश जिंकून घेतला व त्याला ठार केले व पल्लवांची राजवट संपली.

**स्वयं अध्ययन प्रश्न-४**

**(अ) खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१. पल्लवांच्या एका प्राकृत शिलालेखात .......... चा उल्लेख आहे.

(अ) विष्णूगोप (ब) शिवस्कंदवर्मन (क) सिंहविष्णू (ड) नरसिंहर्मन

२. समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद शिलालेखात ............. या पल्लव राजाचा उल्लेख आहे.

(अ) विष्णूगोप (ब) महेंद्रवर्मन (पहिला) (क) नंदिवर्मन (दुसरा) (ड) नरसिंहवर्मन दुसरा

३. पल्लव वंशाचा खरा संस्थापक म्हणून इतिहासकार ........ याचाच उल्लेख करतात.

(अ) नरसिंहवर्मन (ब) सिंहविष्णू (क) विष्णूगोप (ड) महेंद्रवर्मन (पहिला)

४. नरसिंहवर्मन दुसरा याने स्वतःला ........... ही पदवी घेतली होती.

(अ) राजसिंह (ब) मानसिंह (क) जयसिंह (ड) परमेश्वर

५. परमेश्वरवर्मन (दुसरा) निपुत्रिक मरण पावला, त्यामुळे पल्लवांची गादी दुसऱ्या शाखेकडे गेली तोच .......... होय.

(अ) नरसिंहवर्मन दुसरा (ब) नंदिवर्मन दुसरा

(क) परमेश्वरवर्मन पहिला (ड) महेंद्रवर्मन पहिला

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. सिंहविष्णू स्वतःला काय म्हणवून घेत असे ?

२. अखंड शिलेतून मंदिर खोदण्याची कला कोणी सुरू केली ?

३. 'वातापी कोंडा' ही पदवी कोणत्या पल्लव राजाने स्वतःला लावली होती ?

४. कोणत्या पल्लव राजाने आपला राजदूत व शिष्टमंडळ चीनच्या सम्राटाकडे पाठविले होते ?

५. पल्लव राजकुळातील शेवटचा सम्राट कोण ?

## ३.३ सारांश

प्राचीन भारताच्या इतिहासाचा अभ्यास करतांना जी काही मोजकी वैभवशाली राजघराणी होऊन गेली, त्यामध्ये उत्तरेकडील वर्धन घराणे आणि दक्षिणेकडील चालुक्य व पल्लव या घराण्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. गुप्तसत्तेच्या अस्तानंतर उत्तर भारतात पुन्हा राजकीय गोंधळ निर्माण झाला असताना अनेकांनी साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. परंतु वर्धनाचा अपवाद वगळता इतरांना त्यात यश आलेले दिसत नाही. या घराण्यात सर्वात प्रभावी कारकीर्द हर्षवर्धनाची होऊन गेली. त्याच्यापुढे अनेक समस्या असताना त्या समस्यांना त्याने यशस्वीपणे तोंड देऊन आपले साम्राज्य वाढविले आणि वैभवाच्या शिखरावर नेऊन ठेवले.

ज्याप्रमाणे उत्तरेत वर्धन घराण्याने आपला प्रभाव निर्माण केलेला होता. त्याचवेळी दक्षिणेत चालुक्य आणि पल्लव या दोन घराण्यांनी आपली सत्ता स्थिर करून विस्तारीत केलेली दिसते. शिल्पकला, मूर्तिकला, वास्तुकला, साहित्य, वाङ्मय अशा सर्वच क्षेत्रात इतिहासात नोंद होईल अशीच कामगिरी केलेली आहे. चालुक्य घराण्यात दुसरा पुलकेशी हा सर्वश्रेष्ठ सम्राट होऊन गेला. अन्य सम्राटांनीही आपल्या राज्याचे संरक्षण करून भरभराट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

प्राचीन कालखंडात दक्षिण भारतावर राज्य करणारा आणखी एक राजवंश म्हणजे पल्लव घराणे. पल्लव वंशातही विष्णुगोप, सिंहविष्णू, नरसिंहवर्मन प्रथम, नरसिंहवर्मन द्वितीय, नंदिवर्मन यासारखे कर्तबगार राजे होऊन गेले.

## ३.४ पारिभाषिक शब्द - अर्थ

मांडलिक - सार्वभौम सत्तेच्या ताब्यातील राजा

बिरूद - पदवी / चिन्ह

मुद्रा - शिक्का व ठसा

पायदळ - खडे सैन्य

अश्वदळ - घोड्याचे सैन्य

हत्तीदल - हत्तींचे सैन्य

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

(१) देवगुप्त (२) बाणभट्ट (३) हर्षवर्धन

(४) विक्रमांकदेव (५) इ.स. ६३०

**(ब) एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. हर्षवर्धन याच्या दरबारातील बाणभट्ट हा आश्रित कवी होता.

२. हर्षवर्धनाने ह्यु-एन-त्संगला प्रयाग धर्मसभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठी पाचारण केले.

३. ह्यु-एन-त्संगला बुद्धाची चंदन व रौप्य प्रतिमा कौशांबीच्या राजाने दिली.

४. ह्यु-एन-त्संगने महाराष्ट्रातील मराठ्यांविषयी मराठे शूर व स्वाभिमानी आहेत असे लिहिले आहे.

५. ह्यु-एन-त्संग याने लिहिलेल्या प्रवास वर्णन ग्रंथाचे नाव 'वा-तांग-सियुकी' असे आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

(१) पुष्यभूती (२) तीन (३) गृहवर्मन (४) ६०६ (५) ब्राह्मण

**(ब) एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. प्रभाकरवर्धनाच्या वडिलांचे नाव आदित्यवर्धन असे होते.

२. हर्षवर्धनाचा सेनापती भंडी हा होता.

३. हर्षवर्धनाच्या आईचे नाव यशोमतीदेवी असे होते.

४. हर्षवर्धनाच्या बहिणीचे नाव राजश्री असे होते.

५. कामरूपच्या (आसामच्या) भास्कर वर्मन या राजाची हर्षवर्धनने मदत घेतली.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

(१) दोन (२) जयसिंग (३) पुलकेशी दुसरा

(४) लोकमहादेवी (५) विष्णूवर्धन

**(ब) एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. बदामीचे चालुक्य ही चालुक्यवंशाची पश्चिमेकडील शाखा होय.

२. नर्मदेपासून कृष्णानदीपर्यंतच्या प्रदेशावर चालुक्यांचे राज्य होते.

३. पुलकेशी पहिला हा चालुक्य वंशाचा खरा संस्थापक होय.

४. रविकीर्ती या राजकवीने 'प्रशस्ती' हे काव्यच दुसऱ्या पुलकेशीच्या पराक्रमावर लिहिले आहे.

५. विष्णूवर्धन हा पूर्वेकडील चालुक्य वेंगी घराण्याचा संस्थापक होय.

**स्वयं अध्ययन प्रश्न-४**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

(१) शिवस्कंदवर्मन (२) विष्णूगोप (३) सिंहविष्णू

(४) राजसिंह (५) नंदिवर्मन दुसरा.

**(ब) एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. सिंहविष्णू स्वतःला पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ म्हणवून घेत असे.

२. अखंड शिळेतून मंदिर खोदण्याची कला महेंद्रवर्मन याने प्रथम सुरू केली.

३. नरसिंहवर्मन प्रथम याने 'वातापी कोंडा' ही पदवी स्वतःला लावून घेतली.

४. नरसिंहवर्मन दुसरा याने आपला राजदूत व शिष्टमंडळ चीनच्या सम्राटाकडे पाठविले होते.

५. अपराजितवर्मन हा पल्लव राजकुळातील शेवटचा सम्राट होय.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

१. वर्धन घराण्यातील राजांचे कार्य विशद करा.

२. चालुक्य घराण्याचे दक्षिण भारताच्या इतिहासातील महत्त्व विशद करा.

३. पल्लव घराण्याचे महत्त्व विशद करा.

४. गुप्तोत्तर प्राचीन भारताच्या इतिहासाने साधन म्हणून ह्यू-एन-त्संग यांच्या प्रवासवर्णनाची माहिती द्या.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


१. गायधनी र. ना., राहूरकर व. ग. - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९५५.

२. आचार्य केशट्टीवार - प्राचीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर.

३. कोलारकर श. गो. - प्राचीन भारताचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९३.

४. कोसंबी डी. डी. - प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६.

५. कदम य. ना. : प्राचीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

६. देव प्रभाकर रघुनाथ - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९०.

७. गाठाळ एस. एस. - भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपूरा, औरंगाबाद, २००३.

८. नेवासकर अशोक व पाटोळे भावना - प्राचीन भारताचा इहिास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००८.

९. चौधरी प्र. का. - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद.


❋❋❋

## घटक - ४

# प्राचीन भारताच्या अभ्यासाची साहाय्यकारी शास्त्रे


४.० प्रस्तावना

४.१ उद्दिष्टे

४.२ विषयाचे विवेचन

४.२.१ पुरातत्त्वशास्त्र: अर्थ, स्वरुप, उत्खननाचे प्रकार, पुरातत्त्वीय अवशेषांचे स्वरुप

४.२.२ मूर्तीशास्त्र: अर्थ, स्वरुप, मुद्रा आणि आसनं, विष्णू आणि शिवमूर्तींची लक्षणे

४.२.३ पुराभिलेखविद्या: अर्थ, स्वरुप, आलेखाचे प्रकार, प्रमुख आलेख (अशोकाचे आलेख, ऐहोळ आलेख)

४.२.४ नाणकशास्त्र: अर्थ, स्वरुप, प्रमुख नाणेसंच (आहत, ग्रीक, कुशाण आणि गुप्त)

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक संज्ञा - अर्थ

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.६ स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


### ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर

- पुरातत्त्वशास्त्र म्हणजे काय आणि त्याचे स्वरुप काय हे आपल्याला समजून येईल.
- मूर्तीशास्त्र म्हणजे काय आणि त्याचे स्वरुप काय हे आपल्याला समजून येईल.
- पुराभिलेखविद्या म्हणजे काय आणि त्याचे स्वरुप काय हे आपल्याला समजून येईल.

● नाणकशास्त्र म्हणजे काय आणि त्याचे स्वरुप काय हे आपल्याला समजून येईल.

त्याचबरोबर वरील शास्त्रांची प्राचीन भारतीय इतिहासलेखनासाठी कशी मदत होते हेही लक्षात येईल.

## ४.१ प्रस्तावना

इतिहास हा पुराव्याआधारे लिहावयाचा असतो. हा पुरावा म्हणजे लिखित व अलिखित साधने असे समजले जाते. अर्थात, या साधनांचे स्वरुप काळानुसार बदलत जाते. तसेच, आपल्या इतिहासाचा बराचसा मोठा कालखंड असा आहे की ज्याची माहिती देणारी कोणत्याही स्वरुपाची लिखित साधने उपलब्ध नाही. अशा वेळी काही साहाय्यकारी शास्त्रांची मदत घेऊन या समस्या सोडवता येतात. या प्रकरणामध्ये आपण अशाच इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्रांचा परिचय करून घेणार आहोत.

## ४.२ विषयाचे विवेचन

### ४.२.१ पुरातत्त्वशास्त्र : अर्थ, स्वरुप, उत्खननाचे प्रकार, पुरातत्त्वीय अवशेषांचे स्वरुप

मानवाने निर्हेतूकपणे आपल्या मागे सोडलेल्या भौतिक अवशेषांचा अभ्यास करून, त्याद्वारे त्या मानवाचा इतिहास अभ्यासणारे शास्त्र म्हणजे पुरातत्त्वशास्त्र (Archaelogy) होय. पुरातत्त्वीय संशोधनामध्ये मिळालेले हे भौतिक अवशेष विविध स्वरुपाचे असू शकतात, जसे,

धार्मिक अवशेषांचा विचार करता यामध्ये स्मारके (स्थापत्य) (Monuments) यांचा समावेश होतो. यामध्ये पुन्हा वैदिक-हिंदू (गुहामंदिरे,बांधीव मंदिरे, मठ), बौद्ध (स्तूप, गुहामंदिरे, विहार), जैन (गुहामंदिरे,विहार) असे अवशेष मिळतात.

तर निधार्मिक अवशेषांमध्ये;

१. संरक्षणात्मक (Defensive) स्थापत्य (Architecture) चा समावेश होतो, जसे किल्ले, गढी इ.

२. वसाहती (Settlement) (नगरे, रस्ते, राजवाडे-वाडे-घरे, सार्वजनिक स्थापत्य जसे धर्मशाळा, नद्यावंरील घाट, पाणीपुरवठ्याची साधने, स्नानगृह, कामगारांच्या चाळी, धान्यकोठारे, बंदरे इ.)

३. सुटे अवशेष (Artefacts) : भांडी, घरगुती साधने, उपजीविकेची साधने, हत्यारे, अलंकार-दागदागिने, मूर्ती, शिल्पं तसेच हाडे, परागकण, बीया;

४. विशेष अवशेष (Antiquities) : नाणी, आलेख इत्यादींचा समावेश होतो.

असे अवशेष एकतर जमिनीवर उभे असतात, आणि ढासळत चाललेले असतात. किंवा जमिनीवर विखुरलेले तर असतात. तर बरेचसे अवशेष हे मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले असतात. पुरातत्त्वशास्त्रज्ञ या अवशेषांचा शोध घेतो, त्याच्या नोंदी करतो, अन्वयार्थ लावतो आणि लोकांसमोर त्या काळचा इतिहास मांडत असतो.

पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासामध्ये पुढील टप्पे येत असतात.

१. सर्वप्रथम प्राचीन अवशेषांचा शोध घेतला जातो. याला 'समन्वेषण' (Exploration) असे म्हटले जाते. यासाठी विविध स्वरुपाचे नकाशे, नकाशावरील भौगोलिक वैशिष्ट्ये तसेच ऐकीव माहिती, दंतकथा, प्राचीन कथा इ. साधनांच्या आधारे तो एखादे पुरातत्त्वीय स्थळ (Archaelogical Sit) निश्चित करतो.

२. हे पुरातत्त्वीय स्थळ जर अश्मयुगीन काळाचे असेल तर साधारणत: हे अवशेष जमिनीवर विखुरलेले असतात. कारण या काळातील मानव हा भटका होता आणि उघड्यावर रहात होता. मात्र जर हे स्थळ ताम्रपाषाणयुगीन (Chalcolithic) किंवा पूर्वऐतिहासिक (Early Historic) असेल तर मात्र त्याच्यासमोर हे स्थळ मातीच्या ढिगाऱ्याच्या स्वरुपात दिसून येते. निरनिराळ्या काळामध्ये, वस्ती एकावर एक अशा स्वरुपात झाल्यामुळे असे मातीचे ढिगारे तयार झालेले असतात. हे ढिगारे पांढऱ्या मातीचे असतात. त्यामुळे यांना 'पांढरी', 'पुरातत्त्वीय टेकाड' (Archaeological Mound) असे म्हटले जाते.

३. या टेकाडावर (Mound), आतील अवशेष विविध कारणांमुळे जमिनीवर आलेले असतात. विशेषत: भांड्यांचे तुकडे, हाडे, काही प्रमाणात मणी इ. संशोधक हे अवशेष गोळा करतो (Surface Collection) या अवशेषांच्या स्वरुपावरून तो निश्चित करतो की सदर टेकाडाचे अधिक संशोधन करावयाचे का नाही ते.

४. पुरातत्वीय टेकडाचे तपशीलवार संशोधन करावयाचे ठरले की मग संशोधक त्या टेकाडाची मापं घेतो. प्रथम तो त्या टेकाडाच्या चढउताराची नोंद करतो (Countor Mapping). यातून त्याला सर्वोच्च बिंदू (Datum Point) मिळतो. हा बिंदू पुढील मोजमापाचा मापदंड असतो. कारण अवशेष किती खोलीवर मिळाले त्याची नोंद या बिंदूनुसार केली जाते. त्यानंतर, त्या टेकाडावर, समान अंतराचे चौकोन काढले जातात. या चौकोनाला नावं (अद्याक्षरं/क्रमांक) दिली जातात आणि हे सर्व आलेख कागदावर घेतले जाते.

५. त्यानंतर सर्वोच्च बिंदू ज्या चौकोनात आहे किंवा सगळ्यात वरील चौकोन जो आहे फक्त तो खोदायला (Excavation) घेतला जातो. हा चौकोन सरळ, उभा जमिनीचा तळ लागेपर्यंत खोदला जातो. उत्खननाच्या या पद्धतीला 'उदग्र उत्खनन' (Vertical Excavation) असे म्हटले जाते. तर या खड्ड्याला 'चाचणी खड्डा' (Trial Trench / Index Trench) असे म्हटले जाते. जसे-जसे खाली आपण जातो, तस-तसे मिळणाऱ्या अवशेषाची नोंद केली जाते. तळापर्यंत आपण ज्यावेळी जाऊन पोचतो तोपर्यंत आपल्याकडे त्या टेकाडातील अवशेषाचा नमुनाच आलेला असतो. यावरून ठरवले जाते की उत्खनन पुढे चालू ठेवायचे का नाही ते.

६. एकदा उत्खनन चालूच ठेवणे हे ठरले की मग उत्खननाचा पहिला प्रकार येतो तो म्हणजे 'उदग्र उत्खननाचा'. पूर्वीच्या टप्प्यामध्ये सर्वोच्च बिंदूपासून, तळापर्यंत एक चाचणी खड्डा अशा उदग्र उत्खननाच्या पद्धतीनुसारच घेतलेला असतो. आता, टेकडीला उभा/आडवा/तिरका मात्र सरळ असा एकच काप घेतला जातो. तुलनेने कमी वेळेत, खर्चात आणि श्रमात हे उत्खनन होते. पूर्वीची पहिली-वहिली उत्खननं अशाच प्रकारची होती. आजसुद्धा मर्यादित साधनसामुग्री असेल तर अशाच प्रकारचे उत्खनन केले जाते. त्यामुळे संपूर्ण टेकडी उकरली जाण्याची भीती नसते. म्हणून पुढील संशोधकांना सुद्धा उत्खननासाठी संधी कायम राहते. मर्यादित साधनसामुग्री असेल तर

'सोपान खड्डे' (Step Trench) प्रकारचे उत्खनन घेतले जाते. यामध्ये टेकाडाच्या वर, मध्ये आणि तळाजवळ असे खड्डे घेऊन अभ्यास केला जातो.

७. उदग्र उत्खननाची सर्वांत महत्त्वाची मर्यादा म्हणजे की पूर्ण वसाहत आपल्याला समजून येत नाही. अशावेळी विस्तृत स्वरुपाचे उत्खनन घेतले जाते. याला 'आयत उत्खनन' (Horizontal Excavation) असे म्हटले जाते. यावेळी टेकडीवरील बहुतेक सर्व चौकोनांचे उत्खनन सुरू होते आणि कालांतराने त्या टेकडीचा संपूर्ण अंत:भाग आपल्यासमोर उजेडात येतो. याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे संपूर्ण वसाहतीची रचना आपल्या समोर येते. रस्ते, घराघरांमधील संबंध, सार्वजनिक स्थापत्य इ. बाबी यामुळे उजेडात येतात. अर्थात हे उत्खनन दीर्घकाळ चालते तसेच यासाठी पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणावर लागतो. म्हणूनच भारतीय पुरातत्त्व खाते अशी केंद्रीय शाखा किंवा डेक्कन कॉलेजसारख्या मान्यवर संस्था अशा प्रकारचे उत्खनन करतात. जसे भारतीय पुरातत्त्व खात्याने धोलावीराचे उत्खनन करून हडप्पाकालीन संस्कृती उजेडात आणली. या आयत उत्खननामुळे धोलावीराची नगररचना, पाणीपुरवठ्यांची अभिनव कल्पना, क्रिडांगण इ. बाबी उजेडात येऊ शकल्या. तसेच डेक्कन कॉलेजने इनामगावचे आयत उत्खनन करून, दख्खनच्या ताम्रपाषाणयुगाचे, तिच्या तपशीलासह दर्शन घडवले. हे उत्खनन जवळजवळ १२ वर्षे चाललेले होते.

७. जर महाशिलायुगीन दफनं असतील तर त्यांची उत्खनन करण्याची पद्धती वेगळी असते. येथील शिलावर्तुळाचे चार भाग आखले जातात. मग समोरासमोरील खड्डे प्रथम घेतले जातात. मग, उरलेले खड्डे घेतले जातात (Quadrant Excavation) अशा पद्धतीने सर्व दफन खुले होते.

७. उत्खनन कोणतेही असले तरी अवशेषांची, खोली आणि कोणत्या स्तरामध्ये सापडलेले आहेत याच्या नोंदी नियमितपणे ठेवल्या जातात. यासाठी जसजशी उत्खननाची प्रगती होत जाईल तसेतसे खड्ड्याच्या चारी बाजू, उभ्या घासून गुळगुळीत केल्या जातात. यामुळे त्या टेकाडाच्या अंतर्गत भागातील, दगड-मातीचे विविध स्तर ठळकपणे दिसू शकतात. यातील प्रत्येक वेगळ्या स्तराला क्रमांक दिले जातात. स्थापत्याचे अवशेष जर सापडले (जसे घरे, तटबंदी इ.) तर त्यांची रेखाटनं काढली जातात, छायाचित्रण घेतले जाते. तसेच, काही विशेष अवशेष असतील तर त्यांची एक स्वतंत्र नोंदवही (Antiquity Register) ठेवली जाते. अवशेषांच्या या नोंदीमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. खड्ड्याचे नाव, किती खोलीवर ती वस्तू मिळालेली आहे (ही खोली सर्वोच्च बिंदूपासून मोजली जाते), किती लांबी-रुंदीवर मिळालेली आहे (खड्ड्याच्या बाजूपासून), कोणत्या स्तरांमध्ये मिळालेली आहे, तिचे स्वरुप काय आहे (म्हणजे नाणे, नांगर, तलवार इ.), कोणत्या धातूपासून ती बनवलेली आहे इ.

८. या नोंदी काळजीपूर्वक घेण्याचे कारण म्हणजे, उत्खनन हे प्रकारे त्या टेकडीला उद्ध्वस्त करणेच असते. अशावेळी पुढील अभ्यासकांना योग्य माहिती मिळणे हा कर्तव्याचा भाग असतो.

तसेच, शास्त्रीयदृष्ट्या कालनिर्णय करण्यासाठी, उत्खनन करीत असताना कोळशाचे तुकडे विशिष्ट प्रमाणात गोळा करावे लागतात. याचा उपयोग करून, कार्बन-१४ पद्धतीचे कालमापन केले जाते. ही पद्धती एफ. डब्ल्यू. लिबी यांनी १९४९-६० या कालावधीमध्ये शोधून काढली.

८. अशा तऱ्हेने उत्खनन पूर्ण झाले की मग ताबडतोब त्याचा सविस्तर अहवाल लिहिणे आवश्यक असते.

**इतिहासअभ्यासासाठी पुरातत्त्वशास्त्राचे महत्त्व**

- साधारणत: इतिहासाचा अभ्यास करताना आपण लिखित साधनांचा वापर करतो. मात्र, लिखाणाचे ज्ञान ही तशी खूप अलिकडची घटना आहे. त्यामुळे अशोकाच्या आलेखापूर्वी कोणत्याही स्वरुपाचे लिखित साधन आपल्याला उपलब्ध होत नाही आणि अशोकापूर्वी भारताचा इतिहास हा लाखो वर्षे प्राचीन आहे. मग अशा कालखंडाचा इतिहास कसा अभ्यासायचा ?
- दुसरी गोष्ट म्हणजे, प्राचीन काळाचा विचार करता आपल्याला जी लिखित साधने मिळतात ती ही खूप अपुरी आहेत. मग तो काळ अधिक योग्यपणे समजून घ्यायचा असेल तर आपल्याला पुरातत्त्वीय साधनांवर अवलंबून रहावे लागते.
- तसेच, जी काही लिखित साधने आहेत ती एकतर धार्मिक आहेत किंवा वाङ्मयीन. मग सामान्यांचे जीवन कसे होते हे समजून घेण्यासाठी आपल्याला पुरातत्त्वीय साधनांचाच आधार घ्यावा लागतो.
- ताम्रपाषाणयुगानंतर विशिष्ट संस्कृतीमध्ये विशिष्ट स्वरुपाची मातीची भांडी तयार होत असत. अशा भांड्यांच्या तुकड्यावरून आपल्याला ती संस्कृती ओळखता येते, तौलनिक कालक्रम शोधता येतो.

## ४.२.२ मूर्तीशास्त्र : अर्थ, स्वरुप, मुद्रा आणि आसनं, विष्णू आणि शिवमूर्तीची लक्षणे

मूर्तींचा अभ्यास करणारे ते मूर्तीशास्त्र (Iconography) होय. नि. पु. जोशी, गो. बं. देगलूरकर अशा विद्वानांनी मूर्तीशास्त्राचा सखोल अभ्यास केलेला आहे.

वैदिक-हिंदू, जैन, बौद्ध हे आपल्या भारतीय संस्कृतीतील मुख्य धर्म. सुरुवातीला हे सर्व धर्म मूर्तीपूजा करीत नसत. पुढे भक्तिमार्गाचा उदय झाला. सर्वसामान्यांना आपली श्रद्धा व्यक्त करण्यासाठी, आपल्यासमोर देवदेवतांच्या काही आकारांची गरज निर्माण झाली. अशावेळी देवदेवता प्रतिकात्मक पद्धतीने त्यांच्या समोर होत्या. मात्र यांचे समाधान होत नसे. त्यामुळे पुढे काळाच्या विविध टप्प्यामध्ये या सर्व धर्मांनी आपल्या देव-देवतांच्या मूर्ती निर्माण केलेल्या दिसून येतात. या मूर्ती अथवा प्रतिमा दगड, रत्ने,धातू, लाकूड, माती अशा माध्यमांतून बनवल्या जातात. याठिकाणी फक्त दगडांमधील मूर्ती आणि शिल्पांचा आपण विचार करणार आहोत. तसेच, प्रातिनिधिक स्वरुपात या शास्त्राचा विचार करावयाचा आहे. यासाठी सातव्या शतकापर्यंतच्या तसेच शिव आणि विष्णूमूर्तींचा आपण विचार करणार आहोत.

अशा अनेक मूर्ती आज आपण पाहतो. यातील काही स्वतंत्र असतात तर काही गाभाऱ्यात. त्यांची पूजा केली जाते. या 'मूर्ती' होत. यामध्ये शिव, विष्णू, पार्वती, लक्ष्मी, गणेश, कार्तिकेय इ. प्रमुख देव त्यांच्या विविध अवतारासह/ स्वरुपासह येतात. तर, काही मूर्ती मंदिरांमध्ये अथवा भिंतीवर दिसून येतात. अशांची आपण पूजा करीत नाही. मग अशा मूर्तींना, सोयीसाठी आपण 'शिल्प' असे म्हणतो. यामध्ये सूरसुंदरी, गंधर्व, अप्सरा, यक्ष, प्राणी, पक्षी, वनस्पती,

देवांचे गण, राक्षस, मंदिर बांधण्यासाठी अनुदान देणारे इ. चा समावेश होतो. अशा मूर्ती आणि शिल्पांचा अभ्यास मूर्तीशास्त्रामध्ये केला जातो. मूर्तीशास्त्राचा अभ्यास म्हणजे एक प्रकारे भारतीय संस्कृतीचाच - तिच्या इतिहासाचाच अभ्यास होय.

सर्वसाधारणत: अशा मूर्तींवर नावे नसतात. यांची ओळख पटवणे हाच सुरुवातीचा प्रश्न असतो. तर एकाच देवतेची मूर्ती वेगवेगळ्याा ठिकाणी आणि वेगवेगळ्या काळांमध्ये, वेगवेगळी दिसू लागते. हे असे का होते ? सुरुवातीला शिवाची एकटी मूर्ती दिसते. ती पुढे पार्वती, गणपतीसह दिसू लागते. पुढे-पुढे तर शिवाची मूर्ती दिसेनाशी होते, तिची जागा शिवलिंग घेते. हे असे का घडते ? उत्तरेकडील सूर्य पायात बूट घालतो तर दक्षिणेकडे मात्र अनवाणी. का असे ? अशा वेळी आपला गोंधळ उडतो. अशा वेळी मूर्तीशास्त्र आपल्या मदतीस येते.

आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये देवदेवतांच्या मूर्ती / शिल्पं कशी घडवावीत, कोणत्या वस्तू त्यासाठी वापराव्यात, त्यांचे आकार कसे असावेत, त्यांची वेशभूषा/केशभूषा कशी असावी, त्यांना कोणते अलंकार घालावेत, त्यांच्या हाती कोणती साधने/आयुधे द्यावीत, त्यांचे वाहन कोणते असावे इ. बऱ्याच बाबींचे तपशीलवार आणि व्यवस्थित वर्णन केलेले आहे. यामध्ये समरांगण सूत्रधार, ररुपमंडन, मयमत, शिल्परत्न, शिल्पप्रकाश, विष्णूधर्मोत्तरपुराण अशा ग्रंथांचा समावेश होतो. हे एकप्रकारे मूर्तीशास्त्रावरील प्राचीन ग्रंथच होत. त्याशिवाय, मूर्तीशास्त्राचे हे तंत्र निर्माण करताना प्राचीन विद्वानांनी महाकाव्ये, पुराण, जातक, पंचतंत्र अशा विविध ग्रंथातील कथांचाही आधार घेतलेला होता. किंबहुना अशा कथांमधूनच, मूर्ती / शिल्पं तयार करण्यांमध्ये वैविध्य आले. अशा ग्रंथांचाही अभ्यास मूर्तीशास्त्रात केला जातो. या अभ्यासातून आपल्याला पडलेले प्रश्न दूर होतात.

त्याचबरोबर हाताच्या मुद्रा कशा असाव्यात - त्यांची नावे, बसण्याच्या (आसन), उभे राहण्याच्या विविध पद्धती, त्यांची नावे, विविध आयुधांची नावे इ. बऱ्याच बाबी प्राचीन ग्रंथामध्ये हाताळल्या आहेत. जर मुद्रांचा विचार केला तर पुढील प्रकारांचा समावेश होतो. 'अभयमुद्रा' मध्ये अशिर्वाद देण्यासारखा पूर्ण पंजा खुला, वरच्या दिशेला आणि समोर असतो. 'वरमुद्रा' मध्ये हाच पंजा खालच्या दिशेला असतो. 'धर्मचक्रपरिवर्तनमुद्रा' मध्ये उजवा आणि डावा पंजा जवळ, अर्धवट झाकलेला, अंगठ्यावर टेकवलेले पहिले बोट. 'कर्तरीमुखमुद्रा'मध्ये पंजा खुला, वरच्या दिशेला आणि पहिले बोट अंगठ्याजवळ. तर 'कटकहस्तमुद्रा' मध्ये पंजा खुला, वरच्या दिशेला मात्र अंगठ्याव्यतिरिक्त बाकीची बोटं अंगठ्याजवळ.

आसनांचा विचार करता पुढील प्रकारांचा समावेश होतो. 'सुखासन' मध्ये, डावा पाय मांडी घातलेल्या स्थितीत तर उजवा पाय बाजूला, खाली सोडलेला किंवा देह थोडासा डावीकडे कललेला, उजवा पाय आसनावर, डावा पाय बाजूला, खाली सोडलेला. 'ललितासन' मध्ये डावा पाय मांडी घातलेल्या स्थितीत तर उजवा पाय, आसनावरच, मुडपून ठेवलेला. 'भूमिस्पर्श' मध्ये मांडी घातलेली, फक्त उजवा हात बैठकीला स्पर्श करणारा इ. तर उभे राहण्याच्या पद्धतीमध्ये 'समपद' दोन्ही पायाचे तळवे जमिनीला टेकलेले, 'अर्धसम' दोन पाय एकमेकांना छेदणारे, यामध्ये एक पाय सरळ असतो तर दुसरा तिरका, उचललेला अशा प्रकारे. 'आलीढ'मध्ये उजवा पाय ताठ, तळवा तिरका

टेकलेला तर डावा पाय वर आसनावर ठेवलेला असतो. याबरोबर मूर्तींच्या हातात विविध प्रकाराचे कमळ दिसते. या कमळाचे स्वरुप विविध काळानुरूप बदलत जाते.

मूर्तीशास्त्रज्ञाला याचा परिचय असणे आवश्यक असते. तसेच, स्थळकाळाचे भान हे मूर्तीशास्त्रज्ञाला असणे आवश्यक असते.

**लक्षणे :** मूर्तीशास्त्रासंबंधी जे प्राचीन ग्रंथ आहेत त्यांनी विशिष्ट देवतांची काही विशिष्ट वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत. मूर्ती/शिल्प तयार करताना ही वैशिष्ट्ये लक्षात घेणे हे अपेक्षित असते. अशा वैशिष्ट्यांना/संकेतांना 'लक्षण' असे म्हटले जाते. जसे, शिवाचे लक्षण कोणते तर त्याच्या हाती त्रिशूळ, डमरू असला पाहिजे, गळ्यामध्ये नाग, डोक्यावर चंद्रकोर आणि जटा असली पाहिजे, जवळ नंदी असला पाहिजे. तर विष्णूच्या लक्षणामध्ये त्याच्या हाती शंख, चक्र, गदा असावे लागते, ती त्याची लक्षणे. जलदेवतांच्या हातात घट दाखवणे आवश्यक. मात्र गंगा ही देवता दाखवताना तिचे लक्षण मगर तर यमुनेचे कासव. पार्श्वनाथाच्या मागे नागाचा फणा तर बाहुबलीच्या पायावर चढणारी वेल. अर्थात ही लक्षणे पहिल्यापासून नव्हती. तर काळाच्या ओघामध्ये ही लक्षणं बदलत गेलेली आहेत; त्यामध्ये भर पडत गेलेली आहे. तसेच अशा लक्षणांवरून देवतेची नावेही वेगवेगळी होत जातात. हा या मूर्ती/शिल्पांचा मनोरंजक इतिहास मूर्तीशास्त्रांमध्ये अभ्यासला जातो.

वैदिक काळापासूनच देवताभक्ती आणि प्रतिमांचा पुसटसा उल्लेख आपल्याला आढळतो. मात्र या काळातील देवतांच्या प्रतिमा अद्याप सापडलेल्या नाहीत. पुढे मौर्य काळामध्ये आपल्याला प्रतिमा दिसू लागतात. मात्र त्या असतात प्राण्यांच्या, यक्ष, अप्सरा यांच्या. काही लेण्यांमध्ये दानकर्त्यांच्याही प्रतिमा आपल्याला दिसतात. अर्थात या प्रतिमा अर्धउठावामध्ये दिसून येतात. म्हणजे पुढील बाजूनचे प्रतिमेची वैशिष्ट्ये दिसतात. मागील बाजूने प्रतिमा सपाट असते. अर्थात याला काही अपवाद आहेत. पुढे ग्रीकांच्या प्रभावातून 'गांधार' शैलीमध्ये देवतांची शिल्पं दिसू लागतात. त्याचवेळी नाण्यांवरही देवतांच्या प्रतिमा दिसू लागतात. मात्र या प्रतिमांवर ग्रीक शैलीचा प्रचंड प्रभाव दिसून येतो. कुशाण काळापासून मात्र नाण्यांच्यावर आणि दगड / माती यामध्ये खास भारतीय शैलीमध्ये प्रतिमा दिसू लागतात. याला 'मथुरा शैली' असे म्हटले जाते. या मथुरा शैलीचाच पुढे गुप्त काळामध्ये विकास होतो. या काळामध्ये मूर्ती आणि शिल्पं खास भारतीय अभिजात सौंदर्याने आपल्या पुढे येतात. त्याचबरोबर त्या आणि आयुधे / अलंकरण यामध्ये एकप्रकारची कलात्मक व्यवस्था स्थापन होते.

याठिकाणी आपण विष्णू आणि शिव मूर्तींचा थोडक्यात परिचय करून घेणार आहोत. याठिकाणी फक्त सुरुवातीपासून गुप्त-हर्षवर्धन काळापर्यंतच्या मूर्तींचा प्रातिनिधिक स्वरुपात विचार करावयाचा आहे.

**विष्णू मूर्ती**

वैदिक साहित्य, महाकाव्ये, वैष्णव पुराणे यामधून आपल्याला विष्णूमूर्ती, त्यांचे संकेत, त्यांचे प्रकार इ. बाबींची माहिती होते.

कुशाणकाळापासून विष्णूच्या मूर्ती आपल्याला दिसून येतात. या सर्व मूर्ती चार हातांच्या आहेत. गदा, चक्र, शंख, जलपात्र अशा वस्तू त्याच्या हातात दिसू लागतात. यातील गदा ही मुदगलासारखी दिसते. खालचा एक

हात 'अभयमुद्रेमध्ये' तर दुसरा कमरेवर असे. वरचे हात वर उचलल्यासारखे दिसतात. त्यांना 'उदबाहू' असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे या काळातच मूर्ती पूर्ण उठावामध्ये निर्माण होऊ लागल्या. यामध्ये मूर्तीची मागील बाजूही कलात्मकरित्या घडवली जाऊ लागली.

गुप्त काळामध्ये आता प्रत्येक बाबींमध्ये तंत्रशुद्धता आली, कलात्मकता आली. विष्णूमागे कलात्मक प्रभावळ दाखवली जाऊ लागली. ही मूर्ती चार हाताचीच असे आणि त्यातील चारही वस्तू मागील काळाप्रमाणेच आहेत. गदा मात्र, आपल्या परिचयासारखी येऊ लागते. म्हणजे, उभा दांडा आणि त्याला जोडलेला एक मोठा बसका गोल. आता विष्णूचे वरील हातही खाली आले. अशावेळी ही मूर्ती 'प्रलंबबाहू' आहे असे म्हटले जाते. यातील एक हात 'आयुधपुरुषाच्या' डोक्यावर विसावलेला असतो. आयुधपुरुष म्हणजे देवतेच्या आयुधाचे मानवी रूप. मूर्तीवर विविध अलंकार आले. त्याची वेशभूषा सुंदर झाली. मूर्तीवर जानवेसुद्धा आले. हे जानवे पुन्हा मोत्यांच्या सरीचे केले गेले. या काळात मूर्तीच्या पुढील बाजूवरच कलात्मकता आली. मागील बाजू फक्त लक्षात येण्यासारखी ठेवली गेली.

अशा विष्णू मूर्ती पुढे विविध रूपामध्ये दिसू लागल्या. यावरून त्यांचे बरेच प्रकार आपल्याला दिसून येतात. विष्णूच्या बहुतेक मूर्ती या 'स्थानक' म्हणजे उभ्या स्वरुपात आहेत. तसेच तिच्या आसनमूर्ती, शयनमूर्ती, अवतारमूर्ती आहेत. याचे पुन्हा उपप्रकार पडतात. जसे,

**स्थानक मूर्ती**

- **चतुर्भुज :** चार हातांची, उभी मूर्ती. हातामध्ये गदा, चक्र, शंख, अभयमुद्रा. सहाव्या शतकानंतर, कमळ हातामध्ये दिसू लागते.
- **वैकुंठ :** सिंह, मानव व वराह अशी तीन अथवा चार मुख असलेली विष्णूमूर्ती.
- **अनंत :** विष्णूच्या डोक्यावर सापाचा फणा असलेली मूर्ती.
- **हरीहर :** एकाच मूर्तीमध्ये शिव आणि विष्णू. त्यावरील अलंकार त्या-त्या देवतेच्या लक्षणानुसार असत. शैव आणि वैष्णव पंथांमध्ये सलोखा निर्माण करण्यासाठी विष्णूचे हे स्वरुप निर्माण झाले.

**आसन मूर्ती**

- **गरूडारूढ :** पक्षीरूपातील गरूडावर बसलेला विष्णू.
- **नरनारायण :** चतुर्भुज नारायण आणि द्विभुज नर हा जोडी. तपश्चर्या करीत असलेली. पायाजवळ सिंह आणि हरीण एकत्र.

**शयन मूर्ती**

- **शेषशायी :** कोणतेही आयुध नसलेला विष्णू, डावा हात उशाशी घेऊन शेषावर निजलेला. वर कमळामध्ये ब्रह्मदेव. मात्र हे कमळ विष्णूच्या नाभीमधून निघालेले नाही. पुढील काळामध्ये विष्णूच्या हाती आयुधे आली, आणि हे कमळ नाभीशी जोडून, ब्रह्मदेवाला विष्णूशी जोडले गेले.

### अवतार मूर्ती

विष्णूच्या एकूण अवतार किती याबद्दल विविध ग्रंथांमध्ये एकमत नाही. ही संख्या ५ पासून १४ पर्यंत जाते. शिवाय हे अवतार ही विविध स्वरुपाचे आहेत, जसे, अंशावतार (वाहर, वामन, परशुराम), तात्कालिक अवतार (नृसिंह), पूर्णावतार (राम, कृष्ण).

- **वराह :** यामध्ये पुन्हा दोन गट पडतात, जसे - ***(१) नृवराह*** **-** देह मानवाचा मुख वराहाचे ***(२) यज्ञवराह-*** पूर्ण देह वराहाचा.
- **नृसिंह :** कोंडामोतू (आंध्र प्रदेश) येथील शिल्पपट्टावर सिंह व त्याच्या मानेजवळून उगवणारे गदा व चक्रधारी हात दिसतात. पुढे गुप्त काळामध्ये, (१) मानवी स्वरुपातील नृसिंह, (२) देह मानवाचा मुख सिंहाचे, (३) हिरण्यकश्यपशी युद्ध करताना.
- **हयग्रीव :** घोड्याचे मुख आणि देह मानवाचा अशी मूर्ती.
- **धन्वंतरी :** उजव्या हातामध्ये घट असणारी मूर्ती.

**दक्षिणेतील विष्णूमूर्ती :** दक्षिणेतील विष्णूमूर्तीमध्ये काही लक्षणीय फरक आपल्याला दिसून येतात. गदा, आयुधपुरुष, अक्षमाला, फळ, घट इ. फार क्वचित दिसतात. तसेच परिवारदेवता फारशा दिसत नाहित. मात्र इकडील विष्णूमूर्तीमध्ये दागदागिन्यांचे अलंकरण मोठ्या प्रमाणावर दिसते. विष्णूचे 'अनंतशयनी' स्वरुप मोठ्या प्रमाणावर दिसते. विष्णूचे वराह, त्रिविक्रम, नृसिंह हे प्रकार याठिकाणी विशेष लोकप्रिय आहेत.

सहाव्या शतकानंतर विष्णूमूर्तींचे विविध मुद्यांवरून असंख्य प्रकार पडतात. जसे - आसन स्वरुप, अवतार, नव्या कथांचा समावेश इ. निव्वळ आयुधं - त्यांचा क्रम लक्षात घेतला तर एकूण २४ वेगवेगळे प्रकार आपल्याला दिसून येतात.

### शिव मूर्ती

हडप्पा संस्कृतीच्या काळापासूनच आपल्याला शिव प्रतिमा किंवा मूर्ती आढळू लागतात. याठिकाणी शिव, सभोवताली प्राणी घेऊन बसलेला दिसतो. विशेष म्हणजे कालिबंगनमधून शिवलिंगाचे अवशेष ही मिळालेले आहेत. हाच प्रकार पुढे वैदिक आणि महाकाव्य काळातही दिसून येतो. पुढे कुशाणांच्या नाण्यांवर शिवाचे मूर्तस्वरुप ठळकपणे दिसू लागते. या नाण्यांवरील शिव हा नंदीसह आहे. त्याच्या हातात कमंडलू आहे, त्रिशूळ आहे, दंड आहे, पाश आहे, कधीकधी तो त्रिमुखी आहे, मस्तकावर जटा आहेत, त्यातून अग्निज्वाळा निघत आहेत, त्याने प्राण्याचे कातडे पांघरलेले आहे इ. अशा नाण्यांवरील शिवप्रतिमांबरोबर, मातीच्या ठशांवरही आपल्याला शिवप्रतिमा आढळतात.

गुप्तकाळापासून आपल्याला ठळकपणे दगडांमध्ये घडविलेल्या शिव मूर्ती दिसून येतात. या मूर्तींच्या स्वरुपावरून/ लक्षणावरून, शिवाची वेगवेगळी रुपे आपल्याला मिळतात.

- **केवल शिव :** जटाधारी, कपाळावर तिसरा डोळा असलेला, वाघाचे कातडे पांघरलेला, एका हातात त्रिशूळ तर दुसरा हात अभयमुद्रेत असणारा एकटा शिव.

- **पार्वतीसह शिव :** शिव आणि शक्ती अलिंगनमुद्रेत किंवा स्वतंत्र, दोघेही द्विभूज, कोणतेही आयुध नाही, मागे नंदी.
- **अर्धनारीश्वर :** द्विभूज, आयुधाविना, उजवा भाग पुरुषाचा तर डावा भाग स्त्रीचा.
- **लकुलिश :** हातात सोटा घेतलेला शिव.
- **दक्षिणामूर्ती :** व्याख्यानमुद्रा, पायाजवळील दोन हरणे, सोबत चार शिष्य. तज्ज्ञांच्या मते या मूर्तीवर बौद्धमूर्तींचा प्रभाव आहे.
- **रावणानुग्रह :** कैलास पर्वत उचलणारा अहंकारी रावण आणि केवळ अंगठ्याने पर्वत दाबून रावणाचे गर्वहरण करणारा शिव असे अंकन.
- **गजासूरवध :** हत्तीवर बसून, अंकुश धारण करणारा शिव.
- **नृत्य मूर्ती :** चतुर्भूज, नृत्य करणारा शिव.
- **भिक्षाटन मूर्ती :** जटा, डाव्या हातात कृपाल / भीक्षापात्र.

याशिवाय हरीहर, चतुर्मुख, अष्टमुख, द्वादशमुख शिव असे अनेक प्रकार मिळत राहतात.

सहाव्या शतकानंतर शिवमूर्तीमध्ये आणखीन वैविध्य वाढते. त्याचा परिवारही वाढत जातो. समांतरपणे शिवलिंगाची पूजा ही प्रस्थापित होत राहते. पुढे-पुढे शिवमूर्तीचे प्रमाण कमी होते, शिव फक्त शिल्परुपात राहू लागतो. गाभाऱ्यात 'शिवलिंगाचीच' पूजा प्रसिद्ध होते.

**मूर्तीशास्त्राचे इतिहास अभ्यासासाठी महत्त्व**

- मूर्तीपूजा हे भारतीय संस्कृतीतील धर्मांचे एक अविभाज्य अंग आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीचा अभ्यास हा मूर्तीशास्त्राच्या अभ्यासाशिवाय अपूरा आहे.
- काही मूर्ती प्रथम स्वतंत्र होत्या. जसे - शिव, नंदी, देवी, गणपती, कार्तिकेय इ. त्यांचे प्रत्येकाचे स्वतंत्र पंथ होते. पुढे हे सर्व पंथ एकत्र आले. आणि प्रत्येकाच्या देवता एकत्र करून, शिवाचा एक परिवारच निर्माण झाला. हे इतिहासातील विविध समाज एकत्र येण्याचा स्पष्ट पुरावाच आहे.
- हरीहर, अर्धनारी अशा मूर्तीवरुन तत्कालिन दोन्ही पंथाचे महत्त्व, त्यातील संघर्ष आणि त्यांच्यामध्ये समन्वय राखण्यासाठी झालेले प्रयत्न हे कळून येत.
- लोककथा, पुराणे यांचे मूर्त स्वरुप आपल्यासमोर असल्याने, त्या कथा समजायला मदत मिळते, जसे, रावणानुग्रह, गजासूरवध, अंधकासूरवध इ.
- मूर्तीशास्त्राच्या अभ्यासातून आपल्याला मूर्ती ओळखता येतात. या मूर्तींवरील (म्हणजे त्या-त्या पंथावरील)

विविध प्रभावही आपल्याला दिसून येतात. जसे, कुशाणांच्या प्रभावातून सूर्यमूर्ती ही कोट घातलेली, बूट घातलेली दाखविली जात असे.

- मूर्ती आणि शिल्पांवरून आपल्याला कलेचा विकासही समजू शकतो.

**स्वयंअध्ययन प्रश्न-१**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. कार्बन-१४ कालमापन .............. तुकड्यांच्या आधारावर केले जाते.

(अ) दगड (ब) काच (क) लोखंड (ड) कोळसा

२. त्रिशूळ, डमरू हे .............. या देवतेच्या मूर्तीचे लक्षण आहे.

(अ) शिव (ब) विष्णू (क) इंद्र (ड) बलराम

३. नागाचा फणा .............. हे या तीर्थंकरांच्या मूर्तीचे लक्षण आहे.

(अ) वर्धमान (ब) अजितनाथ (क) पार्श्वनाथ (ड) बाहुबली

४. गांधार शैली .............. प्रभावातून निर्माण झाली.

(अ) शकांच्या (ब) रोमनांच्या (क) चीनच्या (ड) ग्रीकांच्या

५. हातात सोटा घेतलेल्या शिवाची जर मूर्ती असेल तर त्या मूर्तीला.......... मूर्ती असे म्हणतात.

(अ) गजासूरवध (ब) लकुलीश (क) भिक्षाटन (ड) दक्षिणामूर्ती

**(ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१. पुरातत्त्वशास्त्र म्हणजे काय ?

२. पुरातत्त्वीय टेकाड म्हणजे काय ?

३. मूर्तीशास्त्र म्हणजे काय ?

४. मूर्तीशास्त्रामधील 'लक्षण' म्हणजे काय ?

५. विष्णूच्या हरीहर मूर्तीचे लक्षण कोणते ?

## ४.२.३ पुराभिलेखविद्या : अर्थ, स्वरुप, आलेखाचे प्रकार, प्रमुख आलेख (अशोकाचे आलेख, ऐहोळ आलेख)

जुने लेख म्हणजे पुराभिलेख आणि त्यामधील प्राचीन कोरीव लेखांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे 'पुराभिलेखविद्या'(Epigraphy) होय. असे प्राचीन कोरीव लेख विविध वस्तूंवर कोरलेले असत, जसे, मोठे

प्रस्तर (शिलालेख), दगडी खांब (स्तंभालेख), तांब्याचे पत्रे (ताम्रपट), भांडी, मुद्रा इ. डॉ. शोभना गोखले या विदुषिंनी पुराभिलेखाचा सखोल अभ्यास केलेला आहे.

**पुराभिलेखांचे प्रकार :** पुराभिलेखांचे आपल्याला दोन पद्धतीने प्रकार पाडता येतात.

(अ) पुराभिलेखांचे, ते ज्या वस्तूवर कोरलेले आहेत, त्यावरून खालील प्रमुख प्रकार पडतात :

- **शिलालेख :** यामध्ये मोठे प्रस्तर, छोटे प्रस्तर यावर ज्यावेळी लेख कोरलेला असतो त्यावेळी त्याला शिलालेख असे म्हणतात. हे शिलालेख एका ठिकाणी स्थिर असतात.
- **स्तंभालेख :** एकाच दगडाने बनवलेल्या खांबावर ज्यावेळी आलेख कोरलेला असतो त्यावेळी त्याला 'स्तंभालेख' असे म्हणतात.

  या स्तंभालेखामध्ये पुन्हा ध्वजस्तंभ, जयस्तंभ, छायास्तंभ, वीरगळ असे प्रकार पडतात. यातील ध्वजस्तंभामध्ये एक स्तंभ उभा करीत. त्या स्तंभावर जे शिल्प असे त्या शिल्पाला 'ध्वज' असे म्हटले जाते. जसे, सारनाथ येथून जे चार सिंहाचे शिल्प सापडलेले आहे (ही आपली राजमुद्राही आहे) तो एकेकाळाच्या 'सिंहध्वजा'च भाग होता. म्हणजे, एका स्तंभावर हे शिल्प होते. विदिशा (मध्य प्रदेश) या ठिकाणी एक विष्णूचे मंदिर आहे. त्यासमोर एक गरूड-स्तंभ आहे. यावर ग्रीक राजदूत हेलिओडोरस याने लेख कोरलेला आहे (इ.स.पू. २ रे शतक). तर जयस्तंभ हा दिग्वीजयानंतर उभा केला जात असे. जसे, यशोधर्म या राजाचा मंदसौर येथील जयस्तंभ. तर एखादा मृताच्या स्मरणासाठी 'छायास्तंभ' उभारत असत. तर धारातीर्थी पडलेल्या वीरांच्या स्मरणार्थ 'वीरगळ' उभे केले जात असत. दक्षिणेकडील वीरगळांमध्ये त्या-त्या लढाईची माहितीही कोरलेली असते.
- **ताम्रपट :** ज्यावेळी तांब्याच्या पत्रावर आलेख कोरलेले असतात त्यावेळी त्यांना 'ताम्रपट' असे म्हणतात. असे ताम्रपट हलवता येण्यासारखे असतात. हे आयताकृती असतात. साधारणत: तीन तांब्याच्या पत्र्यावर हे कोरलेले असतात. अक्षरे झिजू नयेत म्हणून वरच्या आणि खालच्या पत्र्यावर कोरले जात नाही. तर एकमेकांवर घासून अक्षरे झिजू नयेत म्हणून या पत्र्याच्या कडा थोड्याशा वर उचलल्या जात. असे ताम्रपट, एका कडीने एकत्रित ठेवलेले असत. असे ताम्रपट काही ग्रॅमपासून तीन चार किलोपर्यंत मिळालेले आहेत.

वरील प्रमुख प्रकाराशिवाय, पुराभिलेख आपल्याला नाण्यांवर, मातीच्या भांड्यावर, विटांवर, मुद्रांवरही सापडतात. तसेच, कागदाच्या शोधापूर्वी, भूर्जपत्र, ताडपत्र आणि कापडांवरही लेखन सापडते. यांचा विशेष अभ्यास हा 'हस्तलिखितशास्त्र' (Manuscriptology) या विद्याशाखेमध्ये केला जातो.

(ब) पुराभिलेख विविध उद्देशाने लिहिलेले असतात. यांचा उद्देश लक्षात घेऊन आपण या पुराभिलेखांचे पुढीलप्रमाणे प्रकार पाडू शकतो. जसे,

**(अ) शासकीय आलेख :** हे राजाकडून किंवा प्रशासनाकडून प्रसिद्ध केले जातात. यामध्ये पुन्हा,

- **राजशासने :** यावर मुख्यत: राजाज्ञा असतात. उदा. अशोकाचे शिलालेख
- **प्रशस्ती :** राजाचे कर्तृत्त्व सांगणारे प्रशंसापर आलेख, उदा. समुद्रगुप्ताचा अलाहाबाद स्तंभालेख, पुलकेशी दुसरा याचा ऐहोळ स्तंभालेख
- **भूदाने/ग्रामदाने :** मोबदला म्हणून, कौतुक म्हणून, महसूल/पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी म्हणून कोरलेले आलेख. हे शिलालेख ही असू शकतात आणि मोठ्या प्रमाणावर ताम्रपट असतात.

**(ब) खाजगी व्यक्तींचे / संस्थांचे आलेख :** यामध्ये मंदिर / मठांना दिलेल्या देणग्या, मूर्तीची प्रतिष्ठापना, तलाव / कुंड बांधल्याप्रित्यर्थ अशा आलेखांचा समावेश होतो. तसेच, कोरीव लेणे, स्तूपांची तोरणे यांच्यावरही लेख आढळतात. जसे, भारहूतच्या स्तूपावरील तोरणांवर कराडच्या कारागीरांनी लेख कोरलेला होता. तसेच मूर्तींच्या आसनपट्टीवरही लेख आढळतात. कुंडाच्या भिंतीवर लेख आढळतात.

**पुराभिलेखांची लिपी आणि भाषा :** आपल्या इतिहासातील लेखनाचा पहिला स्पष्ट पुरावा म्हणजे अशोकाचे शिलालेख होय. यापूर्वी लेखनाचे आपल्याला ज्ञान होते, मात्र त्यांचे स्पष्ट पुरावे आपल्याला मिळत नाही. जसे, हडप्पा संस्कृतीमध्ये (इ.स.पू. २६००-१७००) मुद्रांवर, धोलवीरा येथील फलकावर अक्षरे दिसून येतात. ती अद्याप वाचता आलेली नाहीत. वैदिक काळामध्ये (इ.स.पू. १५००-१०००) संख्येचे ज्ञान होते, छंदशास्त्राचे ज्ञान होते. म्हणजेच यांना लेखनाचे ज्ञान होते. तसेच इ.स.पू. सहाव्या-चवथ्या शतकातील बौद्ध त्रिपिटकांमध्ये 'लेखनविद्या', लेखा, लेखक असे शब्द आलेले आहेत. पुढे इ.स.पू. चवथ्या शतकामध्ये आलेल्या निआर्कस या ग्रीक सेनापतीने, भारतीय लोक 'कापूस कुटुन तयार केलेल्या कापडावर लिहित' असे नमूद केलेले आहे. तर कर्टियस 'भूर्जपत्रावर' भारतीय लोक लिहित असतो असे म्हटले आहे. थोडक्यात, अशोकाच्या पूर्वीच किती तरी वर्षे आपल्याला लेखनकलेचे ज्ञान होते हे निश्चित. दुर्दैवाने, हे सर्व लेख सेंद्रिय वस्तूवर लिहिल्याने, काळाच्या ओघात त्या वस्तू नष्ट झाल्या आणि शिलालेख, दगडावर कोरलेले असल्याने ते चिरस्थायी ठरले.

अशोकानंतर आपल्याला पुराभिलेख मिळू लागतात. मौर्य, सातवाहन अशा घराण्यांचे हे पुराभिलेख आहेत. हे पुराभिलेख मुख्यत्त्वे प्राकृत भाषा आणि ब्राह्मी लिपीमध्ये आहेत. तर वायव्य भागातील आलेख आपल्याला प्राकृत भाषेमध्ये मात्र खरोष्ठी लिपीत दिसून येतात. कारण त्याठिकाणी ब्राह्मी समजत नव्हती. पुढे कुशाण आणि गुप्त काळापासून, संस्कृत भाषेला उर्जितावस्था प्राप्त झाली. त्यामुळे संस्कृत भाषेमध्ये आणि ब्राह्मी लिपीमध्ये पुराभिलेख दिसू लागतात. गुप्त काळ हा तर सर्वाथाने सुवर्णकाळ. त्यामुळे त्यांचे संस्कृत लेख हे लालित्यपूर्ण असे आहेत. पुढे हर्षवर्धनाच्या काळापासून केंद्रिय सत्ता कमकुवत झाली. प्रादेशिकतेचा उदय झाला. यातूनच प्रादेशिक भाषा आणि लिपीचे प्रादेशिक स्वरुप निर्माण झाले. यातून तामीळ, मराठी वगैरे भाषा निर्माण होतात. तसेच देवनागरी लिपी विकसित होत जाते.

लेखाप्रमाणे 'अंकही' आपल्याला पुराभिलेखामध्ये दिसून येतात. अर्थात हे अंक साधारणत: अक्षरांमध्येच लिहिले जातात. जसे, ४ या अंकासाठी 'क', १० साठी 'ठ' अशाप्रकारे. पुढे-पुढे हे अंक प्रतिकात्मक स्वरुपात शब्द लिहून कोरले जात. जसे, ० या अंकासाठी आकाश हा शब्द, २ साठी नेत्र/कर्ण (कारण ते दोन असतात), ४ साठी वेद, ५ साठी पांडव, ६ साठी ऋतू , ३२ साठी दंत इ.

पुराभिलेखामध्ये कालगणनासुद्धा कोरलेली असते. ही राज्याभिषेकानंतर अमुकअमुक वर्षे, बुद्धनिर्वाणानंतर अमुकअमुक वर्षे, शक, संवत अशा प्रकारे दिलेली असते. तसेच तिथी, वार, मास, ऋतू यांचाही उल्लेख असतो. ही संक्षिप्त स्वरुपात दिलेली असतात, जसे, सं=संवत, ग्री=ग्रीष्म.

**पुराभिलेख कसे कोरले जात ? :** साधारण शिलालेख तयार करत असताना, प्रथम दगड गुळगुळीत केला जात असे. त्यानंतर शाई अथवा खडूने लेख लिहिला जात असे. नंतर हा लेख छिन्नीने कोरला जात असे. यातील शाई ही, पिंपळाचा डिंक, टाकणखार इ.च्या उकळलेल्या मिश्रणातून तयार करीत. तसेच दिव्याची काजळी गोळा करूनही काळी शाई तयार केली जात असे. प्राचीन काळी शाईला 'मसी' असे म्हणत असून, 'मसीकुपिका' म्हणजे दौत होय. हे कोरण्याचे काम एका शासकीय अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली होत असे. त्याला 'अक्षपटलिक' असे म्हटले जात असे.

**पुराभिलेखांचा अभ्यास :** अशा पुराभिलेखांचा अभ्यास खऱ्या अर्थाने सुरू झाला तो सर विल्यम जोन्स यांच्या उत्साहातून. सर विल्यम जोन्स यांनी 'एशियाटिक सोसायटी' ही संस्था स्थापन केली (१७८४). या संस्थेद्वारे मोठ्या प्रमाणावर पुराभिलेख शोधण्याचे काम सुरू झाले. या शोधातून मिळालेल्या वस्तू, त्यांच्या अर्थासह प्रकाशित करण्यासाठी, 'एशियाटक रिसर्चेस' हे नियतकालिक सुरू केले (१७८८). तर त्या वस्तू ठेवण्यासाठी आणि प्रदर्शित करण्यासाठी 'इंडियन म्युझियम'ची स्थापना करण्यात आली. या संशोधकामध्ये जसे युरोपियन होते तसेच, त्यांनी प्रशिक्षित केलेले भारतीय होते. युरोपियनांमध्ये चार्लस विल्किन्सन (पाल, मौखरी घराण्याचे आलेखवाचन), बॅबींग्टन (महाबलीपूरम येथील तामीळ आलेखवाचन), राधाकांत शर्मा (चौहान घराण्याचे आलेखवाचन), यती ज्ञानचंद्र (राजस्थानमधील आलेखवाचन) इ. अर्थात भारतातील प्राचीन लेख हे भाषा कोणतीही असली तरी ब्राह्मी लिपीमध्ये आहेत आणि ही ब्राह्मी लिपी, विशेषत: अशोककालीन ब्राह्मी लिपी अद्याप वाचली गेली नव्हती. ती वाचली जेम्स प्रिन्सेप यांनी (१८३४-३८).

हे शिलालेख आणि त्यांचे वाचन प्रकाशित करणे आणि संशोधनासाठी खुले करणे हेही महत्त्वाचे असते. यापूर्वी विल्यम जोन्सने एक नियतकालिक सुरू करून या कार्याचा श्रीगणेशा केलेलाच होता. मात्र यामध्ये सर्व प्रकारची संशोधनं असत. खास पुराभिलेख प्रकाशित करणे आवश्यक होते. त्यामुळे अलेक्झांडर कनिंगहॅमने 'कार्पस इन्स्क्रिप्शन इंडिकॅरम' हे नियतकालिक सुरू केले (१८७७). पुढे जेम्स बर्जेस यांनी 'एपिग्राफिका इंडिका' ही मालिका सुरू केली (१८८८). पुढे १९१० मध्ये ल्यूडर्स यांनी भारतातील सर्व ब्राह्मी पुराभिलेखांची यादी प्रकाशित केली. यामध्ये या पुराभिलेखांचा सारांशही दिलेला होता. तसेच व्यक्तीनाम, ग्रामनाम सूचीही दिलेली होती. ही यादी 'ल्यूडर्स लिस्ट' या नावाने प्रसिद्ध आहे.

**पुराभिलेखांचे विषय :** पुराभिलेखांमध्ये प्रचंड स्वरुपाची माहिती दिलेली असते. राजा एखादे भूदान देतो. त्याचा तपशील स्थायी स्वरुपात शिलालेखांच्या माध्यमात दिसतो. असे शिलालेख दान दिलेल्या जमिनीत पुरलेले असतात. तर एक पुरावा म्हणून, असे आलेख ताम्रपटावर कोरलेले असतात. अशी भूदानं ही क्षत्रियांना त्यांच्या कर्तृत्वासाठी, कार्यासाठी दिले जात असे. तसेच विद्यादान आणि धर्मपालनसाठी ब्राह्मणाच्या एका कुटुंबाला किंवा

ब्राह्मणांच्या समूहाला दिले जात असे. असे भूदान ज्यावेळी, एका जमिनीचे असे त्याला 'ब्रह्मदेय' तर गावांचे असे तर 'अग्रहार' असे म्हटले जात असे. एका मंदिराच्या व्यवस्थेसाठी ते जर असेल तर त्याला 'देवदान' असे म्हटले जात असे. तर बौद्ध भिक्षूंना दिलेल्या दानास 'भिक्षुदल' असे म्हटलेले आहे. हे दान जर बौद्ध भिक्षूंना कायमस्वरुपी दिलेले असूल तर त्यास 'अक्षयनीवी' असे म्हणले जात असे.

**अशा पुराभिलेखामध्ये पुढील प्रकारची माहिती असते :** सर्वप्रथम पवित्र शब्द असत जसे 'स्वस्ति', 'सिद्धम' असे; त्यानंतर शुभचिन्ह असे; दानकर्त्याचा तपशील आणि वंशावळ, त्याचे आणि त्याच्या मागील तीन पिढ्यांचे कर्तृत्व; दान घेणाऱ्याचा तपशील; दानाचा उद्देश म्हणजे कशासाठी दान दिलेले आहे; दानाचा तपशील म्हणजे जमिनीची चतु:सीमा, एकूण महसूल किती-तो कशाप्रकारे मोजला गेला-त्यातील कितवा भाग राजाला पाठवायचा किती स्वत:कडे ठेवायचा, दानामध्ये त्या जमिनीतील/गावातील कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो जसे तलाव,विहिर इ., कशाचा समावेश होत नाही; दान घेणाऱ्याचे विशेषाधिकार म्हणजे त्या प्रदेशातून अगदी सैन्यानेही प्रवेश करायचा नाही इ.; दान समारंभाच्या वेळी उपस्थित असलेले अधिकारी-त्यांची नावे आणि पदे इ.; कोणत्या पर्वकाळी/ग्रहणाच्यावेळी/मुहुर्ताला दिले गेले, कोणत्या तिथीला, वारी दिले गेले; तसेच, लोककल्याणा-प्रीत्यर्थ उभारलेल्या योजनांबद्दलही माहिती दिलेली असते. जसे, गिरनार येथील सुदर्शन तलाव हा चंद्रगुप्त मौर्याच्या काळामध्ये बांधला गेला. पुढे तो शक राजा रुद्रदामन, गुप्त राजा स्कंदगुप्ताने दुरुस्त केला.

असा तपशील असलेले ताम्रपट राजधानीत जपून ठेवलेले असत. अशा प्रकारचा महाराष्ट्रातील पहिला शिलालेख हा अशोकाचा असून, सोपारे या ठिकाणचा आहे. तर पहिला ताम्रपट हा वाशिम येथील वाकाटक राजा विंध्यशक्ती दुसरा याचा आहे. तर मराठीतील पहिला शिलालेख हा गोमटेश्वराच्या मूर्तीखाली आहे (इ.स. १०६१) आणि मराठीतील पहिला ताम्रपट हा दिवेआगार या ठिकाणी सापडलेला आहे (इ.स. १०६०).

**काही महत्त्वाचे शिलालेख : (अ) अशोकाचे आलेख**

अशोक हा मौर्य सम्राट होय. त्याच्या काळामध्ये मौर्य साम्राज्य जवळपास संपूर्ण भारतभर पसरलेले होते. अशोकाने आपले धोरण स्पष्ट करण्यासाठी शिलालेख आणि स्तंभालेखांचा आधार घेतला. यांना 'अशोकाच्या राजाज्ञा' असेही आपण म्हणू शकतो. अशोकाच्या या आलेखांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येते.

**१. शिलालेख :** कालसी (उत्तर प्रदेश); धौली, जौगढ (ओरिसा); एरागुड्डी (आंध्र प्रदेश); सोपारे (महाराष्ट्र); गिरनार (गुजरात); शहाबाजगढी, मन्सेरा (पाकिस्तान).

**२. लघुशिलालेख :** अहरौरा (उत्तर प्रदेश); सहस्त्राम (बिहार); कलकत्ता-बैराट (प. बंगाल); एरागुड्डी (आंध्र प्रदेश); मस्की सिद्दापूर, ब्रह्मगिरी, जटिंगरामेश्वर (कर्नाटक); रुपनाथ (मध्य प्रदेश); बैराट (राजस्थान).

**३. स्तंभालेख :** दिल्ली-टोपडा, दिल्ली-मीरत (दिल्ली); अलाहाबाद-कोसम (उत्तर प्रदेश); लौरिया अरराज, लौरिया नंदनगढ, रामपूर्वा (बिहार).

**४. लघुस्तंभालेख :** सारनाथ (उत्तर प्रदेश), सांची (मध्य प्रदेश), रुम्मिनदेई, निगलीसागर (नेपाळ), शेरेकुना (अफगाणिस्थान).

**शिलालेख**

सर्वसाधारण: अशोकाच्या १४ राजाज्ञा या शिलालेखांमध्ये कोरलेल्या आढळतात. प्रातिनिधिक स्वरुपात गिरनारचा याठिकाणी आपण थोडक्यात विचार करू. थोड्याफार फरकाने तीच माहिती इतर शिलालेखामध्ये आहे. काही नवीन आज्ञाही इतरत्र आढळतात.

**गिरनार (गुजरात) :** या ठिकाणी अशोकाच्या १४ राजाज्ञा अथवा त्याचे धोरण कोरलेले आहे.

**आज्ञा १ :** प्राण्यांचा वध करू नये, बळी देऊ नयेत. राजवाड्यातही मांसाहार टाळावा.

**आज्ञा २ :** अशोकाने आपल्या राज्यात तसेच मित्रांच्या राज्यामध्ये मनुष्यचिकित्सा आणि पशुचिकित्सेच्या सेवा उपलब्ध करून दिल्या. तशा औषधी वनस्पतींची लागवड केली. जनावरे आणि माणसे दोघांसाठी रस्त्याची, पाण्याची, सावलीसाठी झाडांची सोय केली.

**आज्ञा ३ :** सर्व अधिकाऱ्यांनी धम्माची शिकवण देण्यासाठी आणि इतर कार्यासाठी दर पाच वर्षांनी दौरे काढावेत. सर्वांनी मातापित्यांची सेवा करावी.

**आज्ञा ४ :** राजाने युद्ध सोडून आता धम्माचा प्रचार सुरू केलेला आहे.

**आज्ञा ५ :** राजाने धर्ममहामात्रांची नेमणूक केलेली आहे. धम्मप्रसारासाठी तसेच धम्मपालनावर लक्ष ठेवण्यासाठी ही नेमणूक आहे.

**आज्ञा ६ :** राजाने हेरांची नेमणूक केली. हे हेर, राजाला, कुठेही, कधीही, केव्हांही भेटू शकतात. राजाचे लोककल्याण हे प्रमुख कर्तव्य आहे. तो लोकांची गाऱ्हाणी कुठेही ऐकेल.

**आज्ञा ७ :** राजाची इच्छा आहे की सर्वपंथीय लोक सगळीकडे रहावेत.

**आज्ञा ८ :** राजाने, विहारयात्रा (शिकार, मनोरंजन) सोडून आता धर्मयात्रेला सुरुवात केलेली आहे.

**आज्ञा ९, ११ :** समारंभ निष्फळ असतात. त्यामुळे धर्माचरण केले पाहिजे. धर्माचरण म्हणजे वडिलधाऱ्यांचा आदर, नोकरांना योग्य वागणूक, प्राणीमात्रांवर दया, अहिंसा, श्रमण आणि ब्राह्मण यांना दान.

**आज्ञा १० :** राजा यशप्राप्ती आणि किर्तीला महत्त्व देत नाही. तर धम्माचरणाला प्राधान्य देतो.

**आज्ञा १२ :** प्रत्येकाने दुसऱ्या संप्रदायाचा आदर केला पाहिजे. जो दुसऱ्या धर्माची निंदा करतो तो स्वधर्माचीच हानी करत असतो. सर्व संप्रदायांनी कल्याणकारी सिद्धांताचा पाठपुरावा करावा.

**आज्ञा १३ :** कलिंग युद्धामध्ये लाख लोक मारले गेले. राजाला पश्चात्ताप झाला. त्याला कळून चुकले ज्या विजयामुळे प्रेमभावना वाढते तोच खरा विजय होय.

**आज्ञा १४ :** हे आलेख का कोरले त्याची कारणे.

**कालसी, शहाबाजगढी, मन्सेरा :** या ठिकाणी अशोकाच्या १४ राजाज्ञा कोरलेल्या आहेत. तर धौली, जौगढ या ठिकाणी ३ आज्ञा नाहीत मात्र नव्या दोन आज्ञा आहेत.

**लघुशिलालेख**

या शिलालेखांमध्ये पाच-सहा ओळी आहेत. गुर्जरा (उत्तर प्रदेश) येथील लेखांमध्ये 'देवानाम प्रिय प्रियदसिनो असोकराज' (देवानाम प्रिय प्रियदर्शिनी अशोकराजा) असा स्पष्ट उल्लेख आहे. तर मस्की (कर्नाटक) लेखांमध्ये 'असोक' आणि 'देवानंप्रिय' असा उल्लेख आहे.

**स्तंभालेख**

- **दिल्ली-टोपडा आणि दिल्ली-मीरत :** हे दोन्ही स्तंभालेख मूळत: टोपडा आणि मीरत येथे होते. फिरोजशहा तुघलक या सुलतानाने हे दिल्लीला आणले. म्हणून त्यांना जोडनावाने ओळखले जाते.
- **लौरिया अरराज, लौरिया नंदनगढ :** अलेक्झांडर कनिंगहॅमला लोरिया या गावाच्या जवळपास हे दोन्ही स्तंभालेख सापडले. यातील लौरिया अरराज या स्तंभावर गरूडध्वज असून, नंदनगढच्या स्तंभावर सिंहध्वज आहे. याच स्तंभावर, अशोकाच्या आलेखाच्या खाली औरंगजेबाचेही लेख आहेत.
- **रामपूर्वा :** येथील स्तंभावरही सिंहध्वज आहे. तसेच अशोकाचे सहा लेख यावर कोरलेले आहे.
- **अलाहाबाद-कोसम :** या स्तंभावर अशोकाचे सहा लेख आहेत. त्याखाली समुद्रगुप्ताची प्रशस्ती याठिकाणी कोरलेली आहे. यावर जहांगीरचेही लेख आहेत. मूळात हा स्तंभ कौशांबी या ठिकाणावरून, अकबराने अलाहाबादला आणला. म्हणून हे जोडनाव.

**लघुस्तंभालेख**

- **सारनाथ :** येथील स्तंभावर सिंहध्वज होता. हा सिंहध्वज आपल्या देशाची राजमुद्रा बनलेला आहे.
- **शेरेकुना :** शांतीचा संदेश देणारा हा स्तंभालेख आहे. हा अरेमाईक लिपीत लिहिलेला आहे.

**अशोकाच्या आलेखाची वैशिष्ट्ये :**

- या आलेखावरूनच अशोकाची माहिती मिळते. त्याचे 'देवानाम प्रियदर्शी राजा' हे बिरुद मिळते.
- अशोक धम्माचा प्रचार करतो. हा धम्म बौद्ध धर्म नाही. तर अशोकाची स्वत:ची ही 'धम्म कल्पना' आहे. अशोकाच्या या धम्मामध्ये 'नैतिक तत्त्वां'चा समावेश होतो.
- 'युद्धाऐवजी प्रेम, वडिलधाऱ्यांची सेवा, नोकरांप्रती चांगली वागणूक, त्यागी माणसांचा आदर, विरोधी विचारांबद्दल धोरण, प्राणीमात्रांबद्दल दया' ही वैश्विक नितीमूल्ये अशोक जोपासताना दिसतो.
- अशोकाने आपली संपूर्ण प्रशासनव्यवस्था, साम्राज्यामध्ये नैतिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी गुंतवलेली होती हे लक्षात येते.
- अशोकाचा धार्मिक सहिष्णुतेचा आग्रह कळतो. त्यावरून त्याकाळी धर्माधर्मांमध्ये वाद होत असत याकडेही लक्ष जाते.

- अशोकाचे ग्रीस, सिरिया, श्रीलंका या देशांशी असणारे मित्रत्वाचे संबंध कळून येतात.
- यज्ञीय हिंसा, मांसाहार, खर्चिक समारंभ याचा अशोक विरोध करतो. तो स्वत: त्याचा अवलंब करतो.
- अशोकाचे हे लेख अशा ठिकाणी कोरले ज्याठिकाणी माणसांची वर्दळ असते, जसे, बाजार, चौक इ. म्हणजे आपले धोरण आणि विचार सर्वसामान्यांपर्यंत जावे असे त्याला वाटत होते.
- त्याचप्रमाणे ते अशा भाषेत (प्राकृत) आणि लिपीत (ब्राह्मी, वायव्य भागात खरोष्टी) लिहिलेले होते की जी सर्वसामान्यांना समजेल.
- ही राजाज्ञा देण्याची जी पद्धती आहे त्यावर पर्शियन शैलीचा मोठा प्रभाव आहे. तसेच, मूळातच 'शिलालेख उभारणे' या संकल्पनेवर पर्शियाचा प्रभाव आहे. कारण अशोकाअगोदर आपल्याला भारतात ना शिलालेख मिळतात ना त्यांचा विकास आढळतो. तत्कालीन पर्शियामध्ये मात्र ही पद्धती होती. सांस्कृतिक संबंधांद्वारे ही परंपरा आपल्याकडे आली.

**(ब) पुलकेशी दुसरा याचा ऐहोळ-आलेख**

पुलकेशी दुसरा हा चालुक्य घराण्यातील एक मोठा राजा होय. यांची राजधानी 'वातापी' (बदामी, जि. विजापूर, कर्नाटक). याच्या काळामध्येच युवान श्वांग हा चिनी प्रवासी याच्या राज्यात येऊन गेला. रविकिर्ती हा याच्या दरबारातील एक प्रतिष्ठित राजकवी. तो साहित्य आणि कलेमध्ये पारंगत होता. या रविकिर्तीने ऐहोळ या ठिकाणी एक जैनमंदिर बांधले. तसेच या जैनमंदिराच्या एका भींतीवर आपल्या राजाची प्रशस्ती कोरली. यालाच 'ऐहोळ प्रशस्ती' असे म्हणतात (इ.स.६३४).

हा लेख १८ ओळी आणि ३७ पंक्तींचा असून, संस्कृतमध्ये आहे. यातील तपशील पुढीलप्रमाणे :

- १ ते ३ पंक्तींमध्ये, रविकिर्ती, जिनेंद्र, चालुक्य घराणे आणि पुलकेशी दुसरा (सत्याश्रय असे म्हटलेले आहे) यांचा जयजयकार करतो.
- ५ व्या पंक्तीमध्ये तो, जयसिंह वल्लभ राजाच्या पराक्रमाचे वर्णन करतो. ६ व्या मध्ये, रणराग राजाच्या, ७-८ पंक्तीमध्ये प्रथम पुलकेशीच्या, ९-१० पंक्तीमध्ये किर्तीवर्मनच्या, ११-१३ पंक्तीमध्ये मंगलेश राजाच्या पराक्रमाचे वर्णन करतो.
- १४-१५ व्या पंक्तीमध्ये, मंगलेश आणि त्याचा पणतू पुलकेशी दुसरा यांच्या मतभेदाचे वर्णन करतो.
- १६ व्या पंक्तीपासून पुलकेशी दुसरा याच्या कर्तृत्वाची प्रशंसा सुरू होते. त्याने पराभूत केलेल्या राज्यांची, राजघराण्यांची माहिती मिळते. जसे त्याने पुढील राज्ये काबीज कलि, वनवासी नगर आणि किल्ला (१८वी पंक्ती), पिष्ठपूर (२७), केरळ, पांड्य (३१) कोकण (२०), ओरिसा (२१,२६), दक्षिण गुजरात आणि दक्षिण मध्यप्रदेश-माळवा (२२, २४). त्याने समकालीन असणाऱ्या हर्षवर्धनाचाही पराभव केलेला होता (२३). तसेच पल्लव (२९) आणि चोलांसारख्या (३०) पराक्रमी राजघराण्यांनाही धूळ चारलेली होती. त्याचा साम्राज्यविस्तार ही दिलेला आहे (२५, ३५).

- ३२ व्या पंक्तीमध्ये पुलकेशी दुसऱ्याच्या वातापी राजधानीचे वर्णन येते. तर ३३ आणि ३४ व्या पंक्तीमध्ये लेखाचा काळ येतो. ३५ आणि ३६ व्या पंक्तीमध्ये रविकिर्तीनेच हे जैनमंदिर बांधल्याचा उल्लेख येतो.
- शेवटच्या ३७ व्या पंक्तीमध्ये रविकिर्ती आत्मस्तुती करतो आणि स्वत:ला 'कालिदास आणि भारावी' या महाकवींच्या पंक्तीत आहे असे सांगतो.

**महत्त्व**

- चालुक्य घराणे, त्या घराण्यातील पुलकेशी दुसरा या राजापर्यंतची वंशावळ याबाबत माहिती मिळते.
- पुलकेशी दुसऱ्याच्या समकालीन मध्य आणि दक्षिण भारतातील विविध राज्ये आणि तेथील राजघराणी यांची माहिती मिळते.
- पुलकेशी दुसऱ्याचे पराक्रम कळून येतात. यातून चालुक्यांचा राज्यविस्तार कळून येतो. 'तिन महाराष्ट्र (२५), ''तिन्ही समुद्राने वेढलेला' (३५) या शब्दांवरून, तो संपूर्ण दक्षिण भारताचा सम्राट होता हे कळते. तसेच, त्याने दक्षिण गुजरात, दक्षिण मध्यप्रदेश, ओरिसाही ताब्यात घेतलेला होता हे कळते.
- काळ सांगताना रविकिर्ती, भारतीय युद्धानंतर ३७-३५ वर्षे लोटल्यानंतर आणि कलियुगातील शक राजांची ५५६ वर्षे लोटल्यानंतर असे लिहितो. या दोन्ही बाबी प्रस्तुत लेखाचा काळ इ.स. ६३४ निश्चित करतात.
- रविकिर्ती हा एक मोठा साहित्यिक होता. त्याने हा लेख सर्व वृत्त-मात्रांचा विचार करून लिहिलेला आहे. संस्कृत भाषेचे सौंदर्य त्याच्या आलेखामधून कळून चुकते. त्याचे शब्दभंडार, त्याची मांडणी हे अतिशय सुंदर आहे. प्रचंड अलंकारांनी, दृष्टांतांनी, उपमांनी नटलेला हा लेख आहे. जसे, 'रणांगणरुपी मंदिरामध्ये कटचुरींच्या वैभवरुपी वधूस प्राप्त करून घेतले' (ओळ १२), 'त्याच्या प्रतापापुढे नमलेले लाट, मालव, गुर्जर हे बळाने जिंकलेल्या मांडलिक राजाने कसे वागावे याचे शिक्षण देणारे जणू आचार्य झाले' (पंक्ती २२), 'कोकणामध्ये त्याच्या आज्ञेने प्रचंड सैन्यांच्या लाटांमुळे मौर्यरुपी छोटी डबकी उद्ध्वस्त झाली' (पंक्ती २०), 'त्याने जेव्हा चोलांवर विजय मिळवण्याचा उद्योग आरंभला तेव्हा चपळ मासे हेच जिचे चंचल नेत्र आहेत अशी कावेरी नदी त्याच्या मस्त हत्तीच्या तांड्यांचा बांध घातल्याने समुद्राचा स्पर्श टाळू शकली'. इ.

**प्राचीन भारतीय इतिहासलेखनाचे एक साधन म्हणून पुराभिलेखाचे महत्त्व**

- तत्कालिन राजे, त्यांची घराणी आणि वंशावळी यांची आपल्याला माहिती होते.
- राजाचे कर्तृत्त्व, त्याचे धोरण समजते, जसे, अशोकाच्या शिलालेखातून त्याचे धोरण समजते, अलाहाबाद स्तंभालेखातून समुद्रगुप्ताचा पराक्रम समजतो. नाशिक शिलालेखातून गौतमीपुत्र सातकर्णीचा पराक्रम समजतो. हाथीगुंफा लेखातून खारवेलाचे लोककल्याणाची कामे समजतात.
- राजाचा राज्यविस्तार समजतो. जसे, अशोकाचे शिलालेख ज्या-ज्या ठिकाणी सापडलेले आहेत यावरून

त्याचा राज्यविस्तार कळतो. तसेच, 'त्रिसमुद्रतोयपितवाहन' या गौतमीपुत्र सातकर्णीच्या बिरुदावरून, त्याचे दक्षिण भारतावर राज्य आहे हे कळते.

- कालगणनेच्या नोंदीवरून राजांचा कालक्रम निश्चित करता येतो.
- राजकर्त्यांच्या वंशावळीवरून आपल्याला एखाद्या राजघराण्यातील संगतवार राजे कळून येतात; त्यांचे पराक्रम कळून येतात.
- अक्षराच्या वळणावर स्थळ,काळाचा नेहमी प्रभाव पडत असतो. त्यामुळे या अक्षरवाटिकेवरून आपल्याला स्थळ, काळ समजायला मदत होते.
- भूदान परंपरेची, व्यवस्थेची माहिती मिळते. यातून प्रशासकीय धोरण कळून येते.
- तत्कालिन जमिन महसूल व्यवस्थेची, धार्मिक धोरणाची माहिती मिळते.
- तत्कालीन अधिकारी व त्यांच्या पदांची नावे मिळतात.
- पिके, जमिनीचा प्रकार, पाणीपुरवठ्यांचे प्रकार इ. माहिती मिळते.
- राजाचा धार्मिक कल समजतो.

### ४.२.४ नाणकशास्त्र : अर्थ, स्वरुप, प्रमुख नाणेसंच (आहत, ग्रीक, कुशाण आणि गुप्त)

नाण्यांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रास नाणकशास्त्र (Numismatics) असे म्हटले जाते. इतिहासाचा अभ्यास करताना, या नाण्यांचे एक साधन म्हणून खूप महत्त्व आहे. म. के. ढवळीकर यांचा 'भारतीय नाणकशास्त्र' हा ग्रंथ आपल्याला या विषयावर मोलाची माहिती देतो.

एक काळ होता की ज्यावेळी नाणी अस्तित्वात नव्हती. सर्व व्यवहार हे वस्तूंची अदलाबदल करून होत असत. मात्र जस-जसा व्याप वाढू लागला, तशा या वस्तूविनिमय पद्धतीमधील अडचणी दिसू लागल्या. आपल्याला माहीत आहे की वैदिक काळामध्ये गाय ही संपत्ती असे. त्यामुळे वस्तुविनिमयामध्ये गाय देऊन वस्तू विकत घेतल्या जात होता. इथे अडचण येऊ लागली. जसे, मूल्यांची विभागणीचा प्रश्न. म्हणजे, आपण जर १० किलो धान्य घेण्यासाठी जर एक गाय देत असू. तर, जर, १/२ किलो धान्य हवे असल्यास १/२ गाय देणे हे हास्यास्पद होते. शिवाय, गाय नाशवंत असे. त्यामुळे संपत्ती साठवणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे जर व्यापारासाठी दूरदेशी जायचे असेल तर 'गाय' या संपत्तीची ने-आण करणे तसे अवघडच होते. अशा अडचणींमुळे पुढे नाण्यांचा उदय झालेला दिसून येतो.

प्राचीन जगातही अशा प्रकारचे वस्तूविनिमय (आणि त्यातील समस्या) असे. पुढे इजिप्तशियन संस्कृतीमध्ये, ठरावीक वजनाच्या सोन्याच्या अंगठ्या या विनिमयात वापरल्या जात असत. यांना 'टॅब्यून' असे म्हणत. अशा प्रकारे ठरावीक मूल्याच्या धातूचा वापर विनिमयात होणे सुरू झाले. पुढे, बॅबिलोनियन लोक, ठरावीक वजनाचे चांदीचे गोळे वापरू लागले. यांचे छोट्या मूल्यात विभाजनही होऊ लागले, जसे, शेकूल, मीन, टॅलेंट असे. थोडक्यात,

आता, मूल्यविभाजनाची सुरुवात झाली असे म्हणता येईल. पुढे लिडियामध्ये धातूच्या तुकड्यावर चिन्हे उमटवली जाऊ लागली (इ.स.पू. ७००). ही चिन्हे या धातूच्या वजनाची आणि शुद्धतेची हमी देण्यासाठी असावीत. या चिन्हांबरोबरच, या तुकड्यांवर प्राण्याची चित्रे, लेखही दिसू लागतात. शिवाय ही नाणी विविध पट्टीतीलही आहेत. थोडक्यात, इ.स.पू. ७०० नंतर जगामध्ये खऱ्या अर्थाने नाण्यांचा उदय झाला असे म्हणता येईल.

भारताचा विचार करता, वैदिक काळातच (इ.स.पू. १५०० पासून पुढे) धातूंच्या तुकड्यांचा विनिमयासाठी वापर सुरू झालेला दिसतो. या तुकड्यांना कृष्णल, सुवर्ण, शतमान, निष्क इ. नावांनी ओळखले जात होते. ऋग्वेदामध्ये उल्लेख आहे की, कक्षिवक नावाच्या ऋषींनी, १० निष्क देऊन १० घोडे घेतले. अर्थात, ढवळीकरांच्या मते, या तुकड्यांवर चित्र, लेख नसत त्यामुळे यांना नाणी म्हणता येणार नाहीत. तरीही, वैदिक काळात, विनिमयासाठी धातूंच्या तुकड्यांचा, गाईसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून उपयोग सुरू झालेला होता हे मात्र निश्चित. सर्वसाधारणत: इ.स.पू. ६ व्या शतकांमध्ये आपल्याला खऱ्या अर्थाने नाणी उदयास आली असे म्हणता येईल. १७५ ग्रॅम वजनाचे हे 'शतमान'नावाचे नाणे आहे. याचा उल्लेख वाङ्मयातही आहे आणि तक्षशीलेच्या उत्खननामध्ये तशी नाणीही मिळालेली आहेत. या शतमानाचे पुढे अर्धशतमान, पाव शतमान, पादार्ध शतमान,शाण (आठवा भाग) असे विभाजनही दिसू लागते. या शतमानानंतर, कार्षापण हे नाणे अस्तित्वात आले. जातककथांमध्ये यांच्या वापराचे पुरावेही आपल्याला मिळतात. जसे, १२ कार्षापणाला १ बैल.

इ.स.पू. ६ व्या शतकानंतर मोठ्या प्रमाणावर दिसू लागलेल्या अशा शतमान आणि कार्षापण नाण्यांनाच आपण 'आहत नाणी' म्हणतो.

**आहत नाणी**

आहत याचा अर्थ आघात केलेली. धातूच्या तुकड्यावर आघात करून काही चिन्हे उमटवली जातात. म्हणून त्यांना आहत नाणी किंवा Punch Marked Coins (PMC) असे म्हटले जाते. इ.स.पू. ६ व्या शतकामध्ये १६ महा-जनपदे उदयास आलेली होती. मोठा व्यापार चाललेला होता. दुसरे नागरीकरण याच काळात घडून आले. इतक्या मोठ्या आर्थिक व्यापाला सांभाळणे हे नाण्यांशिवाय शक्यच नव्हते. म्हणून ही नाणी साधारणत: इ.स.पू. ६ व्या शतकानंतर दिसू लागतात. या नाण्यांना वाङ्मयामध्ये शतमान/कार्षापण अशा नावांनी ओळखले जाते. आपण, ती नाणी तयार करण्याच्या पद्धतीवरून त्यांना 'आहत नाणी' असे म्हणतो. विविध महाजनपदे तसेच व्यापाऱ्यांनी ही नाणी पाडलेली होती. साधारणत: उत्तर भारतामध्ये ही नाणी मोठ्या प्रमाणावर आढळतात. ती दक्षिणेत, व्यापाराच्या माध्यमातून कोईमतूरपर्यंत पसरलेली आहेत. ही नाणी इ.स.पू. २ ऱ्या शतकानंतर व्यवहारातून बंद झाली.

ही नाणी मुख्यत्त्वे चांदीची आहेत. ही ५६ ग्रेन्स वजनांची आहेत. आकाराने ही ओबडधोबड असली तरी गोल, चौकोनी असतात. त्याचबरोबर काही लांबट-वक्राकारही (Bent Bar) असत. ही लांबट-वक्राकार नाणी सर्वात प्राचीन होत. यांचे १७५ ग्रेन्स वजन आहे. अशी नाणी वायव्य भारतामध्ये सापडलेली आहेत.

ही आहत नाणी तयार करताना, प्रथम धातूच्या पत्र्याला कापून, त्याचे तुकडे केले जात. हे तुकडे ठराविक अशा वजनाचे असत. मग त्या तुकड्यावर ठशांनी चिन्हे उमटवली जात. पुढील बाजूस पाच/सहा तर मागील बाजूस

एक अथवा दोन चिन्हे असतात. यावरून तज्ज्ञ असे म्हणतात की मूळत: या नाण्यांवर फक्त पुढील (छापा : Observe) बाजूसच चिन्हे उमटवली जात असत. पुढे व्यवहारात आल्यावर, मागील (काटा : Reverse) बाजूस नाणी तपासणारे आपापली चिन्हे उमटवत. म्हणूनच, ही नाणी जितकी व्यवहारात अधिक तितके त्याच्या मागील बाजूस चिन्हे हे ओघानेच येते.

आहत नाण्यांच्यावरील चिन्हांमध्ये पुढील चिन्हांचा समावेश होतो, जसे, मानव, प्राणी (हत्ती, बैल, गेंडा), पक्षी (मोर), जलचर (मासे (जोडीने), बेडूक, कासव), फुले, टेकडी, नदी, सूर्य, चंद्र इ. तसेच, धनुष्यबाण, तराजू, भौमितिक चिन्हेही दिसून येतात. यामध्ये सूर्यासारखे दिसणारे 'षडरचक्र' हे चिन्ह हे एक विशेष चिन्ह होय. तसेच काही चिन्हे वारंवार येताना दिसतात. जसे, सूर्य, वर्तुळ, बैल, हत्ती, बाणांचे टोक, टेकड्या, झाड इ. ही चिन्हे विशिष्ट पद्धतीने, ठरावीक भागावर उमटवली जातात. असे म्हटले जाते की, प्रत्येक प्रदेशाची वैशिष्ट्यपूर्ण अशी चिन्हे होती.

**ग्रीक नाणी**

भारतातील पहिलीवहिली परकिय नाणी ही ग्रीकांची आहेत. तशीच साच्यातून काढलेली पहिली नाणी ही या ग्रीकांचीच. अलेक्झांडरच्या स्वारीनंतर, भारताचा आणि ग्रीकांचा सांस्कृतिक संबंध सुरू झाला. अलेक्झांडरने, भारतीय प्रदेशाचे विविध प्रांतामध्ये विभाजन करून, त्यावर राज्यपाल (क्षत्रप) नेमलेले होते. पुढे, अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर ते स्वतंत्र झाले. यामध्ये बॅक्ट्रियन ग्रीक होते, पार्थियन ग्रीक होते आणि इंडो-ग्रीक होते. असे जवळपास ४२ ग्रीक राजे उत्तर आणि वायव्य भारतामध्ये विशेषत: हिंदुकूश नजीकच्या प्रदेशामध्ये होऊन गेले. यांच्या इतिहासाची माहिती फक्त त्यांच्या नाण्यांच्या अभ्यासावरूनच आपल्याला होऊ शकते. यामधील 'इंडो ग्रीक' नाण्यांचा येथे थोडक्यात विचार करू.

इंडो ग्रीक नाणी ही सिरियातील ग्रीक नाण्यांच्या धर्तीवरच पाडलेली आहेत. ही नाणी सोने, चांदी आणि तांबे वापरून तयार केलेली आहेत. यातील चांदीची नाणी भरपूर असून, सोन्याची कमी सापडलेली आहेत. अशी नाणी मोठ्या व्यवहारासाठी वापरली जात असत. तांब्याची नाणी ही मुख्यत्वे दैनंदिन व्यवहारासाठी आणि साध्या गरजांसाठी वापरली जात. त्यामुळे तांब्याची नाणीही मोठ्या प्रमाणावर सापडतात. यातील सोन्याच्या नाण्याचे (स्टॅटर) वजन १३२ ग्रेन्स असे. तर चांदीचे (ड्रक्मा) ६६ ग्रेन्सचे असे. यावेळी सोने आणि चांदीचे किंमतीचे प्रमाण हे १:१० असे असे. तांब्याच्या नाण्यांचे वजन हे ७० ग्रेन्स असे. अशी इंडो-ग्रीकांची सोने आणि चांदीची नाणी ही आकाराने गोल आहेत तर तांब्याची नाणी चौकोनी आहेत.

ग्रीक नाण्यांच्या पुढील बाजूस राजाचा चेहरा आणि मागे ग्रीक देवता असे. या ग्रीक देवतांमध्ये झ्यूस (वज्र हे याचे प्रमुख अस्त्र), ॲथेना (अथेन्सची नगरदेवता, तिचा आवडता पक्षी घुबड), हिरॅक्लस (धनुष्यबाणासह), निके (विजयदेवता, हातात पुष्पमाला आणि पाम वृक्षाची फांदी) इ. चा समावेश होतो. यातील राजाचा चेहरा हा साधारणत: उजवीकडे पाहताना दिसतो. पुढे डिमिट्रियसच्या काळापासून, चेहऱ्याऐवजी राजाचा अर्धपुतळा दाखवणे सुरू झाले. राजाचे केस कुरळे असतात आणि साधारण: ते एका फितीमध्ये बांधलेले असतात. हा पर्शियन प्रभाव

होय. हा डिमिट्रियस पहिला ग्रीक राजा होय जो हिंदुकुश पार करून भारतामध्ये प्रवेश करू शकला. त्यामुळे याच्या नाण्यावर आपल्याला राजाच्या शिरस्त्राणावर हत्तीचे मुंडके दिसून येते. पुढे अगॅथोक्लोसच्या काळामध्ये ग्रीकांच्या नाण्यांवर कृष्ण आणि बलरामाच्या आकृती दिसू लागतात. अर्थात या आकृतींवर ग्रीक कलेचा प्रभाव आहे. अपोलोडोटसच्या काळामध्ये मात्र ग्रीकांचे जवळपास भारतीयीकरण पूर्ण होते. त्यामुळे त्याच्या नाण्यांवर आपल्याला भारतातील हत्ती आणि वशिंडयुक्त बैल अगदी भारतीय स्वरुपाचे दिसू लागतात.

बॅक्ट्रियन ग्रीकांची नाणी ही पूर्णपणे ग्रीक भाषेतील लेख असलेली आहेत. मात्र इंडो-ग्रीकांनी भारतीयांसाठी जी नाणी काढली ती द्वैभाषिक असत. पहिला युक्रेटायडिस हा द्वैभाषिक नाणी काढणारा पहिला राजा होय. ही द्वैभाषिक नाणी म्हणजे पुढील बाजूस ग्रीक लेख आणि तीच माहिती, मागील बाजूस प्राकृत भाषेत आणि खरोष्ठी किंवा ब्राह्मी लिपीत असे. याचे कारण म्हणजे भारतामध्ये प्राकृत भाषा जरी बोलली जात असली तरी, वायव्य भागात खरोष्ठी आणि उर्वरित भारतामध्ये ब्राह्मी लिपी वापरली जात असे. या द्वैभाषिक नाण्यांच्यामुळे आपल्याला एका ज्ञात लिपी/भाषेच्या मदतीने अज्ञात लिपी आणि भाषा वाचता येते. अशा नाण्यांवर राजाच्या नावाबरोबर त्याची बिरुदंही असत. अशा नाण्यांवर चिन्हंही असत. अशी ४०० हून अधिक चिन्हं सापडलेली आहेत असे तज्ज्ञांचे मत आहे. ही अर्थात, नाण्यांच्या मागील बाजूस असत.

ग्रीकांच्या व्यवहारातील नाण्यांबरोबर, काही प्रसंगोत्पात 'स्मारक नाणी'ही काढलेली दिसतात. ही नाणी मोठी असून, चांदी अथवा सोन्याची असत. जसे अलेक्झांडरने, त्याचा पौरसवरील विजय साजरा करण्यासाठी स्मारक नाणे काढलेले होते. यामध्ये पुढील बाजूस घोड्यावरून भाला फेकणारा अलेक्झांडर दिसतो. तर मागील बाजूस हत्तीवर बसलेला पौरस राजा दिसतो.

ग्रीकांच्या नाण्यांचा भारतीय नाण्यांच्या विकासावर मोठा प्रभाव पडला. नाणी साच्यातून काढावीत म्हणजे ती एकसारखी निघतात, नाणी गोल असावीत, ती सुबक असावीत, राजाचा चेहरा, देवता दाखवाव्यात, राजाचे नाव द्यावे, त्याची बिरुदं दाखवावीत, ज्या-ज्या प्रदेशात ही नाणी वापरायची त्या-त्या प्रदेशातील भाषा/लिपीमध्ये लेख असावेत इ. बरंचसं शिक्षण आपल्याला ग्रीक नाण्यांनी दिले. हा प्रभाव भारतीय नाण्यांच्यावर दिसतोच, शिवाय कुशाणांसारख्या परकीय नाण्यांवर सुद्धा दिसून येतो.

**कुशाण नाणी**

कुशाण हे मध्य आशियातील एक टोळी. यांना हूणांनी पिटाळून लावले. ते प्रथम ग्रीकांच्या सेवेत आले आणि पुढे उत्तर भारताच्या मोठ्या भागात त्यांनी जवळजवळ ३०० वर्षे राज्य केले. कुजुल कॅडफिसेस हा भारतातील कुशाण सत्तेचा संस्थापक होय. याच्यानंतर विम कॅडफिसेस, कनिष्क, हुविष्क, वासुदेव असे मोठे राजे कुशाणांच्यात होऊन गेले. यातील कॅडफिसेस राजांची माहिती आपल्याला फक्त नाण्यांच्यामुळे मिळते. हे राजे परकिय जरी असले तरी परमतसहिष्णू होते. यातील कनिष्क हा बौद्धधर्मीय होता तर याच्यानंतरचे राजे शैव. यांच्याच काळात देवदेवतांच्या मूर्ती करणे सुरू झाले.

कुजूलने जरी चांदी आणि तांब्यांची नाणी काढली तरी कुशाणांची बहुतेक नाणी सोन्याची आहेत. विशेषत: कनिष्काची सोन्याची नाणी मोठ्या प्रमाणावर सापडतात. यावरून आपल्याला लक्षात येते की याच्या काळात समृद्धी होती. सर्व नाणी गोलाकार आहेत. पुढे वासुदेवाच्या काळात मात्र नाणी ओबडधोबड, प्रचंड भेसळ असणारी दिसू लागतात. यावरून आपल्याला कळते की आता राज्याची अर्थव्यवस्था ढासळू लागलेली आहे. ग्रीक नाण्यांसारखाच पुढे राजा आणि मागे देवता हा प्रकार दिसून येतो. यांच्या नाण्यांवरील राजा हा सिंहासनावर बसलेला, रथात बसलेला, हत्तीवर अंबारीत बसलेला इ. असा दाखवलेला आहे. तसेच हे कुशाण राजे ढगांमध्ये बसलेले, ढगांमधून उगवणारे, प्रभावळ असलेले असेही दिसतात. यामुळे आपल्याला कळते की कुशाण राजे हे स्वत:ला देवतास्वरूप समजत आणि तसे ठसवण्याचा प्रयत्न करीत असत. याच्या नाण्यांवर उभा राजाही दिसून येतो. जसे वेदीमध्ये आहुती देणारा. हे राजे मध्य आशियातून आल्याने, मोठे बूट आणि कोट घातलेला राजा यांच्या नाण्यावर दिसून येतो.

ग्रीकांप्रमाणेच यांच्या नाण्यांच्या मागील बाजूवर देवदेवता दिसून येतात. विमनंतर कुशाणांच्या नाण्यांवर 'नंदीसह शिव', त्रिशूळ-डमरूधारी शिव आपल्याला दिसतोच दिसतो. यावरून आपल्याला कळते की शिवाची एकेकाळी मूर्तीस्वरुपात पूजा केली जात असे. त्याचे शिवलिंगस्वरुप फार पुढे प्रसिद्ध झाले असावे. हुविष्कांच्या नाण्यांवर 'कार्तिकेय' दिसून येतो. शिव देवतेशिवाय, कुशाण नाण्यांवर ग्रीक, पर्शियन, बौद्ध देवताही दिसून येतात. आपल्याला हे माहिती आहे की कनिष्क हा बौद्ध होता आणि इतर शैव होते. तरीही बाकीच्या देवता यांच्या नाण्यांवर दिसतात. याचे कारण म्हणजे त्यांचा राज्यविस्तार हा फार मोठ्या प्रदेशामध्ये झालेला होता. त्यामुळे त्या-त्या प्रदेशातील श्रद्धेय देवता या नाण्यांवर दिसणे हे राज्याच्या समर्थनासाठी आवश्यक असते. या पर्शियन (ईराणी) देवतांमध्ये ओएशो (तीन तोंडे असलेला, त्रिशूळ आणि कमंडलूधारक), अर्दाक्षो (हातात कॉर्न्युकोपिया) इ. चा समावेश होतो. शिवाय यांच्या नाण्यांच्या मागील बाजूवर काही चिन्हेही दिसतात. यातील 'नंदीपाद' हे चिन्ह विशेषकरून प्रत्येक नाण्यांवर आढळते.

यांच्या नाण्यांवर प्राणीही दिसून येतात. जसे, कुजूलच्या काळात कुशाण हे मुख्यत्वे वायव्य भारतामध्ये असल्याने, दोन वशिंड असलेला ऊंट दिसून येतो. तर, भारतामध्ये आल्यानंतर आपल्याला भारतीय बैल (वशिंडयुक्त) दिसू लागतो.

ग्रीकांप्रमाणेच, कुशाणांची नाणीही द्वैभाषिक आहेत. यांची सोन्याची नाणी १२३ ग्रेन्स वजनाची असत.

**गुप्त नाणी**

ज्या नाण्यांना पहिलीवहिली संपूर्णत: भारतीय नाणी म्हणता येईल ती गुप्त नाणी होत. आहत नाण्यांच्या प्रयोगानंतर, ग्रीक-कुषाणांसारख्या परकियांपासून शिकले गेले. आणि या ज्ञानाचा पूर्ण वापर करून पूर्णपणे स्वदेशी स्वरुपाची नाणी निर्माण झाली ती गुप्त काळातच. शिवाय, पूर्वीपेक्षा अतिशय कलात्मक, सुंदर आणि शुद्ध सोन्याची अशी ही नाणी होती.

सुरुवातीची गुप्त नाणी ही परंपरेचे पालन करणारी दिसून येतात. हे स्वाभाविक होते. कारण नविन राज्य निर्माण झाल्यावर, परंपरा पूर्णपणे खंडित करणे हे शक्यही नसते. म्हणजे नव्या नाण्यांचा वापर लगेचच विनिमयासाठी होणे

हे शक्य नसते. त्यामुळे गुप्तांची सुरुवातीची नाणी ही पुढे राजाचा चेहरा मागे देवता ही परंपरा राखणारीच दिसून येतात. तसेच नाण्यांवरील आकृत्यांचे कपडेही मध्य आशियासारखेच होते. मात्र पुढे बदल होत गेला. आता आकृतींना भारतीय कपडे दिसू लागतात. ग्रीक/कुशाण देवतेऐवजी सिंहवाहिनी दुर्गा, कमळावर बसलेली लक्ष्मी दिसू लागते. कॉर्निकोपियाऐवजी देवतेच्या हाती कमळ दिसू लागते. राजाच्या हातात आता धनुष्य दिसू लागते, कुऱ्हाड दिसू लागते.

गुप्तांची नाणी मोठ्या प्रमाणावर जी सापडतात ती सोन्याची आहेत. बहुतेक नाणी गोलाकारच आहेत. यावरील लेख 'कोरडे' न येता, वृत्तांमध्ये येऊ लागले. यांची भाषा संस्कृत असून, लिपी ब्राह्मी आहे. आपल्याला हे माहीत आहे की कुशाणांनी सोन्याची नाणी मोठ्या प्रमाणावर पाडली. मात्र, नाणे तयार करण्यासाठी त्यामध्ये जो इतर धातू मिसळला जातो तो कुशाण नाण्यांमध्ये ५०% आहे. मात्र गुप्ताच्या काळात समृद्धीही अधिक होती, शिवाय तंत्रज्ञानही अधिक विकसित होते. त्यामुळे गुप्त नाण्यांमध्ये मिसळ १०% च दिसून येते.

चंद्रगुप्त पहिला हा गुप्त साम्राज्याचा वास्तविक संस्थापक. याने आपले राज्य स्थिर ठेवण्यासाठी शेजारील लिच्छवी राजघराण्याशी वैवाहिक संबंध निर्माण केलेले होते. त्यामुळे याची नाणी संयुक्त दिसतात. म्हणजे, राजा आणि राणी दोघेही दिसतात. तर मागे 'लिच्छवीय:' अशी अक्षरे दिसून येतात. पुढे समुद्रगुप्त हा एक थोर सम्राट होऊन गेला. याच्या काळात गुप्तांचे एक साम्राज्यच निर्माण झाले. या समुद्रगुप्ताची नाणी पाहिल्यास त्यांचे सहा प्रकारामध्ये वर्गीकरण करता येते.

**१. राजदंड छाप :** यामध्ये पुढील बाजूस राजा हातात राजदंड घेऊन असतो. याच्या समोर एक गरूडध्वज असतो. नाण्यांचा हा प्रकार मोठ्या प्रमाणावर आढळतो. याचे वजन १०५-१२२ ग्रेन्स इतके आहे.

**२. धनुर्धर छाप :** राजाच्या हातात, राजदंडाऐवजी, धनुष्यबाण येते.

**३.परशू छाप :** याठिकाणी राजाच्या हातात कुऱ्हाड दिसते. मागील बाजूस कमळावर बसलेली किंवा हातात कमळ घेतलेली लक्ष्मी आहे.'कृतांतपरशू' हा लेख दिसून येतो.

**४.अश्वमेध छाप :** याठिकाणी घोडा दिसून येतो. त्याच्यासमोर यज्ञवेदी असते. मागे 'अश्वमेध पराक्रम:' हा लेख दिसून येतो. समुद्रगुप्ताच्या अश्वमेध यज्ञाच्या वेळी ही नाणी पाडलेली होती. यांचे वजन ११५-११८ ग्रेन्स आहे.

**५. व्याघ्र पराक्रम छाप :** बाणाने वाघ मारणारा राजा दिसतो. लेख 'व्याघ्रपराक्रम:' असा आहे. तर मागील बाजूस लेख 'राजा समुद्रगुप्त:' असा आहे. वजन ११५ ग्रेन्स.

**६. वीणावादक छाप :** हे दुर्मिळ नाणे आहे. यावर समुद्रगुप्त वीणा वाजवत बसलेला दिसून येतो.

समुद्रगुप्ताची ही नाणी म्हणजे गुप्त नाण्यांचा एक पॅटर्न दाखवतो. हे मूळ प्रकार कायम ठेवून पुढील गुप्त राजांनी नवे प्रकारही सुरू केलेले दिसून येतात.

पुढे चंद्रगुप्त दुसरा याने गुजरातवर विजय मिळवला. यातून, त्याने चांदीची नाणीही पाडायला सुरुवात केली.

या चांदीच्या नाण्यावंर शकांचा प्रभाव दिसून येतो. (याचे कारण गुजरातमध्ये शकांचे राज्य होते आणि तेथील प्रजेला या नाण्यांचाच परिचय होता. गुप्त साम्राज्यातील हा नवा भाग असल्याने, परंपरेचे पालन करणे हे चंद्रगुप्त दुसऱ्याला आवश्यक वाटत होते). त्याची नाणीही कलात्मक आहेत. त्याच्या सोन्याच्या नाण्यांमध्ये एकूण आठ प्रकार दिसून येतात. यामध्ये त्याने सुरू केलेले काही नवे प्रकारही दिसतात, जसे, घोडस्वार छाप (घोड्यावर बसलेला राजा), छत्र छाप (मागे प्रभावळ असलेला राजा), मंच छाप (मंचावर बसलेला राजा), इ. त्याने तांब्याची नाणीही काढलेली होती. या नाण्यांचा वापर दैनंदिन व्यवहारासाठी होत असावा. पुढे कुमारगुप्तानेही सोन्याची विविध नाणी सुरू केली. हा कार्तिकेयाचा भक्त असल्याने, याच्या नाण्यांवर कार्तिकेय मोठ्या प्रमाणावर दिसू लागतो. त्याने सोन्याच्या नाण्यांमध्ये काही नवे प्रकारही सुरू केले. जसे, सिंहमहेंद्र छाप (सिंहाला बाण मारणारा राजा), महेंद्रगज छाप (हत्तीवर बसलेला राजा), सिंहनिहंता महेंद्रगज छाप (हत्तीवर बसून सिंहाची शिकार करणारा राजा) इ. याच्या चांदीच्या नाण्यांमध्ये गरुड छाप, त्रिशूळ छाप, मोर छाप असे प्रकार पडतात. याठिकाणी पुढील बाजूस राजाचा चेहरा दाखविलेला आहे. तर स्कंदगुप्ताच्या चांदीच्या नाण्यांमध्ये नंदी छाप हे नवे नाणे दिसून येते.

- **नाण्यांचे, प्राचीन भारताच्या इतिहासलेखनचे एक साधन म्हणून महत्त्व :**
- नाणी हे प्राचीन भारताच्या इतिहासलेखनाचे एक महत्त्वाचे साधन आहे.
- नाण्यांच्या शोधावरून आपल्याला एका विशिष्ट काळातील विविध प्रदेशातील आर्थिक संबंध कळून येतात.
- नाण्यांमुळे कित्येक अज्ञात राजांचा आपल्याला शोध लागला. जसे जवळ-जवळ ४२ ग्रीक राजे हे आपल्याला नाण्यांमुळेच लक्षात आले.
- शकांच्या नाण्यांवरून आपल्याला राजा आणि वारसदार या दोघांची नावे मिळतात. त्यामुळे आपल्याला संगतवार राजांचा क्रम लावता येतो.
- नाण्यांवर शक राजांनी तिथी लिहिण्यास सुरुवात केली. त्यामुळे आपल्याला कालक्रम समजायला मदत होते.
- नाण्यांवरील लेखामुळे, विशेषत: द्वैभाषिक लेखांमुळे आपल्याला ज्ञात भाषेच्या आधारे अज्ञात भाषा समजू शकतात.
- नाण्यांतील लेखांवरून, ज्याप्रमाणे विविध प्रभाव कळून येतात त्याचप्रमाणे भाषा आणि लिपीचा विकासही कळून येतो.
- नाण्यांतील धातूच्या प्रमाणावरून आर्थिक परिस्थिती कळून येते. जसे, कुशाण आणि गुप्तांच्या नाणेसंचामध्ये सोन्याचे मोठे प्रमाण त्यांच्या काळातील समृद्धी दाखवते.
- नाण्यांवरून, राजाचा धार्मिक कल दिसून येतो. जसे गुप्तांच्या नाण्यांच्या पुढील बाजूस गरुडध्वज आहे तर मागील बाजूस लक्ष्मी. म्हणजेच ते वैष्णव असावेत असे कळते.

- नाण्यांवरील देवतांवरून राजाचे धार्मिक धोरणही समजते. जसे कुशाणांच्या नाण्यावर ग्रीक, भारतीय, पर्शियन देवतांचा आढळ होतो. असे लक्षात येते की हे राजे परमतसहिष्णू होते. अर्थात, त्याचबरोबर हेही कळते की वैविध्यपूर्ण प्रदेशावर राज्य करताना या राजाने वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारला असावा.

अशा प्रकारे नाण्यांचे हे महत्त्व असल्याने, नाणकशास्त्र हे इतिहासाचे एक महत्त्वाचे सहाय्यकारी शास्त्र आहे हे कळून येईल. नाशिकजवळील अंजनेरी याठिकाणी Indian Institute of Numismatic Research ही संस्था विशेषकरून नाणकशास्त्राचा अभ्यास करते. लोकांना शिकविण्यासाठी छोटे-छोटे अभ्यासक्रम राबवते आणि वस्तुसंग्रहालयही चालवते.

**स्वयंअध्ययन प्रश्न-२**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. अलाहाबादची प्रशस्ती ............. या राजाबद्दल माहिती देते.

(अ) अशोक (ब) पुलकेशी दुसरा (क) समुद्रगुप्त (ड) रुद्रदामन

२. सातवाहनांचे पुराभिलेख ............. या भाषेमध्ये आहेत.

(अ) प्राकृत (ब) संस्कृत (क) तामीळ (ड) कन्नड

३. ............. हा एशियाटिक संस्थेचा संस्थापक होय.

(अ) जेम्स प्रिन्सेप (ब) अलेक्झांडर कनिंगहॅम (क) विल्यम जोन्स (ड) जॉन मार्शल

४. अशोकाने, कलिंग युद्धाचा पश्चात्ताप ............. व्या शिलालेखातून व्यक्त केलेला आहे.

(अ) १० (ब) ११ (क) १२ (ड) १३

५. दक्षिणेतील ............. या राजाने हर्षवर्धनचा पराभव केलेला होता.

(अ) गौतमीपुत्र सातकर्णी (ब) दुसरा पुलकेशी (क) नंदीवर्धन (ड) महेंद्रवर्मन

**(ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१. पुराभिलेखविद्या म्हणजे काय?

२. स्तंभालेख म्हणजे काय?

३. ताम्रपट म्हणजे काय?

४. ऐहोळ शिलालेख कोणी कोरला?

५. आहत नाणी म्हणजे काय?

### ४.३ सारांश

इतिहास हा समकालिन अशा प्राथमिक साधनांच्या आधारे लिहावा लागतो. सर्वसाधारणत: मध्ययुगीन आणि आधुनिक काळाचा इतिहास लिहिताना अशी लिखित प्राथमिक साधने आपल्याला मिळतात. मात्र प्राचीन भारताचा इतिहास लिहिताना आपल्याला साधनांची प्रचंड कमतरता जाणवते. अशावेळी इतर साहाय्यकारी शास्त्रांची मदत घेऊन आपण त्या प्राचीन भारताचा इतिहास लिहितो. जसे पुरातत्त्वशास्त्राच्या मदतीने आपण लेखनकलेच्या पूर्वीचा लाखो वर्षांचा इतिहास लिहू शकतो. मूर्तीशास्त्राच्या मदतीने आपल्याला कलेचा विकास तर कळतोच. शिवाय विविध संप्रदायांचा विकास, त्यांच्यातील आदान-प्रदान आपल्याला कळते. तर नाणकशास्त्राच्या मदतीने आपल्याला अनेक अज्ञात राजे कळून येतात. त्याचप्रमाणे आपल्याला आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीही कळून येते. तसेच आलेखांच्या अभ्यासाने एखाद्या राजाचे कर्तृत्त्व, त्याचे घराणे, त्याचे विचार, भूमिका, धोरण आदी बाबी कळून येतात.

### ४.४ पारिभाषिक संज्ञा

**ताम्रपाषाणयुग :** ज्या काळातील मानव तांब्याच्या आणि दगडी साधनांचाही वापर करत असे ते युग.

**कालिबंगन :** राजस्थानमधील एक हडप्पा संस्कृतीचे स्थळ.

**कुशाण :** इ.स.च्या पहिल्या शतकातील मध्य आशियातून आलेले परकिय राजे.

**सुवर्णकाळ :** गुप्त साम्राज्याच्या काळाला 'सुवर्णयुग' असे म्हणले जाते. स्थैर्य, शांतता, समृद्ध शेती आणि उद्योग, वैभवशाली व्यापार, परदेशातील वसाहती, सोन्याची नाणी, कला-स्थापत्यामध्ये सर्वोच्च विकास, उच्च दर्जाचे वाङमय, विज्ञानाचा विकास ही या काळाची ठळक लक्षणे होती.

### ४.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

**स्वयंअध्ययन प्रश्न-१**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. कोळसा २. शिव ३. पार्श्वनाथ

४. ग्रीकांच्या ५. लकुलिश

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. मानवाने निर्हेतूकपणे आपल्या मागे सोडलेल्या भौतिक अवशेषांचा अभ्यास करून, त्याद्वारे त्या मानवाचा इतिहास अभ्यासणारे शास्त्र म्हणजे पुरातत्त्वशास्त्र (Archaeology) होय.

२. निरनिराळ्याा काळामध्ये, वस्ती एकावर एक अशा स्वरुपात झाल्यामुळे असे मातीचे ढिगारे तयार झालेले असतात. हे ढिगारे पांढऱ्या मातीचे असतात. त्यामुळे त्यांना 'पांढरी', 'पुरातत्त्वीय टेकाड' (Archaelogical Mound) असे म्हटले जाते.

३. मूर्तींचा अभ्यास करणारे ते मूर्तीशास्त्र (Iconography) होय.

४. मूर्तीशास्त्रासंबंधी जे प्राचीन ग्रंथ आहेत त्यांनी विशिष्ट देवतांची काही विशिष्ट वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. मूर्ती/शिल्प तयार करताना ही वैशिष्ट्ये लक्षात घेणे हे अपेक्षित असते. अशा वैशिष्ट्यांना/संकेतांना 'लक्षण' असे म्हटले जाते.

५. एकाच मूर्तीमध्ये शिव आणि विष्णू. त्यावरील अलंकार त्या-त्या देवतेच्या लक्षणानुसार असत. शैव आणि वैष्णव पंथांमध्ये सलोखा निर्माण करण्यासाठी विष्णूचे हे स्वरुप निर्माण झाले.

**स्वयंअध्ययन प्रश्न-२**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. समुद्रगुप्त २. प्राकृत ३. विल्यम जोन्स

४. १३ ५. दुसरा पुलकेशी

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. जुने लेख म्हणजे पुराभिलेख आणि त्यामधील प्राचीन कोरीव लेखांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे 'पुराभिलेखविद्या' (Epigraphy) होय.

२. एकाच दगडाने बनवलेल्या खांबावर ज्यावेळी आलेख कोरलेला असतो त्यावेळी त्याला 'स्तंभालेख' असे म्हणतात.

३. ज्यावेळी तांब्याच्या पत्रावर आलेख कोरलेले असतात त्यावेळी त्यांना 'ताम्रपट' असे म्हणतात.

४. रविकिर्ती

५. आहत याचा अर्थ आघात केलेली. धातूच्या तुकड्यावर आघात करून काही चिन्हे उमटवली जातात. म्हणून त्यांना आहत नाणी किंवा Punch Marked Coins (PMC) असे म्हटले जाते.

## ४.६ स्वाध्याय

**(अ) टीपा द्या.**

१. पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासातील टप्पे

२. विष्णूमूर्तीची लक्षणे

३. अशोकाचे शिलालेख

४. पुराभिलेखाचे उद्देश

५. गुप्त नाणी

**(ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. मूर्तीशास्त्र म्हणजे काय ते सांगून, शिवमूर्तीची लक्षणे स्पष्ट करा.

२. पुराभिलेखविद्या म्हणजे काय ते सांगून, दुसऱ्या पुलकेशीच्या प्रशस्तीची माहिती द्या.

३. नाणकशास्त्र म्हणजे काय ते सांगून आहत नाणींची माहिती द्या.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. देव, शां. भा., पुरातत्त्वविद्या, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७६.

२. ढवळीकर, म. के., प्राचीन भारतीय नाणकशास्त्र, महाराष्ट्र राज्य ग्रंथनिर्मिती मंडळासाठी कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, २००६ (प्रथम आवृत्ती : १९७५)

३. गोखले शोभना, पुराभिलेखविद्या, महाराष्ट्र राज्य ग्रंथनिर्मिती मंडळासाठी कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७५

४. जोशी नि. पु., भारतीय मूर्तीशास्त्र, महाराष्ट्र राज्य ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९७९

५. देगलूरकर गो. ब., विष्णूमूर्ती नमस्तुभ्यम, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१३

६. देगलूरकर गो. ब., शिवमूर्ती, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१४